# श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे विचारधन

(भाग एक)



दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा

# विचारधन

## भाग पहिला

## श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्याशी सुसंवाद

डॉ. शरद्‌चंद्र कोपर्डेकर

इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा

❐ **विचारधन - भाग पहिला**

*डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर*
*६०१, मेरीलँड कॉर्नर*
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड*
*सायन (पूर्व) मुंबई ४०० ०२२*
*दूरध्वनी : ४०७२३६८ / ४०७२११५*

❐ *ISBN-81-7418-133-4*
*Vichardhan - Part One (Marathi)*
*Dr. Sharadchandra Kopardekar*

❐ **प्रकाशक**
*श्याम दयार्णव कोपर्डेकर*
*इंद्रायणी साहित्य प्रकाशन*
*२७३, शनिवार पेठ, पुणे- ३०*
*दूरध्वनी : ४४५८५१८*

❐ ©सौ. पौर्णिमा कोपर्डेकर

❐ **प्रकाशन दिनांक**
२ मे, १९९९

❐ **मुखपृष्ठ सजावट व मुद्रक**
*सुगम मुद्रण,*
*माहीम, मुंबई - १६.*

❐ **सेवाभावी मूल्य - पन्नास रुपये**

卐卐卐

# श्रीदत्तमहाराज

आणि

# सौ. आईसाहेब

यांचे

चरणी

भक्तीभावे

अर्पण

卐卐卐

श्री गुरु:शरणम्

# ॥ अनुक्रमणिका ॥


| | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| प्रकाशकाचे मनोगत | ५ |
| मनोगत - पहिल्या आवृत्तीच्या निमित्ताने | १२ |
| मनोगत - दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने | १४ |
| ऋणनिर्देश | ४० |
| श्रीदत्तमहाराज कवीश्वर-विसाव्या शतकांतील थोर वेदान्ती | ४१ |
| सौ.लक्ष्मीबाई कवीश्वर - अल्पचरित्र व विभूतीविशेष | ५४ |
| **विचारधन -** | |
| (साधकांचे प्रश्न आणि श्रीदत्तमहाराजांची उत्तरे यांचे संकलन) | |
| १. साधकांच्या मनांत येणाऱ्या सर्वसामान्य शंकांविषयी प्रश्नोत्तरे | ६३ |
| २. साधकाची अवस्था व मनोभूमिका ओळखून मार्गदर्शन केले त्यावेळी झालेली संभाषणे | १२२ |
| ३. मोठ्या कौटुंबिक आघातानंतर झालेली संभाषणे | १७१ |
| ४. नाममंत्र मिळाल्यानंतर साधनेला प्रारंभ करतांना साधकाच्या मनांत येणाऱ्या शंकांविषयी प्रश्नोत्तरे | १९५ |
| ५. साधनामार्गावरील विशिष्ठ टप्प्यावर साधक आल्यानंतर झालेली संभाषणे | २१४ |
| ६. साधना तीव्र करण्यासाठी सद्गुरूंनी दिलेल्या सूचनांसंबंधी प्रश्नोत्तरे | २२६ |
| ७. आत्मसाक्षात्काराच्या अवस्थेसंबंधी झालेली प्रश्नोत्तरे | २४४ |
| डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर यांचे प्रकाशित झालेले संत साहित्य | २५० |

## ॥ प्रकाशकाचे मनोगत ॥

“विचारधन भाग-१” ह्या पुस्तकाची दुसरी आवृत्ती आम्ही वाचकांच्या हातात देत आहोत. साधकांचे प्रश्न आणि त्या प्रश्नांना श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांनी दिलेली उत्तरे यांचे ध्वनिफितींवरून केलेले हे संकलन आहे. आमचे बंधू डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर यांनी लिहिलेले श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे चरित्र आणि श्रीदत्तमहाराजांनी साधकांच्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरांचे तीन भागात केलेले संकलन-विचारधन ही पुस्तके आम्ही प्रकाशित केली हा आमच्या दृष्टीने अभिमानाचा विषय आहे.

“श्रीदत्तमहाराज कवीश्वर - चरित्र आणि विचारधन (विचारधन भाग-२ सह)” हे पुस्तक गेल्या वर्षी आम्ही सादर केले. वाचकांनी ते अक्षरशः डोक्यावर घेतल्याने एकाच वर्षात या पुस्तकाच्या पाच आवृत्त्या निघाल्या. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची विचारसंपदा (विचारधन भाग-३) हे पुस्तक ३ जानेवारी, १९९९ रोजी प्रकाशित केले. त्यालाही असाच उत्तम प्रतिसाद मिळाला. पंधरा दिवसांतच पहिली आवृत्ती संपल्याने तातडीने दुसरी आवृत्ती छापावी लागली. अनेक वाचक “विचारधन भाग-१” या पुस्तकाची मागणी करीत होते. परंतु भगवती प्रकाशन, पुणे यांनी ऑक्टोबर १९९५ मध्ये काढलेली पहिली आवृत्ती कधीच संपली होती. भगवती प्रकाशनच्या संमतीने आम्ही ‘विचारधन भाग-१’ची दुसरी आवृत्ती काढत आहोत. पहिल्या आवृत्तीतील सर्व प्रश्नोत्तरे यांत समाविष्ट आहेतच. त्यांत आणखी नवीन प्रश्नोत्तरांची भर घातली आहे. शिवाय श्रीदत्तमहाराज,

सौ. लक्ष्मीबाई आईसाहेब व प. पू. सौ. ताईमहाराज यांची रंगीत चित्रेही यांत समाविष्ट केलेली आहेत.

प्रस्तुत पुस्तक प्रकाशित होत असतांना श्रीदत्तमहाराज व त्यांच्या सहधर्मचारिणी सौ. लक्ष्मीबाई आईसाहेब दोघेही स्थूल देहाने आपणामध्ये नाहीत याचे वाईट वाटते. सौ.आईसाहेबांनी १० जानेवारी, १९९९ रोजी आणि श्रीदत्तमहाराजांनी १ मार्च, १९९९ रोजी देह ठेवला. परंतु संतमहात्मे सूक्ष्म रूपांत असतातच. त्यांचे विचार, तत्त्वे व आदर्श यांच्या रूपांतही अस्तित्त्व जाणवत रहाते आणि त्यांचे मार्गदर्शन होत रहाते हेही खरे आहे.

'विचारधन'चे तीन भाग अभ्यासले म्हणजे साधकांच्या मनांत येणाऱ्या जवळ जवळ सर्व प्रश्नांना उत्तरे मिळतात. हे विवेचन सनातन परंपरेला पूर्णतया धरून आहे. भारताचे अध्यात्मशास्त्र विशुद्ध स्वरूपांत या उत्तरांमधून श्रीदत्तमहाराजांनी प्रभावीपणे आपल्यापुढे ठेवले आहे.

श्रीदत्तमहाराज कवीश्वर ही विभूती म्हणजे थोर साक्षात्कारी संतांच्या परंपरेतील एक तेजस्वी रत्न आहे. धर्मप्रबोधन करण्यासाठी अवतरणाऱ्या ईश्वरी शक्तीचे परिपूर्ण रूप श्रीदत्तमहाराजांच्या रूपाने आपल्याला पाहायला मिळते. सर्व भूतमात्रांत ईश्वर पाहणारे हे निखळ साधुपुरुष. महाकवीची प्रतिभा, ऋतंभरा प्रज्ञा, अलौकिक धारणाशक्ती आणि ईश्वरी मेधाशक्ती जन्मतः बरोबर घेऊन आलेले. सनातन परंपरेतील विशुद्ध ज्ञान आजच्या भाषेत समाजापुढे मांडणारे प्रज्ञावंत भाष्यकार. वेदान्ताचा संदेश प्रसारित करण्यांतच त्यांनी संपूर्ण

आयुष्य व्यतीत केले. आपल्या प्रवचनांतून आणि भागवतसप्ताहांतून ते रसाळ कथाही सांगायचे आणि भारतीय संस्कृतीतील थोर मूल्ये, तत्त्वे व आदर्श श्रोत्यांच्या मनांत रूजवायचे. जे कांही सांगत ते त्यांनी स्वतःच्या आचरणांत आणलेले होते. म्हणूनच त्यांचा थोर आचार्य असा उल्लेख केला जातो. वेदान्त व इतर शास्त्रग्रंथ त्यांनी पूर्वायुष्यांत केवळ अभ्यासले होते असे नाही तर त्यातील सर्व अनुभूती त्यांनी स्वतः घेतल्या, स्वतःमध्ये मुरवल्या होत्या आणि त्या अनुभूती शिष्यांना देण्याचे सामर्थ्यही त्यांच्याजवळ पूरेपूर होते. अनुभूतीची प्रभा विचारधनमध्ये जागोजागी प्रकट झालेली दिसते. श्रीदत्तमहाराजांच्या शब्दांना ऋतंभरा प्रज्ञेचा आणि परतत्त्वाचा स्पर्श झालेला दिसतो. म्हणूनच साधकांच्या प्रश्नांना त्यांनी दिलेली उत्तरे सोप्या भाषेत व ठाम शब्दांत आहेत. ते विवेचन शास्त्रग्रंथांना पूर्णतया धरून आहे. श्रीदत्तमहाराजांचे शब्द आधी येतात आणि शास्त्रार्थ धावत येऊन त्या शब्दांत समाविष्ट होतो असे म्हणावे इतके हे विवेचन शास्त्राला धरून आहे.

''विचारधन''च्या तीन भागांच्या मालिकेतून संपूर्ण वेदान्त तत्त्वज्ञान विशुद्ध स्वरूपांत एकत्रित स्वरूपांत उपलब्ध झाले आहे. ही तीन पुस्तके वाचल्यावर आध्यात्मविषयी आणखी काही वाचायचे उरतच नाही असे मत अनेक साधकांनी व्यक्त केले आहे. ही पुस्तके पुनःपुन्हा वाचली, त्यावर चिंतन व मनन केले की ईश्वरी कृपाप्रसाद होतो आणि अनेक दिव्य अनुभूती येऊ लागतात असा अनेक

साधकांचा अनुभव आहे. म्हणूनच या तीनही पुस्तकांना मराठी वाङ्मयाच्या अध्यात्मदालनांत मानाचे स्थान आहे.

श्रीदत्तमहाराज कवीश्वर अशी विभूती आहेत, ज्यांना खऱ्या अर्थाने ''गुरूणां गुरू'' असे संबोधता येईल. मोक्षविद्येचे भांडार त्यांनी फोडले आणि त्यांतील संपत्तीची लयलूट करण्यांतच आयुष्यभर धन्यता मानली. गृहस्थाश्रमी असूनही ते प्रपंचांत रमले नाहीत. वैदिक ऋषींप्रमाणेच चिंतनांतच ते मग्न राहिले. तत्त्वज्ञ महाकवीचा पिंड असल्याने भावावस्थेत जे कांही स्फुरले ते मंत्रगर्भ शब्दांत मुखांतून बाहेर पडले. सर्व शास्त्रांचे परिपूर्ण आलोचन असूनही मनोभूमिका अद्वैत भक्ताची, वृत्ती पूर्णतया पारमार्थिक. अंतःकरण ऋषीरस चाखण्यांतच रंगलेले.

श्रीदत्तमहाराजांसारख्या अलौकिक विभूतीचा प्रपंच सांभाळणे सोपे नाही. परंतु त्यांच्या सहधर्मचारिणी सौ.लक्ष्मीबाई कवीश्वर यांचा अधिकार मोठा. त्यांनी श्रीदत्तमहाराजांचा प्रपंच आणि परमार्थ दोन्ही समर्थपणे तोलून धरला. सर्व कुटुंबीयांच्या आणि शिष्यपरिवाराच्या त्या आई झाल्या. सौ. लक्ष्मीबाई आईसाहेब म्हणजे एक अलौकिक विभूतीमत्व. पतीच्या धर्मकार्यात आणि धर्माचरणांत संपूर्ण श्रद्धेने परिपूर्ण साहाय्य करणारी पत्नी हे स्त्रीचे मंगल रूप भारतीय संस्कृतीत शास्त्रकारांनी चितारले आहे आणि तिला धर्मपत्नी असे नांव दिले आहे. सौ. आईसाहेबांच्या रूपाने अशी धर्मपत्नी, परिपूर्ण सहधर्मचारिणी पाहायला मिळते. पतीच्या जीवनाशी त्या पूर्णतया एकरूप झाल्या होत्या.

श्रीदत्तमहाराज आणि सौ.आईसाहेब ही दोन विभूतीमत्त्वे एकमेकाला पूर्णतया पूरक होती, एकरूप झालेली होती. दोघांचे आचार, विचार व वागणूक एकाच व्यक्तीचे असावे असेच व्हायचे. भारतीय संस्कृतीतील ''दोन देह एक मन'' हा दांपत्यजीवनाचा आदर्श या दोघांमध्ये पूर्णतया साकार झालेला होता. म्हणूनच सौ.आईसाहेब या खऱ्या अर्थाने पतीची ''अर्धांगी'' होत्या. सौ.आईसाहेबांनी देह ठेवल्यावर श्रीदत्तमहाराजांनीही पाठोपाठ कांही दिवसांतच देह ठेवावा हा केवळ योगायोग नाही. पतीपत्नीच्या परिपूर्ण सहजीवनाचा तो एक आगळा आविष्कार आहे. सौ.लक्ष्मीबाई आईसाहेबांवरील एक लेख या पुस्तकांत समाविष्ट केला आहे. हे पुस्तक श्रीदत्तमहाराज व सौ.आईसाहेबांना अर्पण केले आहे.

या पुस्तकाच्या निमित्ताने पुन्हा एकदा आमचे बंधू डॉ. शरद्‌चंद्र कोपर्डेकर यांच्याबद्दल लिहावेसे वाटते. आमचा दोघांचाही जन्म संतश्रेष्ठ श्रीकृष्णदयार्णव यांच्या वंशात झालेला आहे. श्रीकृष्णदयार्णव हे संत सतराव्या शतकांत अवतीर्ण झाले आणि त्यांनी भागवताच्या दशम स्कंधावर 'हरिवरदा' ही टीका रचली. अनेक स्फुट अभंगही रचले. 'हरिवरदा' म्हणजे श्रीकृष्णचरित्र ओव्यांतून रचलेले. त्यांतून तत्त्वचिंतनाची गुंफण आहे. हा ग्रंथ म्हणजे मराठी वाङ्मयाचे फार मोठे भूषण आहे.

आमचे बंधू जन्माला येतांना संतश्रेष्ठ श्रीकृष्णदयार्णव यांचा कांही आध्यात्मिक वारसा घेऊनच आलेले असावेत. बालपणापासून त्यांना तत्त्वचिंतनाची गोडी आहे. असामान्य बुद्धीमत्तेची देणगी असल्याने

विद्यार्थीदशेत बहुतेक परीक्षांतून ते पहिले आले. त्यांचे शिक्षण कॉमर्स व मॅनेजमेंट या शाखांतील. व्यवसायही त्या क्षेत्रांतला. पण स्वभाव तत्त्वचिंतनाचा, लेखन व वाचन यांतच रमणारा. अध्यात्मचर्चा मनापासून भावणारा. त्यामुळे व्यावसायिक क्षेत्रांत उच्च पदावर राहूनही त्यांचे आंतरिक जीवन आध्यात्मिक ओढीने भारलेलेच राहिले. बँकेत आणि मोठ्या कंपनीत १८ वर्षे उच्च अधिकारी म्हणून त्यांनी नोकरी केली. नंतर व्यावसायिक क्षेत्रांतील मोठ्या पगाराची नोकरी सोडून ते शिक्षणक्षेत्राकडे वळले तेही या तत्त्वचिंतनाच्या ओढीतूनच. गेली १७ वर्षे ते मुंबईच्या वेलिंगकर इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट या संस्थेचे संचालक म्हणून काम पहात आहेत. त्यांच्यामुळेच ही संस्था नावारूपाला आली आहे आणि जगांतील उत्तम मॅनेजमेंट इन्स्टिट्युटस्‌पैकी एक असा नावलौकिक या संस्थेला मिळाला आहे.

व्यवसायाच्या निमित्ताने आमच्या बंधूंचा देशभर प्रवास झाला, विदेशांतही पुष्कळ भ्रमण घडले. संपन्न जीवनही पाहायला मिळाले. मुंबईसारख्या मोहमयी नगरीत अनेक वर्षे सुस्थितीतील संपन्न जीवन ते जगत आहेत, पण वृत्ती विरागीच राहिली आहे. अधिकारपदावर राहूनही सौजन्य, ऋजुता व नम्रता तशीच राहिली आहेत. अनेक गौरव व पुरस्कार प्राप्त होऊनही वृत्ती निरंहकारीच राहिली आहे. व्यावसायिक काम संपताच घरी जायचे आणि ज्ञानेश्वरी किंवा एखादा अध्यात्मग्रंथ वाचण्यांत रमून जायचे ही वृत्ती आहे. कोणाच्या घरी जाणे-येणे, गप्पा करणे, पार्ट्या, मनोरंजनाचे कार्यक्रम यांची आवड

नाही. त्यापेक्षा देवळांत जाऊन देवदर्शन करणे, आश्रमांत व मठांत जाऊन साधुसंतांशी बोलत बसणे त्यांना मनापासून आवडते. मूळचा पिंड श्रद्धावंताचा, ईश्वरभक्तीचा. अनेक आघात सोसूनही ईश्वरनिष्ठा अभंगच राहिली ही ईश्वरकृपा आहे.

लेखन करण्याची आवड पहिल्यापासूनच आहे. सुमारे दोनशे लेख, पन्नासहून अधिक कथा आणि एकूण ५४ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. या पुस्तकांपैकी ३५ पुस्तके व्यापारशास्त्र, अर्थशास्त्र व व्यवस्थापनशास्त्र या विषयांवरील आहेत. यापैकी बहुतके पुस्तके महाराष्ट्र सरकारने क्रमिक पाठ्यपुस्तके म्हणून मंजूर केलेली असून त्यांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. त्याशिवाय आमच्या बंधूंनी संतसाहित्य विषयक १९ पुस्तके लिहिली आहेत. संतसाहित्याची यादी या पुस्तकाच्या शेवटी दिली आहे.

आमच्या बंधूंनी श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची दीक्षा घेतली असून त्याप्रमाणे त्यांची साधना चालू आहे. अध्यात्मक्षेत्रांतील त्यांचे इप्सित त्यांना प्राप्त होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

*२ मे, १९९९.*

**श्याम कोपर्डेकर**
*इंद्रायणी साहित्य प्रकाशन,*
*पुणे*

## ॥ मनोगत - पहिल्या आवृत्तीच्या निमित्ताने ॥

पूर्वसुकृतामुळे लहानपणापासून अध्यात्माची आवड लागली. गुरू भेटावेत म्हणून खूप हिंडलो. खूप कांही वाचत राहिलो. पण समाधान होईना. कांही उपासनाही हातून घडत नव्हती. अवचित एक दिवस श्रीदत्तमहाराज दत्त म्हणून समोर आले, मी त्यांच्याकडे गेलो असे नाही. वेळ येताच त्यांनीच मला बोलावून घेतलं व जवळ केलं असंच म्हणावे लागेल.

पहिल्या भेटीपासूनच त्यांनी मला प्रश्न विचारायला उद्युक्त केलं. पहिल्यांपासूनच हा प्रश्नोत्तरांचा संवाद सुरू झाला. सुदैवाने ते संवाद ध्वनिमुद्रित करायची बुद्धी झाली. नंतर ते संवाद लिहून ठेवत असे. हळूहळू ध्यानात येऊ लागले की दत्तमहाराज पूर्णावतार आहेत. तेच पूर्णब्रह्म आहेत. मग या पूर्णब्रह्माच्या परिपूर्ण रूपाला सद्गुरू म्हणा किंवा ईश्वर म्हणा. सुरुवातीच्या काळात खूप प्रश्न विचारावेसे वाटायचे. विचारणाऱ्याचे पूर्ण समाधान होईपर्यंत सद्गुरू उत्तरे देत राहिले. कधीही कंटाळा केलेला दिसला नाही.

आणि एके दिवशी त्यांच्याच कृपेने लक्षात आले की, हे काही खरे ज्ञान नव्हे. खरे ज्ञान म्हणजे ईश्वर सर्वत्र भरला आहे ही जाणीव. सत्‌चित्‌आनंदघनअस्ति ही प्रचिती. ती प्रचिती गुरूकृपेशिवाय येत नसते. साधकाने कितीही प्रयत्न केले तरी केवळ स्वतःच्या प्रयत्नांनी ही प्रचिती येत नसते. सद्गुरूंची प्रार्थना करीत रहायचं, पूर्णपणे शरण जायचं एवढेच साधक करू शकतो. असे शरण झाल्यावर गुरूकृपा झाली तरच भक्ती अंतःकरणात उत्पन्न होते. गुरूकृपा झाली तरच ती

द्वैत भक्ती पक्की होत जाते व गुरूकृपेनेच अद्वैत भक्तीपर्यंत पोचू शकते. हे शाब्दिक ज्ञानही गुरूकृपा झाल्याशिवाय मिळत नसतं. आणि हे शाब्दिक ज्ञान साधकाला प्राप्त झालं तरीही ती अद्वैत भक्तीची अवस्था मिळवण्यासाठी साधकाने कितीही प्रयत्न केले तरी केवळ त्याच्या प्रयत्नाने ती मिळत नाही. गुरूकृपा झाली तरच भक्त तेथपर्यंत पोचू शकतो. साधकाने प्रार्थना करीत रहायचे. गुरूकृपा झाली तरच त्या प्रार्थनेत तळमळ उत्पन्न व्हायची आणि काहीतरी व्हायचे.

परमपूजनीय सौ.ताईमहाराजांच्या रूपाने अद्वैत भक्तीचे परिपूर्ण रूप पहायला मिळाले. ब्रह्माशी एकरूप झाल्यावरही भक्ती कशी करीत रहायची व त्या भक्तीतील आनंद कसा घेत रहायचा हे त्यांच्या रूपाने प्रत्यक्ष पहायला मिळाले. हाच सद्चिदानंद. तो प्रत्यक्ष पहाण्याचे भाग्यही गुरूकृपेनेच मिळाले. मग वाटले, शब्द संपायला हवेत. मौनातूनच काही मिळाले तर मिळेल. प. पू. सौ. ताईमहाराजांच्या आज्ञेनेच हे प्रश्नोत्तरांच्या रूपातील सद्गुरूंचे विचारधन - ज्याला ब्रह्मज्ञान म्हणता येईल - ते आज प्रकाशित होत आहे.

आता जाणवते की, ही प्रश्नोत्तरे म्हणजे सर्व वेद, उपनिषदे व पुराणे यांचे सार आहे. एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर जग असतांना ज्या सामाजिक व सांस्कृतिक समस्या निर्माण झाल्या आहेत, त्यांच्या पार्श्वभूमीवर हे विचारधन प्रकट झाले आहे. त्या दृष्टीने त्याचे महत्त्व खूपच वाढले आहे. हे साक्षात् पूर्णब्रह्म ईश्वराचे शब्द असल्यामुळे या

प्रश्नोत्तरातील उत्तरांना भगवद्गीतेचे माहात्म्य आहे. साधकाला पैलतीराला नेण्याचे सामर्थ्य या शब्दात निश्चितच आहे.

सद्गुरूंची भेट झाल्यावर मी जेव्हा जेव्हा त्यांच्या पुढे जाई, तेव्हा मनांत प्रश्न येत ते सद्गुरूंच्या प्रेरणेनेच. ते प्रश्न विचारायचे धाडसही त्यांच्या कृपेनेच आले. पण ही उत्तरे केवळ माझ्यासाठीच नव्हती. प्रतीतीजन्य ज्ञानधन जगापुढे पुन्हा मांडावे हा सद्गुरूंचा संकल्प होता. तो त्यांनीच पुरा केला. मी केवळ निमित्त. तेव्हा ही प्रश्नोत्तरे प्रकाशित करणेच उचित आहे. प्रश्नोत्तरे वाचणाऱ्यांवर गुरूकृपा व्हावी अशी सद्गुरूचरणी प्रार्थना आहे.

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरूदेवदत्त ॥**

१ सप्टेंबर, १९९५ **डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर**

***

## ॥ मनोगत - दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने ॥

**भारतीय** परंपरा सांगते - आध्यात्मिक वाटचाल केवळ स्वतःच्या प्रयत्नांनी होत नाही. त्यासाठी सद्गुरुकृपा व्हावीच लागते. सद्गुरू भेटतात तेही भाग्याने. भेटले तरी ओळखता येतातच असे नाही. त्यांची ओळख पटते तीही भाग्याने. सद्गुरूंची सेवा घडणे, त्यांच्या

आज्ञेचे पालन होणे, त्यांची कृपा होणे या सगळ्या पुढच्या गोष्टी आहेत.

माझं भाग्य मोठं. जन्म मिळाला तो संतश्रेष्ठ श्रीकृष्णदयार्णव यांच्या वंशात. आई व आजी श्रद्धावंत, परंपरेवर पूर्ण विश्वास असणाऱ्या. वडीलांचा पुस्तक विक्रीचा व्यवसाय असल्यामुळे खूप संतसाहित्य वाचायला मिळाले. त्यामुळे त्या वयांतच वाटायला लागले - ध्रुव आणि प्रल्हाद यांच्याप्रमाणेच आपल्यालाही देव भेटावा, देवाची भक्ती करावी. शालेय वयातच गीता वाचली. मनाला खूप भावली. वाटायला लागलं, गीतेत सांगितल्याप्रमाणे आपणही स्थितप्रज्ञ व्हावं, गुणातीत व्हावं, भक्त व्हावं. तेच आपल्या आयुष्याचे ध्येय. त्यासाठी सद्गुरू भेटावेत, त्यांचे निरपेक्ष प्रेम मिळावं.

प्रवासाची आवड होतीच. नोकरीच्या निमित्तानेही खूप भ्रमण घडलं. देशभर अनेकवेळा फिरलो. गेलो तिथे देवळे, मठ, आश्रम पहात राहिलो. अनेक थोर साधु भेटले. त्यांच्याशी बोलायलाही मिळाले. पण सद्गुरू मिळाले असे वाटत नव्हते. वर्षामागून वर्षे उलटत चालली. सुखदुःख येतजात होती. जबाबदाऱ्या वाढत होत्या, आशानिराशा आणि अनुकूल प्रतिकूल यांचा खेळ चालूच राहिला. विविध विचारप्रणाल्या डोळसपणे पहात राहिलो. अनेक अध्यात्मग्रंथ अभ्यासत राहिलो. नोकरी, अधिकार, पैसा असं सगळं ऐहिक खूप मिळालं. तरी समाधान होत नव्हतं. वयाचं पन्नासावं वर्ष संपलं तरीही ती अनभूती येत नव्हती. कितीही चालत राहिलं तरीही क्षितीज दूरच जात राहातं, तसं स्थितप्रज्ञ व गुणातीत होण्याचं ध्येय दूरच जात आहे

असं वाटायला लागलं. ते ध्येय म्हणजे मृगजळ असावं असेही विचार मनांत यायला लागले. मग मात्र मी उध्वस्त झाल्यासारखा झालो. कशाकरिता जगायचं हेच मला कळेना.

आणि एकेदिवशी अचानक 'श्रीदत्तमहाराज' सद्गुरू म्हणून माझ्या समोर आले. मी त्यांच्याकडे गेलो असे नाही. वेळ येताच त्यांनीच मला बोलावून घेतलं आणि माझ्यावर कृपा केली. वास्तविक मी शाळेत असतांना टिळकमहाराष्ट्र विद्यापीठांत संस्कृतच्या वर्गांना जायचो, तेव्हा त्यांना तिथं पाहिलं होतं. माझ्या विवाह सोहळ्यात श्वशुरांच्या बाजूने गुरू म्हणून उपस्थित राहून त्यांनी आशीर्वादही दिले होते. नंतर वासुदेवनिवासमध्ये एकदोनदा दर्शनही झालं होतं. पण ते माझे सद्गुरू आहेत याची पुसटशी जाणीवही झाली नव्हती. एक दिवस अचानक श्रीदत्तमहाराजांच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यांत प्रवचन करण्याचं निमंत्रण श्रीमती नीलाताई जोशी यांच्यामार्फत आलं. त्यासाठी पुण्याला वामननिवासमध्ये गेलो. सहस्त्रचंद्रदर्शनाचा भव्य सोहळा, हजारो शिष्य, साधक, अनेक शास्त्रीपंडित जमलेले, हे सगळं पाहिलं आणि जाणीव झाली की श्रीदत्तमहाराज फार मोठे संत आहेत. नीलाताईंनी आईसाहेबांची ओळख करून दिली आणि श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनासाठी आतल्या खोलीत नेलं. मोठ्या श्रद्धेनं नमस्कार करून मी बाहेर आलो. बोलणं असं कांही झालंच नाही. ठरलेल्या वेळी श्रोत्यांसमोर ज्ञानेश्वरीतील भक्तीविषयी प्रवचन केलं आणि मुंबईला परतलो.

श्रीदत्तमहाराजांना पुन्हा भेटावसं वाटत होतं. मनांतून एक अनामिक ओढ जाणवत होती. पण वाटलं की श्रीदत्तमहाराज एवढे मोठे पीठाधिपती, हजारोंच्या भक्तवृंदाचे गुरू, महाज्ञानी, प्रकांड पंडित, शास्त्रपरंपरेतून वाढलेले, सनातनी परंपरेप्रमाणे निष्ठेने जीवन जगणारे. आणि मी अगदी विरूद्ध टोकाचे जीवन जगणारा. आधुनिक इंग्रजी शिक्षण घेतलेला, मॅनेजमेंट इन्स्टिट्युटमध्ये काम करणारा, संपन्न ऐहिक जीवन जगणारा, उच्चभ्रू लोकांमध्ये वावरणारा, संस्कृतचा आणि परंपरेचा अभ्यास नसलेला. वाटलं, श्रीदत्तमहाराजांची व माझी स्थिती दोन ध्रुवांसारखी आहे. त्यांच्याजवळ मला कसं काय जाता येईल? त्यांच्याशी बोलायची एक संधी मिळाली तरी ते खूप होईल.

पण माझं भाग्य थोर. सद्गुरूंनीच मला जवळ करण्याचा संकल्प केलेला होता. श्रीमती नीलाताई जोशी सातत्याने मला फोन करू लागल्या. महाराजांकडे मी जावं, त्यांच्याशी बोलावं असे आग्रहाने पुनःपुन्हा सांगू लागल्या. त्यामुळे पुण्याला श्रीदत्तमहाराजांकडे मधूनमधून माझं जाणं होऊ लागलं. पुण्याला जाऊन आलो की श्रीदत्तमहाराजांशी काय बोलणं झालं याची नीलाताई आग्रहाने चौकशी करायच्या, श्रीदत्तमहाराजांचे मोठेपण सांगायच्या. वयाने त्या माझ्या आईच्या वयापेक्षाही जास्त. पण त्यांनी मला भाऊ मानलं आणि वडीलबहिणीच्या अधिकाराने श्रीदत्तमहाराजांशी सुसंवाद साधायला त्या मला सांगत राहिल्या. त्यांनीच मला पुण्याला, वाडीला आणि नाशिकला बरोबर नेले आणि श्रीदत्तमहाराजांशी भरपूर

बोलण्याची संधी मिळवून दिली. मुंबईला नीलाताईंच्या घरीही श्रीदत्तमहाराजांचं दर्शन घडलं.

आणि एक दिवस नीलाताई मला म्हणाल्या, "महाराज तुमची वाट पहात असतात. तुम्ही जास्त वेळा महाराजांकडे जायला पाहिजे." मला वाटले, श्रीदत्तमहाराज वासुदेव निवासचे उत्तराधिकारी, हजारो शिष्य असलेले पीठाधीश्वर. माझ्यासारख्या सामान्य जीवाची ते कशाला वाट पाहतील? माझ्यावरच्या मायेपोटी नीलाताई उगीचच काहीतरी सांगतात झालं !

पण एका अनामिक ओढीने मी झपाटल्यासारखा झालो. पुनःपुन्हा श्रीदत्तमहाराजांकडे जात राहिलो, त्यांना प्रश्न विचारीत राहिलो, संभाषणे ध्वनीमुद्रित करीत राहिलो. मुंबईहून मी डॉ. अशोकमहाराजांना फोन करायचो. संध्याकाळी 'रेणुकानिवास'मध्ये येतो हा निरोप द्यायचो. श्रीदत्तमहाराज तयार होऊन वाट बघत बसायचे. 'मी आलो कां' अशी अधीरतेने तीनतीनदा चौकशी करायचे.

एके दिवशी डॉ. अशोकमहाराजांनी मला सांगितले, "महाराज आपली वाट पहात असतात. आपण सांगितलेल्या वेळेला आला नाहीत तर सांगावं लागतं की स्टेशनवर फोन केला आहे, गाडी लेट आहे." हे वाक्य ऐकलं आणि माझ्या भाग्याची जाणीव झाली. सद्गुरूंना या सामान्य जीवाची करूणा आली होती. दयाबुद्धीनंच त्यांनी मला जवळ केलं होतं. त्यांच्या चरणप्रांती मला आसरा दिला होता. बरं वाटलं. काहीसं निश्चिंत झाल्यासारखं वाटलं.

माझं प्रारब्ध खडतर असावं. कांही वर्ष व्यावहारिक अडचणी व संकटांची मालिका सुरू राहिली. पण पावलं डगमगली नाहीत, धीर खचला नाही. सद्गुरूंचा आधार होता. त्यांचं कृपाछत्र होतं. त्यामुळे मनांतील श्रद्धा वाढतच राहिली. सद्गुरूंच्या भेटी चालूच राहिल्या. बोलता बोलता एकदा सद्गुरूंनी मला सांगितलं, ''गुरूकृपेने समाधान प्राप्त होतं. प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साधतात.'' मला वाटलं, 'होय! प्रपंच व परमार्थ दोन्ही जबाबदाऱ्या आता सद्गुरूंनी घेतल्या आहेत. आता काळजीचे कारण नाही.'

वर्षे उलटत होती. सद्गुरूंकडे जातच राहिलो. कधी नुसतं दर्शन मिळायचं तर कधी सद्गुरूंशी बोलायची संधीही मिळायची. पण अपार प्रेम मिळतच राहिलं. कशाचीही अपेक्षा न ठेवता, सद्गुरू प्रेमाचा वर्षाव करीत राहिले. ते प्रेम अनुभवतांना धन्य झाल्यासारखं वाटलं. तोपर्यंतच्या आयुष्यात मित्रांचं आणि नातलगांचं प्रेम केवळ दिल्याघेतल्याचं असतं हे लक्षात आलं होतं. पण सद्गुरूंचं प्रेम पूर्णपणे 'अनपेक्ष' होतं. ''ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती'' या श्रीज्ञानदेवांच्या उक्तीप्रमाणे होतं. असे 'अनपेक्ष' प्रेम सद्गुरूंशिवाय कोण करू शकेल ?

ऐकलं होतं की श्रीदत्तमहाराज फार अबोल आहेत, गंभीर आहेत, विरक्त आहेत. पण मला दिसले ते नेहमी प्रसन्न, संतुष्ट, तृप्त असेच दिसले. चेहऱ्यावर आनंद ओसंडतो आहे असेच दिसते. श्रीदत्तमहाराजांना मी विचारलेले प्रश्न अनेकवेळा बालबुद्धीचे होते. ते प्रश्न ऐकून सद्गुरू अगदी खळखळून हसायचे. ते हास्य निरागस

बालकाप्रमाणे असायचं, निर्मळ असायचं. ते हास्य ऐकणं हा एक आगळाच आनंद आहे असं वाटायचं. मग लक्षात आलं की अकाम संतमहात्माच पूर्ण आनंदी असतो. कारण त्याचा आनंद आत्मानंद असतो.

आमची कांही संभाषणं ध्वनीफितींवरून लिहून काढली. टंकलिखित करून घेतली. अनेकांना ती आवडली. जालन्याला सौ.ताईमहाराजांना कांही पानं वाचून दाखविली, तेव्हा त्या भावविभोर झाल्या. जेवायला बसल्या होत्या तर ते ताट बाजूला सारलं आणि म्हणाल्या- ''खरं जेवण मिळाले, पोट भरले.'' त्यांच्या डोळ्यांत पाणी होतं. हे विचारधन ताबडतोब प्रकाशित करावे अशी त्यांनी आज्ञा केली. त्यांच्या आज्ञेप्रमाणे विचारधन भाग - १ प्रसिद्ध झाला. तो चांगला खपला. मग भाग-२ व भाग- ३ प्रसिद्ध झाले. दुसऱ्या भागात श्रीदत्तमहाराजांचं चरित्र घातलं होतं. या पुस्तकांनी विक्रीचा इतिहास कसा निर्माण केला ही हकीगत आता सर्वांना माहितीच आहे.

विचारधनचे तीन भाग म्हणजे गुरूशिष्य संवाद आहे. शिष्याचे प्रश्न आणि श्रीदत्तमहाराजांनी दिलेली उत्तरे असे त्यांचं स्वरूप आहे. वेदान्ताचे समग्र तत्त्वज्ञान श्रीदत्तमहाराजांनी प्रश्नोत्तरांच्या रूपाने जगापुढे मांडले आहे. हे प्रश्न सर्वसामान्य साधकांच्या मनांतले आहेत. ते प्रश्न मी विचारलेले आहेत असे मला मुळीच वाटत नाही. प्रश्नही सद्गुरूंचेच आहेत आणि उत्तरेही त्यांचीच आहेत. वेदान्तातील ज्ञान आजच्या काळांतील जीवनाच्या संदर्भात पुन्हा एकदा प्रकट करावे हा श्रीदत्तमहाराजांचा संकल्प होता. मला निमित्त करून त्यांनी

हे ज्ञान प्रकट केले. अर्जुनाला निमित्त करून भगवान श्रीकृष्णांनी गीता सांगितली, तसेच येथे घडले आहे. गीता केवळ अर्जुनासाठी नाही. ती सर्व जगासाठी आहे, सर्व कालासाठी आहे. विचारधनही असेच सर्व जगासाठी आहे. कुबेराच्या भांडारालाही लाजवेल अशी संपत्ती सद्गुरूंनी विचारधनमधून जगापुढे उधळली आहे. त्यासाठी सद्गुरूंनी मला निमित्त केले हीच माझ्या आयुष्याची एकमेव खरी कमाई.

विचारधनमधील तत्त्वज्ञानाच्या मांडणीची कांही वैशिष्ट्ये आढळतात. विवेचन बोलीभाषेत आहे, सोप्या शब्दांत आहे. पारिभाषिक शब्द आणि तात्त्विक विवेचन शक्यतो टाळले आहे. वेदान्तातील तत्त्वज्ञान आचरणांत कसं आणायचं हे सांगण्यावर भर आहे. विवेचन आटोपशीर आहे, नेमके आहे, थोड्या वाक्यातच खूप कांही सांगितलं आहे. सुशिक्षित बुद्धीवादी तरूणालाही भावेल असे आहे. सुस्पष्ट आहे, ठाम शब्दांत आहे. तरीही भूमिका अनाग्रही आहे. इतरांवर टीका नाही, कसलाच अभिनिवेश नाही, दुराभिमान नाही, मीपणा, माझे अनुभव मी सांगतो आहे असं कांही नाही. एकूण भूमिका समन्वयात्मक आहे. केवळ एक विशिष्ट पंथ - संप्रदाय - भूप्रदेश - भाषिक यांच्यासाठी ते नाही, ते सर्व मानवजातीसाठी आहे, कोणालाही कुठेही आचरणांत आणता येईल असे आहे. सनातन शास्त्राला पूर्णतया धरून आहे. वेदान्ताचा गाभाच विशुद्ध स्वरूपांत आपल्यापुढे ठेवला आहे. अहंकाररहित ज्ञानी महात्मा लौकीक व्यवहारांच्या पलीकडे जाऊन सगळीकडे ब्रह्मबोधाने पाहतो आहे आणि बोलतो आहे हे सतत जाणवत राहातं.

आजच्या सामाजिक आणि सांस्कृतिक समस्यांचे भान ठेवून श्रीदत्तमहाराजांनी वेदान्तातील विचारप्रणाली मांडली आहे. आधुनिक सुखसोयींचे संपन्न जीवन आज टाळता येणार नाही हे खरे. पण आजची सुखसाधने प्रामुख्याने देहाला आराम देण्यासाठी आहेत. देहाला आराम देऊन समाधान मिळत नाही. स्वतःच्या मनांत बदल घडवून आणला तरच समाधान मिळते. ते कसं करायचं याचं सविस्तर विवेचन श्रीदत्तमहाराजांनी केलं आहे.

आधुनिक जगातील मानवासाठी सर्वसमावेशक, सर्वस्पर्शी जीवनप्रणाली मांडणे हा श्रीदत्तमहाराजांचा उद्देश आहे. कर्मकांड, क्रियाकांड, रूढी-परंपरा आणि पूजाअर्चा याबद्दल आज कोणाला फारशी ओढ नसते. धर्माचे तसले स्वरूप तरूणांना आकृष्ट करू शकत नाही, हे ओळखून श्रीदत्तमहाराजांनी वैश्विकधर्माची विराट संकल्पना विचारधनच्या माध्यमातून जगापुढे मांडली आहे. सर्व प्राणीमात्रांचे कल्याण व्हावे हा एकच संकल्प ठेवून श्रीदत्तमहाराजांनी धर्माची कक्षा एवढ्या विशाल स्वरूपांत मांडली आहे की त्यात केवळ मानवजातच सामावली आहे असे नाही. सर्व प्राणीमात्र, जडचेतन सर्व कांही त्यात सामावून घेतले आहे. धर्मसंकल्पनेचे हे विशाल आणि उदात्त स्वरूप पाहून मन मोहरून जाते, उल्हसित होते आणि भारताला अध्यात्मज्ञानाचा केवढा थोर वारसा लाभला आहे याची जाणीव होते.

सर्व प्राणीमात्र आणि जडचेतन आपले कुटुंब आहे अशा ईश्वरी भूमिकेत स्वतः श्रीदत्तमहाराज आयुष्यभर वावरत होते. त्यांनी जे कांही सांगितले तसे ते स्वतः प्रत्यक्ष जगत राहिले. विचारधनमधील

धर्मप्रणाली आचरणांत कशी आणायची याचे प्रात्यक्षिक म्हणून त्यांचे स्वतःचे जीवन आपल्या समोर आहे.

श्रीदत्तमहाराजांचे विचारधन हा तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा (Milestone) आहे असे अनेक जाणकार म्हणतात. या पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर झाले तर ते जगभर घरोघर जाईल आणि श्रीरामकृष्ण वचनामृत "(The Gospel of Shri Ramkrishna Paramhans)" या पुस्तकाप्रमाणे त्याला सर्वत्र मान्यता मिळेल असेही म्हणतात. पण एवढे मोठे काम करूनसुद्धा श्रीदत्तमहाराजांची अमानित्वाची भूमिका तशीच राहिली. विचारधनचे भाग पुढे ठेवल्यावर श्रीदत्तमहाराज म्हणाले, ''आपण सर्व जाणताच. सर्वकांही आपणच लिहून काढून उगीचच आम्हाला मोठेपणा देता आहांत.'' हे शब्द ऐकून मी बावरल्यासारखा झालो. तसेच उद्गार त्यांनी इतरांजवळही काढल्याचे ऐकताच माझ्या डोळ्यांत पाणी आले. सूर्य उगवल्यावर दाही दिशा उजळल्या की रात्रभर जो काजवा लुकलुकत होता, त्यानेच हे कार्य केले असे म्हणण्यासारखे हे झाले. श्रीदत्तमहाराज ज्या मार्गावर पावले टाकतात, त्या मार्गावरील धुळीचा कण होण्याचीही माझी पात्रता नाही. श्रीदत्तमहाराज एवढे थोर आहेत की त्यांच्या चरणावरील धुळीच्या एका कणातून ते माझ्यापेक्षाही चांगले हजारो साधक निर्माण करू शकतील. पण पूर्ण अमानित्व हाच त्यांचा स्वभाव आहे. स्वतःकडे मोठेपणा घ्यायचा नाही. काम स्वतः करायचे आणि श्रेय दुसऱ्याला द्यायचे हाच त्यांचा स्वभाव आहे.

''अमानित्व हेच ज्ञान आणि मान हेच अज्ञान'' असे श्रीदत्तमहाराज एकदा म्हणाले होते. 'पूज्यता डोळा न देखावि । स्वकीर्ति कानी नायकावि । हा अमुका ऐसी नोहे । सेची लोका ॥' ही ज्ञानदेवांची ओवी त्यांना आवडायची. ते अमानित्व श्रीदत्तमहाराजांच्या जीवनांत पूर्णपणे साकार झालेले दिसते. स्वतःला मोठेपणा मिळावा, स्वतःची कीर्ति ऐकावी, स्वतःची पूजा व्हावी असे कांही त्यांच्या मनांत कधी आलेच नाही. मान व सन्मानाचे प्रसंग त्यांनी हेतूपूर्वक टाळले. त्यांच्या प्रेरणेने होणाऱ्या मोठ्या कार्यक्रमातही ते असे वावरायचे की जणू कांही त्यांचा कशाशी कांही संबंधच नाही.

श्रीदत्तमहाराजांचा सहवास मला खूप लाभला. काही वेळा आम्ही दोघेच एकत्र होतो. अशा वेळी श्रीदत्तमहाराज अगदी मोकळेपणाने, मनांतील भावना व्यक्त करत असत. एकदा रात्री श्रीदत्तमहाराजांच्या खोलीत होतो. सौ.राजलक्ष्मी देशपांडे यांनी लिहिलेले स्वामी चिदानंद यांचे चरित्र त्यांनी नुकतेच वाचले होते. ते सांगू लागले, ''चरित्र फार चांगले लिहिले आहे. ऋषीकेशचे थोर साधु स्वामी शिवानंद यांचे स्वामी चिदानंद हे शिष्य, उत्तराधिकारी. स्वामी शिवानंदांनी देह ठेवल्यावर त्यांच्या पत्राप्रमाणे स्वामी चिदानंदांची उत्तराधिकारी म्हणून नेमणूक होणार होती. पण चिदानंदांना ते नको होते. स्वामी चिदानंद नाही म्हणणार आणि पळून जाण्याचा प्रयत्न करणार हे गुरूबंधूंनी ओळखले. त्यांनी स्वामी चिदानंदांच्या खोलीभोवती पहारा ठेवला. अज्ञातवासात निघून जाण्यासाठी मध्यरात्री स्वामी चिदानंदांनी खोलीच्या खिडकीतून बाहेर उडी घेतली. पण तेथेही गुरूबंधूंचा पहारा

होता. त्यामुळे ते जाऊ शकले नाही. नाईलाजाने उत्तराधिकारीपद त्यांना स्वीकारावे लागले. ही सगळी हकीगत या चरित्रात सविस्तर दिली आहे.''

श्रीदत्तमहाराज भावपूर्ण स्वरांत पुढे म्हणाले, ''आमचीही स्थिती वेगळी नव्हती. आम्हाला उत्तराधिकारी होण्याची मुळीच इच्छा नव्हती. गुरूमहाराजांना आम्ही अनेकवेळा तसे सांगितले होते. गुरूमहाराजांनी देह ठेवल्यावरही आम्ही उत्तराधिकारी होण्याचे टाळण्याचाच प्रयत्न केला. पण इतर विश्वस्त व गुरूबंधूंनी आम्हाला विचारले, 'श्रीगुरूमहाराजांचा प्रत्येक शब्द आजवर वेदवाक्यासारखा पाळलांत. मग हीच आज्ञा कशी काय मोडू शकता?' त्यांच्या या प्रश्नाला आमच्याजवळ उत्तर नव्हते. आमचा नाईलाज झाला.''

ही हकीगत सांगतांना श्रीदत्तमहाराजांचे डोळे पाणावले. त्यांत गुरूमहाराजांबद्दल असीम श्रद्धाही होती आणि आणखी खूप कांही होते.

उत्तराधिकारीपदाचे वाद - अगदी शंकराचार्यपदाचे वादही - न्यायालयात गेल्याची उदाहरणे आहेत. विश्वविख्यात हरेकृष्ण (इस्कॉन) पंथांतील गुरूपदाच्या वादात कलकत्ता उच्च न्यायालयाने एप्रिल १९९९ मध्ये त्या संस्थेत दीक्षा देण्यावरच तात्पुरती बंदी घातली. या बातमीच्या प्रतिक्रिया जगभर अनेक वृत्तपत्रांतून उमटल्या. एकजण लिहितात ''ज्या व्यक्तीचा अहंकार पूर्णपणे जातो, त्याच व्यक्तीच्या माध्यमांतून ईश्वरी कृपा होऊ शकते. तीच व्यक्ती गुरूपदाला पात्र असते. 'मीच गुरू, मीच दीक्षा देणार, मीच मठाचा

कारभार चालवणार' असे म्हणणे हा अहंकारच झाला. त्यासाठी तंटा करणे ही तर व्यापारी वृत्तीच झाली. असल्या वृत्तीच्या व्यक्ती गुरूपदावर बसल्या तर त्यात कोणाचेच हित नाही - मठाचेही नाही, भक्तांचेही नाही आणि समाजाचे तर नाहीच नाही.''

हे सर्व वाचतांना श्रीदत्तमहाराजांचे वागणे आणि बोलणे आठवले आणि माझे मन हेलावून गेले. श्रीदत्तमहाराज सांगायचे, मनातल्या सर्व इच्छा व वासना गेल्या म्हणजेच ''सर्वभूतहितेरतः'' ही वृत्ती येते. श्रीदत्तमहाराजांच्या स्वतःच्या आचरणांत हे प्रत्यक्ष दिसायचे. श्रीज्ञानदेवांची एक ओवी श्रीदत्तमहाराज नेहमी सांगायचे.

''म्हणोनि थोरपण पऱ्हांचि सांडीजे । व्युत्पत्ती आवघी विसरिजे ।
जैं जगा धाकुटें होईजे । तैं जवळीक माझी ।।''

मिळालेला थोरपणा विसरून जावा, शास्त्रज्ञानही विसरू जावे, सर्व जगापेक्षा धाकुटे व्हावे म्हणजे माझी जवळीक मिळते असं या ओवीत सांगितलेलं आहे. श्रीदत्तमहाराजांचे स्वतःचे वागणेही या ओवीचे प्रात्यक्षिक वाटावे असेच असायचे.

एकदा श्रीदत्तमहाराज म्हणाले, ''स्वतःची योग्यता स्वतःच्याच तोंडाने इतरांना सांगणे ही खरी योग्यता नव्हे, हे अज्ञान आहे.'' श्रीदत्तमहाराज स्वतः आयुष्यभर त्याप्रमाणे वागलेले दिसतात. महाज्ञानी, प्रकांड पंडित आणि उत्तराधिकारी श्रीदत्तमहाराज स्वतःच्या योग्यतेबद्दल किंवा स्वतः केलेल्या कामाबद्दल कधीही बोललेले दिसत नाही. उलट वासुदेव निवासमध्ये उत्तराधिकारी म्हणून नेमणूक झाल्यावरही ते गुरूदेवांच्या सेवकांप्रमाणेच तेथे वावरले. आश्रमात

उतरलेल्यांना चहा, कॉफी, जेवण एखाद्या सेवकाप्रमाणे विचारतील. स्वतःला आश्रमात जेवायला यायचे असले तर आधी आश्रमाच्या व्यवस्थापकांची परवानगी विचारतील. आश्रमात दुपारी विश्रांती घ्यायची असली तर गादी व पांघरूण नाकारतील. तीन पाट एकमेकांना जोडून त्यावरच आडवे होऊन स्वतःचे उपरणे पांघरतील. वेळप्रसंगी भांडी धुवायला सेवकाप्रमाणे पुढे येतील. सिंहासनावर पादुका ठेवून राज्य चालविणाऱ्या भरताची आठवण करून देणारे हे वर्तन असायचे.

बोलायचे ते अगदी सौम्यपणे. ऋजु शब्दांत. आवाज कधी चढला नाही आणि कोणाचा अपमान किंवा द्रोह होईल असे शब्दही कधी मुखातून बाहेर पडले नाहीत. मान करणारा जेवढा जवळचा तेवढाच अपमान क रणारा जवळचा. उलट अपमान करणाऱ्यावरच जास्त प्रेमाने जबाबदारी टाकायचे.

इतरांच्या कामाचे श्रेय आपण घेतो आणि चुकांची जबाबदारी दुसऱ्यावर टाकतो. इथं उलटच घडायचं. झालेल्या कामाचे श्रेय दुसऱ्याला द्यायचे आणि इतरांच्या चुकांची जबाबदारी स्वतःवर घ्यायची हे श्रीदत्तमहाराजांचे नेहमीचे वागणे होते. अशा अनेक हकीगती आश्रमवासी सांगतात. एकदा एका समारंभात एका मोठ्या वैदिकाचे नांव घेतले गेले नाही याचा त्या व्यक्तीला राग आला. रागारागाने आश्रमांत येऊन ते सेवकांना वेडेवाकडे बोलू लागले. श्रीदत्तमहाराजांनी त्यांना आपल्या खोलीत बोलावले आणि हात जोडून त्यांना म्हणाले, ‘‘आपला अपमान झाला याची सर्व जबाबदारी

आमच्यावर आहे. आपला यथोचित उल्लेख करायला आम्हीच स्पष्टपणे सांगायला हवे होते. आपण आम्हाला क्षमा करावी अशी प्रार्थना आहे.''

श्रीदत्तमहाराज लौकिक व्यवहारांच्या पलीकडे होते. एकदा श्रीदत्तमहाराज एकदा एका सेवकाबरोबर घरी गेले . तो सेवक चपला बाहेर ठेवून घरात गेला. कुत्रा नेईल म्हणून श्रीदत्तमहाराज त्या चपलांची राखण करत उभे राहिले. उत्तराधिकारी, पीठाधिपतीने असे वागणे कोणत्या लौकिक व्यवहारांत बसते?

समोरच्या माणसाचा आपल्याला काय उपयोग होईल हा विचार करून आपण त्याच्याशी तसे वागतो. पण श्रीदत्तमहाराज समोरच्या माणसाची केवळ भक्ती बघायचे, श्रद्धा बघायचे, अंतःकरणाची शुद्धी बघायचे. कोणाकडून कसलीच अपेक्षा नाही - मानाची, धनाची कसलीच नाही. समोरच्या माणसाबद्दल दया, करुणा ही एकच भावना त्यांच्या हृदयात असायची. इतरांनी दिलेले न स्वीकारणे हाच त्यांचा स्वभाव होता. कांही भक्तांनी घर देऊ केले, मोटार देऊ केली, मोठ्या रक्कमा समोर ठेवल्या. पण ते नाकारून श्रीदत्तमहाराज सांगत, ''जे करायचे ते वासुदेवनिवासकरता करावे.''

दर्शनाला येणाऱ्यांनी पुढे ठेवलेली दक्षिणा श्रीदत्तमहाराज निरनिराळ्या धर्मसंस्थांना पाठवून द्यायचे. भागवतसप्ताहाचे पैसेही स्वतःच्या संसाराला वापरले नाहीत. समोर ठेवलेली फळेदेखील तशीच उचलून भक्ताच्या हातात द्यावी हीच त्यांची वृत्ती होती. कांही स्वीकारणे ही वृत्तीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून नाहीशी झाली होती.

इतरांना देणे, इतरांचे दुःख दयाबुद्धीने दूर करणे हाच त्यांचा स्वभाव होता. म्हणूनच एका भक्ताचे मोठ्या खर्चाचे ऑपरेशन ठरल्यावर त्यांनी आपल्या चिरंजीवांना एक लाख रुपयांची रक्कम त्याच्याकडे पाठवायला सांगितले. इतरत्र शिष्य गुरूपुढे दक्षिणा ठेवतात. इथे उलटाच व्यवहार घडलेला दिसतो. प्रवचनाच्यावेळी समोर ठेवलेली दक्षिणाही अनेक वेळा तेथेच प्रसाद म्हणून वाटून टाकायचे.

श्रीदत्तमहाराजांच्या अमानित्वाच्या बाबतीत एक गोष्ट मुद्दाम सांगावीशी वाटते. आपले चरित्र प्रसिद्ध व्हावे, आपले मोठेपण जगापुढे यावे असे त्यांना कधीच वाटले नाही. ते नेहमी स्वतःला झाकूनच घेत. श्रीदत्तमहाराजांचे चरित्र लिहावे असे मला इ.स. १९९१ साली वाटले. तेव्हापासून अनेक वर्षे मी अनुमती मागत होतो. पण श्रीदत्तमहाराज नकारच देत राहिले. चिकाटीने पुनःपुन्हा प्रार्थना करत राहिलो. श्रीमती नीलाताई जोशी यांच्याद्वाराही अनुमती मिळविण्याचा प्रयत्न केला. पण अनुमती मिळेना.

शेवटी सौ.ताईमहाराजांची अनुमती घेऊन मी तसे श्रीदत्तमहाराजांना सांगितले, तेव्हा कांहीशा त्राग्याने ते म्हणाले, ''इतके वेळा तुम्हाला नाही सांगितले. ठीक आहे! काय पाहिजे ते करा.'' यात वाच्यार्थानेच फक्त अनुमती होती. पण त्याचाच फायदा घेऊन मी चरित्र लिहिले आणि प्रसिद्ध केले.

अनेक वाचकांनी आग्रहाने सांगितले की श्रीदत्तमहाराजांचे चरित्र आणि विचारधन इंग्रजी भाषेतून जगापुढे मांडावे. मलाही तसे तीव्रतेने वाटले म्हणून अनुमती मागायला गेलो, तर श्रीदत्तमहाराज कांहीशा

नाराजीच्या स्वरात म्हणाले, ''कशाला? तुमची पुस्तके खपतीलही, पण त्याने काय होणार ?''

श्रीरामकृष्ण परमहंस किती मोठे होते हे केवळ त्यांची चरित्रे प्रसिद्ध झाल्यावरच जगाला समजले. नाहीतर त्यांचा मोठेपणा कलकत्त्यातल्या कांही लोकांनाच ज्ञात राहिला असता. इथेही तसेच घडले असते. पण सौ.ताईमहाराजांचा संकल्प होता. म्हणून चरित्रे प्रसिद्ध झाली आणि श्रीदत्तमहाराजांचा मोठेपणा जगापुढे आला.

अनेक शास्त्री-पंडित सांगतात, सद्गुरू महाज्ञानी होते, प्रकांड पंडित होते. पण जाणकार ओळखायचे, श्रीदत्तमहाराज आतून भावमय भक्त आहेत, अत्यंत कोमल हृदयाचे आहेत. शबरी, ध्रुव, प्रल्हाद अशा भक्तांची नांवे घेतांनाही ते गहीवरायचे आणि मूक व्हायचे.

सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यानंतर सन १९९१ मध्ये ते अमरेश्वरला दर्शनासाठी गेले होते. श्रीदत्तमहाराजांचे ज्ञानगुरू श्रीदीक्षितस्वामीमहाराज यांचे ते स्थान. देवस्थानची पडझड झालेली पाहून त्यांचे मन हेलावले. त्यांनी जीर्णोद्धार करायचे ठरविले. अनेक भक्त जीर्णोद्धाराचा सगळा खर्च करायला पुढे आले, पण त्यांनी नकार दिला. गुरूसेवा स्वतःच्या हातूनच घडावी असे त्यांना उत्कटतेने वाटत होते. वयाचे ८१ वे वर्ष सुरू झाले होते. वृद्धत्वाने गात्रे थकली होती. प्रवास झेपेनासा झाला होता. पण डॉक्टरांच्या आणि कुटुंबीयांच्या विरोधाकडे दुर्लक्ष करून ते गावोगाव हिंडून भागवतसप्ताह करीत राहिले, पैसे जमवत राहिले. त्यातूनच अमरेश्वरचा जीर्णोद्धार झाला. ही गुरूसेवा कोणत्या कोटीतली ?

खरे तर महाराजांचा देह आमच्या समोर दिसायचा. पण त्यांचे मन एका वेगळ्याच भावविश्वात विहार करत असायचे. त्यांच्या आत्मस्थितीची कोणालाही कल्पना करता येणार नाही.

श्रीदत्तमहाराज स्वतःला नेहमी झाकूनच घ्यायचे. अंतर्मुख वृत्तीचे असल्याने फार कमी बोलायचे. आत्मानंदात असल्याने भोवती लक्ष नसायचे. धोतर व उपरणे हा वेष. रस्त्याने अनवाणी जायचे. रस्त्यावर त्यांना तसे चालतांना पाहून अनोळखी मनुष्य म्हणायचा, 'पुरोहित दिसतात, यजमानांकडे जात असतील.' प्रवचन ऐकल्यावर श्रोता भारावून म्हणायचा 'फारच रसाळ प्रवचनकार आहेत.' वासुदेवनिवासशी संबंधित म्हणायचे 'उत्तराधिकारी आहेत. पीठाधीश्वर आहेत. पण अत्यंत विनयशील आणि साधे आहेत.' तत्त्वज्ञानातील निरगाठी व कुट श्लोक सहजतेने सोडवणारे विद्वतप्रचूर बोलणे ऐकून विद्वान म्हणायचे, 'महाज्ञानी आहेत. थोर प्रज्ञावंत आहेत.' अनेक पीठांचे शंकराचार्य आणि संतमहात्मे पुण्यात येताच प्रथम त्यांची चौकशी करायचे आणि आदराने म्हणायचे, 'थोर संत आहेत, साक्षात्कारी आहेत.'

पण ही सगळी वर्णने फार अपुरी आहेत. भक्तीने जवळ जो जो येत गेला, त्याला कल्पनांतीत अनुभव येत राहिले. त्यांची कृपा ज्यांच्यावर झाली, त्यांनाच कळले की श्रीदत्तमहाराज गुणातीत आहेत, स्थितप्रज्ञ आहेत, भक्त आहेत, साक्षात्कारी आहेत आणि त्याहूनही खूप कांही आहेत. हळूहळू लक्षात यायचे की श्रीदत्तमहाराज अवतारी पुरुष आहेत, ज्ञान-भक्ती-कर्म यांच्या सर्वोच्च पातळीवर वावरत आहेत.

वेदव्यास आद्य शंकराचार्य आणि श्रीज्ञानदेव यांच्यासारखेच धर्मजागरणासाठी अवतीर्ण झालेले, ईश्वरी शक्तीचे परिपूर्ण रूप आहेत.

श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाच्यावेळी जाणवायचं त्यांच्या चेहऱ्यावरील भाव अलौकिक आहेत. डोळ्यात एक विलक्षण तेजस्वी चमक असायची. दृष्टीतून सदैव करूणेचा वर्षाव होत राहायचा. त्यांचे डोळे प्रेमभक्तीने तुडूंब भरलेले असायचे. एका अलौकिक आनंदाने तृप्त दिसायचे. पावित्र्याचं आणि शुचित्वाचं तेज काय असतं ते प्रत्यक्ष बघायला मिळायचं. नीरव शांती घनीभूत होऊन सगुण साकार झाली आहे असं वाटायचं. सर्व आदर्श गुण श्रीदत्तमहाराजांमध्ये साकार आहेत असं वाटायचं. श्रीदत्तमहाराज एका वेगळ्याच अवस्थेत - तुरीय अवस्थेत आहेत हे जाणवायचं. श्रीदत्तमहाराजांची ती अवस्था जागेपणा, स्वप्न आणि झोप या तीनही अवस्थांच्या पलीकडची आहे असं जाणवायचं. म्हणूनच श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनासाठी कितीही वेळा गेले तरी प्रत्येक वेळी मन भारावून जायचं. मनांतील दुःखं नाहीशी व्हायची. वाटायचं, अंतःकरण शुद्ध होत आहे. मनांतील विकार नाहीसे होत आहेत, एका आगळ्या शांतीने व समाधानाने मन भरून जात आहे. त्यांच्या दर्शनाने कृतार्थ झाल्यासारखे वाटायचे. म्हणूनच एका अनावर ओढीने भक्त आणि साधक त्यांच्या दर्शनाला पुनःपुन्हा येत राहिले.

श्रीदत्तमहाराज म्हणजे घनीभूत प्रेम, करूणा आणि दया. ईश्वरी शक्तीचे परिपूर्ण रूप श्रीदत्तमहाराजांमध्ये पहायला मिळायचे आणि

जाणीव व्हायची की सद्गुरू एक मोठे शक्तीकेंद्र आहेत. त्या शक्तीकेंद्रांतून सर्व दिशांना ऊर्जास्त्रोत फेकले जात आहेत. त्या द्वारे ते साधकांचे उन्नयन करताहेत, त्यांचा प्रपंच व परमार्थ चालवताहेत.

दर्शन घेतांना अनेकांच्या लक्षात यायचं की इंद्रियांनी जे जग जाणता येतं, त्याच्यापेक्षा एक वेगळे सूक्ष्माहून सूक्ष्म असे विश्व आहे - एक विराट विश्व, विशुद्ध आत्मरसाने भरलेले - आणि त्या विश्वाचे श्रीदत्तमहाराज अधिपती आहेत, स्वामी आहेत. त्या इंद्रियातीत विराट विश्वाची जाणीव झाली की समोरच्या माणसाची वाणी मौनात जायची, मन आणि बुद्धी यांचे व्यवहार बंद व्हायचे, तर्कबुद्धी हलकेच नाहीशी व्हायची. मग त्या साधकाला सद्गुरूंच्या कृपेनं फक्त भगवंत दिसायला लागायचा. दत्तमहाराजांचे दर्शन घेतांना अनेक साधकांना हा अनुभव आला. श्रीदत्तमहाराजांच्या कृपेनं साधकांना अनेक दिव्य अनुभूती यायच्या. त्यांच्याच कृपेनं कांही भक्तांना अपरोक्ष अनुभूती घेणं, ईश्वराची अनुभूती घेणं शक्य झालं.

श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाचे यथार्थ वर्णन करणं वैखरी वाणीला शक्य नाही. मध्यमा आणि पश्यंती वाणी वैखरी वाणीत मिसळल्या आणि परावाणी त्यांच्या मागे उभी राहिली तरीही ते शक्य होणार नाही. एवढंच म्हणता येईल - त्यांच्या चरणावरील धुळीचे कणही पतित व पापी माणसाला मुक्ती द्यायला समर्थ होते.

गेल्या कांही वर्षात श्रीदत्तमहाराजांवरील कामाचा ताण कमी करणे, उत्तराधिकारी नेमणे वगैरे प्रश्नांची चर्चा दबलेल्या स्वरांत होऊ लागली होती. घराण्याचा आध्यात्मिक वारसा डॉ.

अशोकमहाराजांकडे आला होता म्हणून कांहीजण त्यांना सूचवायचे त्यांनी कामे हळुहळू स्वत:कडे घ्यावी आणि उत्तराधिकारीपद स्वीकारण्याची मानसिक तयारी ठेवावी. पण अमानित्वाच्या भूमिकेतून डॉ. अशोकमहाराज त्यासंबंधीचे बोलणे टाळायचे. स्वामी चिदानंद आणि श्रीदत्तमहाराज यांच्याप्रमाणेच डॉ.अशोकमहाराजांनाही ती जबाबदारी नको वाटायची.

पण श्रीदत्तमहाराजांनी सन १९८९ मध्ये डॉ. अशोकमहाराजांना ''हे सर्व सांभाळावे'' अशी स्पष्टपणे आज्ञा केल्यावर त्यांना नकार देणे शक्य झाले नाही. सन १९९१ पासून कवीश्वर घराण्याची मंत्रदीक्षा आणि सन १९९५ सालापासून 'वासुदेवनिवास' पीठाची दीक्षा देणे श्रीदत्तमहाराजांनी डॉ. अशोकमहाराजांवर सोपवली. सुरूवातीला 'वासुदेवनिवास' पीठाची दीक्षा देतांना डॉ. अशोकमहाराज दिवस व वेळ श्रीदत्तमहाराजांना विचारून घेत व साधकाला कळवित. असे ७/८ महिने गेल्यावर प. पू. सौ. ताईमहाराज यांच्या उपस्थितीत श्रीदत्तमहाराज त्यांना म्हणाले, ''आपण सर्व जाणताच आहात. आम्हाला विचारायचे कारण नाही. आपणच सर्वकांही पाहून दीक्षेचे पत्र लिहीत जावे.'' तेव्हापासून डॉ. अशोकमहाराज तसे करू लागले. गेल्या तीन वर्षात आलेल्या पत्रांना उत्तरे देण्याचे कामही डॉ. अशोकमहाराज करीत होते. बोलण्यामुळेही थकवा जाणवायला लागला म्हणून श्रीदत्तमहाराजांनी बोलणेही कमी केले आणि ते डॉ.अशोकमहाराजांमार्फत साधकांशी बोलू लागले. जे सांगायचे ते डॉ.अशोकमहाराजांद्वारे सांगत.

श्रीदत्तमहाराजांचे शरीर क्षीण झाले असले, उठून बसायची व बोलण्याची शक्ती नसली तरीही कासवीच्या दृष्टीप्रमाणे ते डोळ्यांतून साधकांना खूप कांही देत राहिले. ''शब्देवीण संवादिजे'' या ज्ञानदेवांच्या उक्तीप्रमाणेच साधकांशी शब्दांवाचून संवाद होतच राहिले. ''गुरोस्तु मौनं व्याख्यानं । शिष्यास्तुच्छिन्नसंशयाः ।'' या श्रीशंकराचार्य स्वामीमहाराजांच्या उक्तीप्रमाणे घडतच राहिले. त्यामुळे दर्शनाला लोक येतच राहिले.

श्रीदत्तमहाराजांच्या शरीरावर वयाच्या खुणा दिसायला लागल्या होत्या. पण तरीही वाटायचं ते बालपण, तारूण्य आणि वृद्धावस्था या तीनही अवस्थांच्या पलीकडे आहेत. चेहऱ्यावर अलौकिक तेज एकवटलेले दिसायचं. मुखावरील कांतीने आणि तेजाने भोवतालच्या चारी दिशा उजळल्या आहेत असं वाटायचं. परमसुंदर, चितूस्वरूप, प्रकाशस्वरूप असं कांही तरी आपण पहातो आहोत असे जाणवायचं. त्यांची कल्याणकारी ज्ञानमुद्रा सदैव बोध करणारी वाटायची, मनाचे उन्नयन करणारी वाटायची, असीम शांतीप्रदान करणारी वाटायची. म्हणूनच त्यांच्या दर्शनाने एका अलौकिक निरतिशय सुखाचा लाभ व्हायचा. मनाला एक आगळे समाधान व्हायचं.

श्रीदत्तमहाराजांचे जीवन म्हणजे अमृतमय लीलांनी भरलेली कथासरिता-गंगा नदीसारखीच पावन करणारी, पाप आणि ताप यांचे हरण करणारी, मन शुद्ध करणारी. त्यांची दृष्टी ज्यांच्यावर पडलेली आहे, त्यांना अवनती होण्याची किंवा अधःपात होण्याची भिती नाही.

संसार संकटाच्या परंपरेचा नाश करण्याचे सामर्थ्य त्यांच्या दर्शनात होतं.

चिदानंद - चिद्घन - आनंदघन - तेजःस्वरूप - स्वयंप्रकाशी - आत्मस्वरूप हेच श्रीदत्तमहाराजांचे खरे स्वरूप आहे. निरूपाधिक पूर्णब्रह्मरूप हेच श्रीदत्तमहाराजांचे खरे स्वरूप आहे. मानवी मनाला त्यांच्या या आत्मस्थितीचा वेध घेणे शक्य नव्हते. कारण ती तर्क आणि बुद्धी यांच्या पलीकडे आहे. श्रीदत्तमहाराज अविनाशी, चिरंतन गुरूतत्त्व आहेत. पूर्णब्रह्मस्वरूप आहेत आणि सद्चिदानंदस्वरूप आहेत. आम्हा संसारी माणसांची तेच खरी गती आहेत, आधार आहेत. खऱ्या अर्थाने ‘‘भगवंताचा लीला-विग्रह’’ आहेत. मानवी कल्याणासाठी भगवंताने धारण केलेला देह आहेत.

श्रीदत्तमहाराजांचे खरे स्वरूप लक्षात येऊ लागले, तोपर्यंत त्यांच्या अवतार समाप्तीची वेळ आली. एकेदिवशी अगदी अनपेक्षित वाटणारी ती वार्ता कानावर पडली - श्रीदत्तमहाराजांनी स्थूल देह ठेवला.

महर्षि व्यास ब्रह्मसूत्रांत सांगतात - आत्मज्ञानी पुरुष स्थूल देह सोडतांना आपले ज्ञान, तेज आणि शक्ती अंतरंगशिष्यात संक्रमित करतात आणि इच्छा असल्यास सूक्ष्मदेहांत राहून भक्तांचे कल्याण करीत राहातात. अनेक ऋषीमुनींनी आणि संतांनी तसे केल्याचे उल्लेख आहेत. अलिकडच्या काळांत समर्थ रामदासस्वामींनी कल्याण या अंतरंगशिष्यात असे संक्रमण केले. श्रीकृष्णदयार्णवांनी

उत्तमश्लोकमध्ये आणि श्रीरामकृष्ण परमहंसांनी विवेकानंदांमध्ये असे संक्रमण केल्याचेही सांगतात.

श्रीदत्तमहाराजांनी स्थूल देह ठेवतांना अशाच संक्रमणविधीने आपले ज्ञान, तपस्सामर्थ्य व तेजशक्ती डॉ. अशोकमहाराजांमध्ये संक्रमित केली असे जाणकार सांगतात. तसा प्रत्यय आला म्हणूनच श्रीदत्तमहाराजांनी देह ठेवल्यावर चौदाव्या दिवशी कांही वैदिक डॉ. अशोकमहाराजांपुढे साष्टांग नमस्कार घालून म्हणाले, "आपणच श्रीदत्तमहाराज आहांत, आपणच आमचे सद्गुरू आहांत." श्रीदत्तमहाराजांनी केलेल्या या संक्रमणविधीबद्दल ते बोलायला लागताच अमानित्वाच्या भूमिकेतून श्रीअशोकमहाराजांनी डोळे व ओठ मिटून घेतले. ते रहस्य श्रीदत्तमहाराज व डॉ. अशोकमहाराज या दोघांतच रहावे असेही त्यांना वाटत असावे.

श्रीदत्तमहाराज स्थूल देहाने आपल्यात नसले तरीही वासुदेवनिवास, वामननिवास आणि रेणुकानिवासमध्ये त्यांचे सूक्ष्मरूपांतील अस्तित्त्व प्रत्ययाला येत रहाणारच आहे, त्यांची कृपा लाभणारच आहे. त्यांनी मागे ठेवलेल्या विचारधनमध्येही त्यांचे दर्शन होतच रहाणार आहे. कारण विचारधनमधील शब्द हे वाङ्मयीन शब्द नाहीत. ते शब्द ब्रह्मरसांत चिंब भिजून आले आहेत. श्रीदत्तमहाराजांच्या मुखांतून तो ईश्वरी स्पर्श घेऊन आलेले आहेत. भगवंताच्या लीलाविग्रहाचे ते शब्द आहेत. म्हणूनच श्रद्धावंतांना उपनिषदांतील मंत्रांप्रमाणेच ते शब्द पूजनीय आहेत.

श्रीदत्तमहाराजांच्या चरणी एक प्रार्थना सादर करावीशी वाटते - ''या जन्मी शरीराने दूरच राहावं लागलं. सेवा करायची संधीच मिळाली नाही. तेवढे सुकृत नव्हते. माझे यापुढे अनेक जन्म येत राहिले तरी चालेल, पण हातून केवळ पूण्यकर्मेच घडत रहावीत आणि सतत सुकृतच साठत राहावे. म्हणजे मग त्यांच्या पुढच्या एखाद्या अवतारात मला सद्गुरूंची सेवा करण्याची संधी मिळेल.''

''सद्गुरू ज्या घरात अवतीर्ण होणार आहेत, त्या घरात मी दासी होऊन अनेक वर्षे निष्ठेने सेवा करावी. श्रीदत्तमहाराज अवतीर्ण झाले म्हणजे ते बालरूप माझ्या मांडीवर संगोपनासाठी ठेवले जावे. त्या बालरूपाची सर्व सेवा जुन्या जाणत्या दासीच्या रूपांतून मीच करावी. लालनपालन, संगोपन सर्वकांही करण्याचे भाग्य मला एकट्यालाच मिळावे. त्या बालरूपाची मीच आई व्हावे, मीच दाई व्हावे, मीच खेळगडी व्हावे. मीच त्या बालरूपाचे कौतुक करीत रहावे. बाललीला पाहून हर्षभरीत होण्याचे भाग्य मला पुरेपूर मिळावे, मनसोक्त मिळावे. माझे विश्व व्हावे. त्या विश्वांत मी एवढे रमून जावे की बाकीचे सर्व जग नाहीसे व्हावे, भूतकाळ व भविष्यकाळ स्मरणांतून नाहीसा व्हावा.''

यशोदा मातेने भगवान श्रीकृष्णांचे बालरूप वाढवतांना हेच भाग्य अनुभवलं होतं. यशोदा मातेचं ते भाग्य मलाही श्रीदत्तमहाराजांचे बालरूप वाढवतांना प्राप्त व्हावं. पण भगवान श्रीकृष्ण मथुरेला गेल्यावर यशोदेची विरहव्याकुळ अवस्था झाली होती, तसे मात्र माझे होऊ नये. श्रीदत्तमहाराज बालवयांतून जेव्हा किशोर रूपात पदार्पण

करतील, तेव्हा त्यांच्याच मांडीवर डोके ठेवून त्या वृद्ध दासीला देह सोडण्याचे भाग्य लाभावं. तोच माझ्या जीवनाचा शेवट असावा.''

एवढी एकच प्रार्थना सद्गुरूच्या चरणी अत्यंत उत्कटतेने सादर करीत आहे.

**डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर**

## ।। ऋणनिर्देश ।।

माझ्या इतर पुस्तकांप्रमाणेच याही पुस्तकाच्या कार्याचे सचिवपण माझ्या पत्नी सौ. पौर्णिमा कोपर्डेकर यांनीच समर्थपणे सांभाळले. श्री. शरद्चंद्र भालेराव यांनी हे लेखन बारकाईने वाचून त्यावर चिकित्सक दृष्टीने संपादकीय संस्कार केले आणि हे पुस्तक जास्तीत जास्त निर्दोष करायला मदत केली. ''पुस्तक विविध भाषांतून जगभर सर्वत्र जावो'' असा आशीर्वादही त्यांनी दिला. त्यांची माझी पूर्वीची ओळख नसतांनाही त्यांनी एवढे सहाय्य आपणहून केले ही केवळ सद्गुरूंची लीलाच आहे असे वाटते. श्री.अजितराव कवीश्वर आणि श्री.भाऊसाहेब वाकडे यांनी सर्वतोपरी उत्तेजन देऊन या कार्याला मोठाच हातभार लावला. श्री. प्रसाद पाटणकर आणि अच्युतराव पोटभरे यांनी छायाचित्रे उपलब्ध करून दिली इतरही अनेकांचे सहाय्य झाले. त्यांत सर्वश्री रघुनाथ सुर्वे, रविंद्र सुंभे, पराग पिंपळे, महेश खाजगीवाले, डॉ. श्री.म. भातखंडे आणि नारायणराव दाते यांचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. श्री. सुनील महाशब्दे यांनी केलेल्या देखण्या मुद्रणामुळे पुस्तकाची निर्मिती मूल्ये उच्च दर्जाची ठेवणे शक्य झाले. माझे बंधू श्री. श्यामराव कोपर्डेकर यांनी हे पुस्तकही सेवाभावी मूल्य ठेवून वितरीत करण्याचा निर्णय घेतला याबद्दल मला झालेला आनंद आणि मनांत दाटून आलेली कृतज्ञता योग्य शब्दांत व्यक्त करणे शक्य नाही. सर्वांची सेवा गुरूकृपेला पात्र आहे.

या पुस्तकाचे प्रकाशन 'वासुदेवनिवास' या पवित्र वास्तुमध्ये करायची परवानगी दिल्याबद्दल मी सर्व विश्वस्तांचा ऋणी आहे.

## ॥ श्रीदत्तमहाराज कवीश्वर - विसाव्या शतकांतील थोर वेदान्ती ॥

भारतात वेदान्त तत्त्वज्ञानाची परंपरा वेदकाळापासून चालत आली आहे. विसाव्या शतकात अवतीर्ण झालेले श्रीदत्तमहाराज या थोर परंपरेतील एक तेजस्वी रत्न होत. आपले सर्व जीवन त्यांनी वेदान्ताच्या प्रसारालाच वाहिले. सुमारे एक हजार भागवतसप्ताह आणि पंधरा हजार प्रवचने व व्याख्याने संपन्न करून त्यांनी वेदान्ताचे सार जनसामान्यांपुढे विशुद्ध स्वरूपांत मांडले. त्यांच्या निरूपणात विशुद्ध ज्ञान आणि विशुद्ध भक्ती यांचा मधुर संगम झालेला दिसतो. सुमारे पाऊण शतकांचा दीर्घ कालखंड ते धर्मजागरणाचे आणि लोकसंग्रहाचे कार्य सातत्याने करत राहिले.

महर्षि व्यास, आद्यशंकराचार्य व श्रीज्ञानदेव यांच्याप्रमाणेच श्रीदत्तमहाराज हे परतत्त्वरूप व परिणतप्रज्ञ अवतारी पुरुष होते. अद्वैत दृष्टी देणाऱ्या मोक्षविद्येचे ते प्रबोधन करीत. अद्वैत सिद्धांत आणि शक्तिपातसाधना यांचे सजीव साकार रूप श्रीदत्तमहाराजांच्या रूपाने आपल्याला पहायला मिळते. भारतीय संस्कृतीतील सर्व आदर्श मूल्ये, तत्त्वे व व्यवहार श्रीदत्तमहाराजांच्या जीवन कार्याच्या रूपाने आपल्याला प्रत्यक्ष पहायला मिळतात.

धर्मप्रबोधन करण्यासाठी अवतरणाऱ्या ईश्वरी शक्तीचे परिपूर्ण रूप श्रीदत्तमहाराजांच्या रूपाने आपल्याला पहायला मिळते. सर्व भूतमात्रांत ईश्वर पहाणारे निखळ साधुपुरुष होते. महाकवीची प्रतिभा, ऋतंभरा प्रज्ञा, अलौकिक धारणाशक्ती आणि ईश्वरी मेघाशक्ती याची

देणगी घेऊन आले होते. वेदान्त तत्त्वज्ञानाचे विसाव्या शतकांतील थोर प्रज्ञावंत भाष्यकार म्हणून त्यांचे नाव अमर राहील.

श्रीदत्तमहाराजांना गुरूस्थानी मानणारे व त्यांच्या मार्गदर्शनाखाली साधना करणारे हजारो शिष्य भारतभर पसरलेले आहेत. काही शिष्य परदेशांतही साधना करीत आहेत.

माघ वद्य षष्ठी शके १८३१ (२ मार्च, १९१०) या दिवशी श्रीक्षेत्र वाडी येथे श्रीदत्तमहाराज यांचा जन्म झाला. श्रीधुंडिराजमहाराज व सौ.सरस्वती आईसाहेब हे त्यांचे मातापिता होते. कृष्णामाईच्या निसर्गरम्य आसमंतात वाडी येथे त्यांचे बालपण गेले.

श्रीदीक्षितस्वामीमहाराजांच्या कृपाछायेत त्यांनी शास्त्राभ्यासाला प्रारंभ केला. पंडीतप्रवर श्रीधुंडिराजमहाराज यांच्याकडूनच वेदाध्ययनाचे पहिले पाठ मिळाले. श्रीधुंडिराजमहाराजांनी मंत्रविद्येचे गुरूत्वही श्रीदत्तमहाराजांना विधीपूर्वक प्रदान केले. वाडीनिवासी पूर्वाश्रमीचे अहिताग्नी, वेद्रशास्त्रसंपन्न श्रीशंकरशास्त्री जेरे (हे पुढे संकेश्वर पीठाधीश शंकराचार्य झाले) यांच्याकडे साहित्य आणि वेद यांचा अभ्यास झाला. सांगलीला वे.शा.सं. श्रीव्यंकटेशशास्त्री अभ्यंकर यांच्याकडे व्याकरणाचे अध्ययन पूर्ण झाले. विद्वतकुलशेखर पंडीत नागेश्वरशास्त्री उप्पिनबेट्टगिरी यांच्याकडे धारवाडला विशेषतः न्याय व वेदान्तांचे अध्ययन झाले. त्यांची बुद्धीमत्ता व नम्रता बघून गुरूजी त्यांना 'प्रदीपक शिष्यरत्न' म्हणत. पुण्यातील मीमांसा विद्यालयात त्यांनी मीमांसाकंठीरव परमविद्वान सुब्बाशास्त्रीवर्य यांच्याकडे मीमांसाशास्त्राचे अध्ययन पूर्ण केले. वाराणसीच्या

महापंडीत राजराजेश्वरशास्त्री द्रविड यांच्याकडे धर्मशास्त्र, न्यायशास्त्र आणि राजनीती यांचे सखोल अध्ययन झाले. श्रीदत्तमहाराजांनी या शास्त्रात संपूर्ण प्रभूत्व मिळवल्यावर 'असामान्य नैयायिक व राजनीतीज्ञ' असा सर्वत्र गौरव होऊ लागला.

श्रीदत्तमहाराज पुण्याला आल्यावर योगीराज श्रीगुळवणीमहाराज यांच्या कृपाछायेत आले. राजयोग, लययोग, मंत्रयोग, हठयोग, प्राणायम व कुंडलिनीयोग या ज्ञानशाखांतील श्रीगुळवणीमहाराजांची अधिकार सर्वमान्यच होता. कुंडलीनीयोग म्हणजेच शक्तिपातविद्या हा तर त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय. योगक्षेत्रातील विविध अंगांवर श्रीगुळवणीमहाराजांचे प्रभुत्त्व अपूर्व म्हणावे असेच होते. म्हणूनच त्यांचा 'महायोगी' असा गौरवपूर्ण उल्लेख होत असे. श्रीदत्तमहाराजांचा सखोल ज्ञानात्मक अभ्यास, त्याग, वैराग्य व असामान्य विनम्रता पाहून श्रीगुळवणीमहाराजांनी त्यांना महायोगाची दीक्षा दिली आणि आपल्यासारखेच केले.

वेद, न्याय, व्याकरण, मीमांसा, साहित्य, महायोगशास्त्र, राजनीती, मंत्रशास्त्र, शक्तिपातविद्या आणि धर्मशास्त्र या अनेकविध विषयांमध्ये श्रीदत्तमहाराजांनी जे संपूर्ण प्रभुत्त्व मिळवले आणि त्यांत जी खोली व उंची गाठली ती विस्मित करणारी आहे. यापैकी एकेका विषयाचे परिपूर्ण अध्ययन करायला एक जन्मही पुरणार नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु श्रीदत्तमहाराज सिद्धप्रज्ञा घेऊन आलेली अलौकिक विभूती असल्यामुळे हे सर्व विषय अल्पकाळांत आत्मसात करणे त्यांना शक्य झाले. या सर्व शास्त्रांवर श्रीदत्तमहाराजाइतके प्रभुत्त्व

असणारी आणि समाजापुढे प्रकट झालेली एखाददुसरी व्यक्ती तरी वर्तमान काळांत भारतात असेल की नाही याची शंका वाटते.

पुणे येथे शंकराचार्यांच्या संकेश्वरपीठात आणि नंतर टिळक महाराष्ट्रपीठात या विषयांचे ते अनेक वर्षे अध्यापन करीत होते. भारतात अनेक ठिकाणी विद्वतसभांचे निमंत्रण यायचे आणि प्रत्येक ठिकाणी त्यांच्या शांत व सौम्य वाणीतून आविष्कृत झालेल्या ज्ञाननिधीचा गौरव व्हायचा. अनेक विद्वत सभांमध्ये त्यांना फार मोठी मानमान्यता मिळाली. त्यांचे फार मोठे वाङ्मयीन आणि धार्मिक कार्य म्हणजे श्रीटेंबेस्वामींच्या संपूर्ण वाङ्मयाचे संपादन व प्रकाशन. या वाङ्मयाचे बारा खंड असून एकंदर पाच हजार पृष्ठे आहेत. हे एवढे मोठे कार्य केवळ चार वर्षात त्यांनी पूर्ण केले. वेदांत पारिजात सौरभ या ग्रंथात त्यांनी सर्व वेदान्त दर्शनांचा समन्वय करून दाखवला आहे आणि ब्रह्मसूत्रांवरील निंबार्कटीकेवर भाष्य केले आहे. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत हे कार्य मोलाचे मानले जाते.

श्रीदत्तमहाराज अवघे सोळा वर्षांचे असतांना दीक्षितस्वामीमहाराजांनी त्यांचा पहिला भागवतसप्ताह आयोजित केला. तेव्हापासून भागवतसप्ताह आणि प्रवचने यांच्या माध्यमांतून त्यांचे धर्मजागरणाचे कार्य होत राहिले. पुणे येथे योगीराज श्रीगुळवणीमहाराज यांच्या कृपाछायेत या कार्याने वेग घेतला. दीक्षागुरू श्रीगुळवणीमहाराजांनी देह ठेवल्यावर त्यांच्या 'वासुदेवनिवास' या शक्तिपीठाचे श्रीदत्तमहाराज उत्तराधिकारी झाले. मराठवाड्यांतील श्रीधुंडिराजमहाराजांच्या पीठाचेही ते उत्तराधिकारी

होतेच. श्रीदत्तमहाराजांचे वेदान्त प्रसाराचे कार्य एवढे थोर आहे की अखिल भारताला भूषणभूत ठरलेले धर्मपुरुष म्हणून भारतातील सर्व पीठांच्या शंकराचार्यांनी वेळोवेळी श्रीदत्तमहाराजांचा उचित गौरव केलेला आहे. असे हे फार मोठे धर्मकार्य करून त्यांनी ९० व्या वर्षात पदार्पण करत असतांनाच पुणे येथील आपल्या निवासस्थानी १ मार्च, १९९९ रोजी देह ठेवला.

श्रीदत्तमहाराजांची प्रवचने आणि त्यांचे विचारधन ही आधुनिक काळांत प्रकटलेली उपनिषदेच आहेत. उपनिषदांमध्ये असलेले मंत्रसामर्थ्य 'विचारधन'मधील वाक्यावाक्यांत प्रतीत होते. ''सकलमिदं अहं च वासुदेवः ।'' या अनुभूतीतून 'विचारधन'मधील प्रत्येक शब्द प्रकटला आहे. अध्यात्मविद्येचा लावलेला वेलु पानाफुलांनी बहरून आलेला आणि गगनावेरी चढलेला येथे दिसतो. ब्रह्मरसांत चिंब भिजून आलेली ही अक्षरे म्हणजे दिव्य सुगंध आणि रूप घेऊन आलेली अनेकरंगी फुलेच. या फुलांचा येथे दाट सडा पडला आहे. 'विचारधन'च्या अध्ययनांतून अनेक दिव्य अनुभूति मिळतात असे अनेक साधक सांगत आहेत. श्रीशंकराचार्यांचे वाङ्मय आणि ज्ञानेश्वरी वाचतांनाही हाच अनुभव येतो. श्रीशंकराचार्य आणि श्रीज्ञानदेव यांच्यासारखेच श्रीदत्तमहाराज हे ईश्वरी शक्तीचे परिपूर्ण रूप असल्यानेच हा चमत्कार अनुभवाला येतो.

वेदान्तांतील सिद्धांत आणि जीवन व्यवहार यांचा आधुनिक काळाला साजेल असा उचित समन्वय विचारधनमध्ये आहे. सुखी ऐहिक जीवन जगावे परंतु भगवंताला विसरू नये, ईश्वरभक्ती करावी,

धर्माचरण श्रद्धेने करावे आणि मनाचे समाधान प्राप्त करून घ्यावे असा समन्वयात्मक विचार ते सांगत. प्रवृत्ती आणि निवृत्ती या दोन्ही विचारांना त्यांनी सामावून घेतले आहे.

श्रीदत्तमहाराज हे भारताच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञानी पुरुषांपैकी एक आहेत. मानवी बुद्धी तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात किती उंची गाठू शकते याचे एक उत्तम उदाहरण श्रीदत्तमहाराजांच्या रूपाने आपणाला पहायला मिळते. श्रीदत्तमहाराजांनी केलेली वेदान्ताची मांडणी इतकी तर्कशुद्ध आणि तर्ककठोर आहे की त्याबद्दल कोणतेही वाद होऊ शकत नाहीत. प्रखर बुद्धीचा हा सूर्य अशा प्रकारे तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात सतत तळपत राहिला आणि त्यामुळे परमसत्य जाणण्याचा आणि ते प्रत्यक्ष आचरणांत आणण्याचा एक तेजस्वी मार्ग विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आपणांस पाहायला मिळाला. वेदान्तातील सर्व सूत्रे सामान्य माणसाला समजतील अशा भाषेत या अलौकिक महाप्रज्ञाने आमच्यासमोर मांडली. एकप्रकारे उपनिषदांत ठिकठिकाणी विखुरलेले विचार सुसंबद्ध स्वरूपांत आजच्या बोलीभाषेत मांडण्याचे हे कार्य अपूर्व मानावे असेच आहे. जे सांगितले त्याचे प्रात्यक्षिक म्हणून त्यांचे जीवन आपल्यासमोर आहे. तत्त्वज्ञान आणि प्रत्यक्ष आचरण यांची इतकी एकरूपता क्वचितच पाहायला मिळते.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साधुत्त्व होते, प्रतिभाशाली कवित्त्व होते, गूढवाद होता, अज्ञेयवादही होता आणि सर्वोच्च मानावी अशी विद्वत्ताही होती. हे असे विलक्षण मिश्रण व्यक्तिमत्त्वात असूनही ते

व्यावहारिक पातळीवर सफलपणे कार्य करीत राहिले. वेदान्तातील तत्त्वज्ञान आपल्या दैनंदिन व्यवहाराच्या पातळीवर आणून त्यांनी शास्त्रग्रंथात दडलेल्या अमोल खजिन्याचे दरवाजे सर्वसामान्य लोकांपुढे उघडले. वेदांनी सांगितलेला खराखुरा सनातन धर्म कोणता हे विसाव्या शतकाच्या अखेरीस त्यांनी समर्थपणे आणि तेजस्वी तर्कबुद्धीने लोकांपुढे मांडले. ऐहिक कल्याण म्हणजे अभ्युदय आणि पारलौकिक कल्याण म्हणजे निःश्रेयस. यांचा उचित समन्वय लोकांनी आपल्या जीवनांत करावा हेच त्यांनी आयुष्यभर सांगितले. मनांतील विकार कमी करून विवेकशील सदाचरण करीत रहावे, धर्माचरण करीत रहावे हीच त्यांची शिकवण आहे. हीच धर्माची पुनर्स्थापना असे म्हणता येईल.

त्यांचे विचार केवळ भारतीय समाजासाठी नाहीत तर अवघ्या मानव समाजासाठी आहेत. काळाच्या कसोटीला पूर्णपणे उतरेल असा विश्वधर्मच त्यांनी जगापुढे मांडला. सर्व प्राणीमात्र व जड विश्वाला कवेत घेईल अशी करूणा त्यांच्या हृदयांत होती. अखिल विश्वाचे कल्याण हाच त्यांचा ध्यास होता. विश्वकल्याणाच्या संकल्पांतून त्यांनी मांडलेल्या विचारधनाला वैश्विक धर्माचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

त्यांच्या मनाला समुद्राची खोली आणि आकाशाची विशालता होती. नवा धर्म किंवा पंथ स्थापन करून तो जगाला पटवून देण्याचे सामर्थ्यही त्यांच्याजवळ होते. पण त्यांनी तसे केले नाही. सनातन धर्मावरील धूळ झटकून त्यांनी त्याला झळाळी दिली आणि सर्व मानवजातीला आनंदमार्ग वाटेल अशा स्वरूपांत तो त्यांनी जगापुढे

ठेवला. पण ते केवळ तर्ककठोर तत्त्वज्ञानी नव्हते. ईश्वराच्या सगुण स्वरूपाचे उत्कट भक्त म्हणून ते व्यावहारिक पातळीवर जीवन जगत राहिले. धर्माचरण आणि तत्त्वज्ञान यांचा हेतू ईश्वरभक्ती करणे आहे असे सांगून त्यांनी व्यावहारिक जीवनाशी धर्माचरणाचा जो तोल साधला तो निरूपमेय म्हणावा असाच आहे. हे उत्तुंग कार्य त्यांनी केले ते स्वतःच्या कोणत्याही लाभासाठी नव्हते. सर्वसामान्य लोकांच्याबद्दल मनांत कळवळा होता म्हणूनच हे निष्काम कर्मयोग्याचे जीवन जगत राहिले.

विचारधनमधील त्यांचे विवेचन वाचतांना सतत जाणवत रहाते की एका धारदार बुद्धी असलेल्या परमसाक्षात्कारी महायोग्याच्या सहवासांत आपण आहोत. त्यांच्या बुद्धीप्रकाशाने वैचारीक क्षेत्रातील अनेक कोपरे उजळून निघाले. तथापि सर्वसामान्य माणसाला ईश्वरभक्तीची शिकवण सांगून ते निराश व उदास मनांना शांती प्रदान करीत राहिले.

वैदिक ज्ञान, भक्ती आणि मुक्त चिंतन यांचा त्रिवेणी संगम त्यांच्या जीवन कार्यांत दिसून येतो. बौद्धिक शक्तीचा परमोत्कर्ष असल्यामुळे ज्ञानाच्या गहन क्षेत्रातील अवघड प्रमेयेही ते सहजपणे सोडवून दाखवत. पण मनांतील भक्ती इतकी कोमल होती की प्रल्हाद आणि ध्रुव यांचे नाव ओठावर येताच त्यांचे डोळे ओले होत आणि भावभक्तीच्या गहिवरामुळे त्यांना पुढे बोलणे अशक्य होई. शांत आणि निश्चयी, ज्ञानी आणि भक्त, निग्रही आणि योगी अशी विविध रूपे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सामावलेली होती. तत्त्वज्ञानातील निरगाठी

सोडवून मनांतील गुंता मोकळा करतांना त्यांनी शुद्ध तर्क आणि अचुक विश्लेषण यांचा पाया कधीही सोडला नाही.

महर्षि व्यास, आद्य शंकराचार्य आणि श्रीज्ञानदेव यांच्या अलौकिक कोटीतील अवतारी पुरुष म्हणावे असेच महाज्ञानी ते होते. त्याचबरोबर वेदांतील गूढ तत्त्वे स्वतः आचरणांत आणून इतरांसमोर आदर्श ठेवणारे ते महान आचार्यही होते. प्रखर बुद्धीमंत असूनही अंतरगांत ते संवेदनाशीलच राहिले आणि तरीही कठीण प्रसंगी मनावर व भावनांवर नियंत्रण ठेवून स्थितप्रज्ञ आणि गुणातीत माणसाच्या आचरणाचा आदर्श त्यांनी जगापुढे ठेवला.

पातंजल योगात सांगितलेल्या प्राकाम्यसिद्धी त्यांना प्राप्त होत्या. भूतकाळांतील आणि भविष्यकाळांतील घटना ते स्पष्टपणे पाहू शकत. म्हणूनच त्यांना त्रिकालज्ञ म्हणावेसे वाटते. परंतु या सिद्धी त्यांनी वापरतांना संयम ठेवला आणि अपवादात्मक स्थितीतच केवळ भक्तांच्या कल्याणासाठीच त्या वापरल्या. एवढे सिद्धीसामर्थ्य असूनही त्यांच्या मनांतील संग्रह वृत्ती नाहीशी झाली होती. लोकप्रियतेपासून त्यांना दूरच रहावेसे वाटत असे. समुदायात बसलेले असले किंवा भक्तवृंदांमध्ये बोलत असले तरी मनाने ते एकांतातच असत. स्वतःची प्रसिद्धी व्हावी किंवा स्वतःचे महात्म्य वाढावे असे त्यांना कधीच वाटले नाही.

हिंदुधर्म म्हणजे वैदिक सनातन धर्म असे सांगून त्यांनी सर्व मानव हे एकाच विश्व कुटुंबाचे विशाल मानव समुहाचे घटक आहेत हे लोकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. आपल्या उदार

वैचारिकतेत त्यांनी सर्व मानवजातच नव्हे तर प्राणीमात्रही सामावून घेतले आणि विविध पंथीयांतील एकता ठामपणे लोकांच्या पुढे ते मांडत राहिले. निरनिराळे पंथ आणि संप्रदायांतील एकता आणि धार्मिक सहिष्णुता मांडतांना त्यांनी अलौकिक प्रज्ञावंताचे कौशल्य दाखवले.

सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करा, वनस्पतींवर प्रेम करा, अगदी जड आणि अचेतन वस्तुंवरही प्रेम करा. कारण या साऱ्या गोष्टी तुमच्या माझ्यासारख्या परब्रह्माचा आविष्कार आहेत असे ते ठामपणे सांगायचे. सर्वांविषयी अपार कारूण्य असल्याने त्यांनी विविध धर्म, पंथ व संप्रदाय यांच्यातील एकता समाजापुढे ठासून मांडली. परस्पर द्वेष, मत्सर नाहीसा करण्याचा प्रयत्न केला. सर्व धर्म, पंथ व संप्रदाय एकाच दिशेत एकाच परमसत्याकडे जातात हे त्यांनी प्रामुख्याने सांगितले आणि एक सुसंस्कृत विवेकाधिष्ठीत जीवनमार्ग त्यांनी जगाला दाखविला. त्या मार्गात अतार्कीक असे कांही नाही. उलट पूर्णतया विवेकाधिष्ठात विचारसरणी आहे, तात्त्विक आणि सामाजिक विचारांची प्रगल्भता आहे आणि माणसाचे भौतिक कल्याण व मनःशांती या दोहोंचा समन्वयात्मक विचार आहे. भेदभाव कमी व्हावा आणि बंधूभाव वाढीस लागावा यासाठीच ते सतत प्रयत्न करीत राहिले. पण त्यांत अभिनिवेश व आग्रह नव्हता. अनाग्रही भूमिका हा त्यांचा विशेष होता. सामान्य संकेत आणि साचेबंद विचार यांच्या पलीकडे जाऊन त्यांनी मुक्तपणे चिंतन केले आणि मानवी समाजाच्या समस्या लक्षात घेऊन ईश्वर भक्तीनेच नियमबद्ध कर्मशील जीवन

जगण्याची शिकवण ते समाजाला देत राहिले. वैदिक आचार विचारांना तत्त्वज्ञानाची खंबीर बैठक त्यांनी दिली. सर्व पंथ, संप्रदाय आणि विचारप्रणाल्या यांचा समन्वय करून ते एकाच परमसत्याकडे जातात हे त्यांनी दाखवून दिले. अद्वैत तत्त्वज्ञान त्यांनी प्रभावीपणे मांडले. गुरूकृपेची महती सांगून शक्तिपातविद्येचे महत्त्व ते विशद करीत राहिले. अजातवाद आणि निर्गुण ब्रह्माचा पारमार्थिक स्तरावरील महिमाही त्यांनी स्पष्टपणे वर्णन करून सांगितला आहे आणि तरीही लोककल्याणासाठी ते ईश्वराच्या भक्तीची महती मुक्तकंठाने सांगत राहिले. सर्वसामान्य लोकांना भक्तीमार्गाचाच उपदेश करीत राहिले.

श्रीदत्तमहाराजांच्या तत्त्वज्ञानाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी समत्वदर्शन शक्तीचे महत्त्व स्पष्टपणे मांडले आहे आणि आपले सर्व विवेचन त्या केंद्रबिंदू भोवती गुंफले आहे. सर्व विश्वांत असलेले समत्व पाहण्याची शक्ती ही बुद्धीची अंतिम शक्ती आहे, बुद्धीचा पूर्ण विकास येथेच होतो असे सांगून ते पुढे म्हणतात, सर्व जडचेतन वस्तुंमध्ये समत्व पाहू शकणाऱ्यालाच पूर्ण शांतीचा लाभ होतो. त्यांनी स्वतः अनुभव घेऊन हे सांगितलेले असल्यामुळे या प्रतिपादनाला आजच्या विज्ञानयुगात खूपच महत्त्व प्राप्त झाले आहे.

बुद्धीग्राह्य आणि प्रत्ययपूर्ण चिंतन करण्याची पद्धती आणि लोककल्याणाची दुर्दम्य इच्छा यामुळे त्यांचे विचारधन आजच्या विज्ञानयुगांतही सर्वत्र स्वीकारले गेले आहे. त्यांनी मांडलेले तत्त्वज्ञान पूर्णतया तर्कशुद्ध आणि बुद्धीनिष्ठ असल्यामुळे ते चिरंतन राहील असा

विश्वास वाटतो. ऐहिक कल्याण आणि पारलौकिक कल्याण यांचा समन्वय करण्यावर त्यांनी भर दिला. अंतर्बाह्य विकासाची श्रीदत्तमहाराजांनी मांडलेली ही संकल्पना आजच्या विज्ञान युगांत फार महत्त्वाची आहे. प्रेम व शांतीचा संदेश देऊन सर्वांभूती प्रेम भावनेची वृत्ती वाढीस लावण्याचा ते सातत्याने प्रयत्न करीत राहिले. विविध दैवतांच्या पूजेत भेद न करता सर्वांभूती-प्रेम हीच भगवंताची खरी पूजा असा उदात्त विचार ते सांगत राहिले. कोणाचाही द्वेष अथवा द्रोह नाही, सर्वांवर प्रेम ही त्यांची शिकवण म्हणजे आजच्या जगाला त्यांनी दिलेली एक अमोल देणगी आहे.

श्रीदत्तमहाराजांनी स्वतःचा व्यक्तिगत प्रभाव वाढवू दिला नाही. एखाद्या आधुनिक प्रेषिताप्रमाणे ते विशिष्ट पंथाचे संस्थापक बनले नाहीत. केवळ सर्व प्राणीमात्राला एका सूत्रांत गोवणाऱ्या वैदिक धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठीच ते जीवन जगत राहिले. सत्य, प्रेम आणि शांती यांची शिकवण समाजाला देत राहिले. ईश्वर भक्ती शिकवीत राहिले. लोकांची दुःखे दूर करत राहिले. केवळ लोककल्याणासाठीच जगत राहिले. प्राचीन वैदिक परंपरेचे पुनरुत्थान करतांना त्यांनी सर्व भारतीय समाज पुन्हा एकदा वैदिक सूत्रांत गोवला. त्यामुळे वैदिक परंपरा पुन्हा उज्वलीत स्वरूपात समाजापुढे प्रभावीपणे मांडली गेली.

श्रीशंकराचार्य स्वामीमहाराज सांगतात, ''परब्रह्माचा साक्षात्कार झाला म्हणजे जीवन आनंदमय होते आणि सर्व झाडे कल्पवृक्षासारखी दिसू लागतात, सर्व जलाशय गंगेच्या पाण्यासारखे पवित्र होतात आणि

सर्व कर्मे ईश्वराची पूजाच होऊन जाते. तोंडातून बाहेर पडलेल्या शब्दांना उपनिषदांतील मंत्रांची पूजनीयता प्राप्त होते. सर्व व्यवहार ब्रह्मबोधाने होतात.''

हे कसे घडते, हे कसे असते हे पहावयाचे असेल तर श्रीदत्तमहाराजांची आंतरिक स्थिती पहावी. त्यांचे आचरण व मनोविश्व याच स्वरूपाचे होते.

श्रीदत्तमहाराज हे सनातन परंपरेतून घडलेले अलौकिक प्रज्ञावंतही होते आणि खुल्या मनाने मुक्तपणे चिंतन करणारे प्रतिभाशाली तत्त्वज्ञही होते. धर्मशास्त्रांवर प्रभुत्त्व असलेले प्रकांड पंडीतही होते आणि सर्वभूतहितेरतः या वृत्तीचे निखळ संतही होते. तर्ककठोर महाज्ञानीही होते आणि भावकोमल भक्तही होते. ते ब्रह्मविद्‌ही होते आणि धर्मसुधारकही होते. अनेक परस्पर विरोधी भिन्न गोष्टी त्यांच्या एकाच व्यक्तिमत्त्वात एकवटलेल्या होत्या. वैचारिक विसंगती दूर करणारा अलौकिक प्रज्ञेचा हा शांत तत्त्वज्ञ आणि योगी सदैव वैश्विक पातळीवरील बुद्धीमंताच्या रूपानेच जगाला दिसत राहिला. भविष्यकाळांत भावी पिढ्यांना असा इतक्या विविधांगी कर्तृत्वाचा अलौकिक प्रज्ञावान भारतात होऊन गेला यावर विश्वास ठेवणेही अवघड वाटेल आणि तो प्रज्ञावंत पूर्णतया निरहंकारी आणि विनयशील असल्यामुळे अमानित्वाच्या भूमिकेतून प्रसिद्धीपासून पूर्णतया दूर राहिला यावर विश्वास ठेवणे त्याहूनही अवघड वाटेल.

................

## ॥ सौ.लक्ष्मीबाई कवीश्वर - अल्पचरित्र व विभूतीविशेष ॥

**सौ.**लक्ष्मीबाई कवीश्वर हे एक अलौकिक विभूतीमत्त्व. भारतीय संस्कृतीतील आदर्श मूल्यांचे साकाररूप म्हणून गौरव करावा असे थोर वेदान्ती श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या त्या धर्मपत्नी. वयाच्या बाराव्या वर्षी श्रीदत्तमहाराजांच्या जीवनात सहधर्मचारिणी म्हणून प्रवेश केला आणि अडुसष्ठ वर्षे समर्पित दांपत्य जीवन जगून त्यांनी एक आदर्श समाजापुढे ठेवला आहे. १० जानेवारी, १९९९ रोजी वयाच्या ऐंशीव्या वर्षी सौ.आईसाहेबांनी पुणे येथे देह ठेवला.

श्रीदत्तमहाराजांचे जीवन म्हणजे परमार्थ यात्राच. जीवन धर्मजागरणालाच वाहिलेले. जे कांही करायचे ते जगासाठीच, लोककल्याणासाठीच. स्वतःसाठी कांहीच नाही. मनाने पूर्ण निःसंग, अलिप्त. संन्यासी वृत्तीचे मन सदैव ईश्वर चिंतनातच रंगलेले. स्वतःच्या देहाकडे लक्ष नाही अशा अवस्थेत असलेले. कीर्ती-धन-यश अशा लौकीक गोष्टींबद्दल पूर्णपणे उदासीन असलेले. हजारो शिष्य आणि दुःखीकष्टी हेच आपले कुटुंब असे वाटणारे. ''हे विश्वचि माझे घर'' अशा कोटीतील संतपुरूष. अशा संतांबरोबर संसार करणे सोपे नाही. एक प्रकारे हे असिधाराव्रत-तलवारीच्या पात्यावर चालण्यासारखेच. पण आईसाहेबांनी ते सहजगत्या करून दाखवले. श्रीदत्तमहाराजांचा प्रपंच व परमार्थ दोन्ही त्यांनीच सांभाळला आणि तेही स्वतःला पूर्णपणे झाकून घेऊन, सर्व श्रेय श्रीदत्तमहाराजांच्या पदरांत टाकून. मला त्यांतले काय कळतं असं म्हणत उंबरठ्याच्या आंत दारामागे

राहून. थोर संत बहिणाबाई म्हणतात, "प्रपंच परमार्थ चालवी समर्थ। तिनेच गगन पेलियेले ॥" आईसाहेब अशा कोटीतल्या होत्या. धर्मपत्नीची अशी साथ असल्यामुळेच श्रीदत्तमहाराज एवढे मोठे धर्मजागरणाचे कार्य करू शकले.

आईसाहेबांचे माहेर बार्शीचे. वडील श्री. भगवंतराव पाठक हे श्रीधुंडिराजमहाराजांचे शिष्य. त्या एक वर्षाच्या असतांना आई स्वर्गवासी झाली. आजीनेच त्यांना वाढवले. घराणे साधे व बाळबोध होते. घरातील सर्वांचे श्रीधुंडिराजमहाराजांच्या घरी प्रसंगाप्रमाणे येणे-जाणे व्हायचे. अशाच एका प्रसंगी सौ. सरस्वतीबाई आईसाहेब यांच्या नजरेखालून भगवंतरावांची सुकन्या गेली. हुशार, तरतरीत व देखणी मुलगी पाहून आईसाहेबांना मुलीबद्दल आपलेपणा वाटला. आईसाहेबांचा संकल्प झाला आणि १९३० या साली श्रीदत्तमहाराजांशी सुंदर पाठक यांचा विवाह झाला.

माहेरी कवीश्वरांच्या घराइतके धार्मिक उपासनेचे वातावरण अनुभवलेले नव्हते. त्यामुळे सुरुवातीला सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांचे मन गोंधळून जाई. घरात अनेक शिष्य, साधक, प्रवचनकार, संतमहात्मे वस्तीला असायचे. धार्मिक चर्चा सतत चालायची. सर्वांचे आपल्या परंपरेप्रमाणे शास्त्राधिष्ठीत व्रतवैकल्ये, नित्यक्रम, उपासना यांचे काटेकोरपणे पालन करणे म्हणजेच जीवन अशी सर्वांची वृत्ती होती. त्याहीपेक्षा कठीण म्हणजे त्यांच्या पतिराजांची-श्रीदत्तमहाराजांची मानसिक बैठक तर अत्यंत उच्च कोटीची होती. त्यांचा स्वभाव काहीसा अबोल होता. नेहमी वाचनात मग्न झालेले

असायचे. अत्यंत साध्या पद्धतीने रहायचे. वृत्तीने गंभीर होते. या गोष्टी सामान्य स्त्रियांना अत्यंत अवघड वाटतील. परंतु सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांचा अधिकारही मोठा असल्यामुळे कवीश्वर घराण्याची परंपरा आणि धर्मजीवन यांत त्या सहजतेने मिसळून गेल्या, एकजीव झाल्या. सासूबाईंच्या बरोबर रोज १०८ प्रदक्षिणा घालणे, दत्तमहात्म्याचा एक अध्याय वाचणे आणि संध्याकाळी दिगंबरांची धून सांगणे हे नेम त्यांनी धरले व कवीश्वरांच्या घरातले अग्निहोत्र आईसाहेबांनी आयुष्यभर निष्ठेने सांभाळले.

आईसाहेबांचे वागणे अतिशय मर्यादशील असे. आपल्या सासूबाई केवळ गृहिणी नाहीत, तर मोठ्या शिष्यपरिवाराच्या गुरूपत्नीही आहेत याची त्यांना जाणीव नेहमीच असे. सासुसासरे, वडीलधारी मंडळी आणि पतीराजांचा शब्द प्रमाण मानून त्या सदैव त्यांच्या आज्ञेतच राहिल्या.

सन १९३७ या वर्षापासून श्रीदत्तमहाराजांनी शंकराचार्यांच्या मठात अध्यापनाचे काम स्वीकारले आणि बिऱ्हाड पुण्यात मांडले. नारायणपेठेत तिसऱ्या मजल्यावर जागा घेतली. श्रीदत्तमहाराजांचा प्रपंच फारसा सांपत्तिक सुस्थितीत नव्हता. परंतु त्याची खंत आईसाहेबांना कधीच वाटली नाही. प्रसन्न मनाने घरांतील सर्व कामे स्वतः करीत. रात्री दोन वाजता उठून अंगणांतील नळावरून घागरीने पाणी वर आणायचे. भांडीधुणे पहाटेच स्वतः करायच्या. अशी कामे करतांना इतरांनी बघितले तर श्रीदत्तमहाराजांची सांपत्तिक स्थिती उघड होईल, कदाचित त्यांना कमीपणा येईल, तसे होऊ नये ही भावना

त्यांच्या मनांत असे. गुरूकुलपद्धतीने अनेक विद्यार्थी शिकायला घरी रहात. सौ.आईसाहेब स्वतः सर्वांचा स्वयंपाक करीत व मायेने जेवू घालत, त्यांची काळजी घेत. पोटची अपत्ये कोणती आणि शिकायला राहिलेली मुले कोणती हे इतरांना कळणारही असे त्यांचे वागणे असायचे. निखळ मातृत्त्व हाच त्यांचा स्थायीभाव होता.

श्रीदत्तमहाराज व सौ. आईसाहेब यांचे स्वभाव एकमेकाला पूरक होते. श्रीदत्तमहाराज अबोल व मौनांत वावरणारे, फक्त ज्ञानदानासाठी मुख उघडणारे. म्हणूनच आईसाहेब स्पष्ट बोलणाऱ्या. परखड स्वभावाच्या. पण पोटांत मायाच असे, लगेच सौम्य शब्दांत समजूत काढीत व मायेने जवळ घेत. मोठी चूक केली तरीही समजावून सांगायच्या. अबोला धरणे एवढीच शिक्षा. स्वतःच्या आचरणांतूनच त्या खूप कांही शिकवायच्या आणि संस्कार करायच्या.

श्रीदत्तमहाराज सोशिक वृत्तीचे, त्रास झाला तरी न बोलणारे. पण सौ. आईसाहेबांना अतींद्रिय पातळीवरून श्रीदत्तमहाराजांचे अंतरंग जाणता येई व तत्परतेने त्या तसे वागत. खऱ्या अर्थाने त्या अर्धांगी होत्या. भारतीय संस्कृतीत सांगितलेले, “ दोन देह पण एकच मन” हे पती व पत्नी यांचे अद्वैत इथे साकार झाले होते. भारतीय पत्नी म्हणजे धर्मपत्नी. धर्माचरणांत पूर्ण सहभागी होणारी म्हणून सहधर्मचारिणी. आईसाहेब अशा आदर्श सहधर्मचारिणी होत्या.

आईसाहेब नेहमी हसतमुख दिसायच्या. हौसेने अनेक पदार्थ करायच्या, सर्वांना आग्रह करून खाऊ घालायच्या. रसिकतेने चांगली चांगली पुस्तके वाचायच्या. टापटीप, स्वच्छता, नीटनेटकेपणा,

व्यवस्थितपणा हे श्रीगुळवणीमहाराजांचे गुण त्यांनी आत्मसात केले आणि सतत जोपासले. घरांत मोठे गंभीर वाद चालले असले की एकाच वाक्यांत मार्मिक टिपणी करायच्या आणि तो वाद संपून जायचा. मिश्किलपणे विनोद करणे हा त्यांचा एक गुणविशेष. रसिक वृत्तीने चांगल्या गोष्टींचा आस्वाद घेणे त्यांना आवडे. जावई व नातवंडांबरोबर त्यांनी इंग्रजी चित्रपटही पाहिले आणि मार्मिकपणे पाश्चात्य भोगवाद आणि चंगळवादी प्रकृतींची खिल्लीही उडवली. पण हे सगळे मुलांमध्येच. वडीलधाऱ्यांसमोर आदरानेच वागायच्या. शब्दाने वा कृतीनेही त्यांना कधी दुखावले नाही. अडचणीत असलेल्या व्यक्ती आणि अनेक धार्मिक व सामाजिक संस्थांना त्या नेहमी मदत करायच्या. पण त्याचा त्यांनी तोंडाने कधीही उच्चार केला नाही. कोठेही पद, मानसन्मान व हारतुरे कधीही स्वीकारले नाहीत.

गुरूपदावरील विभूती व त्यांच्या पत्नीला वैयक्तिक जीवनांत काय त्याग करावा लागतो याची लोकांना कल्पना नसते. स्वत:च्या इच्छा, दिलेले शब्द, सोयी-गैरसोयी असे कांही पहाता येत नाही. तितिक्षेची कसोटी बघणाऱ्या प्रसंगांनाही शांतपणे सामोरे जावे लागते. अशाच एका प्रसंगी वाडीला श्रीदत्तमहाराज काहीशा उद्वेगाने म्हणाले, "शिवोमतीर्थ स्वामीमहाराजांनी म्हटले आहे परमेश्वरा गुरुपदावर आम्हाला कदापि ठेवू नकोस. गुरुपदावर बसल्यानंतर स्वत:च्या सोयीकडेही पहाता येत नाही. हे त्यांनी जाहीररित्या सांगितले आहे."

श्रीधुंडिराजमहाराज, श्रीगुळवणीमहाराज यांनाही या दिव्यांतून जावे लागले होते. म्हणूनच श्रीगुळवणीमहाराजांनी जेव्हा

आईसाहेबांना विचारले, ''आपले थोरले चिरंजीव अशोकराव आम्हाला देता कां? आम्ही त्यांना तयार करून परंपरा त्यांच्यावर सोपवू,'' तेव्हा त्या गंभीर होऊन म्हणाल्या, ''महाराज व्हायचं म्हणजे फारच त्रास. मोठाच त्याग करावा लागतो. माझ्या मुलांनी महाराज होऊ नये. डॉक्टर, इंजिनिअर व्हावं आणि सामान्यांप्रमाणे संसार करावा.'' मुलांना या दिव्यांतून जावे लागू नये या भावनेमुळे मातृहृदयातून हे शब्द आले. पण माहूरला अशोकरावांचे जावळ काढतांना आणि मौंजीबंधनाच्या वेळी श्रीधुंडिराजमहाराजांनी अशोकरावांच्या आध्यात्मिक अधिकाराबद्दल व पुढील मोठ्या कार्याबद्दल सूचक उद्गार काढले आणि ते ऐकून श्रीगुळवणीमहाराजांनी संमतीदर्शक स्मितहास्य केले असेही आईसाहेब सांगायच्या. सौ.ताईमहाराजांनीही वेळोवळी तसेच उद्गार काढल्याचेही सांगायच्या.

संतांचे संकल्प होतात. ईश्वरालाही ते स्वीकारून त्याप्रमाणे घडवावे लागते. मातोश्रींच्या इच्छेप्रमाणे अशोकराव डॉक्टर झाले. पण त्यांचे मन अध्यात्माकडे ओढ घेत राहिले. कालांतराने डॉक्टरचा व्यवसाय सोडून श्रीदत्तमहाराजांच्या परमार्थकार्यात ते सामील झाले, कवीश्वर घराण्याची मंत्रदीक्षा १९९१ पासून आणि वासुदेवनिवास या शक्तीपीठाची दीक्षा १९९५ पासून ते देऊ लागले. साधकांना यथोचित मार्गदर्शन करू लागले. डॉ.अशोकमहाराजांचा अधिकार जाणून सौ.ताईमहाराज त्यांना साष्टांग नमस्कार घालू लागल्या, त्यांचा शब्द गुरूवचनाप्रमाणे पाळू लागल्या आणि दत्ताश्रमात सद्गुरूप्रमाणेच

त्यांचेही भव्य स्वागत करू लागल्या. हे पाहून सौ.आईसाहेबांना धन्य वाटू लागले असेच सांगतात. ''करणे कां न करणे । हे आघवे तोचि जाणे । विश्व चळतसे जेणे । परमात्मेनि ॥'' असे ज्ञानदेवांनीच म्हटले आहे.

सौ. आईसाहेबांनी आपला पारमार्थिक अधिकार नेहमीच झाकून ठेवला. परंतु जाणकारांच्या लक्षात तो यायचाच. काचेच्या पेटीतली वस्तू पहावी तसे त्यांना समोरच्या माणसांचे अंतरंग दिसून येई. दांभिक व स्वार्थी माणूस त्या लगेच ओळखायच्या. त्यांच्याशी त्या बोलतही नसत. नमस्कारासाठी आला तर त्या मागे पाय घेत. श्रद्धावंत साधक आला की त्यांना आनंद होई. प्रसन्नतेने स्वागत करून त्याला भरभरून आशीर्वाद द्यायच्या, मायेने जेवायला खायला घालायच्या, त्याच्या प्रपंचातल्या अडचणींबाबत मार्गदर्शन करायच्या. पण त्या त्यांच्या घरगुती बोलण्यांतही मोठे पारमार्थिक मार्गदर्शन असे. त्यांचा पदस्पर्श आणि त्यांचे शब्द ईश्वरी शक्तीस्त्रोतासारखे वाटले असे अनेक भक्त सांगतात. अधिकारी साधकांच्या मस्तकावर हात ठेवून त्यांनी शक्तीपात मार्गाने त्यांचे उन्नयन केल्याचीही उदाहरणे आहेत. त्या अनौपचारिक दीक्षाच होत्या कां? सौ.आईसाहेबांचा तेवढा अधिकार निश्चितच होता. ज्यांच्या चरणांवरील रज:कण विनीत भावनेने मस्तकावर धारण करावे अशा योग्यतेच्या त्या होत्या. पण त्या स्वतःला झाकूनच घ्यायच्या. ''मला त्यातलं काय कळतं'' असंच म्हणत रहायच्या. हे अमानित्व ईश्वरी रूपांतच असते.

श्रीदत्तमहाराजांचा धर्मजागरणासाठी अवतीर्ण झाले आहेत याची त्यांना सदैव जाणीव होती. सौ.आईसाहेबांनीही स्वतःच्या प्रपंचापेक्षा धर्मजीवन, धर्मप्रसार आणि धर्मजागरण अधिक महत्त्वाचे मानले. पतीच्या भावजीवनांत त्या सहजपणे मिसळून गेल्या, एकजीव झाल्या. प्रयागला गंगा, यमुना व सरस्वती एकरूप दिसतात, तसे ज्ञान, भक्ती व वैराग्य या अलौकिक संसारात एकरूप झालेले दिसतात. भगवान शंकर व पार्वतीदेवी यांच्याप्रमाणेच तो ईश्वरी सत्तेचा संसार होता. ईश्वरी लीलेसाठीच संपन्न होत राहिला.

जगदंबामातेचे दैवी गुण, अधिकार व थोरवी त्यांच्यात सामावलेली होती. म्हणूनच श्रीदत्तमहाराजांचा प्रपंच सांभाळतांना त्या केवळ स्वतःच्या पोटच्या अपत्यांच्या माता राहिल्या नाहीत. त्या सर्वांच्या माता झाल्या. श्रीदत्तमहाराजांच्या शिष्यपरिवाराच्याही त्या माता झाल्या आणि सर्व शिष्य परिवार ज्यांची परमेश्वररूपाने पूजा करतो त्या श्रीदत्तमहाराजांच्याही त्या स्वतः माताच बनल्या. हे त्यांचे मातृत्त्वाचे रूप खरोखरीच विलोभनीय आहे. स्त्री ही मातारूपांतच मानणारी भारतीय संस्कृती आईसाहेबांच्या जीवनांत पूर्णपणे अवतरलेली दिसते. हे त्यांचे मातृरूप ज्यांना ज्यांना अनुभवता आले त्यांना सर्वांनाच त्या पूजनीय वाटल्या, ज्यांच्या स्मरणानेही पापांचा नाश होतो. ("स्मरे नित्यं महापातकनाशनम्") या कोटीच्या वाटल्या. श्रीदत्तमहाराज जसे परमेश्वररूप म्हणून पूजनीय तशाच आईसाहेबही जगदंबास्वरूप म्हणून पूजनीय.

सौ.ताईमहाराज म्हणतात की,''आईसाहेब म्हणजे जगदंबेचे परिपूर्ण रूपच आहे. कोल्हापूरच्या श्रीअंबाबाईचे दर्शन घेणे आणि सौ.लक्ष्मीबाई आईसाहेबांचे दर्शन घेणे, दोन्हीचे फळ एकच.'' आईसाहेबांचा हा अधिकार जाणून ताईमहाराज त्यांच्याशी लीनतेने वागत आणि साध्या संभाषणातील शब्दही वेदवाक्याप्रमाणे पाळत.

श्रीदत्तमहाराज अवतरले वेदान्त तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठी, वेदान्त आजही कसा जगता येतो हे जगाला दाखविण्यासाठी. आईसाहेब अवतीर्ण झाल्या ते भारतीय संस्कृतीतील आदर्श मूल्ये आचरणांत कशी आणावी हे दाखविण्यासाठी, सर्व प्राणीमात्रांवर माया करणारी देवीस्वरूप माता कशी जीवन जगते हे दाखविण्यासाठी. श्रीदत्तमहाराज ईश्वरी शक्तीचे परिपूर्ण रूप तर सौ.आईसाहेब मातृशक्तीचे परिपूर्ण रूप, साक्षात जगदंबेचे रूप.

आईसाहेबांनी स्थूल देह ठेवला. पाठोपाठ श्रीदत्तमहाराजांनीही स्थूल देह ठेवला . पण ते दोघेही सूक्ष्म रूपांत आहेतच. संत जिथे राहिले ते स्थान संतरूपच धारण करते. रेणुकानिवास, वासुदेवनिवास आणि वामननिवास या पवित्र वास्तूंमध्ये श्रीदत्तमहाराज व सौ.आईसाहेब यांचे दर्शन घडत रहाणार आहे आणि त्यांचा कृपाप्रसादही मिळत राहणार आहे. स्थूल शरीराच्या सीमा ओलांडून अव्यक्त रूपांत गेल्यावर त्या दोघांचे कार्य अधिक व्यापक होत जाणार आहे.

***डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर***



# श्रीदत्तमहाराज कवीश्वर

(इ. स. १९४८ साली घेतलेले एक दुर्मिळ छायाचित्र)



सौ. ताईमहाराज





श्रीदत्तमहाराज कवीश्वर



सौ. ताईमहाराज



सौ. आईसाहेब आणि श्रीदत्तमहाराज



श्रीगुळवणीमहाराज





श्रीदत्तमहाराज कवीश्वर



षष्ठ्यब्दीपूर्ती समारंभ - एक दुर्मीळ दर्शन
श्रीगुळवणीमहाराज, श्रीधुंडीराजमहाराज, श्रीदत्तमहाराज



डॉ. अशोकमहाराज,
सौ. आईसाहेब आणि श्रीदत्तमहाराज



श्रीदत्तमहाराज कवीश्वर





# श्रीदत्तमहाराज कवीश्वर







सहस्त्रचंद्रदर्शन



सहस्त्रचंद्रदर्शन समारंभ श्रीदत्तमहाराज,
सौ. ताईमहाराज, सौ. आईसाहेब



सौ. आईसाहेब आणि सौ. ताईमहाराज



सौ. ताईमहाराज



वाराणसी येथे श्रीदत्तमहाराज



सौ. आईसाहेब आणि श्रीदत्तमहाराज



अमृतमहोत्स व
सौ. आईसाहेब आणि श्रीदत्तमहाराज



श्रीगुळवणीमहाराज,
श्रीदत्तमहाराज कवीश्वर

# विचारधन भाग - १

*(अनेक साधक आणि भक्त श्रीदत्तमहाराजांना शंका विचारीत असत आणि श्रीदत्तमहाराजांनी दिलेली उत्तरे ध्वनिमुद्रित करून घेत असत. अशी कांही निवडक प्रश्नोत्तरे आणि श्रीदत्तमहाराजांशी झालेली संभाषणे पुढे दिली आहेत.)*

## - साधकांच्या मनात येणाऱ्या सर्वसामान्य शंकांविषयी - प्रश्नोत्तरे

***प्रश्न : महाराज, आम्हाला जीवनांत दुःखे कां भोगावी लागतात ?***

उत्तर : पापकर्म हे मूळ कारण आहे. आपल्याला दुःखे भोगावी लागतात आपल्या हातून पूर्वी घडलेल्या पापांमुळे. सुखंदुःखं ही दैवाने मिळतात. दैव याचा अर्थ पूर्वी आपल्या हातून घडलेली कर्मे. पूण्यकर्मांचे फळ म्हणून सुख मिळाले. पापकर्मांचे फळ म्हणून दुःखच मिळते. पूर्वकर्मांनाच प्रारब्ध म्हणतात. सर्व दुःखे, शारीरिक रोग, मनस्ताप, त्यामुळे येणारी निराशा हे सगळे प्रारब्धामुळे आपल्याला भोगावं लागतं.

***प्रश्न : महाराज, प्रारब्धामुळे येणारी दुःखे भोगावी लागू नयेत म्हणून आम्ही काय करावे ?***

उत्तर : ईश्वराची प्रार्थना करावी. आपल्या हातून घडलेल्या पूर्वकर्मांतील दोष दूर करा अशी ईश्वराची मनोभावे प्रार्थना करीत राहिले म्हणजे ईश्वराची कृपा होते आणि प्रारब्धाचा नाश होऊ शकतो.

***प्रश्न : महाराज, आम्हाला पापकर्म कां करावीशी वाटतात?***

उत्तर : हा देह म्हणजे मी आहे अशी आपली गैरसमजूत असते. त्यामुळे फार मोठा अभिमान उत्पन्न होतो. कुळाचा अभिमान, शिक्षणाचा अभिमान, नोकरीच्या पदाचा अभिमान, रूपाचा अभिमान, कर्तबगारीचा अभिमान, कर्माचा अभिमान असा सगळा देहाभिमान येतो. 'मी मिळवणारा आहे. मी कुटुंब प्रमुख आहे. माझ्या आज्ञेत सर्वांनी राहिले पाहिजे.' असा हा सगळा अभिमान असतो. म्हणून सगळ्यांनी माझं ऐकलं पाहिजे असं या देहाभिमानामुळेच वाटतं. आपलं कोणी ऐकलं नाही की मनाला क्लेश होतात. मला धन, मान सगळं मिळालं पाहिजे असे वाटते, तेही देहाभिमानामुळेच. देहाला सुखी करण्याचा विचार इतका प्रबळ असतो की पूर्वीच्या कर्मांचा, पापपुण्याचा नीतीअनीतीचा कशाचा विचारही मनांत येत नाही. पापकर्मे होत रहातात. एकाचे पाहून दुसराही तेच करतो. समाजात सगळीकडे पापकर्मे होत रहातात. त्याचा परिणाम म्हणून दु:ख, दैन्यावस्था, रोगराई असं सगळं समाजात दिसायला लागतं.

***प्रश्न : मग आम्ही काय करायचं महाराज?***

उत्तर : राग, द्वेष, मत्सर, शत्रुत्त्व इत्यादी दुर्गुणांमुळे पापकर्मं करावीशी वाटतात, ते मनांतून दुर्गुण गेले पाहिजेत. आपली बुद्धी शुद्ध झाली पाहिजे. म्हणजे मग पापकर्मे घडत नाहीत. पुण्यकर्मे करावीशी वाटतात. दुर्गुण जावेत आणि बुद्धी शुद्ध व्हावी, निर्भय व्हावी म्हणून ईश्वराची प्रार्थना करावी लागते.

***प्रश्न : महाराज, प्रपंचात फार मनस्ताप सहन करावा लागतो.***

उत्तर : मनस्ताप म्हणजेही दुःखच. तेही पूर्वकर्माचेच फळ आहे. प्रपंचात आपल्या मनाविरूद्ध कांहीतरी घडते आणि त्याचा आपल्याला मनस्ताप होतो. सारखा मनःस्ताप झाला म्हणजे मनुष्य निराश होतो. मग व्यवहारही होत नाही, परमार्थही होत नाही.

***प्रश्न : महाराज, संसारात सुख नाहीच कां ?***

उत्तर : संसार दुःखमय आहे. 'सुख पाहता जवापाडे दुःख पर्वताएवढे' असा सिद्धान्त विचार करणारे महात्मे मांडतात. आयुष्यात सुख नाही असं ते म्हणत नाहीत. संसारांत सुख आहे, पण थोडं आहे. दुःख जास्ती आहे, असंच सगळे संतमहात्मे सांगताहेत.

***प्रश्न : महाराज, सुखदुःखे कोण देतो? ईश्वर देतो कां?***

उत्तर : सुख दुःख देणारा दुसरा कोणीही नाही. कर्मानुसार सगळे चाललेले आहे. सगळेही जीव हे स्वकर्म सूत्राने बांधले गेलेले आहेत. आम्ही जे कर्म केले त्याचे फळ आम्हाला भोगलंच पाहिजे. त्याबद्दल ईश्वराला काय म्हणून दोष द्यायचा?

***प्रश्न : महाराज, प्रपंचात समाधान मिळावे म्हणून काय करावे?***

उत्तर : मनांतले दोष जावे लागतात. मन शुद्ध झालं पाहिजे, सद्गुण संपन्न झालं पाहिजे म्हणजे समाधान मिळते. कोणते दोष मनामध्ये आहेत, कोणते गुण आहेत, असं आपल्या मनाचे निरीक्षण करीत राहिलं पाहिजे. मनःशुद्धी करता प्रयत्न केले पाहिजेत. असा प्रयत्न जे करतात, त्यांच्यावर ईश्वराचा प्रसाद होतो. ईश्वराचं सहाय्य त्यांना होतं आणि जरी दुःखं आली तरीसुद्धा त्यांत ते समाधानाने राहू शकतात.

मनोबल मुख्य आहे. ईश्वराला प्रसन्न करणारे जे गुण आहेत ते जर मनामध्ये उत्पन्न झाले तर ती मोठी शक्ती आहे. मनाची सुधारणा, बुद्धीची सुधारणा झाली पाहिजे. धर्मशास्त्र ही ईश्वराची आज्ञा जी आहे ती मनाची शुद्धी व्हावी, ईश्वरप्रसाद व्हावा आणि आपल्याला समाधान मिळावे यासाठीच आहे.

***प्रश्न : महाराज, यापुढे दुःखे येऊ नयेत म्हणून काय करावे?***

उत्तर : दुःखे भोगावी लागतात याला कारण आपलं कर्म. जसें ज्याचे कर्म असेल तसे त्याचे फळ त्याला मिळते. पुण्यकर्मांचे फळ म्हणून सुख मिळते. पापकर्मांचे फळ म्हणून दुःख मिळते. शास्त्रांत हे सगळे दिलेले आहे.

आपल्या हातून पूर्वी जी कर्मे घडली आहेत त्यांचे आपल्याला स्मरणही नाही. त्यांचा परिणाम आपल्या जीवनावर केव्हा आणि कसा होणार आहे याची कल्पना आपण करूच शकत नाही. पूर्वी झालेल्या पापकर्मांचे जे फल दुःख ही पीडाच आहे. त्यावर औषध योगशास्त्रकार सांगतात सोसत रहायचं. प्रारब्ध भोगत रहायचं.

पूर्वकर्मांचे जे काय फळ मिळेल ते मिळेल. पण यापुढे आपल्यांत सुधारणा कशी करायची, दुःखांचा प्रतिकार कसा करायचा याचा विचार आपण केला पाहिजे. यापुढे आपल्याला दुःख येऊ नयेत म्हणून पुण्य कर्मेच करायची. पापकर्मे करायची नाहीत. या जन्मांत पुण्यकर्मे केली, व्यवस्थित वागलो तर पुढे उन्नती होऊ शकेल, चांगले सुख मिळू शकेल.

***प्रश्न : महाराज, अमुक मनुष्य ऐहिकदृष्ट्या सुखी आहे असे आम्ही म्हणतो ते सुख खरे असते कां?***

उत्तर : आम्ही सुखी झालो. सुखी शब्दाचा अर्थ काय आहे ? तेच तेच विषय वारंवार मिळवायचे. चांगल्या मार्गानेही आणि वाईट मार्गानेही मिळवायचे. न्याय अन्याय असा काही विचार करावयाचा नाही आणि हे फक्त स्वतःपुरतं बघायचं. स्वार्थाशिवाय दुसरा कोणताही विचार आमच्या मनांत नाही.

जगाच्या दृष्टीने आपल्याला सगळं मिळालं, चांगलं शरीर, चांगलं अधिकार पद, चांगली कीर्ति, धनही पुष्कळ मिळालं, तरीसुद्धा तेवढ्याने खरं सुख मिळत नाही. बुद्धीची सुधारणा जर झालेली नसेल तर हे सगळं मिळून काहीही उपयोग नाही. संसारातील ती सुखं तात्कालिक असतात. ती जाणारी असतात.

पूर्ण सुख मिळालं पाहिजे आणि ते कायम टिकले पाहिजे. दुःखाची पूर्ण निवृत्ती झाली पाहिजे. यालाच मोक्ष म्हणतात. ईश्वराची भक्ती जर आपल्याकडून झाली तरच दुःख निवृत्तीचा किंवा सुख प्राप्तीचा कांही तरी संभव आहे. भगवत् भक्तीनेच मोक्ष प्राप्त होतो.

***प्रश्न : महाराज, संसारांतले सुख ईश्वराकडे मागायचेच नाही कां?***

उत्तर : संसार दूर करा असे देवाजवळ मागायचे म्हणजे तितका अधिकार पाहिजे. संसार नको असे आपण तोंडाने म्हणतो. परंतु संसार सोडायची खरी इच्छा नसते. मनांत वासना प्रबळ झालेल्या असतात. वैभवाचे चिंतन चालू असते. त्यापेक्षा देवाजवळच संसारसुख मागावे म्हणतात. जे संसारसुख हवे वाटते ते देवाकडेच मागावे. शुद्ध मनाने

देवाची प्रार्थना करावी, ''देवा माझ्या वासना कांही जात नाहीत. मला अमुक संसारसुख हवे आहे.'' देवानेच संसारसुख दिलं म्हणजे त्यांतून भक्ताला बाहेर काढायची जबाबदारीही देवावरच पडते.

देवाच्या कृपेने संसारसुख मिळाले याची जाणीव ठेवावी. संसारसुख भोगत असतांनाच ईश्वराचे चिंतन मनांत सदैव ठेवावे. मग असे संसारसुख मुक्तीकडे नेणारेच होते. ईश्वरभक्ती असली म्हणजे संसारांत समाधान मिळते आणि परमार्थही साधतो.

***प्रश्न : महाराज, साधकाने प्रपंचात रहावे, पण मनाने अलिप्त असावे असे सांगतात. ते कां सांगतात?***

उत्तर : आपापल्या कर्माप्रमाणे जग चालले आहे. हा एक मोठा सिद्धान्त आहे. कोणाची कर्मे कशी असतील याची माहिती आपल्याला कशी असणार? तेव्हा आपण मुद्दाम कशाला पक्षपातीपणा करायचा? याचा किंवा त्याचा पक्ष घेऊन काय करायचं आहे आपल्याला? आणि तसा पक्ष घेऊन कार्य होतंच असंही नाही. जगाचा फार विचार करू नये. प्रपंचांतच राहून कर्तव्यकर्मे करीत रहावे, पण मनाने अलिप्त रहावे. सन्मार्ग सोडायचा नाही. श्रद्धेने धर्माचरण करीत रहायचे. म्हणजे शांती मिळते, समाधान मिळते. प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साधतात.

***प्रश्न : महाराज, वैराग्य म्हणजे काय? मनाला उद्विग्नता येणे का?***

उत्तर : वैराग्य म्हणजे उद्विग्नता नव्हे, जगाचा तिटकारा येणे नव्हे. विषयांचे दोष लक्षात आले म्हणजे मन विषयांकडे जातच नाही. विषयांपासून दूर रहावेसे वाटू लागते. अंतःकरणाची शुद्धी होते. हेच

वैराग्य. विषयवासनांनी मलीन झालेले अंतःकरण वैराग्याने शुद्ध होते. अशा शुद्ध अंतःकरणांतच संतांच्या उपदेशाचे यथार्थ आकलन होते आणि ईश्वरभक्ती प्राप्त होते.

***प्रश्न : महाराज, संसारात राहूनही शांती मिळू शकते कां?***

उत्तर : मन वासनाशून्य झाले, मनांतील सर्व इच्छा नाहीशा झाल्या की मनाची शांती भंगतच नाही. बाहेर कांहीही घडले तरी त्याचा मनावर परिणाम होत नाही. मन सदैव संतुष्ट राहते, तृप्त राहते.

आसक्ती गेली पाहिजे. हे पाहिजे, ते पाहिजे असं कांही मनांत नसेल तरच मन शांत होत रहाते. मनांत अनेक वासना असतील, आसक्ती असेल, तर मन शांत कसे होणार? मन शांत झाले आहे याचाच अर्थ वासनाक्षय झालेला आहे.

शंकराचार्य स्वामीमहाराज सांगतात, वासना कमी कमी होत जाणं म्हणजे शम आहे, शांती आहे. परमार्थ साधनेत साधनचतुष्ट सांगतात. त्यांत शमाला मुख्य महत्त्व आहे. जितक्या वासना कमी तितके अधिक सुख आहे. बाकीची साधनं अंगभूत आहेत, कमी महत्त्वाची आहेत असं म्हणतात आचार्यमहाराज.

***प्रश्न : महाराज, प्रपंचात राहूनही आम्ही साधना कशी करावी ?***

उत्तर : प्रपंचात असतांना आपले सर्व कर्म ईश्वरसाधनेत परिणत करता येते. प्रपंच नेटकेपणाने करीत असतांनाच, भक्ती, ध्यान व ज्ञान मिळवता येते. पण ते आपल्या प्रयत्नांनी होत नाही. त्यासाठी ईश्वराचा अनुग्रह व्हावा लागतो. शुद्ध प्रेम व भक्ती ठेवून ईश्वराची आराधना केली, प्रार्थना केली तर ईश्वराचा अनुग्रह व्हायला वेळ लागत नाही.

***प्रश्न : महाराज, संतमहात्मा कसा ओळखायचा?***

उत्तर : संतमहात्मा कोणाला म्हणायचे? शरीरापासून बाजूला झालेले आहेत. मनांतून संसार काढून टाकलेला आहे. मनांतील विकार पूर्ण काढून टाकलेले आहेत. अहंकारही मनांतून पूर्णपणे काढून टाकलेला आहे. परिपूर्ण आनंद आहे. त्यांत कोणतीही न्यूनता नाही. आपली योग्यता जशी असते तशी योग्यता ते दुसऱ्याला देऊ शकतात. त्यांच्या दर्शनाने, सान्निध्याने दुःखे नाहीशी होतात, आनंद मिळतो. हे त्यांचे सामर्थ्य आहे. संतमहात्मे कोणाचाच उपमर्द करीत नाहीत, कोणाचाही अपमान करीत नाहीत. तीच खरी ईश्वराची पूजा आहे. त्याला अंतःपूजा म्हणतात. अंतःपूजा बाह्यपूजेपेक्षा जास्त महत्त्वाची असते. त्यांच्या कृपेने मानसिक दुःख, शारीरिक दुःखे, भौतिक दुःखे ही सर्व संपू शकतात.

दया अंतःकरणांत भरलेली आहे. दुःखी जीवाला पाहून दयाभावना होते. अज्ञानामुळे जीव सुखदुःखांत सापडले आहेत त्यांना त्या सुखदुःखांतून सोडवावे ही निर्हेतुक दया आहे. त्यांच्याकडून आपल्याला काय मिळेल अशी अपेक्षा नाही. तो विचारही मनांत नाही. त्यामुळे स्वतःचं अमानित्व नैसर्गिक आलेलं आहे. सामान्य जीवांना सुखदुःखांतून सोडवायचं हीच एक वृत्ती असल्यानं मी मोठा आहे असं वाटेलच कशाला? निरहंकार आहेत, कोणाचाही द्रोह नाही, तितिक्षा आहे. सर्व सहन करतात, अंतःकरणांत कोणतीही इच्छा नाही. इंद्रियांचा निग्रह आहे. पावित्र्य आहे, मिताहार आहे. असे

अनेक गुण ज्यांच्या ठिकाणी असतात ते श्रेष्ठ साधु आहेत, भक्त आहेत. भगवंताचे दर्शन त्यांना झालेलं आहे.

***प्रश्न : महाराज, मनांतून संसार जावा ही इच्छा एखाद्याला झाली तर संतमहात्म्यांच्या कृपेने ती अवस्था त्याला प्राप्त होईल कां?***

उत्तर : जर महात्म्यांची कृपा झाली तर संसार बाजूला होतो. संसार मनांतून जाणे शक्य आहे आणि मग ईश्वराच्या ठिकाणी चित्त स्थिर होतं. भक्ताची सगळी जबाबदारी घेण्याची शक्ती आणि योग्यता सद्‌गुरूंच्या ठिकाणी आहे.

***प्रश्न : महाराज, सद्‌गुरूवरील भक्तीने प्रारब्ध नाश होतो कां ?***

उत्तर : दृढ भक्ती असेल तर प्रारब्धनाश होतो. तेवढी भक्ती असेल तर विपरीत प्रारब्धाचा सुद्धा परिहार होतो असं सांगतात. सद्‌गुरूंनी जी आज्ञा केली आहे तिचे पूर्ण श्रद्धेने पालन केले पाहिजे. सद्‌गुरूंनी जे कांही सांगितले ते असंभवनीय आहे असं वाटणं हा दोषच आहे. तो गेला पाहिजे.

स्वामीमहाराजांनी कुष्ठरोग्याला वाळलेल्या लाकडाला पाणी घालायला सांगितलं. पालवी फुटली की रोग जाईल म्हणाले. हे असंभवनीय आहे असं कां म्हणायचं? लाकूड वाळलंय. लाकडांत जीव नाही. पाण्यातही ते सामर्थ्य नाही. पाणी घालून वाळलेल्या लाकडाला पालवी फुटत नाही हा आमचा अनुभव आहे. पण म्हणून ते चूक म्हणायचं कां? आम्हाला इतर लाकडांचा अनुभव असेल. पण इतर लाकडांना पानं येत नाहीत म्हणून या लाकडाला पानं येणारच नाहीत हे कशावरून म्हणायचं? भविष्यांत काय घडणार आहे याची

कल्पना आमच्या बुद्धीला कशी असणार? भविष्यांतही असं होणार नाही असा जो बुद्धीवाद आम्ही वापरतो तो बरोबर नाही.

श्रद्धेने भविष्यही सुधारतं, असंभवनीय तेही घडत जातं. भक्त आपला आहे अशी देवाची भावना असते. म्हणून त्याच्यासाठी देवाला असंभवनीयही घडवून आणावं लागतं. ईश्वरशक्ती पूर्ण समर्थ आहे. श्रद्धाभक्ती मात्र तशा योग्यतेची पाहिजे.

***प्रश्न : महाराज, ही पूर्ण शांतीची अवस्था कशी मिळवायची?***

उत्तर : सर्व सहन करायचे ही शांती नुसती सांगून ऐकून कांही होत नाही. नाथमहाराजांच्या अंगावर शंभर वेळा थुंकण्याकरता माणसाची नेमणूक झाली होती. नाथांना राग आला तर आणखी पैसे मिळणार होते. राग येण्याकरता तो प्रयोग करतो आहे. पण तितक्या वेळेला नाथमहाराज स्नानाला गेले. संतच अशाप्रकारे वागू शकतात. चित्तामध्ये नारायणाचे नाम अखंड असल्याने त्यांच्या मनांत दोष येऊच शकत नाहीत. ''विषय तो त्यांचा झाला नारायण'' म्हणतात. त्या चित्ताला, बुद्धीला दुसरा विषय नाही. विकार उत्पन्न होण्याची परिस्थिती असतांना त्यांच्या चित्तात विकार उत्पन्न होत नाहीत आणि आम्ही मात्र काल्पनिक कांहीतरी परिस्थिती घेऊन विकारी चित्त बनवतो आणि अशांती निर्माण करतो.

याकरता संतांच्या चरित्राचे चिंतन करायला योगसूत्रकारांनीही मुद्दाम सांगितले आहे. या निमित्ताने आपल्या चित्ताचे रोज निरीक्षण करायचे. चित्तांत किती दोष आहेत, किती राग आहे, किती गेला, रोज असे चित्ताचे निरीक्षण करीत राहायचे. संतांच्या चित्ताचे निरीक्षण

करायचे. अशा अभ्यासाने आपल्या विकारांचे उपशमन होते, चित्त शांत होते.

***प्रश्न : महाराज, मन शुद्ध व्हावे यासाठी आम्ही काय करावे?***

उत्तर : आपल्याच मनामध्ये देव-दैत्य आहेत, असे उपनिषदांमध्ये सांगितले आहे. सात्त्विक वृत्ती म्हणजे देव आणि तामसी वृत्ती म्हणजे दैत्य. यांचे युद्ध नेहमी चालू असते. एखादे वेळी सात्त्विक वृत्तीचा जय होतो. त्याप्रमाणे आपल्या हातून पुण्यकर्म घडतात. दुसऱ्या वेळेस तामसी वृत्ती प्रबल होऊन मनुष्याचा अधःपात होतो. काम, क्रोध, लोभ वगैरे जे भयंकर विकार आहेत त्यांनीच मनःशांती नाहीशी होते.त्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून जर मैत्री, करूणा, मुदिता आणि उपेक्षा या साधनवृत्तींचा अभ्यास केला तरच त्या भयंकर विकारांवर जय मिळू शकतो असे योगशास्त्रकार सांगतात. मनाला स्थिर करण्याकरिता, मन शुद्ध करण्याकरिता हे चार उपाय आहेत.

सुखी मनुष्य पाहिला म्हणजे मनांत विचार करावा, त्याच्या पुण्याईने तो सुखी आहे. त्याच्याबद्दल प्रेम वाटले पाहिजे. सुखी माणसाबद्दल आपल्या मनामध्ये मैत्री निर्माण व्हायला पाहिजे. त्यामुळे मनाला शांती मिळते.

दुःखी माणसाला पाहिल्यावर मनामध्ये दया, करुणा उत्पन्न व्हायला पाहिजे. म्हणजे त्याला मदत करणे, उपयोगी पडणे ही कार्ये होतात. ह्याने सुद्धा मनाला शांती मिळते.

पुण्यवान माणूस पाहिला म्हणजे आनंद वाटला पाहिजे. आपल्याला पुण्यकर्म करणे काही जमत नाही. पण तो जे चांगले

करतोय ते चांगले आहे. त्याला साहाय्य करावे असे वाटले पाहिजे. त्यांत आनंद वाटला पाहिजे. मुदिता यालाच म्हणतात. हा एक अभ्यास आहे.

पापी लोकांची उपेक्षा करावी असे त्यांनी सांगितले आहे. आपल्या मनाची सात्त्विक भूमिका तयार करायची आहे. त्यासाठी पापी माणसाची उपेक्षा करायची. 'ह्याने असे केले', 'तो असे बोलला', 'त्याचे वागणे असे आहे', या सगळ्या गोष्टींचाच आपल्याला राग येतो. त्याला मी सरळ कसा करेन हाच विचार जर मनांत येत राहिला तर मनाला शांती कधीच लाभणार नाही. त्याची उपेक्षा केली, मनांतून त्याचे विचारच काढून टाकले म्हणजे अस्वस्थता रहात नाही. मनःशांती लाभते.

व्यवहार सोडण्याच्या दृष्टीने हे सर्व उपाय आहेत. असा अभ्यास केल्याने आपले चित्त प्रसन्न होते. परंतु या भावनांचा अभ्यास होण्याकरिता सुद्धा ईश्वराची कृपा पाहिजे. ईश्वरी सहाय्याशिवाय कसे होणार! प्रयत्नांनी प्रेम उत्पन्न करू, आनंद मानू, हे सर्व म्हणणे सोपे आहे. पण ईश्वरकृपा झाली तरच हा अभ्यास घडून येतो.

***प्रश्न : महाराज, मनाचा निरोध करावा असे कां सांगतात?***

उत्तर : सर्व सुख साधनांचा संग्रह केल्याने आपण आपल्या सर्व इच्छा पूर्ण करून सुखी होतो अशी आपली समजूत असते. त्यासाठी धन पाहिजे, सत्ता पाहिजे, असे आपल्याला वाटते. असा विचार करीत राहिले म्हणजे विकार वाढत जातात. जर विषयसुख घेऊन आपल्या

वासनांची तृप्ती होत असेल तर ती करायला हरकत नाही. पण तृप्ती होत नाही. वासना येत रहातात. त्यांचा निरोधच करावा लागतो.

मन मोकळं सुटलं, इंद्रिये अनावर झाली तर धर्माचरण होत नाही आणि ते जरी झालं तरी ईश्वर कृपा होत नाही. मनाचा संयम झाला पाहिजे. निग्रह झाला पाहिजे. म्हणजे मनाची शक्ती वाढते. गीतेच्या सोळाव्या अध्यायांत दैवी संपत्ती सांगितली आहे. नम्रता, कृतज्ञता, सरळपणा, दया, क्षमा असे गुण असले म्हणजे सुख मिळते. हे गुण सात्त्विक वृत्तीच्या आश्रयाने रहातात. ईश्वरीकृपा आणि मनोनिग्रह यामुळे वृत्ती सात्त्विक बनते.

***प्रश्न : महाराज, मनाचा निग्रह कसा करायचा?***

उत्तर : भगवंत सांगतात, ''अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येणंच गृह्यते ।'' मन चंचल आहे. पण अभ्यास आणि वैराग्य यांनी मन आवरता येतै. आपल्या शरीराचा निग्रह, मनाचा निग्रह आणि वाणीचा निग्रह हा सगळा साध्य झाला पाहिजे. तळमळ असली म्हणजे ईश्वराच्या कृपेने ते साध्य होऊ शकतं.

अनंत वासना, इच्छा मनामध्ये आहेत. सर्व वासना तृप्त करणे कधीच शक्य होणार नाही. इच्छा कितीही तृप्त केल्या तरी सुख, समाधान मिळत नाही. विषयापासून आपण सुखी होऊ, ही समजूत गेली पाहिजे. तो आत्माच आनंदरूप आहे मुळात. पण आपलं स्वरूप तो विसरला आहे आणि बाहेर विषयांमध्ये सुख आहे, आनंद आहे अशा समजूतीने तो वागतो आहे. ही समजूत गेली पाहिजे. याकरता ईश्वराजवळ प्रार्थना केली पाहिजे. ईश्वराच्या कृपेनेच वासनाक्षय होतो.

**प्रश्न : महाराज, निरहंकार वृत्ती ठेवावी असे कां सांगतात?**

उत्तर : जे कांही मिळालं आहे, ते ईश्वराच्या कृपेने मिळालं आहे. आम्ही अमुक केलं, आम्ही सेवा केली, आम्ही पुण्यकर्मे केली म्हणून मिळालं आम्हाला ही बुद्धी उपयोगी नाही. तो अहंकार आहे. अहंकार गेला पाहिजे. रुक्मिणीबरोबर बोलतांना भगवान सांगतात, ''रुक्मिणी, आम्ही अकिंचन आहोत आणि अकिंचन लोकच आमच्यावर प्रेम करतात.'' अकिंचन वृत्ती अंतःकरणांत पाहिजे. कशाचाही अहंकार धरायचा नाही. अर्थाचा नाही, कामाचा नाही, धर्माचाही नाही. मी कांही केलं हे सुद्धा बोलायचं नाही. आम्ही भगवंतांना कांहीच देत नाही अशी भावना पाहिजे. भगवंतच सर्वांचे संरक्षण करताहेत, त्यांच्याच कृपेने उदरनिर्वाह चाललेला आहे, सर्वांच्या उदरनिर्वाहाची सोय करणारे ते आहेत, सर्वांचा योगक्षेम ते करताहेत हीच बुद्धी खरी आहे. तशी बुद्धी झाली पाहिजे.

**प्रश्न : महाराज, चांगली कर्मेच घडावी म्हणून काय करावे ?**

उत्तर : जीव जो आहे त्याची कर्मे केवळ त्याच्या बुद्धीने होतात असं नाही. जसे संस्कार त्याच्या बुद्धीत असतील, जशा वासना असतील तशी कर्मे घडतात. म्हणून बुद्धीवर चांगले संस्कार करावेत. सात्त्विक बुद्धी बनवावी. राजस व तामस बुद्धीचं निरसन करावे. त्यासाठी काय करायचं, काय करायचं नाही हे सगळे शास्त्रांत दिलेलं आहे. ते समजून घेण्यासाठी मार्गदर्शक महात्म्यांची संगती घडली पाहिजे. त्यांच्या सहवासांत बुद्धीवर चांगले संस्कार होतात. महात्म्यांची कृपा

झाली की आपल्या बुद्धीत सुधारणा होऊन चांगली कर्मे घडायला लागतात.

***प्रश्न : महाराज, पूर्वीच्या पापांतून आम्ही कसं सुटायचं?***

उत्तर : आपण केलेल्या पापकर्माबद्दल पश्चात्ताप झाला आणि प्रायश्चित्त घेतले म्हणजे आपण शुद्ध होतो. प्रायश्चित्ते नाना प्रकारची सांगितली आहेत. प्राणायाम करणे, तीर्थस्नान करणे, निरनिराळी दाने देणे, गायत्री जप, यज्ञ, याग, अनुष्ठाने, मंत्रजप अशी अनेक प्रायश्चित्त आहेत. दोष जावा यासाठी अनेक मंत्र आहेत. त्या मंत्राचा जप विधीपूर्वक झाला तर निश्चित फळ मिळते. पंचगंव्य प्रायश्चित्त सांगतात. गोमल, गोमूत्र, दूध, दही व तूप एकत्र केले की पंचगंव्य होते. त्यांत दर्भोदक मिसळून हवन करायचे आणि पंचगंव्य प्राशन करायचे. त्यामुळे सर्व पापांची शांती होते. ही सगळी प्रायश्चित्ते वेदांमध्ये दिलेली आहेत.

पण प्रायश्चित्त घेणारा भगवद्भक्त असेल तरच शुद्धी होते. कर्मकांडाला भक्तीचं सहाय्य घ्यावेच लागतं असा शास्त्रसिद्धांत आहे. भगवद्भक्ती नसेल तर प्रायश्चित्तांनी पापनिवृत्ती होत नाही. हे सगळे अतींद्रिय आहे. आपल्या बुद्धीने इंद्रियांनी हे समजून घेण्याचा हा विषय नाही. संतमहात्म्यांना अतींद्रिय ज्ञान असते. म्हणून त्यांची बुद्धी मान्य केली पाहिजे. शास्त्र हे ईश्वराची आज्ञा आहे. त्याप्रमाणे आपण वागलो तर आपलं कल्याण होणार आहे. धर्माचरणाने आपली उन्नती होणार आहे.

***प्रश्न : महाराज, धर्माचरण केले म्हणजे उन्नती होते कां ?***

उत्तर : उन्नती यांचा अर्थ अगोदर समजावून घेतला पाहिजे. पैसा मिळणं, कीर्ती मिळणं, सत्ता मिळणं, सांसारीक सुखे प्राप्त होणं, मानसन्मान होणं याला उन्नती म्हणत नाहीत. ते सगळं तात्कालिक असतं. खरी उन्नती कोणती आहे. प्रिय कोणते आणि हित कोणते आहे हा विवेक झाला पाहिजे. आपल्या मनाला जे प्रिय वाटते त्यांत आपले हित असतेच असे नाही.

मनांतल्या सगळ्या वासना गेल्या पाहिजेत. आहे त्या परिस्थितीत सुख मानता आलं पाहिजे, मन शांत ठेवता आलं पाहिजे. सत्ता, संपत्ती, कीर्ती मिळावी म्हणून धर्माचरण करायचं नाही. तो व्यापार होईल. धर्माचे वाणिज्य केल्यासारखे होईल. ईश्वराची आज्ञा म्हणून धर्माचरण करायचे.

***प्रश्न : महाराज, सात्त्विक वृत्ती म्हणजे काय?***

उत्तर : सात्त्विक अंतःकरण म्हणजे प्रसन्नता. तो मोठा प्रसाद आहे. मोठी मोठी दुःखं आली तरी मन प्रसन्न आहे, सुखं आली तरीही मनावर परिणाम नाही. मन सदैव प्रसन्न आहे. ही जी स्थिती आहे त्याला मनाची समस्थिती म्हणतात. दुसऱ्याचे सुख पाहिल्यावर आपल्याला सुख वाटणे ही सात्त्विक वृत्ती आहे. आपल्या मुलाला परीक्षेत फर्स्ट क्लास मिळाल्यावर आपल्याला सुख मिळते. कारण चांगला पास झालाय तो! दुसऱ्याचा मुलगा फर्स्ट क्लासमध्ये पास झाल्यावरही तसा आनंद वाटणे ही सात्त्विक वृत्ती.

परमार्थ साधण्यासाठी वृत्ती सात्त्विक व्हावी लागते. सात्त्विक आनंद मिळवायचा आणि वाढवायचा अभ्यास करावा लागतो. त्याशिवाय प्रपंचात समाधानही मिळत नाही आणि परमार्थ साधत नाही.

***प्रश्न : महाराज, सत्त्वगुणाचे एवढे महत्त्व कां सांगतात ?***

उत्तर : सत्त्वगुण वाढू लागला म्हणजे मनुष्य विवेकाने वागू लागतो. यमनियम पाळावेसे वाटतात. निषिद्ध आचरण करु नये असे वाटू लागते. विषय सुखाच्या वासना कमी कमी होत जातात. परमेश्वरप्राप्तीची एकच इच्छा प्रबळ होत जाते.

सांख्यकारिकेत सांगतात,"अहः शब्दोऽध्यन दुःखविघातास्त्रायः सुंहृत्प्राप्तिः।" सात्त्विक पुरूषाला विशेष अशी सूक्ष्म विचारशक्ती प्राप्त होते, शास्त्राचे अध्ययन करावेसे वाटू लागते. शास्त्रांचे त्याला आकलन होते आणि त्याची सर्वही दुःखे नाहीशी होऊन तो तरून जातो. "अध्यवसायो बुद्धिधर्मो ज्ञान विराग ऐश्वर्यम् सात्त्विकयेतद्रुषम्।" योग्य निश्चय होणे, धर्माचे आकलन होणे, आत्मज्ञान होणे, वैराग्य प्राप्त होणे आणि ऐश्वर्य प्राप्त होणे ही सात्त्विक बुद्धीची रूपे आहेत. ऐहिक किंवा पारलौकिक कोणत्याच फळाची अपेक्षा न ठेवता केलेले कर्म ते सात्त्विक कर्म. सात्त्विक कर्म करणाऱ्याला श्रेष्ठ सुख आणि ज्ञान प्राप्त होते असे वेदांमध्ये सांगितले आहे.

***प्रश्न : सात्त्विक माणसालाच ईश्वरप्राप्ती होते कां?***

उत्तर :"सत्त्वयुक्तं यथा चित्तं शब्दब्रह्मार्थ दर्शनम् ।" सत्त्वगुण हा

परब्रह्माचे दर्शन करून देणारा आहे असे भागवतात म्हटले आहे. मनानेच ईश्वराला जाणायचं आहे. सात्त्विक मनाला ईश्वराला जाणण्याची योग्यता प्राप्त होते. सात्त्विक वृत्तीच ब्रह्माकार होते आणि अनुभूती येते की मी देह नाही, मी ब्रह्म आहे.

***प्रश्न : महाराज, सत्त्वगुण वाढावा म्हणून आम्ही काय करावे ?***

उत्तर : निष्ठेने धर्माचरण करीत राहिले, संतमाहात्म्यांची संगती मिळाली म्हणजे सत्त्वगुण वाढत जातो. वृत्ती अंतर्मुख झाली पाहिजे. चिंतन, मनन घडले पाहिजे. सात्त्विक व्यक्तींची संगती धरावी आणि ज्यांत सत्त्वगुण अधिक आहे असा आहार घ्यावा. जसा आहार घ्यावा तसे शरीर बनते आणि तसे भाव मनांत उत्पन्न होतात. मनाचा सात्त्विकपणा टिकावा, तो वाढावा त्यासाठीच सत्संगती सांगतात.

संतांच्या सहवासांत राहिलं म्हणजे मनांतले दोष दूर होत जातात, मनाचा सात्त्विकपणा वाढत जातो.

बुद्धी मूळांत चांगली असली, कुसंगतीने थोडी बदलली असली तर संतांची भेट झाल्यावर त्यांच्या शब्दांचा परिणाम लगेच होतो. पण कुसंगतीने बुद्धी फारच बदललेली असेल तर बुद्धीत बदल व्हायला वेळ लागतो.

***प्रश्न : महाराज, सत्कर्मे केल्यावरच ईश्वरकृपा होते कां ?***

उत्तर : पूर्वी सत्कर्मे केलेली असली म्हणजेच ईश्वरकृपा होते असे नाही. तळमळ असेल तर ईश्वरकृपा होते. ईश्वरकृपा स्वतंत्र आहे. सत्कर्म करण्याचा किंवा साधनाभ्यास करण्याचा संकल्प मनापासून केला तरीही ईश्वरकृपा होते. मनांत तेवढी तळमळ पाहिजे.

***प्रश्न : महाराज, तळमळ लागावी म्हणून आम्ही काय करायचं?***

उत्तर : देवाने दिलेलं वित्त म्हणजे उपासना. उपासना करण्याकडे अखंड लक्ष लागलं पाहिजे. आपण ज्याला वित्त समजतो ते म्हणजे घरदार, धनदौलत, वस्तु वगैरेमधून मन बाजूला झालं पाहिजे म्हणजेच उपासना पक्की होते.

उपासना पक्की होणं याचा अर्थ मी उपासना करतो आहे अशी कर्तृत्वभावना नाहीशी झाली पाहिजे. उपासनेचे कर्तृत्व जोपर्यंत मनामध्ये आहे तोपर्यंत उद्धार नाही. अहंकार गेला पाहिजे. राग, द्वेष हे मळ गेले पाहिजेत, अंतःकरण शुद्ध झाले पाहिजे. शुद्ध अंतःकरणाने, ध्यानाला सुरुवात झाली म्हणजे त्या ध्यानामध्ये प्रगती होते. त्या ध्यानाने मनाची, बुद्धीची स्थिरता होता होता त्याचा परिपाक समाधीमध्ये होतो. मनाची जास्ती स्थिरता म्हणजे समाधी आहे. ह्या सगळ्याही अवस्था ईश्वराच्या कृपेने प्राप्त होतात.

ईश्वराच्याच कृपेने ईश्वररूप झालेले पण आपल्याप्रमाणेच मानवरूप धारण करून आलेल्या ज्ञानी महात्म्यांची गाठभेट होते. त्यांच्याबद्दल आपल्या मनामध्ये श्रद्धाही निर्माण होते. त्यांच्या आज्ञेप्रमाणे वागून साधनाभ्यास चालू ठेवायचा. त्यांच्या कृपेने आश्चर्यकारक प्रगती होऊ शकते.

***प्रश्न : महाराज, सद्गुरू करावेच असे कां सांगतात?***

उत्तर : उपासना मार्गात मार्गदर्शकाची जरुरी आहे. अनेक प्रकारचे संशय मनामध्ये उत्पन्न होत असतात. केवळ ग्रंथांवरून योग्य मार्गदर्शन मिळत नाही. प्रत्यक्ष शब्दाने, वाणीने सुधारणा करणारा असा

कोणीतरी पाहिजे. मागच्या जन्मांत जे कर्म केलेलं आहे, तसे संस्कार आमच्या बुद्धीवर झालेले आहेत. योग्य मार्गदर्शन करणारा सद्‌गुरू भेटला म्हणजे चांगले संस्कार होतील.

मोक्ष मिळवण्यासाठी शास्त्रकारांनी तप, योगाभ्यास, प्राणायाम असे अनेक मार्ग सांगितले आहेत. पण स्वतःच्या बुद्धीनेच जर ते केले तर दोष राहण्याचा संभव असतो आणि त्याचे फळ मिळत नाही म्हणतात. सद्‌गुरूंची कृपा पाहिजे. त्यांची भक्ती पाहिजे, त्यांचे मार्गदर्शन पाहिजे. तरच या साधनांचा उपयोग होतो.

***प्रश्न : महाराज, कर्म तर करत राहायचे, पण त्या कर्माचे बंधन होऊ द्यायचे नाही, हे आम्ही कसं करायचं?***

उत्तर : कर्माचा बंध निर्माण होतो तो कर्तृत्वाच्या अभिमानाने. ''हे कर्म मी केले. त्याचे हे फळ मला मिळेल. मी ते फळ मिळवेन'' असे वाटणे हा कर्तृत्वाचा अभिमान आहे. त्याचा बंध होतो. पण कर्तृत्वाचा अभिमान मनातून गेला, नुसते कर्म केले, फळाची अपेक्षा किंवा इच्छा राहिली नाही तर मग कर्मबंधन होत नाही. स्वतःचे कांही नाही, सारे ईश्वराचे आहे असे वाटले पाहिजे. मग कर्मबंधन येईलच कसे?

***प्रश्न : महाराज, आम्हाला भगवंताची प्राप्ती कां होत नाही?***

उत्तर : अहंकार गेल्याशिवाय भगवंताची प्राप्ती होत नाही. मी करणारा आहे, मी मोठा आहे, मी ज्ञानी आहे, मी धनवान आहे, मी धर्माचरण करणारा आहे, हा सगळा अहंकार गेला पाहिजे.

उपनिषदकार सांगतात, भगवंत दूरही आहे आणि अगदी जवळही आहे. भगवंत जवळ आहे. पण कोणाला? ''जै जगा धाकुटे होईजे तै

जवळीक माझी'' ज्ञानदेव धाकुटं व्हायला सांगताहेत. निरहंकार झालेल्या माणसाला परमात्मा जवळ आहे. स्वतःचा अहंकार ज्याला आहे, स्वतःचं सामर्थ्य आहे असे जो समजतो आहे त्याला भगवंत दूर आहे.

***प्रश्न : महाराज, आत्मज्ञान म्हणजे काय ?***

उत्तर : मी हा देह आहे असे आपण समजतो. मी अमक्या कुटुंबात जन्माला आलो आहे, मी अमुक वर्णाचा आहे, माझ्यावर अमुक अमुक जबाबदारी आहे अशी मनाची भूमिका असते. मी देह नाही, मी आहे आत्मा. आत्मा असंग आहे, निर्विकार आहे. माझा कोणाशीही कसलाच संबंध नाही. एकमेव अद्वितीय असा आत्मरूप मी आहे. हे ज्ञान म्हणजे आत्मज्ञान.

***प्रश्न : महाराज, आत्मज्ञान व्हावे म्हणून आम्ही काय करावे ?***

उत्तर : मी देह आहे हे अज्ञान दूर करायचे आहे. मी असंग आत्मा आहे याचा अनुभव घ्यायचा आहे. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे कर्माचे आचरण करणे हा मार्ग त्यासाठी शास्त्रकार सांगतात. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे कर्माचे आचरण केले की संस्कार होतात. बुद्धी शुद्ध होते. बुद्धीतील दोष दूर होतात आणि बुद्धीमध्ये दैवी गुणसंपत्ती निर्माण होते. दैवी शक्ती बुद्धीत निर्माण होते. शास्त्र प्रमाण मानून त्याप्रमाणे कर्माचे आचरण करीत रहायचे.

बुद्धी शुद्ध व्हावी, बुद्धीचे संरक्षण व्हावे यासाठी ऋषीमुनी, संतमहात्मे यांचा प्रयत्न आहे. त्यासाठीच शास्त्रे सांगितली आहेत. शास्त्राने सांगितलेली दृष्टी उत्पन्न व्हावी यासाठी शास्त्रांवर श्रद्धा

ठेवणाऱ्यांची संगती झाली पाहिजे. महात्म्यांची संगती झाली पाहिजे. त्यांची कृपा झाली तरच आत्मज्ञान होते.

***प्रश्न : महाराज, आत्मज्ञान प्राप्त झाले म्हणजे वासना जातात कां?***

उत्तर : आत्मज्ञान झाल्यावरही वासनाक्षयाचा स्वतंत्र अभ्यास करावा लागतो. 'मीच ब्रह्मरूप आहे', 'सर्वव्यापी मी आहे', 'आत्मस्वरूप मी आहे' हे ज्ञान झाले म्हणजे सगळे दुःख गेले. पण ते ज्ञान झाले तरी वासना जात नाहीत. मनांत असणाऱ्या सगळ्या वासनांचा क्षय होण्याकरीता ईश्वरभक्ती करावीच लागते.

***प्रश्न : महाराज, ध्यान किंवा समाधी यामुळे वासना जातात कां?***

उत्तर : समाधी अवस्था प्राप्त झाली तरी मनांतल्या वासना जात नाहीत. समाधीतून उठल्यावर वासना मनांत उत्पन्न होतात. ईश्वरभक्ती करूनच त्या वासनांचा क्षय करावा लागला. संतांच्या ग्रंथाचे वाचन करायचे, चिंतन करायचे, भगवंताचे नामस्मरण करायचे. वासनाक्षय करण्याचा तोच एक मार्ग आहे.

***प्रश्न : महाराज, ईश्वरी साक्षात्कार कसा करून घ्यावा ?***

उत्तर : भगवंताचा विशेष आविर्भाव ज्यांच्यामध्ये झालेला आहे अशा विभूतींना ईश्वर समजून उपासना करावी. विभूतीच्या ठिकाणी ईश्वरभाव धारण करून उपासना करणे शास्त्राला संमत आहे. विभूतींची उपासना ईश्वर समजून शुद्ध बुद्धीने केली तर फळ मिळते. ईश्वरसाक्षात्कार आपोआप होतो. पुंडलिकाने आईवडिलांना ईश्वर मानून सेवा केली आणि त्याच्या भेटीला परब्रह्म आले असे नामदेव सांगतात. नामदेवांना

ईश्वरसाक्षात्कार झाला होता. म्हणून त्यांनी पुंडलिकाला ईश्वरसाक्षात्कार झाल्याचे सांगितले याला महत्त्व आहे. ज्याने ईश्वराला पाहिलेच नाही त्यांनी नाही सांगितले.

बुद्धी निर्दोष झाली की ती विशिष्ट ध्येयाच्या ठिकाणी स्थिर होते. बुद्धीत दोष असतात. अज्ञान, अश्रद्धा कितीतरी असतात. ते जावे यासाठी अनेकमार्ग आहेत. कर्ममार्ग आहे. ज्ञानमार्ग आहे. पण भक्तिमार्ग सगळ्यांत सोपा. भक्तिमार्गात कोणताही प्रतिबंध नाही. केवळ अंतःकरणाची आवश्यकता असते. षोडषोपचार लागतातच असेही नाही. अंतःकरण प्रेममय असावे लागते. केवळ प्रेममय अंतःकरणाने दिले तर ईश्वर काहीही स्वीकारतो. रामांनी शबरीची उष्टी बोरे आवडीने खाल्ली. लक्ष्मण पाहातच राहिले. पण थांब असे म्हणाले नाहीत. शबरीचे प्रेममय अंतःकरण ते जाणत होते. सुदामजीचे पोहे कृष्णांनी आवडीने खाल्ले. तृप्त झालो म्हणाले. भक्तीने आपोआप घरी बसून साक्षात्कार होतो. यासाठीच संतमहात्मे भक्तीमार्ग इतर मार्गांपेक्षा सोपा आहे हे सांगताहेत.

***प्रश्न : महाराज, शांती कशी प्राप्त होईल?***

उत्तर : शांती म्हणजे काय? शास्त्रकार सांगतात शांती म्हणजे मन स्वस्थ बसणे. त्यालाच शांती म्हणतात. पण आपले मन स्वस्थ तर कधीच बसत नाही. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मनांत अनेक विचार येतच रहातात. त्यामुळे अशांती येते.

जर मनांत सद्‌विचार जास्ती जास्ती वाढत गेले आणि दुर्विचार कमी कमी होत गेले तर शांती मिळवण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू

झाली असे समजावे. आसुरी संपत्ती कमी करायला हवी. दैवी संपत्ती प्राप्त करून घ्यायला हवी. पण दैवी संपत्ती तरी काय करायची आहे? शेवटी तीही गेली पाहिजे. मन स्वस्थ राहिले पाहिजे. तीच शांती. मन निर्विचार होऊ शकते, आत्मानंदात निमग्न होऊ शकते. हीच शेवटची भूमिका. ही स्थितप्रज्ञाची भूमिका आहे, भगवद्भक्ताची भूमिका आहे, गुणातीताची भूमिका आहे. ही भूमिका प्राप्त झाली म्हणजेच पूर्ण शांती प्राप्त होते. ती भूमिका प्राप्त करून घेण्यासाठी मार्गदर्शन पाहिजे. भगवंताने हे मार्गदर्शन करण्याचा आदेश संतमहात्म्यांना दिलेला आहे. कर्णधार म्हणून सद्गुरू कार्य करीत आहेत.

***प्रश्न : महाराज, चित्त स्थिर कसे करावे ?***

उत्तर : चित्त स्थिर होण्यासाठी अनेक उपाय सांगितले आहेत. प्राणायाम हे एक फार मोठे साधन आहे असे योगसूत्रकार सांगतात. प्राणायामाच्या योगाने मन व इंद्रिये सगळी एका जागी स्वस्थ रहातात असा अनुभव लोकांनी घेतला आहे. प्राणायामाची एवढी शक्ती आहे. पण प्राणायामाचा अभ्यास योगीपुरुषांच्या सान्निध्यातच करावा लागतो. आपल्या बुद्धीने करता येत नाही. पुस्तके वाचून प्राणायाम करता येत नाही. कुठल्यातरी नाडीत चुकून प्राणवायू शिरून बसला तर त्या माणसाला वेड लागायची पाळी येते. आयुष्य सबंध फुकट जाते.

योगसूत्रकार ''वीतरागविषयम् वा चित्तम्'' असे सूत्र सांगतात. ''वीतराग महात्मा'' म्हणजे ज्याच्या मनामध्ये कोणतीही वासना शिल्लक राहिलेली नाही. अशा महात्म्याचा अधिकार फार मोठा असतो. त्याचे अंतःकरण निर्वासन बनलेले असते. त्याच्या मनात

संसाराचीही वासना नसते आणि परमार्थाचीही वासना नसते. वासना पाहिजेच कशाला? परमात्मा सर्वज्ञ आहे. त्याच्या कृपेने यथा संभव सारे होऊन जाते. अशा वीतराग महात्म्यांची चरित्रे पहावीत, ऐकावीत, चिंतन करावे म्हणजे चित्त स्थिर होते. चित्त स्थिर करण्याचा हा एक सोपा उपाय आहे.

***प्रश्न : महाराज, खरा आनंद कोणता? तो कसा मिळवायचा?***

उत्तर : उपनिषदांत आनंदाचे वर्णन आहे. राजाचा आनंद, देवांचा आनंद, गंधर्वांचा आनंद, ब्रह्मदेवांचा आनंद असे सगळे आनंदाचे प्रकार दिले आहेत. राजाचा आनंद सत्तेचा आनंद आहे. तो बोलतो तसे प्रजाजन वागतात. स्वर्गात सगळ्या सुखसोयी देवांना मिळतात. हा देवांचा आनंद. पण त्याला कालमर्यादा आहे. पुण्य संपेपर्यंतच स्वर्गात रहाता येते व आनंद उपभोगता येतो.

ऐहिक जीवनांत सत्ता, मान, कीर्ती, सुखाचा उपभोग, वस्तुंचा संग्रह करणे वगैरे गोष्टींनी जे आनंद मिळतात ते तात्कालिक असतात, थोड्या वेळापुरते असतात. कांही काळाने ते नाहीसे होतात. ऐहिक आनंदाचे सगळे प्रकार कालाने मर्यादित आहेत. अमुक एका काळांत ते संपतात. त्यांत इच्छेचे पारतंत्र्य असते. स्वातंत्र्य पाहिजे. स्वतःच्या इच्छेने आनंद मिळवता आला पाहिजे आणि तो कायम टिकवला पाहिजे. तरच तो खरा आनंद. श्रेष्ठ आनंद, शाश्वत आनंद.

तैत्तरीय उपनिषद सांगते की हे सगळे आनंद एका बाजूला आणि महात्म्यांचा आनंद दुसऱ्या बाजूला. महात्मा अकाम आहे. त्याच्या मनांत कोणतीच वासना नाही. त्याच्या मनांत कांहीच इच्छा नाही. तो

स्थितप्रज्ञ आहे. त्याला या सगळ्या ऐहिक आनंदापेक्षा श्रेष्ठ व शाश्वत आनंद मिळतो. आत्मा आनंदरूप आहे. त्या महात्म्याला आनंदरूप आत्मस्वरूप समजलेले आहे. त्यालाच सर्वश्रेष्ठ आनंद मिळतो. त्याच्या आनंदात सर्व ऐहिक आनंदांचा अंतर्भाव झालेला असतो. तोच निखळ आनंद, खरा आनंद. संतांनी हा आनंद मिळवण्याचा मार्ग म्हणून भक्तीमार्ग सांगून ठेवला आहे. भक्तीमार्गाने गेले तर तो आनंद निश्चितपणे मिळतो. अनेक महात्म्यांनी हा आनंद मिळवला आहे.

***प्रश्न : महाराज, मोक्ष आणि मुक्ती यांत काही फरक आहे काय?***

उत्तर : मोक्ष ही मनाची एक अवस्था आहे. या अवस्थेत दु:खे नाहीशी होतात. सर्वही दु:खे नाहीशी होणं याला मोक्ष असे म्हणतात. पण दु:खं एकदा गेली तरी ती पुन्हा येणारच नाहीत असे नाही. पुढे केव्हाही दु:खं उत्पन्न न होणं याला मुक्ती म्हणतात. मुक्ती म्हणजे जन्म व मृत्यू यांच्या चक्रांतून सुटका होणं, पुन्हा जन्म येणं.

***प्रश्न : महाराज, मनांतील इच्छा, वासना नाहीशा कशा होतील?***

उत्तर : तत्त्वज्ञानाचे ग्रंथ वाचून वासनाक्षय होत नाही. तत्त्वज्ञान झाल्यावरसुद्धा वासनाक्षयाचा स्वतंत्र अभ्यास करावा लागतो. कितीही विषयभोग घेतला तरीही त्याने इच्छा, वासना कमी होत नाही. उलट त्या वाढतात. भगवंताच्या नामस्मरणाने आणि चिंतनाने वासनांचा क्षय होऊ शकतो असे संतमहात्मे सांगतात.

***प्रश्न : महाराज, समाधीअवस्था प्राप्त झाली तर वासनाक्षय होतो का?***

उत्तर : समाधी अवस्था प्राप्त झाली तरी प्रारब्धकर्माचा प्रतिबंध असेल

तर वासना जात नाहीत. समाधीतून उठल्यावर मनांत पुन्हा वासना येतातच. वासनाक्षय करण्याचा भगवंताची भक्ती हाच एक उपाय आहे.

***प्रश्न : महाराज, ज्ञानी कोणाला म्हणायचे? शास्त्रांचा अभ्यास केले त्यांना ज्ञानी म्हणायचे कां ?***

उत्तर : शास्त्राभ्यास करणारे पुष्कळ असतात. पण त्यांचे ते ज्ञान शब्दांपुरतेच मर्यादित रहाते. त्यांना अनुभूती नसेल तर ते शब्दज्ञान झाले. शब्दाच्या बाह्य अर्थाकडे लक्ष देऊन जे शास्त्रार्थ व वादविवाद करीत असतात ते खरे ज्ञानी नव्हेत.

ज्ञान झाल्यावर आचरण करणे ही पुढची पायरी आहे. शब्दज्ञान झाल्यावर तसे आचरण करतात तेच खरे ज्ञानी. अज्ञान दूर करणे, लोकांना सन्मार्गाला लावणे, त्यांचे संरक्षण करणे यासाठी ज्ञानी महात्म्यांचे प्रयत्न असतात. कोणाचाही अवमान करायचा नाही, द्वेष करायचा नाही. सर्वत्र भगवंत एक आहे ही ज्ञानी महात्म्यांची भूमिका आहे. अपकार करणाऱ्यांना, द्वेष करणाऱ्यांना, अपमान करणाऱ्यांनाही ते भगवंत म्हणूनच पाहताहेत. कर्तव्यकर्म करून जो लाभ होईल त्यात संतोषाने राहताहेत. सर्व भूतांबद्दल मनांत सौहार्द, प्रेम, दया, मैत्री आहे. निरहंकारी आहेत. तेच खरे ज्ञानी आहेत.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंजवळ अनेक जण येतात. पण सगळ्यांचाच उद्धार होत नाही. असे कां होते?***

उत्तर : शंकराचार्यमहाराजांनी ईश्वराला पावसाची उपमा दिली आहे. पर्जन्याप्रमाणे ईश्वर आहे. उत्तम जमिनीमध्ये पाऊस पडला तर उत्तम

पीक येईल. खडकावर पडला, समुद्रात पडला तर फुकट जाईल. तो दोष त्या पावसाचा नाही. जमीन कशी आहे, कोणत्या जमिनीत तो पाऊस पडलाय त्या जमिनीचा तो गुण आहे. सद्गुरुरूपही ईश्वराचेच रूप आहे. ज्याची जशी भक्ती असेल तसा कृपालाभ होतो. जसा भाव असेल तसे फळ मिळते. जन्मांधाला सूर्य दिसत नाही. पण सूर्य पहाण्याची आपली योग्यता नाही हे तो मान्य करीत नाही. तो सूर्यच नाही म्हणतो. सूर्याचे अस्तित्त्व तो मान्यच करीत नाही. अभक्तांचीही तशीच स्थिती असते. पण भक्ताची श्रद्धा असेल, सद्गुरूंची कृपा, ज्ञान, सामर्थ्य पूर्ण आहे असा विश्वास असेल तर त्याला तशी अनुभूती येते. त्याचा उद्धार होतो.

***प्रश्न : महाराज, भस्मधारणाचे महत्त्व शास्त्रकार कां सांगतात ?***

उत्तर : यथाविधी भस्म धारण केले तर तो जीवात्मा जीवनमुक्त अवस्थेपर्यंत पोचूं शकतो. यज्ञयाग झाल्यावर जे मिळते ते भस्म धारण करावे. मंत्र म्हणून शरीराच्या निरनिराळ्या अवयवांना लावावे. त्याचा सर्व विधी शास्त्रांत दिला आहे. ज्याला शास्त्राचे ज्ञान नाही अशा अज्ञानी माणसाने भक्तीने, श्रद्धेने भस्मधारण केले तरी त्याच्या योगाने पापक्षय होतो आणि व्याधींचाही नाश होतो. तीर्थस्नान, जप इत्यादी कर्मांपेक्षा भस्मधारण अधिक फळ देणारे आहे.

***प्रश्न : महाराज, आत्मस्वरूपाचे ज्ञान होण्यासाठी काय करावे?***

उत्तर : वृत्ती अंतर्मुख झाली पाहिजे. बाह्य जगाचा विचार बंद करून वृत्ती अंतर्मुख करावी. अंतर्मुख वृत्तीने आपला आत्माराम कसा आहे याचा विचार करायला लागले म्हणजे आपला संसाराबद्दलचा भ्रम दूर

होतो आणि खऱ्या आत्मस्वरूपाचे ज्ञान होते. आत्मा चैतन्यरूप आहे, सर्वव्यापी आहे, अजरामर आहे याचे ज्ञान होते.

***प्रश्न : महाराज, बुद्धी शुद्ध होणे म्हणजे काय?***

उत्तर : बुद्धी शुद्ध आहे याचाच अर्थ बुद्धीमध्ये शास्त्र प्रमाण आहे ही श्रद्धा आहे. शास्त्र हेच सर्वांना प्रमाण आहे. धर्माचरण करायचे ते ईश्वराची आज्ञा म्हणून करायचे. कांही ऐहिक फळ मिळावे म्हणून नव्हे. ईश्वराची आज्ञा म्हणून धर्माचरण करायचे ते आपले कल्याण व्हावे म्हणून. तीच शुद्ध बुद्धी आहे. धर्माचरण करणारे, ईश्वराची खरी भक्ती करणारे, कोणाबद्दलही द्वेषभाव न धरणारे तेच श्रेष्ठ आहेत. ईश्वराला तेच प्रिय होतात. पूर्वकर्माचे फळ म्हणून दुःख भोगत असतांनासुद्धा धर्माचरण करीत राहिले पाहिजे. त्यामुळे पुन्हा उन्नती होऊ शकते.

***प्रश्न : महाराज, बुद्धी शुद्ध करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू लागलो तर ईश्वराचे सहाय्य आम्हाला मिळते कां ?***

उत्तर : ईश्वर सर्वज्ञ आहे. सर्व शक्तीसंपन्न आहे. सर्वज्ञान त्याला आहे. कोणी कोणी किती कर्म केलीत, कोणाचे किती जन्म झालेत, हे सर्व तो जाणतो. ईश्वर असा सर्वज्ञ आहे हे संतांना माहिती आहे. म्हणून ईश्वराची भक्ती करायला ते सांगतात.

ईश्वराची भक्ती केवळ परमार्थ करण्यासाठीच करायची असे नाही. संसार समाधानाचा रहावा म्हणूनही ईश्वराची भक्ती करणे आवश्यक आहे. जीव परतंत्र आहे. कोणती इच्छा करायची हे ठरविण्याकरतासुद्धा ईश्वराची कृपा पाहिजे. नाही तर आपल्यासमोर जे

सुख दिसेल तेच मिळावेसे वाटते. मनाची चंचल स्थिती असेपर्यंत आपल्याला कांही ठरविता येत नाही. कोणते सुख आपण घ्यायचे हे देखील आपल्याला समजत नाही. म्हणून ज्यांनी आपल्या स्थिर बुद्धीने ईश्वराची कृपा संपादन करून घेतली आहे. त्या संतमहात्म्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागले पाहिजे. तसे वागले म्हणजे आपल्याला कोणते सुख पाहिजे हे समजते. मग त्या सुखाची साधनं कोणती हे समजून घेऊन त्याप्रमाणे आचरण सुरू होते. संत, महात्म्यांचा हाच प्रयत्न आहे. त्यांच्या ग्रंथातून हेच सांगितले आहे की ईश्वराची कृपा संपादन करा. म्हणजे तुमच्या सर्व इच्छा पूर्ण होतील. केवळ अर्थ कामाने आपण सुखी होणार नाही. ईश्वरभक्तीने आपण सुखी होऊ हे त्यांना पटले आहे. म्हणून ते या भक्तीमार्गाकडे वळले आहेत. परमेश्वराच्या उपासनेचा मार्ग साधूसंतांनी स्वतः आचरण करून आम्हा भारतीयांच्या पुढे ठेवला आहे.

संत म्हणतात, संसारांतील सगळी सुखं देवाजवळ मागा. संसारांत तोच सगळं सुख देणारा आहे. परंतु मागितलेली सगळी सुखं तुम्हाला मिळाली तरी परमेश्वराचे भजन सोडू नका. संसारांत सुख मिळाले म्हणजे अहंकार येऊ शकतो, अभिमान-ताठा येऊ शकतो. सत्तेचा मद वाढू शकतो. मी मिळवलेले धन वाढावे, माझी सत्ता टिकावी यासाठी कुकर्म करायची बुद्धी होऊ शकते, पापकर्म करायची बुद्धी होऊ शकते असे दोष बुद्धीत येऊ नयेत म्हणून ईश्वराची भक्ती करावी असे संत सांगतात. तशी बुद्धी ठेवली तरच समाधान मिळेल. नाहीतर संसारांतील सगळी सुखं मिळाली तरी समाधान मिळणार नाही.

***प्रश्न : महाराज, भगवंताची भक्ती हा प्रयत्नवाद आहे कां?***

उत्तर : भगवंताची भक्ती हा सुद्धा एक प्रयत्नवादच आहे. कोणाचीही नोकरी करून, मानअपमान सहन करणे म्हणजेच प्रयत्नवाद नाही. संतांनी दाखविलेला भक्तीमार्ग हा मोठा प्रयत्नवाद आहे. तेथे काया वाचा मनाची अत्यंत शुद्धी आवश्यक आहे. हा फार श्रेष्ठ प्रयत्न आहे.

***प्रश्न : महाराज, आमच्या मनांत भक्ती उत्पन्न व्हावी म्हणून आम्ही काय करावे?***

उत्तर : भगवंताच्या कथा ऐकल्या की अंतःकरण निर्मळ होते. संतांची चरित्रे वाचावी. त्यांचे गुण समजावून घ्यावे. भगवंताचे गुण गाईले की अंतःकरण द्रवून जाते. अंतःकरणाला धारावाहिकता येते. धारावाहीक अंतःकरण ही एक अखंड वृत्ती आहे. ईश्वरावर श्रद्धा असली की ही वृत्ती येते. तीच भक्ती.

ही भक्तीरूपी वृत्ती प्रयत्नाने मिळत नाही. भक्ती मला द्या म्हणून भगवंताची प्रार्थना करावी लागते. प्रार्थना केली की लगेच भक्ती मिळाली असेही नाही. चित्तात वैराग्य असावे लागते. नित्यानित्य विवेक असावा लागतो. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक असावा लागतो.अशी विवेकपूर्ण मनोवृत्ती मिळणे हा ईश्वरी प्रसाद आहे. अंतःकरणात भगवंताचे प्रेम यावे यासाठी प्रार्थना करीत रहावे. तळमळ लागली पाहिजे.

***प्रश्न : महाराज, सत्संगतीने ईश्वरभक्ती करावीशी वाटते का?***

उत्तर : ज्यांच्याजवळ सद्बुद्धी आहे, धर्माचरण आहे, जे देवाची खरी भक्ती करतात, त्यांची संगती धरली की, आपोआप सर्व दैवी कृपा

मिळते. ईश्वराच्या कृपेने सत्पुरुषांचे दर्शन होते, त्यांचे मार्गदर्शन होते आणि त्याप्रमाणे वागण्याची बुद्धी होते. म्हणून ईश्वराकडे सत्संग मागावा, असे सांगतात.

***प्रश्न : महाराज, सर्व भूतांच्या ठायी ईश्वर पाहणे ही खरी भक्ती आहे असे शास्त्रकार सांगतात. जगावं म्हणून काय करावे?***

उत्तर : सर्व भूतांच्या ठायी प्रेम निर्माण होणे ही भक्तीची उच्च भूमिका आहे. सर्वत्र एक परमात्मा आहे आणि मीही परमात्मा आहे हीच अंतिम भूमिका आहे. परंतु तितकी भूमिका मिळायला अधिकार प्राप्त व्हावा लागतो. हळूहळू होणार तो! म्हणून सद्‌गुरूंच्या ठिकाणी भक्ती ठेवावी असे शास्त्रकार सांगतात. सद्‌गुरूंवर पूर्ण श्रद्धा ठेवावी. आज्ञेचे पालन करावे. सद्‌गुरूंवरील भक्ती, त्यांचे स्मरण सतत ठेवावे. तीच पुढे अंतिम भूमिकेला नेते.

***प्रश्न : महाराज, गोपी स्वतःच्या संसारांत होत्या तरीही त्यांनी भगवान श्रीकृष्णावर प्रेम केलं, रासक्रीडा केली. हे पापकर्म झालं असं कांही लोक म्हणतात ? त्यांना आक्षेप घ्यावासा वाटतो.***

उत्तर : असा आक्षेप घेणाऱ्यांना भगवान म्हणजे काय? भगवद्‌भक्ती म्हणजे काय, भक्तीमार्ग काय आहे याची माहिती नाही म्हणून ते आक्षेप घेत आहेत. वरवर पाहून हा आक्षेप घेतला झालं. गोपींच प्रेम अत्यंत शुद्ध आहे. संसारश्रृंखला त्यांनी तोडून टाकल्या आणि भगवान श्रीकृष्णांच्या भजनी त्या लागल्या. भगवंताच्या ठिकाणी चित्त स्थिर केलं.

भगवान गोपाळकृष्ण श्रेष्ठ पुरूष आहेत, पापपुण्याच्या पलीकडे गेले आहेत. त्यांना पापही नाही, पुण्यही नाही. भगवान गोपालकृष्ण नियामक आहेत, अंतर्यामी आहेत, जीवांचा उद्धार करण्यासाठी अवतीर्ण झालेले आहेत. त्यांच्या बाबतीत पापपुण्याचा विचार करण्याचं कारणच काय? कर्मबंधन कोणाला आहे ? जो अहंकाराने कर्म करतो आहे त्याला! भगवंत तर सर्व प्राणीमात्रांवर अनुग्रह करायला आले आहेत. गोपींचा जो दिव्य भाव आहे त्याप्रमाणे भगवंतांनी त्यांना फळ दिलं आहे. पूर्वपुण्याईनं किंवा संतांच्या कृपेनं जर मनांत भगवद्प्रेम निर्माण झालं तर त्याला भगवंत फळ देतात. शास्त्र आड येणार नाही, व्यवहार आड येणार नाही.

गोपींना भगवंतांचे सान्निध्य हवं आहे, भगवंतांची सेवा घडावी, तन्मय व्हावं अशी गोपींची इच्छा आहे.

इच्छित विषय मिळाल्यावर चित्त स्थिर होतं आणि तो आत्मानंद त्या चित्तांत प्रतिबिंबित होतो. आपल्याला वाटतं आनंद विषयांपासून मिळाला. पण तो आनंद विषयांपासून मिळालेला नसतो. विषय आनंदरूप नाहीच आहेत. परमात्मा आनंदरूपच आहे. तो परमात्माच गोपींच्या मनांत आला आहे, राहिला आहे. मग त्यांना पूर्ण आनंद मिळाल्याशिवाय कसा राहील?

गोपी भगवंताच्या प्रेमासाठी, संसार विसरून गेल्या, नियंत्रण करणारी वेदशास्त्रे विसरून गेल्या, पापपुण्य व स्वर्ग-नरकही विसरून गेल्या. लोक निंदेची भिती नाही, घरांतून काढून टाकतील ही भिती नाही. आमचं अंतःकरण जर परमेश्वराकडे गेलेलं आहे, तर आम्ही ते

वळवायचं तरी कशाला, हा विचार त्यांच्या मनांत आहे. आमचा मार्ग निंद्य नाही कारण त्याला भगवंतांची अनुमती आहे हा विश्वास आहे.

गोपींबरोबर क्रीडा करणं भगवंतांना कसं शोभलं हा बाह्य दृष्टीने विचार झाला. भगवंतांची मनोवृत्ती कशी आहे? सर्वही विश्व आपलं निमित्त आहे. सर्व जीव आपलेच प्रतिबिंबित रूप आहेत. सर्व ठिकाणी एक ईश्वरच आहे ही भावना आहे. हे तुम्हा आम्हाला येईल का? एक ईश्वरच आहे, मीच सर्वत्र आहे. ज्याच्या मनांत हा भाव निर्माण झाला त्याची मनोवृत्ती वेगळी आहे. जोवर आपलं मन अज्ञानात गुंतून राहिलेलं आहे तोवरच स्त्रीपुरुष, जडचेतन, पापपुण्य असा भेद आहे. त्या गोपी भगवद्भक्तीने या बंधनाच्या पलीकडे गेल्या आहेत. त्या गोपींची योग्यता फार मोठी आहे हे शुकाचार्य सांगताहेत. शुकाचार्य ब्रह्मज्ञानी आहेत, त्रिगुणातीत आहेत. भगवान श्रीकृष्णांची रासक्रीडेची लीला वर्णन करणे, श्रवण करणे यामुळे काम हा भयंकर रोग नाहीसा होतो आणि तो निष्काम होतो असं शुकाचार्य सांगतात.

श्रेष्ठ पुरुष सांगतात तसे वागावे. त्यांचे गुणदोष मनांत आणू नयेत असे शास्त्रकार सांगतात. इथं तर प्रत्यक्ष भगवंतांची लीला आहे. भगवंताची लीला फक्त श्रवण, वर्णन करायची. त्याचं चिंतन करायचं.

***प्रश्न : महाराज, संतांनी राधाकृष्णाचा श्रृंगार असलेल्या गौळणी त्याच हेतूने रचल्या कां ?***

उत्तर : श्रृंगाररस जरी असला तरी त्या श्रृंगाररसांत चित्ताची उन्नती होण्याचा एक मार्ग आहे. सर्व सुखं, आनंद हा विषयापासून मिळतो अशी आपली कल्पना आहे. भ्रमच आहे आपला तो. ते सुख, तो

आनंद आत्मानंदच आहे असा वेदांचा सिद्धांत आहे. आग धडाडून पेटली की ओल लाकूड त्या आगीत टाकलं तरी ते जळून जातं. भगवद्भक्ती तेवढी असेल तर कामवृत्तीवर विजय मिळतो. भगवान श्रीकृष्णांनी रासलीला करून हेच दाखवले आहे. म्हणूनच शुकाचार्य सांगताहेत रासलीलेचं श्रवण आणि चिंतन केले म्हणजे कामवृत्ती नाहीशी होते आणि चित्त निष्काम होते. त्रिगुणातीत असलेले, पूर्ण वैराग्य असलेले शुकाचार्य हे सांगताहेत हे लक्षात घेतले पाहिजे. गौळणी ऐकून कुणी कामासक्त होत नाही. त्यांतला श्रृंगार फसवा आहे, मनाचं उन्नयन करणारा आहे, विरक्तीकडे नेणारा आहे. रासलीलेचं हेच रहस्य आहे.

***प्रश्न : महाराज, सकाम भक्ती आणि निष्काम भक्ती असे दोन प्रकार सांगतात. निष्काम भक्ती म्हणजे काय?***

उत्तर : सकाम भक्ती आणि निष्काम भक्ती असे भक्तीचे प्रकार आहेत. प्रल्हादजींसारख्या निष्काम भक्ताला नृसिंहांनी पुष्कळ सांगितले. 'कांही तरी वर मागून घे बाबा.' त्यावर प्रल्हादजी म्हणाले, "देवा मी तर अकाम आहे. कांहीहि न मागणारा भक्त आहे," देवांनी फारच आग्रह केला. तेव्हा 'माझ्या मनांत कोणतीच इच्छा उत्पन्न होऊ नये हा वर द्या' असे मागून घेतले. म्हणजे प्रल्हादजींची इतकी भूमिका तयार झाली होती. प्रत्यक्ष बाप जीवावर उठलेला होता तरीही त्यांनी देवाजवळ काही मागितले नाही. 'मला वाचवा' असेही म्हणाले नाहीत. ही निष्काम भक्ती. पण काही न मागताच देवाने त्यांची इच्छा

पूर्ण केली. ही भूमिका व्हायला अनेक जन्मांचा अभ्यास पाहिजे, सद्गुरूंची कृपा पाहिजे.

***प्रश्न : महाराज, सकाम भक्ती करणे चुकीचे ठरेल कां?***

उत्तर : सकाम भक्ती सुरुवातीला असली तरी हरकत नाही. देवाची भक्ती केल्यावर देवाने आपल्याला काही तरी द्यावे असे वाटते. हरकत नाही. उपभोग घ्यायची इच्छा भगवंताच्या कृपेने पूर्ण झाली की भगवंताच्या भजनाकडे लक्ष जाते. इतकं देव देतो आपल्याला ! कांही तरी थोडसं देवाकरता करायला पाहिजे असे वाटते. भक्ती वाढत गेली तर मनाची बुभुक्षा शांत होत जाते. मुमुक्षा निर्माण होते. मुमुक्षेमुळे वैराग्य प्राप्त होते. ध्यानयोगाचा अभ्यास होतो आणि त्या उपासना मार्गात अधिकार प्राप्त होऊन भगवंताचा मोठा प्रसाद मिळतो.

***प्रश्न : महाराज, निष्काम भक्ताने कांही मागितले नाही तरीही भगवंत त्याला देतात असे म्हणतात. तसेच असते कां?***

उत्तर : भगवान प्रसन्न झाल्यावर जगामध्ये अलभ्य कांही नाही असे आचार्यमहाराज म्हणतात. परंतु भगवत् भक्त हे कांही मागत नाहीत ही दुसरी बाजूही त्यांनी सांगितली. भगवंताचे अखंड चिंतन रहावे अशी ज्यांना खरी इच्छा आहे, ज्यांचे मन निर्वासन झालेले आहे ते देवाजवळ कोणतीही इच्छा व्यक्त करीत नाहीत, कांहीही मागत नाहीत म्हणतात. परंतु मागितल्याशिवाय देव देतात हेही खरे आहे. सुदामजींचे उदाहरण सांगतात.

निरिच्छ वृत्तीने राहणारे सुदामजी पत्नीच्या इच्छेवरून द्वारकेला जायला निघाले. जातांना धन, संपत्ती मिळेल असे विचार नव्हते. त्या

'उत्तमश्लोकाचे' (श्रीकृष्णांचे) दर्शन मला आज पत्नीच्या आग्रहामुळे घडणार आहे हा मोठा लाभ आहे असेच त्यांना वाटत होते. द्वारकेत पोहोचल्यावर भगवंताचे दर्शन झाले, भेट झाली. गुरूघरच्या आठवणींबद्दल रात्रभर बोलत बसले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी निघून आले. सुदामजींनीही कांही मागितले नाही. श्रीकृष्णांनीही कांही दिले नाही. तरीही गोपालकृष्णांबद्दल मनामध्ये अनादरही नव्हता, रागही नव्हता. या दरिद्री ब्राह्मणाला जर द्रव्य मिळाले तर याला अहंकार होईल, माझे विस्मरण ह्याला होऊ नये असे देवाने मनामध्ये आणलेले आहे ही त्याची केवढी दया आहे. असे सुदामजींना वाटले. मला त्याने धन दिले नाही याचा अर्थ त्याची दया माझ्यावर आहे.

घरी गेल्यावर पाहिले, सोन्याची नगरी मिळाली आहे. मोठा वाडा, वैभव, नोकरचाकर सगळे मिळाले आहे. पण ते मिळाले त्याचा त्याग करावा ही इच्छाही केली नाही. पत्नीच्या, मुलांच्या इच्छेकरता संसारांतच राहिले. पण वैभवांतही मनाने निरिच्छ राहिले, विरक्त राहिले.

भगवान श्रीकृष्णांच्या कृपेने मोठे वैभव मिळाले हे तर खरेच आहे. वैभव मिळणे ही कृपा आहेच. पण वैभव प्राप्त होऊनही सुदामजींची निष्काम भक्ती तशीच राहिली ही त्याहूनही मोठी ईश्वरी कृपा आहे. अशाप्रकारचे अधिकारी महात्मे होऊन गेले. देवाजवळ मागायचे नाही. परंतु काहीतरी सेवा घडावी अशी मनामध्ये तळमळ आहे.

***प्रश्न : महाराज, संत लोकांना सकाम भक्तीकडे कां वळवतात? ते निष्काम भक्तीच केवळ कां सांगत नाहीत?***

उत्तर : संत सामान्य लोकांना एकदम निष्काम भक्ती सांगत नाहीत. ते त्यांना सकाम भक्तीकडेच वळवतात. मोक्षाची इच्छा करणारे थोडेच असतात. संसाराचीच इच्छा प्रत्येकाच्या मनांत असते. मनांत वासना असतात. मन त्यांतच गुंतलेले असते. कोणाला द्रव्य हवे. कोणाला संतती हवी. कोणाला रोग बरा व्हायला हवा. अनेक कामना असतात. त्या घेऊनच ते संतांना शरण जातात. संत सांगतात ईश्वर सर्वांच्या इच्छा पूर्ण करायला समर्थ आहे. आपलीही इच्छा तो पूर्ण करेल. पेढा देऊन औषध घ्यायला लहान मुलाला सांगावे तसे हे आहे. पेढा मिळावा म्हणून मूल औषध पिते. सकाम भक्ती या पेढ्यासारखी आहे. सकाम भजनाने जीव ईश्वराकडे वळतो. ईश्वराची कृपा झाली तर तो निष्काम भजनही करू शकतो. एकदम निष्काम भक्ती कशी सांगणार?

***प्रश्न : महाराज, अशी निष्काम भक्ती कशी मिळवायची?***

उत्तर : त्यासाठी कृपाच व्हावी लागते. संतांच्या कृपेशिवाय अशी निष्काम भक्ती प्राप्त होत नाही.

***प्रश्न : महाराज, संतांच्या स्थानांचे दर्शन ही संतांची संगती आहे कां?***

उत्तर : संत हे व्यक्त अवस्थेमध्ये असेपर्यंत ज्यांना संगती लाभली, त्यांना त्यांच्या सुकृतानुसार लाभ होतो. पण ते जेथे राहिले ते स्थानही त्यांच्या तपाच्या प्रभावामुळे अत्यंत पवित्र होते, संतस्वरूप होऊन जाते. त्या स्थानाच्या दर्शनाने, तिथं राहण्याने लाभ होतोच. अशा स्थानाचे दर्शन, त्या स्थानांत निवास ही संतांची संगतीच आहे.

***प्रश्न : महाराज, आम्ही या आजच्या जगांत संत शोधायचे तरी भेटणार कोठे आणि भेटले तरी ओळखायचे तरी कसे? आम्ही काय करायचे?***

उत्तर : ज्ञान आणि भक्ती यांच्या योगाने संतांनी भगवंतांच्या सगुण व निर्गुण रूपाचा पूर्ण अनुभव घेतलेला असतो. त्यांना सर्वत्र भगवंतच दिसत असतो. त्याचा अहंकार पूर्णपणे नाहीसा झालेला असल्याने भगवंत त्यांच्या हृदयांतच वास करतात आणि त्यांच्या मुखांतून बोलतात. वेदामध्ये जे सांगितले आहे तेच संत सांगताहेत. ज्ञानेश्वरमहाराज, एकनाथमहाराज अशा संतांनी खूप उपदेश करून ठेवला आहे. त्यांचे ग्रंथ वाचायचे, तेच त्यांचे दर्शन आहे. तोच त्यांचा सहवास आहे. मग मनन आणि निदिध्यासन आपोआप दृढ होते आणि संतांची कृपा होऊन ईश्वरभक्ती प्राप्त होते.

***प्रश्न : महाराज, मी अजरामर आहे अशी भूमिका ठेवायलाही सांगतात आणि जीवन क्षणभंगूर आहे अशी भूमिकाही ठेवायला सांगतात. याचा समन्वय कसा करायचा?***

उत्तर : खाली बसलेला मनुष्य खुंटीवर अडकवलेली टोपी घेण्यासाठी उठला आणि खाली कोसळला असं हे जीवन क्षणभंगूर आहे. हा विचार धर्माचरण करतांना मनामध्ये पाहिजे. मी अजरामर आहे असे धर्माचरण करतांना समजायचे नाही. मृत्युने आपले केस एका हातांत धरलेले आहेत आणि आपल्यावर तलवार उगारलेली आहे ही बुद्धी ठेवून जेवढे होईल तेवढं धर्माचरण करायचं.

पण विद्यार्जन करतांना मी अजरामर आहे असा विचार केला पाहिजे. कितीही काळ लागू दे मी ज्ञान मिळवेनच मिळवेन अशी बुद्धी ठेवावी. त्यावेळी जीवन क्षणभंगूर आहे असा विचार करू नये. माझं शरीर विनाशी आहे. काय करायचंय विद्या शिकून? असा विचार केला तर विद्या कधीच मिळायची नाही.

***प्रश्न : महाराज, कर्म शास्त्रोक्त पद्धतीने केले तरच फळ मिळते कां?***

उत्तर : ज्ञान मिळवणं, यश मिळवणं, कीर्ती मिळवणं ही सगळी कर्माची फळं आहेत. पण मुख्य फळ म्हणजे मनांतील सर्व वासना, इच्छा नाहीशा होणं. भक्तीनेच ते फळ मिळते. भक्ती नसेल तर कर्म शास्त्रोक्त पद्धतीने करूनही मन निर्वासन होत नाही, ते कर्म फुकटच जाते.

***प्रश्न : महाराज, संत जर भगवंताशी एकरूप झालेले असतात तर मग ते नंतरही भगवंताची भक्ती कां करत रहातात?***

उत्तर : संसाराची आवड असली म्हणजे संसारांतलेच विषय भोगत रहावेसे वाटते. तो संसारातले सुखच भोगत रहातो. पण संतांना भगवंताचेच प्रेम लागलेले असते. त्यांना भगवंतावाचून दुसरे कांही आवडत नसते. भगवंताच्या कथा ऐकाव्या, भगवंताच्या लीलांचं श्रवण करावे, भगवंतांच्या स्वरूपाची चर्चा करीत रहावे असे त्यांना वाटते. म्हणून संत भगवंताच्या प्रेमातच मग्न रहातात.

***प्रश्न : कांही भक्तांचं आचरण संतांना त्रास देणारं, कमीपणा आणणारेच होते. पण संत त्यांचा त्रास सोसतच रहातात. त्यांना दूर करत नाहीत. असे कां?***

उत्तर : सद्गुरू हे साक्षात ईश्वरच आहेत अशी बुद्धी पाहिजे. शास्त्रकार सांगतात, सत्पुरूष सांगतात तसे वागावे. त्यांचे योग्य-अयोग्य आपण आपल्या बुद्धीने ठरवू नये. जीवांची वृत्ती, त्यांचं पुर्वसुकृत, त्यांचे गुणदोष, त्यांचा पारमार्थिक अधिकार सद्गुरूंना एका दृष्टीक्षेपात समजतो. आपल्याला त्याचे ज्ञान कसे होणार? स्वतःसाठी ते काहीच करीत नाहीत. 'तुका म्हणे आता उरलो उपकारापुरता' असे त्यांचे जीवन असतं. त्यांची स्वतःची अवस्था द्वंद्वातीत असते. ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे मार्गदर्शन करण्याचं त्यांचं काम चालू आहे. कोण मान ठेवतो, कोणाचं वर्तन त्रासदायक आहे, इकडे त्यांचे लक्षही नसते. समोरच्या जीवाचा उद्धार कसा होईल एवढंच ते पहातात.

हृदयकुमारांनी श्रीरामकृष्णांची पुष्कळ सेवा केली. हृदयकुमारांचं वागणं काही वेळा गैर असायचं, भक्तांना ते रूचायचं नाही. भक्तांना रागही यायचा. पण श्रीरामकृष्णांनी हृदयकुमारांना दूर लोटलं नाही. कालीमंदिराच्या मालकांनी हृदयकुमारांना घालवून दिले म्हणूनच ते दूर गेले. नंतर कांही काळ हृदयकुमारांचं जीवन भरकटल्यासारखं झालं असं सांगतात. पण त्यांच्या आयुष्यात शेवटी फार मोठी श्रद्धा प्रकट झाली. त्या श्रद्धेच्या बळावर त्यांनी शेवटी जे मिळवलं ते श्रद्धावंत म्हणवणाऱ्या कितीतरी भक्तांनाही मिळालं नाही.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंची भक्ती केल्याने मुक्ती मिळेल कां?***

उत्तर : सद्गुरू हे भगवंताचे रूप आहे. सद्गुरूंचा स्पर्श हा भगवंताचा स्पर्श आहे. सद्गुरूंच्या पायावर मस्तक ठेवायला मिळालं तर त्या स्पर्शाने आपला दुरित क्षय होतो. त्यांची दृष्टी आपल्यावर पडली तर त्या दृष्टीचाही महिमा आहे. त्यांचं नामसंकीर्तन घडलं तर त्याचाही महिमा आहे. कोणच्याही उपायाने कां होईना चंचल असलेले अंतःकरण सद्गुरूंच्या ठिकाणी स्थिर करता आले तरी भगवत् स्वरूप होऊन जातो.

***प्रश्न : महाराज, सद्गुरू ईश्वरस्वरूप आहेत हे आम्हाला कां समजत नाही?***

उत्तर : सद्गुरू ईश्वरस्वरूप आहेत हे कळायला वेळ लागतो. संसारासक्त अंतःकरण असलं म्हणजे हे ज्ञान होत नाही. ते आपल्याप्रमाणेच आहेत असे वाटते. तेही बोलतात, चालतात, पहातात. आम्ही जसे वागतो तसे तेही वागतात. आमच्याप्रमाणे सर्व त्यांचे आहे. मनामध्ये संसाराच्याच अशुभ वासना भरून राहिलेल्या असल्या म्हणजे गुरूस्वरूप समजत नाही आणि सेवाही घडत नाही.

***प्रश्न : महाराज, वाडीला स्वामीमहाराजांच्या कृपेचा अनुभव सर्वांना कां येत नाही?***

उत्तर : वाडीला स्वामीमहाराज सदैव जागेच आहेत. अदृश्यरूपाने आहेत. दिसले नाहीत म्हणून ते तेथे नाहीत असे समजायचे कारण नाही. केव्हांही त्यांच्याकडे गेले की त्यांचे भक्तवात्सल्य अनुभवाला येते. पण तशी दृढ भक्ती आहे की नाही याची परीक्षा सद्गुरू करतात.

त्यांचे ऐकले पाहिजे. आमच्याजवळ भक्ती आहे असे नुसते तोंडाने म्हणून भागत नाही. मनांतल्या वासना गेल्या पाहिजेत. संतमहात्म्यांचा प्रसाद झाला तरी मनांत वासना असतील तर त्या आड येतात. म्हणून मनाचा निरोध करणं हे सर्वांत महत्त्वाचे आहे.

***प्रश्न : महाराज, सद्‌गुरु संकल्पाने काहीही करू शकतात हे खरे आहे कां?***

उत्तर : जीवाचा संकल्प व सद्‌गुरूंचा संकल्प यांत फरक आहे. जीवाचा संकल्प म्हणजे मनोरथ. पण सद्‌गुरूंचे तसे नसते. त्यांच्याजवळ पूर्ण सामर्थ्य असते. त्यांनी संकल्प केला की लगेच सिद्धी होते. सद्‌गुरूंचा सत्य संकल्प असतो. असं व्हावं असं वाटल्याबरोबर कार्य होऊन जातं. त्यांच्या संकल्पात अशी शक्ती असते. पण दया उत्पन्न झाल्याशिवाय संकल्प होणार नाही. दया उत्पन्न झाल्याबरोबर कार्य केल्याशिवाय सद्‌गुरू कसे राहतील?

***प्रश्न : महाराज, सद्‌गुरूंची कृपादृष्टी पडली तर विषयासक्त जीवांचाही उद्धार होतो कां?***

उत्तर : सद्‌गुरूंची कृपादृष्टी ज्याच्यावर पडते त्याचा उद्धार होतो. संसारांत आसक्त आहे, विषयासक्त आहे अशा लोकांवरही दया करून स्वामीमहाराजांनी त्यांचा उद्धार केला आहे. हे स्वामीमहाराजांचे भक्तवात्सल्य आहे.

परमात्मस्वरूप अतींद्रिय आहे. सद्‌गुरूंच्या रूपाने परमात्मरूप व्यक्त झाल्यावर ते आपल्याला डोळ्यांनी दिसते. पण केवळ डोळ्यांनी सद्‌गुरू दिसले तरी ते ईश्वरस्वरूप आहे हे जाणता येतेच असे नाही.

संसारात मन आसक्त असले म्हणजे सद्गुरू हे ईश्वस्वरूप आहेत हे ज्ञान होत नाही. ते आपल्यासारखेच आहेत असे वाटते. तेही बोलतात, चालतात, पहातात. आम्ही जसे वागतो तसे तेही वागतात. आमच्याप्रमाणेच त्यांचे सर्व आहे असे वाटते.

मनांत संसाराच्या अशुभ वासना भरून राहिल्या असल्या म्हणजे सद्गुरूंची परीक्षा करण्याकडेच बुद्धी जाते. सद्गुरू काय जेवतात, काय करतात अशी परीक्षा करण्याकडेच बुद्धी गेली तर त्यांचे खरे दर्शन होत नाही. त्यांचे खरे स्वरूप कधीच समजून येत नाही. गुरूसेवाही घडत नाही.

आपल्या शिष्याला सद्गुरू स्वत:सारखेच करून सोडतात. आपली जी योग्यता आहे तीच योग्यता शिष्याची करणं हे फक्त सद्गुरूंचंच सामर्थ्य आहे. पण तशी सेवा घडावी लागते. तशी भक्ती असावी लागते.

***प्रश्न : महाराज, अनेक लोकांना वाटते आम्ही सद्गुरूंची एवढी सेवा केली, एवढी भक्ती केली पण फळ मिळाले नाही. आमच्या वाट्याला उपेक्षाच आली.***

उत्तर : सद्गुरू भक्तवत्सल आहेत. केव्हांही त्यांच्याकडे गेलं तरी भक्तवात्सल्यच अनुभवाला येतं अशी दृढ भक्ती पाहिजे. पण भक्ताचे प्रेम दृढ आहे की नाही याची परीक्षा सद्गुरू करतात. त्यांचे ऐकलं पाहिजे. 'आमच्याजवळ भक्ती आहे' असे नुसतं समजून भागत नाही. 'भक्तीने आम्ही खूप सेवा केली' असं नुसतं म्हणून भागत नाही. आमच्या बुद्धीत असलेले दोष दूर व्हायला पाहिजेत आणि मग सेवा

घडली पाहिजे. आमची उपेक्षा केली असं मनांतसुद्धा येणार नाही अशी अवस्था प्राप्त होणे हेच त्या सेवेचे खरे फळ आहे.

श्रद्धा पाहिजे. वादविवाद करीत राहून, चिकित्सा करीत राहून फळ मिळत नाही. श्रद्धा असल्याशिवाय फळ मिळायचं नाही. संतमहात्मे श्रद्धा ठेवायला सांगताहेत. स्वतः अनुभव घेऊन सांगताहेत. त्यांचा प्रत्यक्ष अनुभव आहे. शब्दप्रमाण आहे ते. बुद्धी शुद्ध असेल तरच त्या शब्दप्रमाणावर विश्वास ठेवावासा वाटतो, श्रद्धा उत्पन्न होते आणि सद्गुरूंच्या मार्गदर्शनाप्रमाणे साधकांचे अनुष्ठान, अनुसंधान अखंड चालू रहाते.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंच्या वाणीतून जे निघते तसे कां घडते?***

उत्तर : ज्ञानी महात्मे असत्य कधीच बोलत नाहीत. सद्गुरू म्हणजे मूर्तिमंत सत्य. लोकांना जरी त्यांची वाणी असत्य वाटली तरी त्यांच्या वाणीतून जे निघते तसे घडून येते. ही एक सिद्धीच आहे. अमावास्येला चंद्रोदय होईल असे सद्गुरूंनी म्हटल्यावर खरोखरीच चंद्रोदय झाला अशी कांही उदाहरणे घडल्याचे विदर्भात सांगतात. सत्य हे परमात्म्याचे स्वरूप आहे. भगवान सत्यस्वरूप आहेत. सद्गुरू हे मूर्तिमंत सत्य आहे म्हणूनच त्यांची वाणी सत्य होते.

***प्रश्न : महाराज, गुरुचरित्रांत असे दिले आहे की, सद्गुरूंच्या दृष्टीक्षेपाने प्रारब्धाचा नाश झाला.***

उत्तर : भक्तांच्या उद्धारासाठीच तर सद्गुरू अवतीर्ण झाले आहेत ना! कोणता भक्त अडचणीत आहे, कोणत्या भक्ताला त्याची कर्मे प्रतिबंध करताहेत हे सगळं बघून त्याला त्यांतून सोडवायचे आहे.

सद्गुरूंच्या केवळ दृष्टीपातानेही प्रारब्धकर्म संपून जाते. ईश्वराच्या इच्छेनेच तर प्रारब्धकर्म फळ देतात. ईश्वराची इच्छा नसेल तर प्रारब्धकर्म काय करू शकणार? सद्गुरू हे ईश्वररूपच आहे. अशक्य असं काहीच नाही. त्यांचा दृष्टीपात झाल्यावर प्रारब्धपाप राहील तरी कसे? ते सद्गुरूस्वरूप दिसण्याची आज आपली योग्यता नाहीये. देवाने ती योग्यता आपल्याला द्यावी, आपलं खरं स्वरूप दाखवावं अशी प्रार्थना करायची.

***प्रश्न : महाराज, संतमहात्म्यांची भेट झाली, सहवास घडला तर सांसारिक सुख मिळू शकते कां? कां ते केवळ पारमार्थिक योग्यता वाढवायलाच मदत करतात?***

उत्तर : संतमहात्म्यांची भेट झाल्याने ऐहिक व पारलौकिक दोन्ही कार्ये सिद्ध होतात. सांसारिक सुख पाहिजे असेल तर तेही ते महात्मे देऊ शकतात. संसारातून मुक्त करायचे सामर्थ्यही त्यांच्याजवळ असते. त्यांच्या कृपेने सगळी दुःखे, ताप नाहीसे होऊ शकतात आणि पारमार्थिक योग्यताही वाढते.

***प्रश्न : महाराज, संत महात्म्यांचा संकल्प होईल तसे कर्म घडते असे सांगतात.***

उत्तर : मनांतले सगळे विकार जर दूर करता आले आणि मनामध्ये अखंड परमात्म्याचे अनुसंधान जर चालू झाले तर त्या मनाची अशी शक्ती निर्माण होते. जो संकल्प होईल त्याप्रमाणे कार्य घडते. जो शब्द निघेल त्याप्रमाणे कार्य होतंय. शब्दातही सामर्थ्य आहे. आशीर्वाद देतील तर तोही मोठा आहे. म्हशीला दूध नाही ती बाई म्हणते आहे.

पण नरसिंह सरस्वती म्हणतात, 'अहो, ती दूध देणारी म्हैस आहे.' महात्म्यांचा शब्द आहे. तीच जर हट्टानी म्हणाली असती, 'नाही देत म्हैस दूध, तुम्ही काय सांगता !' तर महाराज निघून गेले असते. पण तो महात्मा सांगतो आहे. म्हणून ती गेली म्हशीजवळ आणि दूध मिळालं. अशीही शब्दामध्ये शक्ती आहे. ती शक्ती आम्हाला नाहीये, म्हणून सगळं खोटं आम्हाला वाटतं. 'असं घडूच शकत नाही' असं आम्ही म्हणतो आणि बाजूला राहतो. ही शक्ती खरी आहे, असं जरी वाटलं तरी प्रयत्नाला आम्ही लागू.

***प्रश्न : महाराज,बुद्धीवादाच्या दृष्टीने परमेश्वर आहे हे सिद्ध करता येईल काय?***

उत्तर : आधुनिक बुद्धीवादी प्रत्यक्ष प्रमाण श्रेष्ठ मानतात. प्राचीन काळीही भारतीय ऋषींनी प्रत्यक्ष प्रमाणाचे श्रेष्ठत्त्व मानलेलेच होते. पण त्यांनी प्रत्यक्ष प्रमाणाच्या मर्यादा ओळखलेल्या होत्या. प्रत्यक्ष प्रमाणाची शक्ती मर्यादितच आहे. डोळ्यांना समोरचे दिसते. पण पाठीमागचे दिसत नाही. भिंतीमागचे दिसत नाही. अती दूरचे दिसत नाही. डोळ्यांची शक्तीही मर्यादित आहे. पाहिल्यावर डोळे स्पष्ट ज्ञान करून देतात. पण डोळ्यांनी जे पाहिलेले नाही ते जगात नाहीच असे म्हणायचे कां? देहाच्या पलीकडे आपल्याला काही दिसत नाही. शास्त्रांनी सांगितंले स्थूल देह वेगळा व सूक्ष्म देह वेगळा. पंचकोश सांगितले. त्याच्यामध्ये काय आहे हे सगळे शास्त्रांत तपशीलांत जाऊन दिले आहे. पण ते केवळ शब्दप्रमाण आहे. शब्दप्रमाणावर विश्वास कां ठेवायचा नाही?

शब्दप्रमाणावर बुद्धीचा विश्वास बसला पाहिजे. त्या शब्दप्रमाणाच्या विरूद्ध आपल्या बुद्धीने कांही दाखवता येते कां असा विचार केलाच पाहिजे. ईश्वर नाही हे बुद्धीने दाखवता येत नाही. हे सांगायलासुद्धा त्याच्याबद्दल काहीतरी थोडा अनुभव असायला पाहिजे. अमुक मनुष्य घरी नाही. पण म्हणजे तो कोठेच नाही कां? तो बाहेर गेला आहे. तो ठराविक वेळी व ठराविक खोलीत भेटू शकत नाही कां? "कृष्णराव आले होते कां हो" असे विचारले. ज्याने कृष्णरावांना कधीच पाहिले नाही, तो कृष्णराव आले होते कां नाही हे कसे सांगणार? तसे ईश्वर नाही असे आम्ही सांगणे, ईश्वरावर कांही आरोप करणे, तो ईश्वर नाहीच असे म्हणणे योग्य नाही. कारण अभाव हे सुद्धा एक प्रमाणच आहे. अभाव सांगायलासुद्धा कांहीतरी त्याबद्दलचे थोडेफार ज्ञान लागते. प्रत्यक्ष प्रमाण नसेल पण शब्दप्रमाण आहे.

उपनिषदांत ईश्वरस्वरूपाचे संपूर्ण सविस्तर प्रतिपादन आहे. आत्मस्वरूप कसे आहे हे सगळे मांडून दाखवले आहे. यापैकी जीव व आत्मा यांची आज आम्हाला कल्पना नाही. जीव शरीरात आहे याची कल्पना आम्हाला येत नाही. देहात रहाणारा देही निराळा आहे हे आधी पटले पाहिजे. तसे मनाला पटले म्हणजेच ईश्वरभक्ती करता येते. भगवद्गीतेत प्रारंभालाच देही वेगळा आहे असे भगवंत सांगतात. आत्मा देहापेक्षा वेगळा आहे, तो अनादि व अनंत आहे, देह नाशवंत आहे, हे सांगून गीतेत धर्मशास्त्र सांगितले आहे. हा सगळा पारमार्थिक

दृष्टिकोन आहे. देही वेगळा आहे अशी बुद्धी असल्याशिवाय धर्माचरण कसे करणार?

जो खरा प्रत्यक्षदर्शी आहे, ज्याला ईश्वराचे प्रत्यक्ष ज्ञान झालेले आहे त्याच्या शब्दावर विश्वास ठेवायला काय हरकत आहे? परमेश्वराने गुरुस्वरूप धारण केले आहे. ते तत्त्वदर्शी आहेत, द्रष्टे आहेत, त्रिकालदर्शी आहेत. मग त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवायला सांगणारी बुद्धी कां मानायची नाही? प्रत्यक्षदर्शी जो आहे त्याच्या शब्दांवर विश्वास ठेवला पाहिजे.

शब्दप्रमाणाशिवाय काहीही होत नाही. व्यवहारात आपण शब्दप्रमाण मानतोच ना? शाळेत शिक्षकाचा शब्द आपण मानत नाही कां? आईचा शब्द आपण मानत नाही कां? नेत्याचा शब्द आपण मानत नाही कां? वरिष्ठ अधिकाऱ्याचा शब्द आपण मानत नाही कां? मग संताचेच शब्द कां मानायचे नाहीत ?

ज्ञानेश्वरमहाराजांसारख्या संतांच्या शब्दांत, वाणीत जे तपश्चर्येचे सामर्थ्य आहे त्याचा अनुभव कोट्यावधी लोकांनी घेतला आहे हे मानावेच लागते. मग त्यांनी सांगितलेले ईश्वराचे अस्तित्त्व, स्वरूप व शक्ती आपली बुद्धी अमान्य कशी काय करू शकते? विश्वात्मक संतमहात्म्याला समजलेल्या परंतु सामान्य लोकांना दृष्टीगोचर नसलेल्या शक्ती मानायच्याच नाहीत असे कसे म्हणता येईल?

***प्रश्न : महाराज, कर्मवादही मानायचा आणि ज्ञाता सर्वज्ञ ईश्वरही मानायचा. याची सांगड कशी घालायची?***

उत्तर : भारतीय संस्कृतीत कर्मवाद मानला आहे. तो मानावाच

लागतो. कितीही बुद्धीवादाने उत्तर देण्याचा प्रयत्न केला तरी उत्तर देता येत नाही. तोच रोग, तोच डॉक्टर, तीच लक्षणे व तेच औषध. पण एकाला औषध लागू पडते व तो बरा होतो. दुसऱ्याला ते औषध लागू पडत नाही, त्याचे आयुष्य संपते. हे कां घडते? शरीरापेक्षा वेगळा असणारा हा जीवात्मा आपले पूर्व कर्म घेऊन जन्माला आलेला आहे हेच एक उत्तर आहे. यालाच कर्मवाद म्हणायचे.

पूर्वकर्माचे फल भोगावेच लागते. पण हा कर्मवाद व कर्मशक्ती कोणी निर्माण केली? ईश्वरानेच ती निर्माण केली आहे व जगताचे कार्य चालवले आहे. जीवाला त्याच्या कर्माप्रमाणे फळ द्यायचे एवढेच त्या शक्तीचे काम आहे. परमात्मा स्वतः अलिप्त आहे.

कर्मशक्ती मानली की ईश्वर मानावाच लागतो. जीवांनी केलेल्या कर्माचे फळ मिळते हे एकदा मानल्यानंतर ते जाणणारा कोणीतरी पाहिजे की नको? ऑफिसात एखादा सेवक चांगले काम करतो, रजा घेत नाही, टाळाटाळ करीत नाही. हे जाणणारा कोणी असेल तरच त्या सेवकाला बढती मिळेल. नुसते कर्म केले, जाणणारा कोणी नाही असे झाले तर फळ कसे मिळणार? केवळ कर्म तर जड आहे ना? शास्त्रकारांनी कर्मशक्ती सिद्ध केली आहे. आपल्याला त्याचा अनुभव येतही असतो. त्या कर्माचा ज्ञाता सर्वज्ञ परमेश्वर आहे व तो कर्माप्रमाणे जीवाला फळ देत असतो हेही आपल्या अनुभवाला येत असतेच. सगळे संतमहात्मे तेच सांगत आहेत.

***प्रश्न : महाराज, ईश्वर नियामक आहे असे म्हणतात आणि ईश्वर अलिप्त आहे असेही म्हणतात. ईश्वर खरा आहे तरी कसा?***

उत्तर : ईश्वर नियामक आहे. तोच निर्माण करतो. तोच व्यवस्था करतो. तोच संहारही करतो. ईश्वर नियामक आहे म्हणजे व्यवस्थापक आहे. त्याचे कार्य अखंड चालू आहे. त्याची ज्ञानशक्ती मोठी आहे. क्रियाशक्ती मोठी आहे. इच्छाशक्ती मोठी आहे. पण तो अलिप्तही आहे. सर्व शक्ती व ऐश्वर्य असूनही तो जीवांचं नियमन जे करतो, ते केवळ स्वतःच्या इच्छेने करीत नाही. जीवांची कर्मे पाहून त्याप्रमाणे तो नियमन करतो. ईश्वराला राग द्वेष लोभ असे काहीही विकार नसतात. ईश्वर विकारांच्या पलीकडे असतो. तो राग या अर्थाने तो अलिप्त आहे. द्वेषादि विकारांच्या आधीन होऊन विश्वाचे नियमन करीत नाही. न्यायाधीशापुढे खटला मांडतात. न्यायाधीश अपराध सिद्ध झाला कां हे पाहातो. अपराध बरोबर सिद्ध झाला तर तो शिक्षा करतो. शिक्षा करतांना न्यायाधीशाच्या मनांत कोणताही विकार नसतो. तो विकारी होऊन शिक्षा करीत नाही. त्याच्या मनांत आरोपीबद्दल राग द्वेष असे कांही नसते. तो अलिप्त असतो. तसेच हे आहे.

***प्रश्न : महाराज, ईश्वर सच्चिदानंद आहे असे सांगतात. सद्‌चिदानंद म्हणजे काय? गुरूही सद्‌चिदानंद असतात कां?***

उत्तर : ईश्वर सच्चिदानंदरूपी आहे. गुरुस्वरूप त्याचंच आहे. सत् म्हणजे त्रिकालाबाधित. कालमर्यादा ईश्वराला कांही करू शकत नाही. ईश्वराला कालाची मर्यादा नाही. तो सत् असतो म्हणजे त्याचं अस्तित्व नेहमी आहे. तो अनादि आहे. त्याला जन्म नाही व मृत्युही नाही. तो कालत्रयातीत आहे.

चित् म्हणजे स्वयंप्रकाशी. परमेश्वर स्वयंप्रकाशी आहे. तो

आत्मप्रकाशित असल्याने त्याला दुसऱ्या कोणत्याही प्रकाशाची जरूरी नाही. त्याच्याच प्रकाशाने सगळं जग प्रकाशित होते आहे.

आनंदरूपी आहे तो. निर्भेळ आनंद हे त्याचे रूप आहे. तो सुखदुःखाच्या पलीकडे आहे. निरानंद नाहीच. हा आनंदरूप परमात्मा सत्य आहे. कालमर्यादारहित आहे, नित्य आहे. स्वयंप्रकाशी आहे.

जो ईश्वर तोच गुरू. सच्चिदानंदघन आहे परमात्मा. तोच गुरू आहे. ईश्वररूप व गुरुस्वरूप हे त्या परमात्म्याचंच रूप आहे. सबंध विश्वाला आधारभूत असलेल्या परमेश्वराचे स्वरूप ज्या महात्म्याने जाणलेले आहे, त्याला सगळं जग नाहीसे होते. आलेले जे ते नाहीसे होते. आलेही नाही व गेलेही नाही म्हणतात. विश्वाधार असा जो परमात्मा तोच गुरू आहे.

***प्रश्न : महाराज, ईश्वर निराकार आहे तर तो साकार कसा होतो? ईश्वर मूर्तीत असतो कां ?***

उत्तर : ईश्वर निर्गुण निराकार आहे तर त्या निराकाराला आकार कसा येईल म्हणतात लोक. पण निराकारातच आकार घेऊ शकतो. अग्नीला आकार कोठे आहे ? पण ज्या लाकडात अग्नी पेटला आहे त्याचा आकार अग्नीला येतो हे आपण पाहात नाही का? पाण्याला आकार कोठे आहे? पण जसे गोल, चौकोनी, अष्टकोनी जसे भांडं असेल तसा आकार त्या पाण्याला येतो हे आपण रोज बघत नाही का? मग निराकाराला आकार येत नाही ही फक्त समजूत करून घेऊन काय उपयोग आहे?

मूर्तीमध्ये देव आहे की नाही असा प्रश्न लोक विचारतात. मूर्तीपूजा शास्त्रांत नाही असेही कांही शास्त्रकार म्हणतात. पण बहुतेक संतमहात्मे मूर्तीपूजकच होते. त्यांनी मूर्तीपूजा करूनच भगवंताची कृपा संपादन केली आणि सर्व लोकांना मार्गदर्शन केले. त्यांच्या जन्माचे सार्थक मूर्तिपूजेमुळेच झाले ना !

***प्रश्न : महाराज, "योगक्षेमम् वहाम्यहम्" याचा अर्थ भगवंत आमच्या प्रपंचाचा योगक्षेम चालवतो असा आहे कां पारमार्थिक योगक्षेम चालवतो असा आहे?***

उत्तर : योगक्षेम शब्दाचे दोन्ही अर्थ आहेत. संसारातील योगक्षेमही तोच चालवतो आणि परमार्थातील योगक्षेमही तोच चालवतो. भक्ताला परमार्थात काय कमी आहे, काय पाहिजे आहे ही सगळी व्यवस्था भगवंतच पहातो असा सर्व संतमहात्म्यांचा पूर्ण विश्वास आहे. त्यांचा तसा अनुभवही आहे.

पण संसारातही काय लागेल ते परमात्माच देतो ना! त्याच्याशिवाय देणारा दुसरा कोणी नाही. संसारही देवानेच करायचा आहे आणि परमार्थही देवानेच करायचा आहे. आणि ते तो करतोही.

***प्रश्न : महाराज, कांही भक्तांना वाटते परमेश्वर माझ्यावर रागावला आहे, राग आला म्हणून तो दुर्लक्ष करतो आहे आणि माझी परिस्थिती सुधारत नाहीए. परमेश्वर भक्तावर रागावतो कां?***

उत्तर : खऱ्या भक्ताला देवाने किंवा सद्गुरूंनी उपेक्षा केली, दुर्लक्ष केले असे वाटणारच नाही. देवाने दिलेली स्थिती चांगलीच आहे असे त्याला वाटते. देव कधीही भक्तावर रागावत नसतो. देव भक्ताची

कधीही उपेक्षा करीत नाही. रागावणे, उपेक्षा करणे हे अल्प सामर्थ्याचे लक्षण आहे. देव सर्वज्ञ आहे, पूर्णपणे समर्थ आहे. तो रागावेलच कसा? तो उपेक्षा करेलच कसा? संत सांगतात, ''जैसी स्थिती आहे तैशापरी राहे। कौतुक तू पाहे संचिताचे।''

देवाचे सामर्थ्य कमी नाही. त्याची अवहेलना करू नये. आपण आपले कर्म चांगले करण्याकडे लक्ष द्या. आपले हित आपल्याला कसे कळेल ? ते देवालाच कळणार. त्याप्रमाणे तो करीत असतोच.

ही सुद्धा चांगली स्थिती आहे. देवाने दिलेली स्थिती चांगलीच आहे असे भक्ताला नेहमीच वाटत असते. देव भक्तावर कधीच रागावत नाही, देव भक्तांची कधीही उपेक्षा करत नाही, ही बुद्धी पाहिजे. रागावणे, उपेक्षा करणे हे अल्प सामर्थ्याचे लक्षण आहे. देवाचे परिपूर्ण सामर्थ्य आहे. ही जाणीव एकदा पक्की झाली म्हणजे देव रागावला, त्याने लक्ष दिले नाही असे कधीच वाटणार नाही.

***प्रश्न : महाराज, स्वामीमहाराज गाणगापुरहून वाडीला आले असे सांगतात. वाडीला आले म्हणजे ते पूर्वी तेथे नव्हते कां? वाडीला आहेत म्हणजे ते इतरत्र नाहीत असं म्हणायचं का?***

उत्तर : आनंदघनस्वरूप परमात्मा सर्वव्यापी आहे. तो सर्वव्यापी आहे म्हटल्यावर तो अमुक ठिकाणी आहे आणि अमुक ठिकाणी नाही असे म्हणता येत नाही. स्वामीमहाराज साक्षात परमेश्वर आहेत. ते कुठे नाहीत असं होऊच शकत नाही. महाराज गाणगापूरला गेले म्हणजे पूर्वी ते गाणगापुरमध्ये नव्हते असे म्हणण्यासारखे झाले. वाडीहून ते तेथे गेले असे म्हणायचं म्हणजे ते वाडीत नाहीत असा अर्थ होईल. पण

परमात्मस्वरूपाला तर कोणतीच क्रिया नाही, गती नाही आणि एका ठिकाणी स्थिर असणे हेही नाही. कुठंही रहाणे, बसणे हेही कांही नाही. महाराज वाडीहून गाणगापुरला गेले म्हणजे फक्त ही लीला दाखवली त्यांनी. बाहेर जे स्वरूप दाखवले, ते स्वरूप एका ठिकाणी अदृश्य झाले आणि दुसरीकडे प्रकट झाले. मूळ आत्मस्वरूपाने भगवंताचे सर्वत्र वास्तव्य आहे. मनुष्यरूप धारण करून भगवान आलेले आहेत. या रूपांत ते येथे होते. आता ते रूप अदृश्य झालेलं आहे. आता ते गाणगापुरला प्रकट झाले म्हणून ते तिकडे गेले असं म्हणायचं.

जशी आपण भावना करावी तसे वाटते. तिथे आहेत म्हटलं तर तिथे आहेत. नास्तिक माणसाला ईश्वरप्राप्तीची बुद्धी नाही. त्याच्या बुद्धीने सगळेच नाहीसे झाल्यामुळे तो स्वतःच नाहीसा होतो म्हणजे अधोगतीला जातो असे उपनिषदकार सांगतात. पण ईश्वर आहे म्हटल्यावर भगवंतांनी सांगितलेला सगळा साधनामार्गही आहे. ही आस्तिक्य बुद्धी असणारा जो आहे तो त्याप्रमाणे आचरण करतो आणि फलप्राप्ती करून घेतो. बुद्धीनेच सगळे मिळवायचे आहे. ''ईश्वर नाही'' अशी बुद्धी झाली की सगळं गेले. साधनेही गेली. साध्यही गेलं. बुद्धीवर ज्याप्रमाणे संस्कार असतील त्याप्रमाणे तो परमात्मा आहे. ईश्वरावर विश्वास ठेवावा, श्रद्धा ठेवावी असे शास्त्र सांगते. श्रद्धावान लभते ज्ञानम् । मुख्य अंतरंग साधन म्हणजे श्रद्धा आहे. बाकीच्या साधनांपेक्षा श्रद्धा हे साधन मुख्य आहे. महाराज अदृश्यरूपाने आहेत म्हणजे ते नाहीत असा अर्थ नाही. श्रद्धेची भूमिका तशी पाहिजे.

***प्रश्न : महाराज, अयाचित वृत्ती म्हणजे काय? त्याचे एवढे कां महत्त्व सांगतात.***

उत्तर : जे मिळेल त्यावर संतोषाने रहायला पाहिजे. निर्वाहाला कांही फार लागत नाही. संतांनी देवाजवळ ''निर्वाहापुरते द्या'' असेच मागितले आहे. क्षणोक्षणी आपले स्मरण घडावे, इतर व्यापांमध्ये वेळ जायला नको म्हणून निर्वाहापुरते मागितले आहे. रहायला जागा आणि भोजन एवढंच संतांचं मागणं आहे त्यांचे. पण ते मागणं देवाकडे आहे. दुसऱ्या कोणाजवळ नाही.

माणसं देतांना एखादी गोष्ट देतात. पण ती उपकाराच्या भावनेतून देतात. त्यामुळे देणारा आणि घेणारा यांच्या संबंधाचे स्वरूप वेगळे होते. देणाऱ्याचा अहंकार वाढत जातो, घेणाऱ्याचीही वृत्ती त्यांतच गुंतत जाते. म्हणून अयाचित वृत्ती सांगतात. अयाचित वृत्तीने करून धैर्यही मोठं आहे. कोणाजवळही मागायचं नाही. जे येईल ते येईल. जे येईल ते देणाराही दाता भगवंतच आहे. दाता एक रघुनंदन आहे ही फार मोठी निष्ठा आहे. हे पाहिजे, ते पाहिजे असं कांहीही मनांत नसलं म्हणजे मग कुठेही आसक्ती रहात नाही. मन शांत होतं. मन शांत होणं याचाच अर्थ वासनाक्षय झालेला आहे. वासना कमीकमी होणे म्हणजेच शम, म्हणजेच शांती. भक्ती व ज्ञानाचा तो अधिकारी आहे.

***प्रश्न : महाराज, परान्न घ्यायचं नाही असे कां सांगतात?***

उत्तर : उपनिषदकार सांगतात, आपण जे अन्न खातो त्याच्यापासून मन तयार होते. ते अन्न पवित्र असेल, शुद्ध बुद्धीने तयार केलेले असेल तर त्या अन्नाच्या सेवनाने तयार होणारे मनही शुद्ध, निर्भय व सात्त्विक

होते. दुसऱ्याकडे नेहमी भोजन करीत राहिले तर आपले तेज नष्ट होते. अन्नदोषामुळे संकटे येतात.

वाटेल ते अन्न खाऊन मनाची तयारी होत नाही, शुचिता रहात नाही. मन शुद्ध होत नाही. पंचमहायज्ञात ज्यावर संस्कार झाले आहेत ते अन्न घ्यायला हरकत नाही. आचारसंपन्न विप्र, आपले गुरू, श्वशुर, शिष्य, आपले आजोबा अशा ठिकाणी भोजन केले तर तो दोष नाही. आचारहीन जो आहे त्याच्याकडे मात्र अन्न घेऊ नये. आपले कर्म सोडून दुसऱ्या कर्मामध्ये प्रवृत्त झालेल्यांचेही अन्न घेऊ नये.

***प्रश्न : महाराज, श्रद्धापूर्वक तीर्थ सेवन केले आणि अंगारा लावला तर पूर्वकर्मांतील दोष दूर होतात कां?***

उत्तर : अदृष्ट न समजून येणारे कर्मभोग असतात. शरीरांत कांही रोग किंवा, मनःस्ताप,विकृती निर्माण होणं आणि उपासना, साधनाभ्यास नीट न घडणे हे पूर्वीच्या कर्माचे फळ आहे. ते कर्म कसे नाहीसे करायचें याचे ज्ञान आपल्याला कोठे आहे. हा प्रतिबंध कसा झाला हेच जिथे कळत नाही तिथे प्रतिकार करणार कसा? इतका असमर्थ जीव आहे तरी त्याचा स्वतःच्या बुद्धीवर विश्वास आहे आणि आपल्या बुद्धीने मी सर्व कांही करू शकतो असे तो म्हणतो. रूद्राक्षाचा, भस्माचा, तीर्थाचा महिमा आहे. भगवंताच्या चरणावरून आलेले तीर्थ पापनाशक आहे. भस्म किंवा अंगाऱ्याने पूर्वकर्मांतील दोष दूर होतात. भवरोग वैद्य परमात्मा आहे आणि तीर्थ अंगारा हे त्याचे औषध आहे.

***प्रश्न : महाराज, गुरूंवर श्रद्धा असली तरच फळ मिळते म्हणजे ते फळ गुरूंनी कृपा करून दिले आहे कां साधकांच्या श्रद्धेमुळे ते फळ त्याला मिळाले ?***

उत्तर : श्रद्धा या भावनेचं फळ मिळतं. ज्याची श्रद्धा आहे त्याला त्या श्रद्धेचे फळ मिळतं. श्रद्धा असेल त्याप्रमाणे फळ मिळते. श्रद्धेचे सामर्थ्य नाही म्हटलं तर फळ मिळत नाही. सामर्थ्य आहे म्हटल्यावर फळ मिळते. दृढ श्रद्धा पाहिजे. फळ मिळेल की नाही असा संशय मनांत आणला की काही मिळायचं नाही हे माणसाला कळतच नाही. मिळेल की नाही, मिळेल की नाही अशी अश्रद्धा निर्माण होऊन केलेल्या कर्माचे फळ मिळाले नाही की यांत काही अर्थ नाही असं म्हणून तो मोकळा होतो. मंत्रशास्त्र खोटं आहे असं म्हणतो.

गुरूवर, देवावर, ज्योतिषावर, औषधावर ज्याची जशी भावना असते तसे त्याला फळ मिळते. म्हणजे त्यांचेही सामर्थ्य आहे आणि त्याच्या जोडीला, भावनेचेही सामर्थ्य पाहिजे. म्हणजे मंत्रात सामर्थ्य नाही पण भावनेमुळे त्याला सामर्थ्य येते असा त्याचा अर्थ नाही. गुरूवरती श्रद्धा पाहिजे म्हणजे गुरूचे सामर्थ्य आहे. यावर श्रद्धा हवी. पण गुरूचे सामर्थ्य आहे ही भावना भक्ताची पाहिजे. या दोन्हींचे मिळून त्याला फळ मिळते. कर्म कर्तृत्व आपल्याकडे घेणारा जीवात्मा आहे. कर्तृत्वाभिमान असला तरी तुला त्याचे फळ मिळेल. पण तेच फळ गुरूंच्या आज्ञेचे आहे, औषधाचे आहे, देवाचे आहे असे समजलास तर त्याचं फळ जास्ती आहे. भक्तीशिवाय कांहीही फळ

सिद्धी नाही. भवसिंधुत बुडणाऱ्याला भक्तीही तारक आहे. ज्याची दृढ श्रद्धा असेल, भक्ती असेल तो तरून जातो.

***प्रश्न : महाराज, सद्‌गुरू कसे ओळखायचे ? त्यांना ओळखायची कांही लक्षणे असतात कां?***

उत्तर : कोणत्या आचार्यांना शरण जावे हे भागवतामध्ये सांगितले आहे. ''शाब्दे परेच निष्णातम् ब्रह्म उपसनाश्रयम् ।'' '

ज्ञानी महात्मे असतात. पूर्ण आत्मज्ञान झालेले आहे. ईश्वररूप झालेले आहेत. शरीर आहे पण मुक्त आहेत. पूर्ण शांतीची स्थिती आहे. मनांत कोणतेही विकार, तरंग नाहीत. मनांतला संसार पूर्ण मावळून गेला आहे. पूर्ण आनंदरूप बनून गेलेले आहेत. जीवांच्या बुद्धीतले दोष काढून टाकणं, त्यांची बुद्धी, मन हे स्थिर करणं, त्या बुद्धीमध्यै ईश्वरस्वरूपाचा प्रकाश करणं तै कार्य करताहेत. अशा ज्ञानी महात्म्यांच्या शब्दांतही सामर्थ्य असते. त्यांच्या मुखांतून जी वाणी निघेल त्याप्रमाणे होतं. आशीर्वाद देतील तोही मोठा आहे. ईश्वरानेच या ज्ञानी महात्म्यांचे रूप घेतलेले आहे. सद्‌गुरूंच्या रूपाने ईश्वराचे कार्य चाललेलं आहे.

## ✻ साधकाची अवस्था व मनोभूमिका ओळखून मार्गदर्शन केले त्यावेळी झालेली संभाषणे -

*(श्रीदत्तमहाराजांकडे जाण्यापूर्वी एक भक्त अनेक वर्षे प्राणायाम करीत होता. तसेच त्याने पातंजल योगशास्त्राचा अभ्यासही केला होता आणि त्याप्रमाणे त्याची ध्यानधारणा बरीच वर्षे चालू होती. परंतु भक्त त्यांत फारशी प्रगती करू शकला नव्हता. शिवाय ही उपासना श्रीदत्तमहाराजांच्या उपासनामार्गाशी सुसंगत असेल किंवा कसे हा प्रश्नही भक्ताच्या मनांत होता. त्यामुळे भक्ताने यासंबंधी श्रीदत्तमहाराजांकडे कधीच उल्लेख केला नव्हता. परंतु सद्गुरू अंतर्यामी असल्याने त्यांनीच सर्व जाणले आणि आपणहून तो विषय काढून त्या संबंधी भक्ताशी बोलायला सुरुवात केली.)*

***प्रश्न : महाराज, माझी आध्यात्मिक प्रगती वेगाने कशी होईल ?***

उत्तर : ध्यानाचा अभ्यास चालूच आहे. प्राणायामही चालू आहे. वाचनही आहे. वाचनाचा परिणाम होतोच की मनावर. ईश्वराचे अनुसंधान सतत राहील असे वाचन झाले की मनावर चांगला परिणाम होतो.

***प्रश्न : महाराज, मी प्रवचनं करतो, पुस्तकं लिहितो. पण या गोष्टी आध्यात्मिक प्रगतीला विघातक ठरणार नाहीत कां?***

उत्तर : जिज्ञासू लोक असतात. त्यांना मार्गदर्शन होतं.

***प्रश्न : महाराज, प्रवचन करायचं असलं की प्रवचनात काय सांगायचं या दृष्टीनेच वाचन होते, तसे विचार मनांत येत रहातात. शिवाय प्रवचन संपल्यावर अनेक लोक प्रवचन चांगले***

***झाले म्हणतात व पाया पडतात. त्यामुळे मनाला बरे वाटते. हे सगळं आध्यात्मिक प्रगतीला विघातक नाही कां?***

उत्तर : एकदम सगळे बंद करण्यापेक्षा थोडेसे बंद करून बघावं. कमी करावं. मनाची प्रवृत्ति जास्तीत जास्ती आत वळू लागली म्हणजे ते बंद होईल आपोआप. एकदम जिज्ञासू लोकांना नाही म्हणून सांगू नये. त्यांनाही समाधान वाटतं. आदराने नमस्कार करतात. बुद्धीला प्रेरणा देणारी एक स्वतंत्र शक्ती आहे अशी नेहमी जाणीव असली म्हणजे त्याचे कांही वाटत नाही. त्या शक्तीचे कार्य आहे हे ओळखले म्हणजे लोक प्रवचनाला चांगले झाले असे म्हणतात याचे कांही वाटत नाही. हे अनुसंधान असलं म्हणजे होतं आपोआप.

***प्रश्न : महाराज, मला काही प्रवचनकार किंवा विद्वान व्हायचे नाही. मला आध्यात्मिक अनुभव घ्यायचा आहे. त्याला प्रवचनांचा काय उपयोग ?***

उत्तर : जिज्ञासू मंडळी आली, काही प्रश्न विचारले तर त्यांना काही उत्तर द्यायचं नाही कां? उत्तर दिले पाहिजे. ही जिज्ञासाच आहे. प्रवचन म्हणजे काय? चार लोक एकत्र बसतात, आपण सांगतो. एकानं विचारणं काय नि दोघांनी विचारणे काय. कधी कधी करावं प्रवचनं. परंतु उपाधी एकएक कमी करणं चांगलं. काही लोकांना जास्त जिज्ञासा असते, त्यांनाच सांगावं. त्यांना उपयोग होईल. [१]परेच्छा

---

[१] **टीप** : इतरांनी इच्छा व्यक्त केल्यामुळे आपल्या हातून जे कर्म घडते व प्रारब्ध निर्माण होते त्याला परेच्छा प्रारब्ध असे म्हणतात.

प्रारब्ध सगळंच आणखी पाळायचं असं नाही. थोडसं पाळायचा प्रयत्न करायचा.

***प्रश्न : महाराज, अजून कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत. नाहीतर एकांतात राहून साधनेला पूर्ण वाहून घेता आलं असतं.***

उत्तर : यांत जितका वेळ मिळेल तितका वेळ इकडे घालवता येणार नाही कां? एकदम सगळं सोडून द्यायचे काय म्हणून? पुन्हा मनालाही कांही वाटायला नको. हाच अभ्यास करतां करतां इकडे मन जास्ती जास्ती वळेल. मग बाह्य उपाधी व व्याप कमी होतातच. एकदम सोडायचं काय म्हणून? जास्ती जास्ती इकडं लक्ष लागलं म्हणजे तिकडचं लक्ष कमी होतंच.

***प्रश्न : महाराज, संसारात ईश्वराच्या कृपेने नावलौकिक, पगार, पैसा, प्रतिष्ठा, अधिकार सगळं उत्तम मिळते आहे. पण पत्नी आजारी असतात. बाकी संसारात वैगुण्य कांही नाही. काय करावे?***

उत्तर : कांही कांही कर्मदोष असतो. होतं तसं कांही. प्रयत्न करायचा. उपेक्षा ठेवावी. त्रास करून घेऊन तरी काय उपयोग? आणि मुलावर चांगले संस्कार झाले आणि मुलगा एकदा मार्गी लागला म्हणजे पुष्कळ उपाधी कमी होईल. आपोआप तो मार्गाला लागेल, तो पहायला लागेल. त्याला मार्गदर्शन करीत रहायचे.

***प्रश्न : महाराज, जे आध्यात्मिक अनुभव येतात ते आपल्या कृपाप्रसादाने येत असतात.***

उत्तर : नाही. आपलाही अभ्यास चालू आहे. प्राणायामाचा अभ्यासही

उत्तम आहे. योग्य मार्गदर्शनाप्रमाणे प्राणायाम चालू आहे. त्याचाही परिणाम हळूहळू होतो. प्राणवायूची शक्ती फार मोठी आहे. त्याचे अनेकांना अनुभव आले आहेत.

पातंजल योगदर्शन साधकाला खूप उपयुक्त आहे. त्यावर भाष्य करतांना श्रीशंकराचार्य स्वामीमहाराजांनी खंडन केलेले आहे. पण त्यात त्यांच्या सिद्धांताचे खंडन आहे. प्रत्यक्ष पातंजल योगाचा जो मार्ग आहे तो आचार्यमहाराजांनी मान्य केलेलाच आहे. ''एतेवयोगतत्त्वप्राणा'' म्हणून सूत्रच आहे. सांख्यांच्या खंडनाप्रमाणे योगाचेही खंडन आहे. सांख्यकारांनी आणि पातंजल योगदर्शनकारांनी जे स्वतंत्र प्रकृतीचे कर्तृत्व मांडले ते तेवढे मान्य नाही. बाकी प्राणायाम ध्यान, धारणा, समाधी वगैरे जे कांही पातंजल योगदर्शनांत सांगितले आहे ते आचार्यमहाराजांना मान्यच आहे. आचार्यांचा विरोध मूळ पातंजल योग मार्गाला नाही. अद्वैत वेदान्तातील सिद्धांताच्या विरूद्ध सिद्धांत जे पातंजल योगदर्शनांत मांडले आहेत त्याचे खंडन आचार्यमहाराजांनी केले आहे. युक्तिवादानेही ते खंडन होतेच. ते प्रकृतीचे कर्तृत्व स्वतंत्र मानतात. पण प्रकृती जड आहे. ईश्वरशक्ती नसेल तर केवळ प्रकृती कार्य करूच कसे शकेल? हे सगळं युक्तिवादाने सिद्ध होते.

***प्रश्न : महाराज, अनेक वर्षे मी पातंजल योगदर्शनांत सांगितल्याप्रमाणे ध्यानधारणा करतो आहे, प्राणायामही करतो आहे. पण अजून समाधी पूर्णपणे साधत नाही.***

उत्तर : एकाग्रता असली म्हणजे क्रमाने होणार - धारणा, ध्यान आणि

समाधी अशा क्रमाने होत जातं. जास्तीत जास्ती एकाग्रता साधली पाहिजे. त्याकरिताच संतांचे मार्गदर्शन आहे. ईश्वरशक्तीची प्रार्थना करीत राहिले पाहिजे. हेच संतांचे मुख्य सांगणे आहे. ध्यान धारणासुद्धा ईश्वरकृपेशिवाय होत नाही. ईश्वराची प्रार्थना करत राहिलं तरच ते होतं असे संत सांगतात.

***प्रश्न : महाराज, प्रपंचातच राहून जर ईश्वरप्रार्थना करीत राहिले तर उद्धार होईल कां?***

उत्तर : प्रार्थना करीत रहायची. वाचन चालू आहे. मनन चालू आहे. चांगलेच आहे की. आपल्या स्वतःकरिता वाचन करायलाच पाहिजे. बुद्धी जर आहे तर संतांचे व मोठे श्रेष्ठांचे ग्रंथ वाचायला काय हरकत आहे? सगळे सोडून द्यायचे म्हणजे असे कसे चालेल. एकदम सगळ्या द्वैतातून आपण मोकळे होणे शक्य आहे कां? हळूहळू साध्य होत जाते.

***प्रश्न : महाराज, ज्ञानेश्वरी वाचतोच. आणखी कांही वाचायला हवे कां?***

उत्तर : हिंदी आहे, मराठी आहे, संस्कृत आहे, इंग्रजी आहे. आपण सगळे वाचू शकता. चांगले चांगले लिहिणारे पुष्कळ लोकही आहेत.

***प्रश्न : महाराज, ध्यान प्राणायाम चालूच आहे. आपला अनुग्रह घेतलाच आहे. मग उद्धार होईल ना?***

उत्तर : अनुग्रह आमचा नाही आहे. आपले वाचन-बिचन चालू आहे. चांगले आहे. क्रमाने सगळं करीत रहायचे.

***प्रश्न : महाराज, म्हणजे संसार न सोडताच अध्यात्म करावे अशी आपली आज्ञा आहे कां?***

उत्तर : संसार सुटायचा कसे शक्य आहे? आहे हे ईश्वराचीच योजना आहे. ईश्वराचे अनुसंधान शक्य तितके ठेवायचे. नामस्मरण आहे. त्याचे गुण आहेत. संतांची पुष्कळ चरित्रे आहेत. ती वाचावीत.

***प्रश्न : महाराज, ध्यान चांगले लागावे म्हणून काय करावे?***

उत्तर : प्रयत्न चालू ठेवायचा. ध्यान म्हणजे एकाग्रता ती. 'यथाभिमतध्यानाद्वा' म्हणून सूत्रकार सांगताहेत. 'एतयैव सविचारा निर्विचारा च सूक्ष्मविषया व्याख्याता ।' म्हणूनही सांगताहेत. अभ्यास चालू ठेवायचा.

***प्रश्न : महाराज, साधना तीव्र करण्यासाठी आणखी काय करावे?***

उत्तर : कांही नाही. चालू आहेच. अभ्यास नित्य नेहमी चालू राहिला म्हणजे झाले. हळूहळू होतं. प्रार्थना ईश्वराची करायची. ईश्वरप्रणिधानाद्वा असे समाधीचे सूत्र सांगितले आहे. अनुसंधान अखंड नित्य चालू ठेवायचे म्हणजे झाले. त्याकरिता हे वाचन आहे. संतांची चरित्रे, ईश्वराची चरित्रे अनेक आहेत. त्याचे सारग्रहण करण्याची बुद्धी आहे आपल्याकडे.

***प्रश्न : महाराज, संतांची दर्शने घ्यायला हरकत नाही ना?***

उत्तर : हरकत नाही. त्यांच्याबरोबर विचारविनिमय होतो. संतांचे दर्शन घेणे, त्यांचा उपदेश ऐकणे हे मनन आहे. मनन महत्त्वाचे आहे. एकाने केले काय किंवा चार लोकांनी मिळून केले काय! मननाने ईश्वराचे अनुसंधान रहाते जास्ती आणि संसारातून तेवढ्या वेळापुरतं मन

बाजूला होतंच की. हे वाचन वगैरे आहे ते चालू असले म्हणजे बाजूला झालंच की. चांगले आहे. तसं कांही वाईट नाही.

***प्रश्न : महाराज, आध्यात्मिक अनुभव येतात त्यांचा फायदा कसा करून घ्यावा?***

उत्तर : फायदा कसला? होईल ते करायचं. त्यांनी जर अनुसंधान रहाणार असेल तर चांगलेच आहे. बाकी कोठे लक्ष जाऊ नये. तिकडे लक्ष लागावे. नादानुसंधान करीत नाहीत काय? ध्यानांत नाद ऐकू येतो तिकडे लक्ष दिले की एकाग्रता होते.

***प्रश्न : महाराज, स्वामी विवेकानंदांनी असे म्हटले आहे की डोळे, कान, नाक, जीव व त्वचा ही पाच ज्ञानेंद्रिये जी बाहेर धावत असतात त्यांना आत आत्म्याकडे वळवणे व आत आत्म्याकडे स्थिर करणे हेच श्रेष्ठ ध्यान किंवा समाधी आहे. हे ध्यान मला कसे साधता येईल?***

उत्तर : बाहेरच्या जगाची जाणीव संपली म्हणजे झाले. कारण इंद्रियांनी आत्मा जाणता येत नाही. अंतर्मुख अवस्था ही मनाची अवस्था आहे. इंद्रियांच्या द्वारानी मन बाहेर जाते. इंद्रिये थांबली की मन थांबले. त्या थांबलेल्या मनामध्ये केवळ आत्मस्वरूपाचाच विषय असणार. बाहेरचे विषय थांबले म्हणजे झाले.

***प्रश्न : महाराज, असं ध्यान करतांना मनांत विचार येत रहातील काय ?***

उत्तर : जितके जितके विचार कमी होतील तितके मन

आत्मस्वरूपाकार होईल. आपला साक्षी भाव असला की आत्मस्वरूपाचे अधिक अधिक ध्यान होईल.

***प्रश्न : महाराज, पातंजल योगसूत्रांत सांगितलेली असंप्रज्ञात समाधी साक्षीभावाच्या ध्यानामुळे येऊ शकेल काय?***

उत्तर : अभ्यास चालू ठेवावा.

***प्रश्न : महाराज, ध्यानाच्या वेळी आत चैतन्य पाहायचे व बाकीचे चोवीस तास बाहेर चैतन्य सगळीकडे पाहायचे अशी अवस्था चांगली काय?***

उत्तर : व्यवहाराचेही बघावेच लागते ना ! तशी इच्छा करू नये जे जे भेटीले भूत ! ते ते मानिजे  भगवंत ! ही पुढची अवस्था आहे. बाहेरचा संबंध कमी कमी झाला की ती अवस्था प्राप्त होते.

***प्रश्न : महाराज, संतमहात्मे भक्तांना मार्गदर्शन करतात असे उद्गार काढून त्यांचे कर्तृत्वही मानायचे आणि ते अलिप्त असतात, अकर्तृत्व भावनेत असतात असेही म्हणायचे. यांत विसंगती नाही कां?***

उत्तर : ज्ञानेश्वरमहाराज भिंतीवर बसले होते. भिंत चालली. भिंत चालली हे पहाणाऱ्यांनी म्हणायचे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांना त्याचे काहीच भान नाही. भिंत चालली काय व न चालली काय. अहंकाराच्या पुढे श्रीज्ञानेश्वरमहाराज गेले होते. कर्तृत्वही मानायचे म्हणजे ते पहाणाऱ्यांनी मानायचे. वास्तविक ते अकर्तृत्व आहे.

***प्रश्न : महाराज, मनातील अहंकार कसा घालवावा?***

उत्तर : साधना चालू ठेवायची, ध्यान, प्राणायाम, उपासना यामुळे

चित्ताची एकाग्रता होते. चित्ताची एकाग्रता झाली म्हणजे अहंकार कमी होतो. ध्यानाचा तो परिपाकच आहे. अहंकार जाणे म्हणजे देहादिकांच्या ठिकाणी अहं बुद्धी कमी होणे. दुसरे काय? अहंकार जायचा याचा अर्थ शुद्ध अहम् रहाणे.

***प्रश्न : महाराज, "वीतरागविषयम् वा चित्तम" या सूत्राचा अर्थ काय?***

उत्तर : भक्ताने साक्षात्कारी संतांच्या चरित्राचे वाचन व मनन केले तर त्याचे चित्त स्थिर होते. त्याचबरोबर जर गुरूंनी शिष्याचे चित्त स्थिर व्हावे असा संकल्प केला तर त्यामुळेही शिष्याचे चित्त स्थिर होईल. अर्जुनाला विश्वरूपदर्शन व्हावे असा संकल्प भगवान् श्रीकृष्णांनी केला आणि तो संकल्प करताच अर्जुनाला विश्वरूपदर्शन झाले. भगवान श्रीकृष्णांनी संकल्प केला त्यामुळे ते घडले.

***प्रश्न : महाराज, शरणागत भावनेने एखाद्या भक्ताने आपल्यासारख्या साक्षात्कारी संतांची प्रार्थना केली तर त्या भक्ताचे चित्त स्थिर होईल काय?***

उत्तर : ईश्वरच साक्षात्कारी संतांच्या रूपाने कार्य करतो आहे. ईश्वराचे साह्य चालू आहे.

***प्रश्न : महाराज, गुरू हा देहधारीच असला पाहिजे काय? का ज्या गुरूने देह ठेवलेला आहे असा गुरूसुद्धा शिष्याला आध्यात्मिक मार्गदर्शन व साह्य करू शकेल?***

उत्तर : सान्निध्य व संगती मिळालेली असली म्हणजे झाले. देह

ठेवलेला असला म्हणून काय झाले! आपल्या मनांत सद्‌गुरूंबद्दल विचार आहेतच.

***प्रश्न : महाराज, ज्ञानेश्वरमहाराज, गुळवणीमहाराज हे आजही साह्य करतात काय?***

उत्तर : होय ते आजही साह्य करतात. ते ईश्वररूप झालेले आहेत. ते मुक्त झालेले आहेत. ईश्वरच त्यांच्या रूपाने कार्य करतो.

***प्रश्न : श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी गुरूंच्या सेवेला खूपच महत्त्व दिलेले आहे. आम्ही गुरूंची सेवा कशी करायची? त्यांचे पाय दाबायचे का त्यांच्या घरची कामे करायची? कां मनाने त्यांचे स्मरण व चिंतन करायचे? का शरणागत भावना ठेवायची?***

उत्तर : सेवेचा अर्थ वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांनी सांगितला आहे. ते म्हणतात सेवा स्मृतिः । सद्‌गुरूंचे स्मरण रहावे यालाच सेवा म्हणतात.

पूजा म्हणजे भोज्य पदार्थ जे आहेत ते सद्‌गुरूंना निवेदन करणे. हे सर्व ईश्वराचे आहे, सद्‌गुरूंचे आहे अशी भावना करणे. म्हणजे अहंकार कमी झालाच. त्याशिवाय होत नाही. यालाच खरी पूजा म्हणता येईल.

गुरूंचे नामस्मरण करणे ही गुरूची शिष्याने केलेली सेवा असे म्हणता येईल.

***प्रश्न : महाराज, हे विश्वचि माझे घर । ऐसि मति जयाची स्थिर । किंबहुना चराचर आपण जाहला । या ओवीचा अर्थ काय?***

उत्तर : अहंकार म्हणजे संकुचित अहंकार नसून मोठा अहंकार आहे. एका घरातले किंवा आप्तसंबंधी तेवढेच माझे आहेत. माझ्याबरोबर अनुकूल वागणारे तेवढेच माझे आहेत असे वाटणे ही ममता हा दोष आहे. सर्व भूतांच्या ठिकाणी ममता निर्माण होणे हे मोठे आहे. व्यापक झाला तो. त्याला आसक्ती म्हणता येत नाही. सर्वत्र ममत्वबुद्धी निर्माण होणे असं ते आहे.

माझं म्हणणे ही ममता झाली. पण त्याच्याही पुढे जाऊन सकलमिदमहंच वासुदेवः ही भूमिका येते ती या ओवीत अभिप्रेत आहे. मीही गेलो. सर्वही गेले. त्या वासुदेवाशिवाय काहीही उरले नाही. ईशावास्यमिदं सर्वं यत्किंचजगत्यांजगत् । ही शेवटची भूमिका आहे. सकलमिदं च अहं वासुदेवः हीच ती भूमिका आहे.

***प्रश्न : महाराज, शारीरिक आसने, वज्रासन, पद्मासन वगैरे यामुळे चित्त स्थिर व्हायला मदत होते काय? मनोभूमिकेवर त्या आसनांचा परिणाम होतो काय?***

उत्तर : आसन हाही एक योगच आहे. त्यामुळे चित्त स्थिर व्हायला मदत होऊ शकते. प्राणायामाच्यापूर्वी आसनबंध करतात.

***प्रश्न : महाराज, "कर्मे इशू भजावा" ही ज्ञानेश्वरमहाराजांची शिकवण आम्ही आचरणात कशी आणावी?***

उत्तर : कर्तृत्व ईश्वराचे आहे माझे नाही ही भावना दृढ झाली म्हणजे झाले. करायचे ते ईश्वरार्पण बुद्धीने त्याचेच आहे सगळे. मी कर्ता नाही हे मनांत बाणले पाहिजे. परि मनेवाचादेहे जैसा जो व्यापार होवे । तो मी करीत आहे ऐसे न म्हणे । असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. कर्तृत्व

आपल्याकडे घेऊ नये. आपल्याला जे अनुभव येत असतात त्याच्याकडून आणि आपण जे लोकांचे व्यवहार पाहतो त्यावरून कर्तृत्व आपले आहे कां ईश्वराचे आहे हे आपल्याला कळते. पुष्कळ प्रयत्नांनीही काही वेळा काहीही होत नाही. त्यामुळे कर्तृत्व ईश्वराचेच मानायला काय हरकत आहे? तशी नित्य बुद्धी झाली पाहिजे. कर्म ईश्वराला अर्पण करायचे म्हणजे कर्म ईश्वराला द्यायचे नाही. कर्तृत्व आपले नाही. ईश्वराचे आहे, ही बुद्धी म्हणजे कर्म ईश्वराला अर्पण करणे, हेच शुद्ध कर्म झाले.

***प्रश्न : महाराज, ध्यान पहाटे एकदाच करावे का रात्रीही झोपण्यापूर्वी पुन्हा करावे?***

उत्तर : जेव्हा मनाला वाटेल त्यावेळी ध्यान करावे. अभ्यास अमुक एक वेळेलाच करावा असे काही नाही.

***प्रश्न : महाराज, मन अन्नापासून बनले आहे असे म्हणतात. कोणते अन्न घ्यावे म्हणजे मन सात्त्विक बनेल?***

उत्तर : सात्त्विक अन्न घ्यावे म्हणजे मन सात्त्विक होते. युक्ताहारविहारस्य - कामक्रोध वाढवणारे राजस व तामस आहार कमी करावेत. सात्त्विक आहाराकडे लक्ष असले म्हणजे झाले. आहारशुद्धौ सत्यशुद्धीः सत्त्वशुद्धौ दृढा मतिः।

***प्रश्न : महाराज, कांदा व लसूण सोडावे काय?***

उत्तर : शरीरशास्त्र वेगळे आहे. हे धर्मशास्त्र आहे. कांदा व लसूण शरीरासाठी आवश्यक आहे असे शरीरशास्त्र सांगत असले तरीही धर्मशास्त्रांत वेगळे सांगितले आहे. चित्तशुद्धी व्हावी व मनाची

सात्त्विकता वाढावी म्हणून कांदा व लसूण वर्ज्य केलेच पाहिजे. धर्मशास्त्राच्या दृष्टीने ते नको आहे. कांदा व लसूण आपण खाल्ले नाही तर शरीर राहणार नाही असे शरीरशास्त्रज्ञ सांगतात ती गोष्ट वेगळी आहे. लोक त्यामुळे असे म्हणतात की आम्ही नाईलाजाने कांदा व लसूण खातो.

***प्रश्न : महाराज, मृत्यूनंतर आत्मा पुढे जातो तो बुद्धी व मन बरोबर घेऊन जातो काय?***

उत्तर : आत्मा जाणे येणे असे काहीही नसते. सूक्ष्म शरीर कर्मेंद्रिय, मन बुद्धी पंचप्राण हे सगळे कायम आहे. मृत्यू म्हणजे या भौतिक शरीराचा संबंध सुटणे. पण ते सूक्ष्म शरीर हे आत्म्याच्या बरोबर आहेच. म्हणून बुद्धी घेऊन तो जातो म्हणजे मनुष्यजन्मात बुद्धीवर चांगले संस्कार करता आले तर तशीच पुढच्या जन्मात बुद्धी मिळणार. पुन्हा तो आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रयत्न करीत रहाणार. हा शास्त्रीय बुद्धिवाद आहे. बाकी कांही नाही.

पुनर्जन्म नाही असे मानले तर काही उत्तर देता येत नाही. एका व्यक्तीची बुद्धी इतकी कुशाग्र कां आणि दुसऱ्या व्यक्तीला कितीही शिकवले तरीही कळत का नाही याचे उत्तर देता येत नाही. म्हणून हे आहे. तो संस्कृत बुद्धी मागच्या जन्मांतूनच घेऊन आला आहे म्हणून त्याचा तसा अभ्यास चालू होतो. गजेंद्र आख्यानात हत्तीने ईश्वराची स्तुती केली असे सांगितले आहे. हे काही तरी लिहिले आहे असे कांहीजण म्हणतात. पण हत्ती मागील जन्मांत भक्त होता. त्यामुळे या जन्मी तो हत्ती असूनही त्याची ती बुद्धी कायम राहिली व त्याने

ईश्वराची स्तुती केली हे या शास्त्रीय दृष्टीने उत्तर देता येते. नाहीतर बुद्धिवाद्यांच्या दृष्टीने ते सर्व प्रक्षिप्त आहे असे मानावे लागेल.

***प्रश्न : महाराज, आईनस्टाईनने असे म्हटले आहे की मनाच्या पलीकडे गेले म्हणजे खरे ज्ञान मिळू शकते. त्यालाही ईश्वरशक्ती मान्य आहे असे दिसते.***

उत्तर : शास्त्रज्ञ असे म्हणतात की काहीतरी शक्ती आहे. अणू परमाणू इकडे तिकडे फिरत असतात. पण ते का तसे फिरतात हे कोणी सांगू शकत नाही. त्यांचा चालक कोणीतरी मानावाच लागतो. शास्त्रज्ञ शोध लावतात तो ध्यानाचाच अभ्यास आहे. शास्त्रज्ञ अखंड चिंतन करतात म्हणूनच त्यांना शोध लागतात. नाहीतर शोध कसे लागणार? योगसिद्धीमध्ये हेच सांगितले आहे. जगातल्या कोणत्याही पदार्थाचे शाब्दिक ज्ञान संपादन करून त्याचे जर ध्यान सुरू झाले तर त्या पदार्थाचे प्रत्यक्ष ज्ञान होते. 'त्रयमेकम् संयमः' पातंजल योगसूत्रांत सांगितले आहे. ध्यान धारणा व समाधी या तिन्हींचा अभ्यास एकाचवेळी एकाच वस्तूच्या बाबतीत केला म्हणजे त्याला संयम म्हणतात. त्यामुळे त्याचे पूर्ण ज्ञान होते. शास्त्रज्ञ असा संयम करतात. तसे शास्त्रज्ञ हे योगीच आहेत. त्यांनी एखाद्या गोष्टीचे संशोधन करायचे ठरवले म्हणजे त्यांचे मन बाहेर जातच नाही.

गुरूत्वाकर्षणाचा शोध लावणारा शास्त्रज्ञ न्यूटन याने चहा करतांना घड्याळ चहात टाकले असे म्हणतात. इतका तो तन्मय झाला होता. तन्मय झाल्याशिवाय शोध लागत नाही. शोध लावणे हा योगाचा अभ्यासच आहे. संबंध समजणे हळूहळूच यायचं ही गोष्ट वेगळी.

संपूर्ण ज्ञान हळूहळूच होते हे खरेच आहे. पण पूर्णता प्राप्त होणे वेगळे आहे. माणसाच्या बुद्धीच्या पलीकडे काहीतरी आहे असे मानणे म्हणजे उपनिषदांत ईश्वरशक्तीबद्दल जे सांगितले आहे ते मान्य केल्यासारखेच आले.

***प्रश्न : महाराज, ऑफिसात मला लोकांच्याकडून काम करून घ्यावे लागते. जर मनांतून राग, लोभ वगैरे विकार निघून गेले तर लोकांकडून काम कसं करून घेता येणार?***

उत्तर : रागलोभ जरूर आहे. अतिरेक कोणताही वाईट. व्यवहारापुरते ते पाहिजेतच. रागलोभ जरूर हवेत. कामक्रोध नाहीसे होणे हे पुढचे काम आहे. कामक्रोधाचा आवेग आवरणारा तोही सुखी आहे तोही योगी आहे. समाधी ही अवस्था त्यालाही आहे.

***प्रश्न : महाराज, वाडीला वातावरण आध्यात्मिक शक्तींनी भारलेले आहे.***

उत्तर : तसा ग्राहक पाहिजे म्हणजे अनुभव मिळतो.

***प्रश्न : महाराज, मनांतील सर्व प्रश्नांची उत्तरे आपल्या प्रवचनांत मिळतात. एक अवस्था अशी होते जेथे प्रश्न व उत्तरे संपून जातात. तशी अवस्था फक्त सद्गुरूंच्या दर्शनानेच येते काय?***

(महाराजांनी या प्रश्नाचे कांहीच उत्तर दिले नाही. ते फक्त हसले.)

***प्रश्न : महाराज, साक्षात्कारी पुरुषाला कसे ओळखावे ?***

उत्तर : साक्षात्कारी पुरुषाला ओळखणे अवघड असते. श्रीकृष्ण अवतारी पुरुष होते. तरीसुद्धा भगवान श्रीकृष्णांना त्यांचे वडील ओळखत नव्हते असे म्हणतात. श्रीकृष्ण आपला मुलगाच आहे असे

समजून वसुदेव भगवान श्रीकृष्णांना मुलासारखे वागवीत होते. आपल्या जीवनातील समस्यांबद्दल आणि अध्यात्माबद्दल ऋषींकडून वसुदेव मार्गदर्शन घेत होते. वसुदेव ऋषींना विचारायचे कसे करायचे, काय करायचे, ऋषींना आश्चर्य वाटायचे. प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण घरात असतांना वसुदेव आम्हा ऋषींना का विचारीत आहेत. सान्निध्यामुळे अनादर होतो.

***प्रश्न : महाराज, मनांत विचार येतो वाडीच्या ठिकाणी काही काळ साधन करावे. कांही काळ रहावे.***

उत्तर : क्षेत्रात रहाणे चांगलेच आहे. पण आपली परीक्षा होत आहे असे समजून मानापमानाकडे दुर्लक्ष करून रहावे. वाडी ही पवित्र भूमी आहे. शुचौ देश प्रतिष्ठाप्य असे गीतेत म्हटले आहे तशी ही शुचित्वपूर्ण म्हणजे पवित्र भूमी आहे. संतांच्या येथील वास्तव्यामुळे वाडी येथील वातावरण पवित्र झाले आहे. द्विसाहस्त्रीमध्ये असे सांगितले आहे की वाडी येथे श्रीनरसिंहसरस्वती व इतर अनेक साक्षात्कारी संत राहिले आहेत. त्यामुळे अशा पवित्र ठिकाणी जप, दान, यज्ञ वगैरे साधनांचे फळ इतर स्थानांच्या तुलनेने फार लौकर मिळते. श्रीज्ञानेश्वरमहाराजांसारखी उपास्य देवता योग्य प्रेरणा देते व मार्गदर्शन करते.

***प्रश्न : महाराज, अधून मधून जर साधकाने एकांतवास केला तर त्या साधकाला आध्यात्मिक प्रगतीसाठी उपयोग होईल काय?***

उत्तर : होय. साधकाने मधून मधून एकांतवासात राहिले तर त्याचा

आध्यात्मिक प्रगतीला उपयोग होतो. नृसिंहवाडी येथेही असे एकांतवासात रहाता येईल.

***प्रश्न : महाराज, योगसूत्रकारांनी परमार्थसाधनात प्रयत्नांवर भर दिला आहे. याचा अर्थ असा की केवळ ईश्वरी कृपेने होत नाही. साधकाचे स्वतःचे प्रयत्न हवेतच का?***

उत्तर : योगसूत्रकारांनी ईश्वरप्रणिधानाद्वा असे सूत्र सांगितले आहेच. त्यांचा ईश्वरी कृपेवर विश्वास होताच.

***प्रश्न : महाराज, योगसूत्रकारांनी समाधी साधनात नऊ अंतराय सांगितले आहेत व ते ईश्वरी कृपेने दूर होतात असेही सांगितले आहे. तरीसुद्धा त्यांनी परमार्थसाधनात प्रयत्नांवर एवढा भर का दिला आहे?***

उत्तर : प्रयत्नांवर भर देण्याचे कारण असे आहे की योगशास्त्र हे फार मोठे शास्त्र आहे व लोकांनी परमार्थसाधन करतांना त्या शास्त्राचा उपयोग करून घ्यावा. यासाठी योगसूत्रकारांनी प्रयत्नांवर भर दिला आहे. सांख्य ईश्वराबद्दल काहीही बोललेले नाहीत. त्यामुळे लोक त्यांना निरिश्वरवादी समजतात. वास्तविक सांख्य आस्तिक दर्शन आहे. ईश्वर दयाळू आहे. (आपल्या खिशांत पैसे असतात. परंतु आम्हाला ईश्वराकरिता पैसे खर्च करायचे नसतात म्हणून आम्ही सोयीस्कर पळवाट शोधतो.) पत्र, पुष्प, फल, पाणी हे एवढेच जर आपण ईश्वराला अर्पण केले तर ते चालते असे सांगायला लागतो आम्ही. म्हणजे आम्हाला काही करायचे नसते. खपवून घेतो आम्ही. कांही केले नाही तरी चालते. असे सांगणाऱ्या लोकांना सांख्य

सांगतात तुम्ही आत्मा म्हणून माना. जीवात्म्याने प्रयत्न करावा म्हणून त्यांनी असे म्हटले आहे.

***प्रश्न : म्हणजे महाराज असे कां की प्रपंचात दैववाद मानायचा परंतु परमार्थ मार्गात प्रयत्नवाद मानलाच पाहिजे ?***

उत्तर : पण हा तसला दैववाद नाही आहे. प्रपंचात सुद्धा दैव व प्रयत्न या दोन्हींची सांगड घालायला हवी. दैव म्हणजे पूर्वीचा झालेला प्रयत्न आहे.

पूर्वजन्मकृतंकर्म दैवमित्यभिधीयते । म्हणजे जीवांनी केलेले कर्मच दैवरूपाने आहे. शिवोमतीर्थ स्वामीमहाराजांनी असे म्हटले आहे की परमेश्वरा गुरूपदावर आम्हाला कदापि ठेवू नकोस. गुरूपदावर बसल्यानंतर स्वतःच्या सोयीकडे पहाता येत नाही हे त्यांनी जाहीररित्या सांगितले आहे. केवळ प्रयत्नांवर असे नाही. आपले प्रयत्न दैवी प्रतिबंध असेल तर सफल होत नाहीत. अशी अनेक उदाहरणं आहेत. त्यामुळे दैववादही मानावा लागतो.

***प्रश्न : महाराज, परमार्थातसुद्धा दैववाद आहे काय?***

उत्तर : होय. परमार्थमार्गात सुद्धा दैववाद आहे व प्रयत्नवादही आहे. बहुत सुकृताची जोडी हा दैववादच आहे. नामदेवांचा एक अभंग आहे. त्यात ते म्हणतात आम्ही पुष्कळ प्रयत्न केले तेव्हा आम्हाला पांडुरंग भेटला. मागच्या जन्मांत आम्ही जे कांही केले ते या जन्मात दैवरूपाने आमच्या समोर येते. वास्तविक तो प्रयत्नच आहे. परंतु तो अदृष्ट आहे. मागील जन्मीचा आहे. या जन्मांतच आपण प्रयत्न करतो आहोत असे नाही. मागील जन्मांतही आपण प्रयत्न केलेला आहेच.

आपल्याला या जन्मी त्यांची आठवण नाही एवढेच. केवळ दैववादी होणे फार कठीण आहे. अवधूत पडून रहायचे ना? झाडाखाली पडलेले असायचे. शास्त्रकारांनी हे तर्काने सांगितले आहे की सुख हे दैवाने मिळते. त्यांनी तर्क केला आहे की ''यथा दुःखमयत्नतः ।'' हा मोठा तर्क आहे. दुःखाकरिता आम्ही काहीही प्रयत्न न करता दुःख आम्हाला कसे मिळते तसे सुख प्रयत्न न करतासुद्धा का मिळू नये? इतकी निश्चित अवस्था झाल्याशिवाय दैववाद पूर्णपणे मानता येत नाही. त्यामुळे दैव असले तरी प्रयत्न चालू ठेवावे लागतात. आपली एवढी निश्चित अवस्था नसते म्हणून शास्त्रकारांनी आपल्याला दैववादी व्हायला सांगितलेले नाही. त्यांनी आपल्याला प्रयत्न करायला सांगितलेले आहे. शास्त्रांत विधिनिषेध दिलेले असतात. शास्त्रीय विधिनिषेधादि त्या रूपाने सांगितले आहे ''हे करा ते करा.'' हा सगळा प्रयत्नच शास्त्रकारांनी सांगितला आहे.

***प्रश्न : महाराज, दैवम् चैवात्र पंचमम् असे गीतेत सांगितले आहे त्याचा अर्थ काय?***

उत्तर : दैवम् म्हणजे देवसमुहः असा अर्थ आदी शंकराचार्यांनी केलेला आहे. प्रत्येक इंद्रियाचा संबंध देवाशी आहे असा शास्त्रसिद्धांत आहे. त्यामुळे त्या देवांचीही अनुकूलता असावी लागते हेही कारण आहे. सगळ्या इंद्रियांकडून जी कामे होतात ती त्या देवांमुळे होतात.

***प्रश्न : महाराज, त्या संबंधित देवतेची कृपा झाल्याशिवाय त्या इंद्रियावर आपल्याला नियंत्रण ठेवता येत नाही असे म्हणायचे कां?***

उत्तर : आपल्या इंद्रियांवर आपल्याला नियंत्रण ठेवता येत नाही हे तर खरेच आहे. आपली इंद्रिये जे कर्म करतात त्याला हे कारणही आणि त्या कर्मांना त्या देवतेची संमती असते हेही आहे. त्या संबंधित देवतेची संमती असल्याशिवाय त्या इंद्रियांकडून ते कर्म घडत नाही.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंचे दर्शन हे सुद्धा पूर्वसुकृताचे म्हणजेच पूर्वीच्या प्रयत्नांचे फळ आहे असे मानायचे काय?***

उत्तर : तेवढे मन जर निश्चित झाले असेल तर पूर्वसुकृताचे गुरूंचे दर्शन हे फल आहे असे म्हणता येईल. गोंदवलेकर महाराज तर किती फिरले. पुढे त्यांना सद्गुरू भेटले. ते जेव्हा अक्कलकोटच्या महाराजांकडे गेले होते तेव्हा त्यांनी सांगितले की तुमचे काम माझ्याकडे नाही.

***प्रश्न : महाराज, आपले गुरू ठरलेले असतात. दुसऱ्या गुरूकडे आपण गेलो तर आपले काम होणार नाही असेच म्हणायचे का?***

उत्तर : होय. उद्धवजींचे गुरू भगवान श्रीकृष्ण होते म्हणून उद्धवजींना भगवान श्रीकृष्णांनी ज्ञानाचा उपदेश केला. परंतु विदुरजींचे गुरू मैत्रेय होते, भगवान श्रीकृष्ण नव्हते. म्हणून जेव्हा विदुरजी भगवान श्रीकृष्णांना म्हणाले, तो उपदेश आपण मलाही करावा. भगवंतांनी स्वतः तो उपदेश विदुरजींना केला नाही. ते विदुरजींना म्हणाले, आपण मैत्रेयांकडे जा. मैत्रेय त्यावेळेला होते. गोपाळकृष्णांनी त्यांना सांगून ठेवलेले होते की विदुरजींची भेट झाल्यावर त्यांना हे ज्ञान द्या.

***प्रश्न : महाराज, साक्षात्कारी पुरुषाच्या दर्शनाने मनाला शांती मिळते म्हणतात. ज्यांच्या दर्शनाने शांती मिळेल तेच आपले गुरू आहेत असं समजता येईल कां?***

उत्तर : शास्त्रामध्ये ज्ञानी व भक्त यांची लक्षणे सांगितली आहेत. ती लक्षणे आपण पहावी. साक्षात्कारी पुरुष एकदा वा दोनदा पाहून लक्षात येत नाही. शिष्यांचे शील गुरूने पहायचे. गुरूचे शील शिष्याने पहायचे. पण त्याला काळ जास्त लागतो. गुरूची योग्यता लौकर ओळखू येत नाही. दैव म्हणा किंवा ईश्वराची कृपा असल्याशिवाय गुरूची योग्यता ओळखू येत नाही. सर्व स्थितप्रज्ञाची लक्षणे, भगवद्भक्तीची लक्षणे, गुणातीत पुरुषाची लक्षणे ही सर्व ज्ञानी महात्म्याची लक्षणे आहेत त्याबाबतीत शिष्याने विचार करणे, मनाची तयारी करणे हा देखील प्रयत्नच आहे.

***प्रश्न : महाराज, वैराग्य व अभ्यास यामुळे परमार्थमार्गात पुढे जाता येईल कां?***

उत्तर : योगसूत्रकारांनी या दोन गोष्टी सांगितल्या आहेत. सगळे प्रमोशन मिळवणारे नसतात. (व्यवहारातसुद्धा प्रमोशन मिळवण्यासाठी केले गेलेले प्रयत्न जाणणारा वरचा अधिकारी असतो. त्याच्या शिफारसीप्रमाणे प्रमोशन मिळते. तसे परमार्थमार्गसुद्धा ईश्वर तुमचे प्रयत्न पहात असतो. त्याचप्रमाणे परमार्थमार्गात वैराग्य व अभ्यास हे प्रयत्न म्हणजे साधन आहे. ते प्रयत्न पाहूनच ईश्वर साधकाला पुढे नेतो. म्हणूनच परमार्थमार्गावर पुढे नेणे हे ईश्वराचे काम आहे म्हणतात.

***प्रश्न : महाराज, हे काम सद्गुरूंचे असते असे सांगतात नां?***

उत्तर : सद्गुरू ईश्वररूपच असतात.

***प्रश्न : महाराज, आत्मा आणि ईशजा शक्ती एकच का?***

उत्तर : सध्यातरी दोन वेगळ्या आहेत. त्या दोन्ही एक झाल्या की

जीवभाव संपतो.

***प्रश्न : महाराज, प्रत्येक माणसांत आत्माही असतो व ईश्वरशक्ती असते असे आपण आपल्या पत्रात लिहिले आहे. आत्मा व ईश्वरशक्ती वेगळ्या असतात काय?***

उत्तर : होय. प्रत्येक माणसांत आत्माही असतो व ईशजा शक्तीही असते. सुरुवातीला दोन्ही वेगळ्या असतात. पुढे माणसाची आध्यात्मिक प्रगती होत जाते व एक अवस्था अशी येते, जेथे जीवदशा संपते. त्या ठिकाणी आत्मा व ईश्वरशक्ती एक होतात. मग सारे मिळाले. मग पुन्हा जन्म उरत नाही. तोपर्यंत जन्म येतच राहतात. आध्यात्मिक प्रगती हा जन्मजन्मांतरीचा प्रवास असतो. प्रत्येक जन्मात मनुष्य आध्यात्मिक प्रगतीच्या मार्गावर पुढे पुढे जात असतो. जीवदशा संपली की मग सर्व साधले. मग जन्म उरत नाही.

***प्रश्न : महाराज, अशी प्रार्थना आहे की, हा जन्म शेवटचा व्हावा. याच जन्मात सारे मिळावे. पुन्हा जन्म नको. तसे होईल कां?***

उत्तर : जशी परमेश्वराची कृपा होईल तसे साधेल. बंधन नसले म्हणजे झाले.

***प्रश्न : महाराज, पहाटे उठून मी प्रथम पृथ्वी प्राणायाम करतो. नंतर महत् प्राणायाम करतो. त्यानंतर लगेच ध्यान करतो. प्राणायाम व ध्यान यांत अंतर ठेवावे काय?***

उत्तर : तसे अंतर ठेवायची काही जरुरी नाही. प्राणायामामुळे मन स्थिर व्हायला मदतच होते. त्यामुळे ध्यान चांगले लागायला मदतच होते.

***प्रश्न : महाराज, ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांत ज्ञानदेव सांगतात - कुंडलीनी जागृतीमुळे शरीराचे जडधर्म रहात नाहीत आणि योग्याला अमुक सिद्धी प्राप्त होतात, तो नवीन शरीर धारण करू शकतो. तसा अनुभव कोणी योग्याने आत्तापर्यंत कधी घेतला आहे काय?***

उत्तर : नवीन शरीर धारण करणे हे केवळ संकल्पानेच शक्य आहे. ती एक संकल्पसिद्धी आहे. परंतु योग्याने आध्यात्मिक मार्गावर पुढे पावले टाकतांना ज्या सिद्धी प्राप्त होतात त्या सिद्धींकडे दुर्लक्षच केले पाहिजे.

***प्रश्न : महाराज, पातंजल योगसूत्रांतही अनेक सिद्धींचे तपशीलवार वर्णन केलेले आहे. त्या तशा प्राप्त होतात कां?***

उत्तर : या सिद्धी निश्चितच प्राप्त होतात. पण या सिद्धींचा साधकाने वापर केला तर परमेश्वराजवळ पोहोचायला वेळ लागतो. तेव्हा साधकाने सिद्धींचा वापर कधीही करू नये. त्याने सिद्धींपासून दूरच राहिले पाहिजे.

***प्रश्न : महाराज, आपण तितिक्षा पाहिजे असे एकदा सांगितले होतेत. तितिक्षा म्हणजे काय?***

उत्तर : भगवत्‌गीतेत तितिक्षा आरंभालाच सांगितली आहे. दुसऱ्या अध्यायातील चौदावा श्लोक असा आहे -

मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्णसुखदुःखदाः ।
आगमा पायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ।। २.१४।।

हे अर्जुना, इंद्रियांचे विषयांशी जे संग होतात ते शीत उष्ण व सुखदुःख देणारे असतात. ते उत्पत्ती व विनाश यांनी युक्त असल्यामुळे अनित्य आहेत. म्हणून तू ते सहन करणे.

या श्लोकावर टीका करतांना ज्ञानदेव सांगतात इंद्रिये विषयाचे सेवन करतात. त्यामुळे सुखदुःखे उत्पन्न होतात. कधी सुखं तरी संसर्गाने कधी दुःख प्राप्त होते. निंदा व स्तुती हे नुसते शब्द आहेत. हे शब्द कानाने ऐकले की द्वेष किंवा प्रेम उत्पन्न होते. मृदु व कठीण असे दोन प्रकारचे स्पर्श असतात. त्या स्पर्शामुळे संतोष तरी उत्पन्न होतो किंवा खेद तरी उत्पन्न होतो. भयंकर व सुरेख अशी दोन प्रकारची रूपे असतात. ती डोळ्यांनी पाहिली म्हणजे सुख किंवा दुःख होते. सुगंध व दुर्गंध असे गंधाचे दोन प्रकार असतात. नाकाने गंध घेतला म्हणजे हर्ष किंवा विषाद प्राप्त होतो. कडू किंवा गोड अशा दोन प्रकारच्या चवी असतात. जीभेने अशी चव घेतली की प्रेम तरी वाटते किंवा कंटाळा तरी येतो. अशाप्रकारे विषयांचा संग झाला की आपल्याला आपल्या खऱ्या स्वरूपाचा विसर पडतो. आपण जेव्हा इंद्रियांच्या अशा प्रकारे स्वाधीन होतो तेव्हा शीत व उष्ण अशा द्वंद्वांचा अनुभव होतो. त्यामुळे आपण सुख किंवा दुःख भोगतो. या विषयांसारखे आपल्याला सुख देणारे या जगात काहीच नाही असे इंद्रिये आपल्याला भासवतात. पण वस्तुतः तसे नसते. विषय मृगजळाप्रमाणे आभासच असतात. स्वप्नात पाहिलेला हत्ती हा केवळ भासमयच असतो. तसे विषय हे क्षणभंगूर आहेत. म्हणून विषयांचा त्याग करावा, या विषयांचा संग धरू नये असे ज्ञानदेवांनी सांगितले आहे.

विषय म्हणजे जग अनित्य आहे. काल्पनिक आहे. म्हणून ब्रह्मज्ञान होऊन जग मिथ्या आहे असे ज्ञान दृढ होईपर्यंत प्रारब्धानुसार विषयाच्या संगामुळे जे सुख व दुःख होते ते सहन केले पाहिजे. यालाच तितिक्षा म्हणतात.

केवळ प्रयत्न करून भागत नाही. प्रारब्धाप्रमाणे जे कांही दुःख प्राप्त होतं ते थोडं सहनही करायचं.नैसर्गिक आहे ते. घरात म्हणा, किंवा बाहेर म्हणा कोणी काही म्हटलं तर उत्तर दिलंच पाहिजे असे नाही. सहन करायचे. इंद्रियांना थोडं शांत ठेवलं पाहिजे. थोडं सहनही करायचं.

***प्रश्न : महाराज, म्हणजे स्थितप्रज्ञ होण्याचा प्रयत्न करायचा कां?***

उत्तर : होय. त्याशिवाय काय आहे? संयमाशिवाय काही होत नाही.

***प्रश्न : महाराज, आपली बाजू लगेच मांडली पाहिजे असे नाही. गप्प बसावे थोडे सहन करावे असेच कां?***

उत्तर : होय. सौम्य शब्दांत सांगायचे. शांत रहायचं नि इंद्रियांना अनावर करून मांडायचं त्यापेक्षा सौम्य शब्दांत मांडायचे. कामक्रोध अजिबात गेले पाहिजेत. यापेक्षा त्यांचा आवेग आवरता आला पाहिजे.

***प्रश्न : महाराज, गुणातीत होण्यासाठी काय केले पाहिजे ?***

उत्तर : रजोगुण व तमोगुण कमी कमी करत गेले म्हणजे गुणातीत अवस्था प्राप्त होते. सात्त्विक अभिमानही नाहीसा होणं महत्त्वाचे आहे. सात्त्विक अभिमान तरी कशाला हवा? अमुक एक झालंच पाहिजे असा आग्रह तरी कशाला हवा? जे होते ते होऊ द्यावे. कुटुंबात

वावरतांनाही असेच वागावे व बाहेर वावरतांनाही असेच वागावे. हाही प्रश्न आहे. अग्निमध्ये जर आपण गवत किंवा इतर इंधन टाकत राहिलो तर अग्नी भडकत जाईल. पण इंधन टाकण्याचे थांबवले तर अग्नी शांत होईल.

***प्रश्न : महाराज, आपण चांगले तर व्हायला पाहिजे ना?***

उत्तर : होय. भक्तीने सारे सोपे बनते. भक्ती असली म्हणजे ईश्वरच सर्व करून घेतो. भक्तीमुळे सर्व प्रतिबंध दूर होतात. भक्तीमुळे ईश्वरावर सर्व जबाबदारी येते. भक्तीमुळे भक्ताचे सर्वप्रकारे कल्याण करण्याची जबाबदारी ईश्वरच घेतो. भक्ती केली की भक्ताला सारे सोपे होते. सर्व संतांनी तोच मार्ग पत्करला आहे.

***प्रश्न : महाराज, भक्ती गुरूची करायची का परमेश्वराची करायची?***

उत्तर : गुरू व ईश्वर दोघेही एकच आहेत. शेवटी पर्यवसान दोन्ही एक होण्यामध्ये आहे. गुरूभक्ती तरी वेगळी कशाला मानायची? ईश्वरशक्ती व गुरूशक्ती शेवटी एकच आहे. न्यायखाते वेगळे, पोलिसखाते वेगळे, काम मांडण्याचे खाते वेगळे असे आपल्याला वाटते. परंतु वस्तुतः सर्व शक्ती एकच आहे. या सर्व कर्माच्या मागे एक राजशक्तीच आहे.

***प्रश्न : महाराज, सर्वसामान्य साधकाने ज्ञानाच्या मागे लागू नये, भक्तीमार्गानेच जावे असे कां सांगतात?***

उत्तर : ज्ञानाचा मार्ग वेगळा आहे. ज्ञानाचा मार्ग आचरण्यासाठी पुष्कळच पूर्वतयारी पाहिजे. इंद्रिये जर अनावर होत असतील तर

मिळवलेले ज्ञान तरी कसे टिकणार? इंद्रिये शांत होणे हे ज्ञानाचे कार्य आहे. इंद्रिये शांत झाली तरच ज्ञान झाले असे म्हणायचे म्हणून ज्ञानमार्गाकडे वळण्यासाठी विवेक वैराग्य आणि षट्संपत्ती प्राप्त करून घ्यावी लागते असे सांगतात.

शंकराचार्य स्वामीमहाराज सांगतात, साधकाने षट्संपत्ती प्राप्त करून घेतलीच पाहिजे. ही षट्संपत्ती मिळून शांती हे साधन होते. स्थानाप्रमाणे व कार्याप्रमाणे ही सहा नांवे शांतीलाच दिलेली आहेत. मनांत शांती असेल तर शम, इंद्रियांत शांती असली म्हणजे दम, कर्मात शांती असली म्हणजे उपरती, शरीरांत शांती असेल तेव्हा तितिक्षा, हृदयांत शांती असेल तेव्हा श्रद्धा आणि चित्तांत शांती असेल तेव्हा समाधान. म्हणजे षट्संपत्ती ही शांतीच आहे. अशी शांती ज्याला प्राप्त झाली तोच साधक ब्रह्मज्ञानाचा अधिकारी होऊ शकतो. ही शांती नसेल तर केवळ बुद्धिच्या जोरावर आत्म्याची प्राप्ती होऊ शकत नाही. असे कठोपनिषदांत सांगितले आहे.

***प्रश्न : महाराज, प्राणायाम केल्याने फायदा होईल कां?***

उत्तर : प्राणायामाने मनाला स्थिरता येते. जिज्ञासू बुद्धीने सर्व ग्रहण करून तुम्ही प्राणायाम करता आहात हे चांगलेच आहे.

***प्रश्न : महाराज, श्रीगुरूंची आठवण आपल्या मनात सतत ठेवणे हे महत्त्वाचे आहे का ?***

उत्तर : होय. नामस्मरण करावे. नामस्मरणाने गुरूस्मरण होते. नामस्मरण मुख्य आहे.

***प्रश्न : महाराज, जपापेक्षा नामस्मरण जास्त चांगले का?***

उत्तर : एकच आहे ते. नामस्मरण हा जपयज्ञच आहे.

***प्रश्न : महाराज, संन्यास हा आंतरिक पाहिजे असेच कां?***

उत्तर : सगळ्या वासना जाणे हे आंतरिकच आहे. संसार काय व परमार्थ काय. परमार्थात हे व्हावे ते व्हावे असे नुसते म्हणून होत नसते. प्रयत्न करीत राहणे महत्त्वाचे आहे. राजसिक व तामसिक वासना जेवढ्या जेवढ्या कमी होतील तेवढी मनाची स्थिरता साधेल. मन स्थिर झाल्याशिवाय कोणत्याही साधनांचा उपयोग झाला असे म्हणता येत नाही. नामस्मरणाने पापक्षय होतो तेव्हा नामस्मरण करीत रहाणे चांगले.

***प्रश्न : महाराज, गीता, ज्ञानेश्वरी असं रोज कांही वाचावे कां?***

उत्तर : होय. गीता व ज्ञानेश्वरीसारखे ग्रंथ वाचणे चांगले ना?

***प्रश्न : महाराज, बैठकीला साधक बसतात तेव्हा आपल्याच विचारांकडे तटस्थपणे पहाणे हेच अभिप्रेत आहे कां?***

उत्तर : म्हणजे कर्तृत्व आपले नाही. अंहकार जेवढा जेवढा कमी होत जाईल तितकी जास्त शांती लाभेल. ईश्वरी शक्तीचेच हे सर्व कार्य आहे. केवळ बैठकीपुरते हे नाही. व्यवहारात सुद्धा ईश्वरी शक्तीच कार्य करीत असते. व्यवहारातसुद्धा मत्तः सर्वम् प्रवर्तते असे म्हणतात. आपल्याला अनेक गोष्टींचा अभिमान असतो. कुळाचा अभिमान, धनाचा अभिमान,शिक्षणाचा अभिमान, तपाचा अभिमान, नोकरीच्या पदाचा अभिमान, रूपाचा अभिमान, कर्तबगारीचा अभिमान, हातून घडलेल्या कर्माचा अभिमान. हा अभिमान गेला पाहिजे. गुरूवाक्य

आणि वेदवाक्यावरील श्रद्धेनेच हा अभिमान जातो. म्हणूनच श्रुती म्हणतात श्रद्धा हीच संपत्ती आहे. श्रद्धावित्तो भूत्वा। अभिमानापासून वैराग्य म्हणजे श्रद्धा. हे सर्व पटणे व बुद्धी त्याप्रमाणे होणे याला वेळ लागतो. त्याकरिता बैठक आहे.

***प्रश्न : महाराज,साक्षी स्वरूपाचे ध्यान करायचे म्हणजे आपल्या विचारांकडे तटस्थपणे पहात रहायचे कां?***

उत्तर : साक्षीभावाने रहायचे. म्हणजे आपल्यावर काही नाही. कर्मही नाही व अकर्मही नाही. कर्म करायचे नाही हाही एक अहंकार झाला. मनात विचार येतात व जातात. आपण साक्षीभावाने त्या विचारांकडे पहात रहायचे. त्या मनाचं साक्षीभावाने अवलोकन होणे हा ध्यानाचा जास्तीत जास्त अभ्यास आहे. साक्षी स्वरूपाचे ते चिंतन आहे.

***प्रश्न : महाराज, ब्रह्म सत्यं जगत् मिथ्या हा विचार जर सतत मनात ठेवला तर प्रगती होईल कां?***

उत्तर : पण ते कसे करणार? विचार मनांत ठेवायचा काय ?

***प्रश्न : महाराज, हे सर्व माया आहे, हे सर्व खोटे आहे असे सारखे मनाला बजावीत रहायचे.***

उत्तर : हे नुसते शाब्दिक झाले. त्याचा परिणाम म्हणून मनांत कोणतेही विकार उत्पन्न होऊन उपयोग नाही. नाहीतर ते नुसते शाब्दिक होईल. नुसते मिथ्या आहे खोटे आहे असे म्हणून उपयोग नाही. खोटे आहे असे म्हटल्यावर राग कशाला यायला पाहिजे. त्याचा परिणाम दिसला पाहिजे. तर ते खरे चिंतन झाले. त्याप्रमाणे इंद्रियांवर व मनावर परिणाम झाला पाहिजे. त्याकरिता ईश्वराची उपासना आहे. मनांतले

सर्व दोष दूर होणे आणि मी खरोखरच साक्षी आहे, कोणत्याही विकाराशी माझा संबंध नाही हे स्वरूप समजून येणे ही ईश्वराची कृपा आहे.

योगसूत्रकार सांगतात - ततः प्रत्यक्चेतनाधिगमोऽप्यन्तरायाभाश्च। साधनेत जे अडथळे निर्माण होतात ते केवळ ईश्वरकृपेनेच दूर होतात. सगळे अंतराय त्यामुळे जातात. पुरे झाले आता किती विचार करून बघायचे. आपल्याला काय ते कळले आहे. असा विचार मनात आला म्हणजे सर्व ब्रह्मच झाले की. प्रयत्न करीत राहिले की सर्व प्रतिबंध जातात. शुद्ध अहं कोण आहे याचा त्यानंतर अनुभव येतो. तोपर्यंत ईश्वरकृपा झालेली नाही असेच म्हटले पाहिजे. लौकिक, व्यावहारिक गोष्टी अनुकूल होणे वेगळे. हे खालचे आहे. पण मी कोण आहे हे समजून येणं हीच खरी ईश्वराची कृपा आहे. त्याकरिता ईश्वराची उपासना केली पाहिजे.

***प्रश्न : महाराज, मनोनाश होणे म्हणजे काय?***

उत्तर : मनोनाश होणे म्हणजे मन निर्वासिन होणे. सर्वच वासना संपणे. मनांत वासना असून उपयोग नाही. मन आहे याचा अर्थ अनंत वासनात्मक मन आहे. मनात वासना येणे कधी थांबलंय, कधी संपलंय असे होतच नाही. त्यामुळे वासना शांत होणे, मन निर्वासिन होणे म्हणजे मनोनाश झाला.

***प्रश्न : महाराज, मनोनाश नामस्मरणानेच होईल कां?***

उत्तर : ईश्वराच्या कृपेने होईल. नामस्मरण हे पापक्षयाचे साधन आहे. पापक्षय जेवढा होईल तेवढी मनाची स्थिरता होईल. पापामुळे हे सर्व

होते. अनंत वासनात्मक मन पापामुळे बनते. राजस वासना, तामस वासना असे वासनांचे प्रकार असतात.

***प्रश्न : महाराज, कोणी निंदा केली तर पापक्षय झाला म्हणून आपण आनंद मानायचा ना?***

उत्तर : होय. तितिक्षा शब्दाचा अर्थच तो आहे. निंदा झाल्यावर मी तसा नाही मी चांगला आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे तितिक्षा नव्हे. गप्प बसले पाहिजे. सहन केले पाहिजे. शेवटी सगळे शब्दात्मक आहे. स्तुती हाही शब्दच आहे व निंदा हाही शब्दच आहे. शब्द काय शरीरांत जातो? शब्दांचा व शरीराचा काही संबंधच नाही. शब्द आकाशांत विरून जातो. त्यादृष्टीने शब्द विनाशीच आहे. आधुनिक शास्त्राच्या दृष्टीने शब्द हे अविनाशी आहेत. परंतु व्यवहाराच्या दृष्टीने विचार केला तर स्तुती काय व निंदा काय सगळे शब्द हवेत विरूनच जातात. स्तुतीचेही शब्द विरून जाणार व निंदेचेही शब्द विरून जाणार. आपण मनावर घेऊन त्याचा काही उपयोग होतो का? हे आपण लक्षात घेतले पाहिजे. अशी जर तितिक्षा साधली तर इंद्रियनिग्रह झालाच.

***प्रश्न : महाराज, कोणाकडून काही अपेक्षा करायच्या नाहीत हे नेमके कसे साधायचे?***

उत्तर : सर्वांना तसे वागता येत नाही. सापेक्ष व्यवहार आहे. व्यवहारात तसे वागता येत नाही. पैसे उसने दिले असतील तर त्या पैशाची अपेक्षा करायची नाही असे कसे चालेल? त्याला पैसे परत आणून दे असे सांगितले पाहिजे. परंतु मन विकृत होता कामा नये. पैसे परत

मिळवायचा हळूहळू प्रयत्न करायचा. मन स्थिर ठेवता आले पाहिजे. तेच मुख्य आहे. योग या शब्दाचा खरा अर्थ तोच आहे. ''परोहि योगो मनसः समाधिः।'' भगवान गोपाळकृष्ण असे सांगतात. मनांत समाधान टिकून राहिले पाहिजे. तोच श्रेष्ठ योग आहे. गोपालकृष्णांचा हा सिद्धांत आहे. अनेक तीर्थयात्रा केल्या. दानधर्म केला. परंतु मनात जर समाधान नसेल तर त्याचा काय उपयोग आहे? आणखी कांही साधना, दानधर्म, तीर्थयात्रा करत नाही. परंतु मन शांत आहे. त्याने सर्व केले. त्याला महत्त्व आहे. विचाराने व ईश्वराच्या नामस्मरणाने ते होऊ शकते.

***प्रश्न : महाराज, अहंकार कसा घालवावा? त्यासाठी काय करावे?***

उत्तर : अहंकार शेवटपर्यंत असतोच. ज्ञानाशिवाय तो जात नाही. विवेक जितका जितका वाढत जाईल तितका अहंकार कमी होतो. देहापेक्षा मी वेगळा आहे असा अभ्यास करून साक्षी स्वरूपापर्यंत पोहोचायचे आहे. त्यामुळेच अहंकारापासून बाजूला होता येईल. मनापेक्षाही मी वेगळा आहे. शरीरापेक्षा मी वेगळा आहे. वेदांतशास्त्राने मन हे सूक्ष्म शरीरात असते असेच मानले आहे. सर्वांपेक्षा मी वेगळा आहे. निर्विकार मी आहे. म्हणजे मी अहंकारापासून बाजूला झालो. ही स्थिती कायम राहिली पाहिजे. साक्षीस्वरूप समजून येते. पण टिकत नाही. म्हणून तो अहंकार येऊन बसतो. त्यामुळे मन व्यवहारात गुंतते व कर्ता मी आहे असे वाटते.

सत्पुरुषांच्या सहवासाने व साक्षात्कारी संतांच्या लिखाणाचं वाचन केल्यामुळे पुष्कळ फायदा होतो. सद्विचारांची जास्तीत जास्त

मनामध्ये वाढ होते. बाकीचे विचार कमी होतात. सत्त्वशुद्धी झाली म्हणजे सगळं कमी होतं.

***प्रश्न : महाराज, मानसपूजा म्हणजे काय?***

उत्तर : समोर मूर्ती असेल तर मूर्तीची मनाने पूजा करता येते. शरीर धारण करणारा परमेश्वर आहे या भूमिकेतून त्याच्या पायापासून मस्तकापर्यंत शरीराचे अवलोकन करणे व पूजेप्रमाणे त्याला देणे घेणे म्हणजे उपचार करणे याला मानसपूजा म्हणतात. आपण जे काही घेतो ते त्यालाही अर्पण करायचे. आपल्याप्रमाणेच तोही आहे. 'यथा देहे तथा देवे.' सूक्ष्मात मन गेले म्हणजे तिथे मी आहे. सारखे अनुसंधान करणे म्हणजेच मी आहे. प्रत्यक्ष द्यायचे काही नाही. सच्चिदानंदरूप मी आहे. निर्विकार मी आहे. सर्वव्यापी मी आहे. असंग मी आहे. हे अनुसंधान सारखे राखणे म्हणजे ती पूजाच आहे.

मी म्हणजे देह नाही. मी म्हणजे आत्मा आहे असे सारखे वाटले पाहिजे. त्याचा अनुभव आला पाहिजे. सारखा निदिध्यास झाला म्हणजे अनुभव येतो. सारखा निदिध्यास व्हायला फार प्रतिबंध असतात. चित्त एकदम दुसरीकडे जाते. त्यामुळे स्थिर ध्यान होत नाही. त्यामुळे साक्षात्कार होत नाही. जितकं मन स्थिर होईल तितकं ते लौकर होतं. मन स्थिर करण्यासाठीच धारणा आहे, ध्यान आहे, समाधी आहे. समाधीच्या नंतर साक्षात्कार आहे. ही मनाची स्थिरता जितकी जितकी वाढत जाईल तितके साक्षात्काराच्या जवळ मन जाते. पापक्षय झाला की मन स्थिर होते. मन स्थिर झाले की आपण

साक्षात्काराच्या जवळ जातो. मग व्यवहारामध्ये मन जातच नाही. सगळं विसरून जातो.

येथ व्युत्पत्ती आघवी विसरीजे। थोरपण परा सांडीजे।
जै जगा धाकुटे होईजे। ते जवळीक माझी। ...ज्ञानदेव सांगताहेत.

अहंकार गेल्याचे ते निदर्शक आहे. सगळं विसरता आले पाहिजे. विचार हे सुद्धा एक साधनच आहे. वाचन काय मनन काय. ही साधनेच आहेत. त्याच्याही पुढे गेले पाहिजे. साधनांच्या पुढे गेल्यावर पुन्हा साधन काय?

***प्रश्न : महाराज, आपल्या चरणांपाशी आल्यापासून मला फारच शांती मिळाली.***

उत्तर : ईश्वरी योगायोग आहेत. प्रपंचात एवढी ऐहिक संपन्नता असूनसुद्धा आपल्यासारखी मंडळी अध्यात्माकडे वळतात. निरहंकार वृत्तीने विचार करणे, ते करताना अभिनिवेश नसणे हे सुद्धा पाहायला मिळत नाही. अभिनिवेश असला म्हणजे विचार नाही, कांही नाही.

चांगलं आहे. आपली साधना चालू आहे. संतवाङ्मयाचा अभ्यास चालू आहे. छान आहे.

***प्रश्न : महाराज, ज्यावेळी कोणी आपली निंदा करतं त्यावेळी मनाची शांती व समाधान कसं टिकवावं? त्यावेळी काय करावे म्हणजे आपलं मन प्रक्षुब्ध होणार नाही?***

उत्तर : ईश्वराची उपासना चालू असली म्हणजे होतं ईश्वराच्या कृपेने ते देहाला उद्देशून बोलताहेत. पण मी देहापेक्षा वेगळा आहे याची मनाला

जाणीव करून दिली म्हणजे मग त्या बोलण्याचं काही वाटत नाही. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक जो सांगितला आहे तो त्याकरिताच आहे.

***प्रश्न : महाराज, कोणी जर आपल्यावर अन्याय करणारे बोलू लागला तर आपण उत्तरच द्यायचं नाही, शांत रहायचं क़ा उत्तर देऊन त्या बोलणाऱ्या व्यक्तींवर घाव घालायचा?***

उत्तर : आपण जर काहीही उत्तर दिले नाही, गप्प बसले, सहन केले, शांत राहिले तर ते अधिक चांगले होईल. उत्तर न देताच अधिक चांगलं काम होतं. ''अतृणेपतितो वन्हिःस्वयमेपोपशाम्यति ।' अग्नीला इंधन घातलं तर तो पेटतो. इंधन घातलंच नाही तर तो शांत होतो. तसं आहे. कोणी काही बोलले तरी आपण काही उत्तर द्यायचे नाही गप्प बसायचं. तितिक्षा हे मोठंच साधन आहे.

***प्रश्न : महाराज, स्थितप्रज्ञ होण्यासाठी काय करावं ? माझी फार इच्छा आहे की आपल्याला स्थितप्रज्ञ होता यावं.***

उत्तर : विवेक वैराग्य ही सगळी साधने सांगितलेली आहेत. विवेक प्राप्त झाला पाहिजे अगोदर. त्याशिवाय स्थितप्रज्ञ कसे होता येईल? आत्मस्वरूपाचं ज्ञान झालं पाहिजे. अनात्म स्वरूपापासून बाजूला झालं पाहिजे.

***प्रश्न : महाराज, अनात्म म्हणजे काय?***

उत्तर : हे देहाचे सगळे भेद आहेत. आत्म्याहून वेगळे असे जेवढे पदार्थ या जगांत आहेत ते अचेतन आहेत. त्या सर्व अचेतन पदार्थांपेक्षा मी वेगळा आहे. मी चेतन आहे, स्वयंप्रकाशी आहे, आनंदरूप आहे.

याचं अनुसंधान जास्तीत जास्त झालं म्हणजे होतं. शाब्दिक ज्ञान असतं. पण प्रत्यक्ष ज्ञान नाही. त्यामुळे त्याला वेळ लागतो.

***प्रश्न : महाराज, कोणी अन्याय केला तरी गप्प बसावं का?***

उत्तर : होय. त्याशिवाय शांती येत नाही. उत्तर देण्यासाठी बुद्धीचा वापर करावा लागतो. बुद्धीचा वापर केला की क्लेश होतात. आपण उत्तर दिल्यानंतर सुद्धा ते थांबेलच असे नाही. विवेकानंदांची एक गोष्ट सांगतात. ते कॉलेजात शिकत होते. त्यावेळी त्यांच्या एका प्रतिस्पर्ध्याने कॉलेजच्या इमारतीतील काचा फोडल्या व विवेकानंदांवर घातले. प्राचार्यांनी विवेकानंदांना ५० रूपये दंड केला. विवेकानंदांनी तो दंड भरून टाकला. विवेकानंदांचे मित्र म्हणाले, तू जर काचा फोडल्याच नाहीस तर तू तसे प्राचार्यांना सांगत का नाहीस. विवेकानंद शांत राहिले. जर मी काचा फोडल्या नाहीत हे सिद्ध करायचं असलं तर बुद्धीचा खूपच वापर करावा लागेल. जाऊ दे. त्यांचं त्यांना काय वाटेल ते वाटेल.

***प्रश्न : महाराज, पहाटे उठून जेव्हा ध्यानाला बसतो तेव्हा शांतीच्या लाटा अंगावर येत आहेत असं कांही वेळा वाटतं.***

उत्तर : पहाटेची वेळ ध्यानाला फार चांगली असते. शिवाय ध्यानाचा एक प्रभाव आहे. ध्यान हे शांती मिळण्यासाठीच आहे. ध्यान करतांना मन जेवढे निर्विचार होईल तेवढी शांती मिळेल.

***प्रश्न : महाराज, ध्यान करतांना मधूनच एखादा क्षण मन निर्विचार होते. पण पुन्हा मनांत विचार येतात. काय करावे?***

उत्तर : अभ्यास चालू आहे. अभ्यास चालू ठेवायचा.

***प्रश्न : महाराज, मनांत विचार येऊ नयेत म्हणून काय करावे?***

उत्तर : विवेक झाला पाहिजे. देहापेक्षा मी जसा वेगळा आहे तसा मनापेक्षाही वेगळा आहे. मन हे एक साधन आहे. बोलणारा, करणारा वेगळा असतो. स्वतः मन ते करीत नाही. डोळे, नाक, कान ही इंद्रिये जशी ज्ञानाची साधने आहेत तसे मन हे एक विचाराचे साधन आहे. त्याचा द्रष्टा मी आहे. मनांत विचार आलेले मला समजतात. मनांत विचार येण्याचे थांबलेलेही मला समजतात. म्हणजे त्या विचारांपेक्षा मी वेगळा आहे, त्या मनापेक्षा मी वेगळा आहे. मनात विचार येतात. येईनात. आले तसे जातील हे कळले म्हणजे कांही वाटत नाही. मनांत विचार आले म्हणून कांही वाटत नाही. विचार गेले म्हणूनही कांही वाटत नाही.

परंतु मन जेवढे निर्विचार होईल तेवढे चांगलं. मन जेवढे निर्विचार होईल तेवढी शांती मिळेल. निर्विचार मन हे शांतीचे स्वरूप आहे. मनाचे समाधान हाच खरा मोठा योग आहे.

***प्रश्न : महाराज, हीच निर्विचार अवस्था कां?***

उत्तर : निर्विचार अवस्था म्हणजे मनाच्या वृत्ती थांबलेल्याच आहेत. केवळ आत्मानंदांतच तो निमग्न आहे. हीच निर्विचार अवस्था. त्यालाच समाधी अवस्था म्हणतात.

***प्रश्न : महाराज, निर्विचार अवस्था सारखी राहू शकते कां ती अवस्था मधूनच येते व मधूनच जाते?***

उत्तर : तो अभ्यास झाला तर सारखी रहायला काय हरकत आहे? निर्विचार अवस्था सारखी राहू शकते. व्याख्यान देताना व्याख्यानाचा

जो विषय आहे तोच विषय व्याख्यान देणाऱ्याच्या मनात येतो. दुसरे काही येतच नाही. असं झालं की व्याख्यानाचा जास्तीत जास्त परिणाम होतो. हे अभ्यासानेच साधतं. निर्विचार अवस्था अभ्यासाने साधते, अध्यासानेच ती कायम राहू शकते. मनाला एकच एक विषय आत्मानंद द्यायचा. त्या आत्मानंदाशिवाय मनाला दुसरा कोणताही विषय नाही, दुसरं काहीही नाही. बाकी सारे विषय बाजूला होतात. संस्कारही मनाचे सगळे बाजूला होतात. त्या संस्काराची आठवणही होत नाही. त्यामुळे मनाच्या वृत्ती शांत होतात.

मनाच्या वृत्ती जितक्या कमी करण्याचा हा जो अभ्यास आहे त्यालाच समाधी असे म्हणतात. मनाचा निरोध करता करता सगळ्या वृत्ती शांत होतात. ती सवय झाली म्हणजे झाले. त्यासाठी ईश्वराचे सहाय्य घेतात हे संतमहात्मे. योगसूत्रकार असं सांगतात की समाधी ईश्वराच्या कृपेने लाभते.

***प्रश्न : महाराज, पातंजल योगसूत्रात क्रियायोग सांगितला आहे- तप, स्वाध्याय व ईश्वरप्रणिधान. या क्रियायोगात सांगितल्याप्रमाणे संसारांत राहून तप करता येईल काय?***

उत्तर : तप म्हणजे काय हे अगोदर समजून घेतले पाहिजे. मनांतल्या वासना कमी कमी होणे हेही तपच आहे. काही काही व्याख्या वेगवेगळ्याही केलेल्या आहेत. उद्धवजींना उपदेश करीत असतांना कंदत्यागः परम् दानम्, कामत्यागः तपस्विधम् असा एक उपदेश केला आहे. कंदत्यागः म्हणजे काय? कंद म्हणजे भूतद्रोहः असे श्रीधर स्वामींनी टीकेमध्ये लिहिले आहे. कोणाही जीवाचा न घडो मत्सर ही

पूजाच आहे. कोणाचाही द्रोह आपल्या मनात न येणे, तितिक्षेच्या द्वारे अजातशत्रू होण्याचा अभ्यास करणे हे दान आहे असे म्हणतात. यालाच दान म्हणायचे. नुसतं पैसा देणं, वस्त्रे देणे हे दान नाही. हे दान आहे.

काम त्यागः आपल्या मनातील इच्छा कमी कमी होत जाणं हेच तप आहे. विचाराने मनांतल्या इच्छा कमी होणे, निरोध करून इच्छा कमी होणे हे साधता येतं त्यासाठीच योगाभ्यास सांगतात. ध्यान व समाधी मनांतील इच्छा कमी करण्यासाठीच आहेत. समाधी, यानाच्या मार्गाने इच्छा व वासना कमी कमी होत गेल्या हे तपच आहे. असे तप केल्यामुळे प्रज्ञा स्थिर होते. बुद्धी स्थिर होते.

***प्रश्न : महाराज, मानसिक तप म्हणजे काय? कोणाबद्दलही आपल्या मनांत वाईट विचार येऊ न देणे कां?***

उत्तर : होय. गीतेमध्ये हे आलेले आहे. भावसंशुद्धी तपोमानस उच्चते.

***प्रश्न : महाराज, ईश्वरप्रणिधान म्हणजे काय?***

उत्तर : ईश्वर प्रणिधान म्हणजे ईश्वराचे अनुसंधान सतत ठेवणे. मनांत सारखे ईश्वराचेच विचार येणं हेच ईश्वरप्रणिधान. यामुळे मन स्थिर होते. ईश्वररूप स्थितप्रज्ञ झालेले जे महात्मे त्यांच्या चरित्र वाचनाने त्यांच्या चरित्र चिंतनानेही मन स्थिर होते. हाही एक स्वतंत्र उपाय सांगितलेला आहे. ''वीतरागविषयं वा चित्तं '' श्रेष्ठ पुरुषांच्या चरित्रांचे चिंतन केल्यामुळे मन शांत होते, मन स्थिर होते. मन स्थिर करण्याचा हा एक चांगला उपाय आहे. तसं ईश्वरप्रणिधान म्हणजे ईश्वराबद्दल प्रेम उत्पन्न झाल्यानंतर सारखी त्याचीच आठवण होते. ईश्वराबद्दल प्रेम उत्पन्न

झाल्यानंतर त्याचे सारखे स्मरण होते. सात्त्विक अष्टभाव जागृत होणं, प्रेमाश्रू येणं हे सगळं आपोआप होतं.

***प्रश्न : महाराज, गृहस्थाश्रमी माणसाला संसार करत असतांना असे ईश्वरप्रणिधान करणे शक्य आहे ना?***

उत्तर : हो. न व्हायला काय झाले? ईश्वरनिष्ठ संतांची चरित्रे वाचल्यानंतर ईश्वराबद्दल आवड निर्माण होते, संसारातील आवड कमी होते. ईश्वराबद्दलची भक्ती वाढायला लागते. इकडची कमी होते. तिकडची वाढायला लागते.

***प्रश्न : महाराज, अशोकमहाराज म्हणाले संसारात अतिथीसारखे राहिले पाहिजे. अतिथीसारखे म्हणजे कसं रहायचं?***

उत्तर : आसक्ती कमी झाली पाहिजे. संसाराबद्दलची जी ममता वाटते ती ममता कमी कमी झाली पाहिजे.

***प्रश्न : महाराज, मुलांवर प्रेम करायचे नाही असे नाही ना?***

उत्तर : तसे नाही. ते कर्तव्यच आहे. मुलांवर प्रेम करायचे. परंतु त्याच्याबद्दल हर्षविषाद उपयोगाचा नाही. मुलाला नोकरी लागल्याबरोबर जो आनंद होतो तो दुसऱ्याला नोकरी लागल्याबरोबर होत नाही. त्याला आसक्ती म्हणतात. मुलाने पात्रता संपादन केली, त्याला नोकरी लागली. दुसऱ्यालाही नोकरी लागली. चांगलं आहे. 'संकल्पावी माया संसाराची' असे तुकाराममहाराज म्हणतात. संसारांतली आसक्ती, ममता कमी कमी झाली पाहिजे.

जोवर आपण गृहस्थाश्रमात आहोत तोवर बायका मुलांवर प्रेम करणे हे आपलं कर्तव्यच आहे. तुकाराममहाराजांनी ऊसाच्या मळ्यात

काम केलं. मळ्याच्या मालकाने ऊसाची एक मोळी दिली. तुकाराममहाराज ती आपल्या डोक्यावर घेऊन आले. वेशीच्या आंत आल्यावर सगळी मुले आली. सर्वांचा विश्वास तुकाराममहाराज आपल्याला ऊस देतील. मुलं एक एक ऊस घ्यायला लागली. एकच ऊस राहिला. तेवढाच घरी घेऊन आले. मुलाला दिला. इतर मुलांनी ऊस मागितल्यावर त्यांना नाही म्हणायचं व सगळे ऊस फक्त आपल्या मुलानाच द्यायचं असे तुकाराममहाराजांनी केलं नाही. याला समचित्त म्हणतात. स्वत:च्या मुलांना प्रतिबंध नाही, तसाच इतर मुलांनाही प्रतिबंध नाही. त्यांनाही ऊस दिले. असं समचित्त साधलं पाहिजे म्हणजे जास्ती आनंद होतो. संसारात राहूनही असा आनंद मिळवता येतो.

संसार म्हटला म्हणजे काही प्रतिकूल व्हायचंच. पण आपलं चित्त असं व्यापक झालं म्हणजे तो आनंद मिळतो. इथं आपलं घर, मुलगा, बायको, आप्तेष्ट एवढीच आपण मानतो. पण चित्ताची समता निर्माण झाली की सर्वच माझं आहे असं वाटायला लागलं. तो व्यापक झाला. हे विश्वचि माझे घर असं वाटलं पाहिजे. अशी भावना होणे हे मोठेच भाग्य आहे. त्यामुळे जास्ती आनंद मिळू शकतो.

**प्रश्न : महाराज, आपण मला गीतेच्या तेराव्या अध्यायातील नववा श्लोक सांगितला होता.**

*असक्तिरनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु । नित्यं च समचित्तत्वमिष्टाऽनिष्टोपपत्तिषु ॥ (भावार्थ : ज्याच्या ठिकाणी सामान्यतः विषयाचे प्रेम नाही व पुत्र, स्त्री घर इत्यादिकांविषयी विशेष प्रेम नाही, जो*

*प्रिय वस्तूची प्राप्ती झाली असता हर्ष न वाटू देता किंवा अप्रिय वस्तूची प्राप्ती झाली असता खिन्न न होता, सदासर्वदा हर्षामर्षरहित चित्त ठेवतो.)*
उत्तर : ही तितिक्षाच आहे. त्याच्यावरची श्रीज्ञानेश्वरमहाराजांची टीका फार चांगली आहे. वाटेवरचा धर्मशाळेत प्रवासी बसतो तसं देहाबद्दल उदासीन राहिलं पाहिजे. रस्त्याने जातांना झाडाखाली सावलीला बसतो. पण ती सावली आपलीच आहे असं कांही आपण मानत नाही. तसं घराबद्दल वाटलं पाहिजे. आपण चालत रहातो. सावलीही तशीच बरोबर येते. पण त्या सावलीची आपल्याला आठवणही नसते. सावलीत आपण आसक्ती ठेवत नाही. तसे बायकोच्या बाबतीत झालं पाहिजे. धर्मशाळेत राहिलं म्हणजे भोवतीचे वाटसरू जसे वाटतात तसं आपल्या संततीबद्दल वाटलं पाहिजे. तसाच साक्षीभाव संपत्तीबद्दल वाटला पाहिजे. पिंजऱ्यांत राघू राहतो तसं वेदाज्ञेला भिऊन संसारात रहावे. घर बायकोमुळे यांच्याबद्दल आसक्ती नसली तरच आत्मज्ञान प्राप्त होते. पाऊस पडला कायं आणि ऊन पडलं काय, समुद्राला ते सारखंच असतं. प्रिय अप्रिय कांही घडलं तरी तसं वाटलं पाहिजे.

सकाळ, दुपार, संध्याकाळ सूर्य एकच असतो, तो कांही बदलत नाही. तसे सुखाचे प्रसंग येवोत किंवा दुःखाचे प्रसंग येवोत, अनुकूल घडो किंवा प्रतिकूल घडो, अंतःकरण तसंच समचित्त राहिलं पाहिजे, चित्ताची समता कमी होता कामा नये किंवा जास्तही होता कामा नये. कोणताही ऋतू आला आणि गेला तरी आकाश हे एकच असते. तसं प्रिय-अप्रिय, हानी-लाभ कांही होवो चित्ताची समता टिकून राहिली पाहिजे. त्यांत फरक पडता कामा नये.

इष्टप्राप्ती होवो किंवा अनिष्टप्राप्ती होवो त्यावेळी समचित्त राहिलं पाहिजे. इष्टप्राप्ती झाल्यावर जास्ती आनंद होणं, अनिष्ट झालं तर विषाद वाटणं हे बरोबर नाही. ''जैसी स्थिती आहे तैशापरी राहे।'' हे साधलं पाहिजे.

***प्रश्न : एकानं असं लिहून ठेवलंय की, निंदा झाली तर वाईट वाटता कामा नये. उलट आनंद वाटला पाहिजे.***

उत्तर : खरं आहे. निंदा झाली की पापक्षय होतो असे म्हणतात. कोणी निंदा केली, नांवे ठेवली तर आपण म्हणावे वा ! छान झाले. पापक्षय झाला. चांगले झाले. परमार्थामध्ये स्तुतीला गौण मानले आहे. कारण स्तुतीमुळे अहंकार वाढतो. निंदेमुळे अहंकार कमी होतो. अहंकार कमी होणे हे परमार्थात प्रगतीचे लक्षण आहे.

***प्रश्न : महाराज, नोकरी करतांना प्रसंगाप्रमाणे रागवावेच लागते. रागावणे टाळले पाहिजे कां?***

उत्तर : नोकरी करणाऱ्या अधिकाऱ्याला प्रसंगाप्रमाणे रागवावे लागतेच. फक्त ज्याच्यावर आपण रागावलो त्याच्याबद्दल मनांत काही कटु भावना नसली म्हणजे झाले. प्रसंग आला म्हणजे रागवावे लागतेच. पण तो राग कायम नाही. तेवढ्यापुरते रागवायचे.

***प्रश्न : महाराज, रागावल्यानंतर त्याची क्षमा मागितली पाहिजे कां?***

उत्तर : क्षमा मागायची काही आवश्यकता नाही. तो राग विसरून गेला म्हणजे झाले. पुन्हा त्याच्याबरोबर प्रेमाने वागायचे. त्यालाही जाणवले

पाहिजे की राग यांच्या मनात राहिलेला नाही. त्याशिवाय काम होत नाही ना ? व्यवहारामध्ये प्रसंगानुसार रागावले तरी चालते.

***प्रश्न : महाराज, गुणातीत व्हायचे म्हणजे काय?***

उत्तर : मनातील सर्व विचार थांबले पाहिजेत. सात्त्विकही उपयोगी नाही. राजसही उपयोगी नाही व तामसही उपयोगी नाही. सगळे कामक्रोधादी विकार मनातून गेले पाहिजेत. सत्त्वाच्याही पलीकडे जायचे आहे. नाहीतर सात्त्विकाचाही अभिमान उत्पन्न होतो. मी चांगला वागतो हा अभिमानही वाईटच. चांगले वागणे वाईट नाही. पण तोही अभिमान कशाला पाहिजे? विसरून गेले पाहिजे. आपल्याकडून चांगले झाले तरीही ते चांगले विसरले पाहिजे. वाईट झाले तरी विसरले पाहिजे, तसे होणे म्हणजे गुणातीत होणे. मानापमानयोस्तुत्यस्तुलयोमित्रासिपक्षयोः । तो विसरून जातो.

***प्रश्न : महाराज, पैशांबद्दल निर्लोभी कसं व्हायचं? मनांतील लोभ कसा काढून टाकायचा?***

उत्तर : आसक्ती सगळीकडचीच कमी झाली पाहिजे. पैशाचीही आसक्ती कमी झाली पाहिजे. आसक्ती कमी व्हायची याचा अर्थ कोणीही पैसे मागायला आला म्हणजे त्याला पैसे देऊन टाकायचे असं नाही. मला हे पाहिजे, मला ते पाहिजे, पैसा वाढला पाहिजे असे वाटता कामा नये. समाधान राहिले पाहिजे. आहे त्यांत समाधानात राहिले पाहिजे. त्यासाठीच दान करायला सांगितलं आहे. इदं न मम असे वाटले पाहिजे. देवाय स्वाहा इंद्राय स्वाहा असे म्हणतात ना? तसं म्हणून दान करायचे. आत्मा वस्तुतः असंग आहे. दान, पुण्य, पाप

यांचा व आत्म्याचा काहीही संबंध नाही. हे माझं आहे, हे माझं अशी जी ममता उत्पन्न होते, ती ममता कमी करण्यासाठी दान आहे. यथाशक्ती दान व त्याग करत राहिले म्हणजे ममता कमी कमी होत जाते. धन हे साधन आहे ही बुद्धी पाहिजे. धन हे साध्य वाटायला लागलं म्हणजे ती आसक्ती झाली. धन हे साधन आहे. साधन म्हणूनच धनाचा उपयोग केला गेला पाहिजे.

***प्रश्न : महाराज, धनाचा फार संचय करायचा नाही कां?***

उत्तर : मुद्दाम धनाचा संचय कोण करतंय? धन मिळाले असता ते टाकून द्यायचे असा त्याचा अर्थ नाही. अनासक्त वृत्ती पाहिजे. जे येईल ते येईल. जे जाईल ते जाईल. जे मिळेल त्याचा योग्य विनियोग केला पाहिजे. तुकाराममहाराज म्हणतात - जोडोनिया धन उत्तम वेव्हारे उदास विचारे खर्च करी ॥

खर्चही त्यांनी करायला सांगितला आहे. औदार्य पाहिजे. मोठं मन पाहिजे. कर्ण उदार म्हणून प्रसिद्ध होता. धर्मराजाच्या राजसूय यज्ञात श्रीकृष्णांची सर्व देखरेख होती. श्रीकृष्णांनी वेगवेगळ्या कामासाठी माणसांची नेमणूक केली. श्रीकृष्णानी दान करण्याच्या कामावर कर्णाची नेमणूक केली. हे पहाण्यासारखे आहे. यज्ञ करणारा धर्मराज. वास्तविक धर्मराजाने दान करायला पाहिजे. त्याच्याकडचा पैसा आहे तो. श्रीकृष्ण म्हणाले, तुला दान जमायचे नाही. पुन्हा अहंकार घेऊन बसशील. मला यज्ञासाठी इतके पैसे मिळाले. इतक्या राजांनी इतके दिले. मी इतके दान करतो. नाही. अहंकारही उपयोग नाही. धन जाणार याबद्दलही खेदही उपयोगाचा नाही. तर ते खरं दान.

***प्रश्न : महाराज, ध्यानामध्ये निर्विचार मन होते. तीच निर्विचार समाधी का? निर्विचार समाधी व निर्विकल्प समाधी एकच का?***

उत्तर : निर्विचार समाधी व निर्विकल्प समाधी एकच. मनाच्या वृत्ती शांत झाल्या म्हणजे समाधीच आहे. ध्यानाची पुढची भूमिका म्हणजे समाधी. जास्ती वेळ स्थिर झालं म्हणजे समाधी. मी ध्यान करतो आहे, माझं ध्यान चाललेले आहे. हे भेद असणं ही ध्यानाची अवस्था आहे. ध्येयाकार मन झालं म्हणजे काही उरत नाही. त्यालाच समाधी म्हणायचं.

***प्रश्न : महाराज, मन निर्विचार होते. पण त्यावेळी मी आहे ही भावना असते. ती भावनाही गेली पाहिजे का?***

उत्तर : समाधी अवस्थेत ध्येय कांही रहात नाही. मनाचा पूर्ण निरोध होतो. मनाच्या सर्व वृत्ती थांबतात. मन ध्येयाकार होणे ही संप्रज्ञात समाधी झाली. ध्येयही शिल्लक राहिले नाही की ती असंप्रज्ञात समाधी. सर्व वृत्ती मनाच्या थांबणे ही समाधीच आहे.

***प्रश्न : महाराज, जिथे काही नाही तोच परमेश्वर असे म्हणणे बरोबर होईल कां?***

उत्तर : काही नाही म्हणजे परमेश्वर असे कसे म्हणता येईल? परमेश्वर आनंदरूप आहे. परमेश्वर भावरूप आहे. परमेश्वर सत् चिद् आनंदरूप आहे. कांही नाही म्हणजे परमेश्वर असे म्हणता येणार नाही. शून्यवाद येईल मग बौद्धांचा! पण बौद्धांना परमेश्वर कळला नाही असे म्हणतात. अस्पर्श्य योग ज्याला म्हणतात कोणताही विषय नाही, परंतु एक आनंद आहे, कायम आहे, तिथं मन राहिलं पाहिजे. मन विषयापासून

बाजूला झालं पाहिजे. कोणतातरी एक आत्मानंद आहे. त्या आत्मानंदात मन स्थिर झालं पाहिजे. कांही नाही म्हणजे आत्मा नाही. परमेश्वर शून्यरूप नाही. परमेश्वर सद्रूप आहे. तोच सगुण आहे. तोच निर्गुण आहे. सकळं तोच आहे. हळूहळू या भूमिका समजून येतात.

***प्रश्न : महाराज, स्वप्नात पुष्कळ संतांची दर्शने होतात.***

उत्तर : स्वप्नात संतांची दर्शने होतात हे पारमार्थिक प्रगतीचे सूचक आहे. आपलं चांगलं चाललं आहे हे त्यावरून दिसून येते. अशी स्वप्ने सूचक असतात.

***प्रश्न : महाराज, क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक करायचा म्हणजे काय करायचे?***

उत्तर : मी देहापेक्षा निराळा आहे, इंद्रियापेक्षा मी वेगळा आहे, बाह्य घरदार प्रपंचापेक्षा मी वेगळा आहे. मी फक्त साक्षी आहे. यालाच अतिथी म्हणतात. अतिथी नुसता प्रेक्षक असतो. बाहेरचा मनुष्य अतिथी असतोच. परंतु घरातल्या माणसाला अतिथी होता येणे फार कठीण आहे. सगळा अधिकार असून काही बोलायचे नाही. तो अभ्यासच होतो. 'निर्ममो निरहंकारः' निर्मम होणे फार कठीण. त्यामुळे गृहस्थाश्रम ही शाळाच आहे. गृहस्थाश्रमात असतांना अनेक प्रसंग आपल्या मनाच्या प्रतिकूल होतात. पण ते सगळं अनुकूल वाटावं असं नारदांनी भागवतात सांगितले आहे. गृहस्थाश्रमी कुटुंबप्रमुखाने सगळ्यांना अनुकूलता दाखवावी. बरं आहे. तुमचंही चांगलं आहे. योग्य आहे. म्हणजे काही आग्रह रहात नाही. त्यांचेही समाधान होते. संसार देवाचा आहे, आपला नाही, असे मनांत बिंबले म्हणजे

संसाराबद्दलची ममता कमी होते. हे ऑफिसमध्ये काम करण्यासारखे आहे. ऑफिसात आपण काम करतो. पण ऑफिसात आपले काहीच नसते, नफानुकसानीची ज़बाबदारीही नसते. तसेच संसारातही राहिले पाहिजे.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंकडे ज्ञान मिळवण्यासाठी जाणाऱ्या शिष्याजवळ कोणते गुण पाहिजेत?***

उत्तर : पहिल्या प्रथम अमानित्व पाहिजे, अभिमान उपयोगाचा नाही. मत्सर उपयोगाचा नाही. कर्तव्यदक्षता पाहिजे. आपली कर्तव्यकर्मे त्याने अत्यंत दक्षतेने केली पाहिजेत. कोणतंही काम करतांना लक्ष दिले पाहिजे. जास्त गडबड उपयोगाची नाही. धर्म, अर्थ आणि काम या त्रिवर्गामध्ये सुद्धा असत्परा जिज्ञासू हा गुण पाहिजे. जिज्ञासू वृत्ती ठेवली पाहिजे. सत्य बोलणारा पाहिजे. असूया वृत्ती नसली पाहिजे. चित्त संसारांतच आसक्त बनले पाहिजे. हे सगळे गुण संपादन करून सद्गुरूंच्याकडून मार्गदर्शन घ्यायचे असते.

स्थूल व सूक्ष्म देहापासून आत्मा वेगळा आहे. तो स्वयंप्रकाश आहे. लाकडाला जाळणारा अग्नी म्हणजे कांही लाकूड नाही. लाकडापेक्षा अग्नी वेगळाच आहे. तसे सर्वही देहांमध्ये रहाणारा प्रकाशरूप आत्मा देहापेक्षा वेगळा आहे. आचार्यांपासून हे सगळे मार्गदर्शन मिळवून त्याप्रमाणे मन आत्मचिंतनात मग्न झाले होते.

***प्रश्न : महाराज, मुक्त पुरुष कसा ओळखावा. तोही सर्वांच्याप्रमाणेच व्यवहार करत असतो. हा मुक्त आहे आणि हा बद्ध आहे हे समजायचे कसे?***

उत्तर : वस्तुतः बद्ध आणि मुक्त हे व्यवहार नाहीच आहेत. आत्मा एकच आहे मग बद्ध कोण? आणि मुक्त कोण? मायेमुळे बंधन आणि मोक्ष हा भेद उत्पन्न झालेला आहे. शोक, मोह, सुख, दुःख हे सगळे त्यामुळे होते, मायेमुळे होते. हा जो संसार उत्पन्न झालेला आहे तो आपल्या वासनांमुळे, अविवेकामुळे. ज्ञान आणि अज्ञान हे दोन पदार्थ आहेत. ज्ञान हे मोक्ष देणारे आहे. अज्ञान हे बंधनांत टाकणारे आहे. जीव हा ईश्वराचाच अंश आहे. जीव आणि ईश्वर वास्तविक एकच आहेत. वेगळे नाहीतच. तरीही जीव हा अज्ञानामुळे बंधनात पडतो, सुखी होतो, दुःखी होतो, हे ज्ञान ज्याने मिळवले तो मुक्त होतो. त्यालाच कळून येते की संसार हा भ्रम आहे. जग ही भ्रांतीच आहे. जग असे कांही नाहीच आहे. एक परमात्माच आहे. हे ज्याने जाणले तो मुक्त झाला. मग तो शरीरांच्या आधारानेच राहिला तरी सगळे साक्षीभावाने पहातो. जो जीव संसारांतच आसक्त असला की सुखदुःख भोगत राहतो. अज्ञानामुळे त्याला सुखं आणि दुःखं होतात. तो बद्ध आहे. पण ज्ञानी माणसाला ही सुखदुःख असे कांही नाहीच. तो नित्य मुक्त आहे. श्रेष्ठ पुरूष तोच आहे. असे मुक्त पुरुष हेच श्रेष्ठ. हेच श्रेष्ठ साधुपुरुष.

## * मोठ्या कौटुंबिक आघातानंतर झालेली संभाषणे -

*(भक्ताच्या कन्येचा बाविसाव्या वर्षी थाटामाटांत विवाह झाला. बाळंतपणासाठी ती माहेरी आली. योग्य वेळेला तिला एका नामवंत प्रसूतीगृहात नेले. अचानकपणे कोणाच्या ध्यानीमनी नसतांनाही अपत्यही मृतावस्थेत जन्मले आणि त्यानंतर भक्ताची कन्याही दोन तासांतच मृत्युमुखी पडली. एका रात्रीतच सर्व खेळ संपला.*

*शेवटी भक्ताच्या कन्येला स्वतःच्या मृत्युची चाहूल लागली असावी. तिने सतत हरीपाठ म्हणणे सुरू केले आणि ती ज्ञानदेवांचा जयजयकार करू लागली. शुद्ध असेपर्यंत सतत लागोपाठ वीस वेळा तिने हरीपाठ म्हटला. बेशुद्धावस्था येऊ लागल्यावरही तिने हरीपाठ म्हणणे सोडले नाही. कोणतीही ओळ केव्हाही म्हणणे सुरू झाले आणि हरीपाठाच्या ओळी ओठावर असतांनाच तिने प्राण सोडला.*

*या आकस्मिक आघाताने भक्त, त्याची पत्नी आणि त्याचा मुलगा कौलमडून पडले. भक्ताची पत्नी तर वेडीपिसीच झाली.*

*भक्त आणि त्यांची पत्नी श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला जेव्हा आले तेव्हा भक्तही अत्यंत विकल अस्वस्थेत होता आणि पत्नीच्या डोळ्यातून तर अश्रुधाराच वहात होत्या. ती श्रीदत्तमहाराजांशी एक शब्दही बोलू शकली नाही. भक्ताने श्रीदत्तमहाराजांना कांही प्रश्न विचारले. त्यावेळी जे संभाषण झाले ते जसेच्या तसे एक शब्दही न वगळता पुढे दिले आहे.)*

***प्रश्न : महाराज, आपण जे म्हणतो देव सगळं करतो ते अशा प्रसंगी कसे काय म्हणावे? माझ्या मुलीला अकाली मृत्यू आला***

***म्हणून मी हा प्रश्न विचारत आहे. एखादा म्हातारा मनुष्य पडला असता तर जगरहाटीप्रमाणे मृत्यू झाला असे समजून मी हा प्रश्न विचारला नसता.***

उत्तर : देव करतो म्हणजे तरी काय? देवावर वैषम्य वगैरे कांही नाही असे म्हणतात. देव निर्दय नाही किंवा विषम वागत नाही असा सिद्धांत आहे. ब्रह्मसूत्रांत असे सांगितले आहे.

***प्रश्न : महाराज, देव निर्दय आहे असे मी म्हणत नाही. परंतु देव करतो ते आपल्या भल्याकरिताच सर्व करतो असे आपण समजतो.***

उत्तर : आपल्या मनाच्या समाधानाकरिता हे विचार आहेत. संतांनी त्यासाठी हे विचार मांडले आहेत. त्याशिवाय समाधान कसे होणार? काय झाले यावर देव सर्व करतो असेच संताचे म्हणणे आहे. देव जे करतो स्वतःच्या इच्छेने करतो असे म्हटले तर ते विषम होईल. एकाला सुखी ठेवायचे, एकाला दुःखी ठेवायचे ही विषमता होईल. ही निर्दयताही होईल. आपल्या इच्छेप्रमाणे देव करीत असेल तर. परंतु देव स्वतःच्या इच्छेने कांहीही करीत नाही. जीवाचे कर्म पाहून त्याप्रमाणे देव कार्य करीत असतो असे संतांनी सांगितले आहे. करण्याची शक्ती देवाची आहे. कर्माचे फळ देण्याची शक्ती आहे. ज्ञानेश्वरीतही हेच विचार सांगितलेले आहेत. ते तुम्ही वाचले असतीलच. त्यात नवीन काय आहे?

***प्रश्न : महाराज, माझ्या मुलीने मृत्यूपूर्वी सतत हरिपाठ म्हटला व श्रीज्ञानेश्वर माऊलीचे नाव घेतले. तिने आईचे किंवा वडिलांचे***

***नाव घेतले नाही. मग श्रीज्ञानेश्वर माऊलीने तिला प्रतिसाद कसा काय दिला नाही?***

उत्तर : देहाच्या दृष्टीने हा विचार.

***प्रश्न : महाराज, म्हणजे काय ?***

उत्तर : जीवात्मा अमर आहे. त्याला मरण नाहीच आहे. श्रीज्ञानेश्वर माऊलीने तिला जवळ घेतली की नाही घेतली हे आत्ता आपण सांगू शकत नाही. या देहाशी ऋणानुबंध असेतोपर्यंत जीवात्म्याचा त्या देहाशी संबंध रहाणार. आपल्यावर मोठा आघात झाला आहे हे खरे आहे. पण ऋणानुंबध होता तोपर्यंत देहाचा संबंध होता. आत्मा किंवा जीवात्मा अमर आहे.

***प्रश्न : महाराज, म्हणजे आपण कर्मविपाक सिद्धांत सांगता आहात काय?***

उत्तर : कर्मविपाक सिद्धांत मानल्याशिवाय अशा घटना कां घडतात याचे उत्तर देता येत नाही. ईश्वराला जर दोष द्यावा असे तुम्हाला वाटत असेल तर ईश्वराला दोष देऊन तुम्हाला स्वस्थ राहता आले पाहिजे. पण घटना होऊन गेल्यावर दोष देऊन तरी काय उपयोग. ईश्वराला दोष देऊन काहीही उपयोग नाही. कर्मविपाक सिद्धांत मानावाच लागतो.

आत्मा अमर आहे हे म्हटल्यानंतर कर्मे आलीच. आत्मा अनादी आहे व अजरामर आहे. अनेक जन्म त्याचे होतात. जीवाचे जे अनेक जन्म होतात त्यापैकी हा एक जन्म आहे. असे जन्म मागेही झालेले आहेत व पुढेही होणार आहेत. जे कर्म हातून घडते त्याचे फळ म्हणून सुख किंवा दुःख हे भोगावेच लागते. ते टाळता येत नाही. आपल्याला

जे सुखदु:ख भोगावे लागले ते आपल्या पूर्वकर्मांचे फळ आहे असं कर्मविपाक सिद्धांतात सांगितले आहे.

***प्रश्न : महाराज, माझी मुलगी चि.स्वराचे या जन्मीचे जे कर्म आहे त्याप्रमाणे तिला पुढचा जन्म मिळेल असेच कां?***

उत्तर : तिचेच केवळ कर्म नव्हे तर कुटुंबातील सर्वांचे कर्म लक्षात घ्यावे लागते. परिवारातल्या लोकांचेही कर्म आहेच की. इतका वियोग होणे व इतके असह्य दु:ख होणे हेही कर्मंच मानले पाहिजे. अशा चांगल्या जीवात्म्याचा संबंध एकदम सुटणे हेही कर्मामुळेच झाले. कर्मविपाक सिद्धांताशिवाय याला दुसरे उत्तर नाही.

***प्रश्न : महाराज, ब्रह्म सत्य व जग मिथ्या आहे असे आद्य शंकराचार्यांनी सांगून ठेवले आहे. जग जर मिथ्या असेल तर मला पित्याचे व तिच्या आईला आईचे एवढे दु:ख कां व्हावे?***

उत्तर : ब्रह्म सत्य जग मिथ्या हे नुसते शाब्दिक झाले. त्यांनी सांगितलेला सिद्धांत शाब्दिक मानून उपयोग नाही. जग हे मिथ्या आहे हे खरेच मानले तर दु:ख होणे शक्य नाही. जन्मापासून तिचा व तुमचा संबंध आहे. त्या संबंधाचे दु:ख होणे साहजिकच आहे. त्या संबंधाला मिथ्या कसे म्हणायचे? शास्त्राचे सिद्धांत व्यवहारापेक्षा वेगळे असतात. व्यवहारामध्ये समाधान करून घेण्याच्या दृष्टीने हे म्हणायचं.

***प्रश्न : महाराज, एखाद्याच्या जीवनांत दु:खे व आघात यांची मालिका दिसते. हाही कर्मविपाक का?***

उत्तर : जीवनांत नुसते दु:ख येत नसते. दु:खाबरोबर काही सुखेही असतातच. जीवनांत नुसती दु:खेच आली व सुख अजिबात आले

नाही तर मनुष्य जिवंतच रहाणार नाही. सुखाचे स्मरण करून दुःखाचे विस्मरण करायचे. दुसरे काय करणार? दुःख कमी व्हायला वेळ लागणारच. साहजिकच आहे. काळ हे एकच औषध आहे. काळ गेल्याशिवाय दुःख कमी होत नाही.

***प्रश्न : महाराज, सुखे व दुःखे ही एकाच कल्पनेची दोन रूपे आहेत असे म्हणायचे कां?***

उत्तर : आध्यात्मिक सुखे व दुःखे मानसिक आहेत. ती काही शारीरिक नाहीत. आपल्या शरीरात बिघाड काय झाला? तुमचे दुःख मानसिक आहे. तुमच्या शरीरात या मानसिक दुःखामुळे काय बिघाड झाला आहे? झोप लागते आहे. तहान लागते आहे. खाणेपिणे चालले आहे. नित्याचे शारीरिक व्यवहार चालूच आहेत. मनावर जो परिणाम झाला आहे तोच मानसिक सुखे व दुःखे देतो आहे. हा परिणाम साहजिकच आहे. आत्मियता एवढी दृढ झालेली असते की वियोगाचे दुःख होतेच. उपयोग काय आता स्मरण करून असा विचार केला पाहिजे. सत्य कटु असले तरी ते मानावेच लागते. सात्त्विक जीवात्म्याला सुख हे लागणारच. जीवनांत काय आणि मृत्यूनंतर काय? आपला संबंध संपला. त्याला कोण करणार?

कर्मविपाक सिद्धांत मानल्याशिवाय या घटनेचे स्पष्टीकरण करताच येणार नाही. आपला संबंध आहे तो संबंध का आला व तो का संपला.

***प्रश्न : महाराज, परमेश्वर निर्गुण व निराकार आहे म्हणून त्याला एखाद्या व्यक्तिबद्दल प्रेम, कृपा व माया नाही असे आपणांस म्हणायचे आहे कां?***

उत्तर : परमेश्वराला जर माया असती तर आमच्यात व त्याच्यात काय फरक राहिला? परमेश्वर असंग आहे. आम्ही सर्व ठिकाणी संग ठेवून आहोत. मुलं, मुली, आत्मीय लोक, मित्र त्यांच्याबद्दल आम्हाला ममत्व वाटते. परमेश्वराला असे कांही नाही. जे जे कांही झाले ते घटना ठरल्या आहेत त्याप्रमाणे झाले. श्रीकृष्णांचे सर्व कुळ एका प्रहरामध्ये संपले. शोक-मोह काही नाही. श्रीकृष्ण असंग होते. तशी त्यांच्या मनाची ठेवण होती. ब्रह्मज्ञानी मनुष्य असंग असू शकतो.

***प्रश्न : महाराज, स्थितप्रज्ञ झाले तर सुखे व दुःखे उरत नाहीत असे म्हणायचे काय?***

उत्तर : स्थिरप्रज्ञ म्हणजे व्यावहारिक दृष्टीने देहाशी संबंध आपण ठेवला आहे. हे नामरूपात्मक प्रतीक आपल्याला दिसते आहे ते आपलं आहे. आपणही देरूपच आहोत अशी समजूत आहे. त्यामुळे आपल्याला असे वाटते की देहाशी आपला संबंध रहावा. साहजिकच आहे ते. स्थितप्रज्ञ हा पारमार्थिक विचार आहे. त्याशिवाय काय करणार? एक जीवात्मा अजरामर आहे हा सिद्धांत म्हटल्यावर त्याचा एक देह गेला. असे कितीतरी देह आतापर्यंत गेले आहेत. तसाच हाही एक देह गेला. आम्हाला तो हवा होता हे बरोबर आहे.पण आमच्या इच्छेवर काहीही अवलंबून नाही. पण देह गेला असला तरी जीवात्मा निश्चितच आहे.

***प्रश्न : महाराज, ईश्वर करतो ते भल्याकरिताच करतो हा विचार बरोबर नाही काय?***

उत्तर : तो विचार फार मोठा आहे. अनेक जन्माची कर्मे आहेत. कोणत्या कर्माचे हे फळ आहे हे कसे समजणार आपल्याला? आपल्या कोणत्या जन्मातील कर्माचे हे भयंकर फळ मिळाले व हा आघात झाला हे समजून काय करायचे आहे. स्वतःच्या हिताकडे लक्ष द्यायचे. दुःख कशाने कमी कमी होईल त्याचे मार्ग कोणते आहेत इकडे लक्ष द्यायचे. हा प्रयत्न करायचा. त्या जीवाचा आपला संबंध संपला हा विचार केल्याशिवाय दुःख कमी होणार नाही. एकत्र जमलेले जीवात्मे म्हणजे संसार आहे. अनेक कर्मफळे असलेले जीवात्मे एकत्र आले की संसार होतो. दुसरं काय? कोणाचा संबंध लौकर संपतो. कोणाचा संबंध जास्ती वेळ टिकून रहातो.

सिद्धांत मानावाच लागतो. जीवात्मा जन्ममरणरहित आहे. देहाला जन्म आहे व मृत्यूही आहे. नवीन देहाचा जीवात्म्याशी संबंध येणे म्हणजे जन्म व देहाचा संबंध सुटणे म्हणजे मृत्यू. देह म्हणजेच आत्मा असे म्हणता येणार नाही.

***प्रश्न : महाराज, माझ्या मनाची समजूत या विचारांनी पटेल परंतु तिच्या आईची समजूत कशी काढायची?***

उत्तर : *(श्रीदत्तमहाराजांनी भक्ताच्या पत्नीकडे दृष्टीक्षेप टाकला. भक्ताच्या पत्नीच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते, तिला उद्देशून ते बोलू लागले.)* - कोठेतरी मनाला गुंतवा. सारखे दुःख करून तरी उपयोग काय? कोठेतरी चांगल्या ठिकाणी मन गुंतवावे. मनाला बरे

वाटेल. तेवढी विस्मृती होईल. हरिपाठ म्हणावा. एकनाथी भागवत वाचावे. हरिवरदा हे संपूर्ण कृष्णचरित्र आहे ते वाचा. संतचरित्रे वाचावीत. या जन्मात जे काही चांगले करीत आहोत ते पुढील जन्मी उपयोगी पडणारच आहे. संतांची चरित्रे वाचून मनाला स्थिरता येते.

***प्रश्न : महाराज, एखाद्याची या जन्मात पापे नसतील पण पूर्व जन्मीची जी पापे असतात ती सद्गुरूंना शरण गेल्यामुळे नाहीशी होत नाहीत काय?***

उत्तर : चांगल्या सद्वर्तनाने बाकीचे दोष जातात ना! पूर्वजन्मीची पापेही जातात. धर्माने वागले म्हणजे पापे जातात. धर्माचरणाने पापक्षय होतो. पण त्याची गणना करूंन काय उपयोग? जे काही पाप हातून होऊन गेले ते धर्माचरणाने गेले असेल किंवा ईश्वरी कृपेने झाले असेल. त्याचे काय मोठे.

***प्रश्न : महाराज, एखाद्या जीवाने आपल्या पुढील जीवनांत आघात किंवा दुःखे येऊ नये म्हणून काय करावे?***

उत्तर : दुःखाचे आघात आले तरी सदाचरण व सद्वर्तन ठेवावे व सुखाचे प्रसंग आले तरी ठेवावे ती बुद्धी देवानेच दिलेली आहे. चांगले वागण्याची बुद्धी शाबूत आहे ही ईश्वराची कृपाच समजायची. संसारात सुखे व दुःखे दोन्हीही असतात. केवळ दुःखेच आहेत असेही म्हणता येणार नाही. सुखाचे प्रसंगही असतात. चाललेच आहे.

***प्रश्न : महाराज, प्राणायामामुळे मनाला स्थिरता येईल का?***

उत्तर : ते आहेच. प्राणायाम चांगला असतो. तो चालूच ठेवावा.

इतरांना धर्मविषयक मार्गदर्शन करण्याने सुद्धा मनाला स्थिरता येऊ शकते.

***प्रश्न : महाराज, आपले सद्वर्तन तसेच चालू ठेवायचे. श्रद्धा तशीच अढळ ठेवायची. आघात झाला म्हणून श्रद्धा डळमळता कामा नये. हे बरोबर आहे ना?***

उत्तर : होय.हे बरोबरच आहे.आपल्या सद्वर्तनाने लोकांना सुखच होते ना? आपल्या मनालाही सद्वर्तनाने समाधानच मिळते. आपण चांगले वागलो त्याचा दुसऱ्यावर काय परिणाम झाला याचा विचार करण्याचे कारण नाही. इतरांना धर्मविषयक मार्गदर्शन करावे. परोपकार करावा. दुसऱ्याची शारीरिक व मानसिक दुःखे दूर करणे हाही प्रयत्न सद्वर्तनच आहे. याचेही फळ आहेच की. नसायला काय झाले?

***प्रश्न : महाराज, गुरूंच्या कृपेने शांती मिळते ना? मग आम्ही दोघेही आपणाला शरण आलो आहोत. आम्हाला शांती द्या ?***

उत्तर : देवावर भार घालायचा. संसार देवाचा आहे असं जर पहिल्यापासून असेल तर दुःख होण्याचे कांही कारण नाही. दुर्योधन सगळंच माझं आहे म्हणून शेवटपर्यंत धरून बसला. भरताने हे माझे नाही हे पहिल्यापासून मानले आणि सांभाळत बसला. मी घेणार नाही असे भरत म्हणाला नाही. त्यामुळे चौदा वर्षे झाल्यावर भरत ते राज्य रामाला देऊ शकला. राज्य गेलं म्हणून भरताला वाईट वाटले नाही. म्हणून रामाला सुद्धा म्हणावं लागलं "माझ्यापेक्षा तुझा त्याग मोठा आहे. मला राज्य मिळालेच नव्हतं. पण तुला तुझ्या आईने राज्य

मिळवून दिले असतांना तू तुला ते राज्य नको आहे असे म्हणालास. हा फरक आहे. असे चांगले चांगले विचार वाचावेत व मनन करावे. त्याचा मनावर चांगला परिणाम होतो. असे विचार केले व संतांची चरित्रे वाचली तर श्रद्धा डळमळत नाही. या विचारांमुळे दुःखाच्या वेळी सुद्धा श्रद्धा अढळच राहील.

आमच्या आई सांगायच्या, आजींना अठरा मुले होऊन गेली. त्यातील एक नऊ वर्षाचाच होऊन गेला. नरसोबाच्या वाडीला गोविंदस्वामी म्हणून सत्पुरुष होऊन गेले. त्यांनी दत्तात्रेयाची उपासना सांगितली. त्यांच्या जवळची दत्ताची मूर्ती आजींना दिली. हा तुमचा मुलगा आहे असे समजा म्हणाले. आमच्या आजींनी व आजोबांनी त्याला कपडे घालायचे, पाळण्यात निजवायचं. दत्तूबाळ म्हणून म्हणायचं. सगळं दत्तूबाळाचेच ते समजायचे. आमच्या देवांत अजूनही ते आहेत. रोज सकाळी आजी देवाकडे जायच्या. पाचशे प्रदक्षिणा घालून यायच्या. सकाळी गेल्यावर बारा वाजता परत यायच्या. घरी कोणीतरी बाई स्वयंपाक करायच्या. स्वामी आणखी कोणीतरी आले, तर मधुकरी वाढायच्या. दमून जायच्या. पण शेवटी फळ मिळाले. दुःखाचे प्रसंग प्रथम आले पण शेवटी सुख मिळाले. पहिली दुःखे होती, पण असे चांगले व वाईट प्रसंग सर्वांवरच येतात. असे अनेक जीव असतात. प्रसंग सर्वांवरच येतात. भीष्माचार्यांनी सर्व पांडवांना विचारले, ''तुम्हाला हे दुःख कां भोगावे लागत आहे? तुमच्या बाजूला काय कमी आहे. हा धर्मराज म्हणजे धर्ममूर्ति आहे. शेवटपर्यंत त्याने धर्म सोडला नाही. भीम म्हणजे शक्तीची मूर्ति आहे. अर्जुनाने

शंकरापासून सर्व अस्त्रविद्या मिळवलेली आहे. आणखी सर्वात मोठी शक्ती म्हणजे तुमचा मित्र कृष्ण आहे. असे असताना तुम्हाला दुःखे का?'' काय याचे उत्तर आहे? कर्मविपाक सिद्धांत मानावाच लागतो. अदृष्ट काय आहे याचा विचार करून काय करायचे आहे. दुःख झालं की गेलं. झालं गेलं सगळं संपलं. तुमचं तुम्ही वागून रहा. भीष्माचार्यांनी सुद्धा शेवटी हेच सांगितले.

***प्रश्न : महाराज, आम्ही दोघे आपल्या चरणी आलो आहोत आम्हांला काही उपासना सांगावी अशी प्रार्थना आहे.***

उत्तर : हरिपाठ चांगला आहे. धुंडीमहाराजांनी त्याचा चांगला अर्थ सांगितला आहे. ज्ञानेश्वमहाराजांवर सुद्धा किती प्रसंग आले. ते घरात जाऊन दार लावून बसले. शेवटी मुक्ताबाईनी त्यांना ताटीचे अभंग म्हणून बाहेर काढले. विसरून गेले पाहिजे. तर जगाचे काम होते. नाहीतर नाही. स्वतः समाधानी असल्याशिवाय दुसऱ्याला काय सांगता येणार? माझा अपमान झाला म्हणून जर ''तुम्ही दुःख करीत बसलात तर काय होईल? ताटी उघडा ज्ञानेश्वरा'' असे अनेक प्रसंग आहेत.

संतांची चरित्रे वाचावीत. पातंजल योगशात्रात सांगितले आहे. ''वीतराग विषयम् वा चित्तम् ।'' महात्मे, ब्रह्मज्ञानी यांच्या चरित्राचे चिंतन केले तरीसुद्धा चित्त स्थिर होते. म्हणून तो उपाय सांगितला आहे. प्राणायाम हाही उपाय आहेच. पण ते सर्वांना साधता येईल असे नाही. सर्वसामान्य माणसाने श्रद्धेने संतांची चरित्रे वाचावीत.

एकनाथी भागवत वाचा. भावार्थ रामायण वाचावे. रामावर किती

आघात झाले. पण ते धीरोदत्त महात्मा होते. ते सांगून आपण प्रयत्न करायचा.

*(श्रीदत्तमहाराजांनी भक्ताच्या पत्नीकडे दृष्टीक्षेप टाकला व पुन्हा भक्ताकडे पाहून ते बोलू लागले.) -*

त्यांच्या चित्ताला सर्व विसरायला वेळ लागणार. ममता आहे. पण काही उपयोग नाही. सारखं स्मरण करून काय होणार? आता त्याचा काही उपयोग आहे काय? तुम्ही ज्ञानेश्वरी वाचा.

*(वरील संभाषण संपल्यानंतर भक्त आणि त्याची पत्नी यांनी श्रीदत्तमहाराजांना नमस्कार केला व ते श्रीदत्तमहाराजांच्या खोलीतून बाहेर आले. सौ.आईसाहेबांना नमस्कार करून ते 'रेणुकानिवास' या श्रीदत्तमहाराजांच्या निवासस्थानांतून बाहेर पडले. बाहेर पडतांना दुःख हलके झाल्यासारखे वाटत होते. दुःखाचा आवेग खूप कमी झाला होता. मनाला शांती मिळाल्यासारखे वाटत होते.)*

*❋ त्यानंतर त्या भक्ताने साधना तीव्र करण्यावर लक्ष केंद्रित केले. श्रीदत्तमहाराजांच्या उपदेशाप्रमाणे उपासना करण्याचा तो जास्तीत जास्त प्रयत्न करू लागला. त्या संदर्भात भक्ताने श्रीदत्तमहाराजांना कांही प्रश्न विचारले, ते पुढे दिले आहेत.*

***प्रश्न : महाराज, श्रीज्ञानदेवमहाराज म्हणतात, "जे जे भेटे भूत ते ते मानीजे भगवंत।" शंकराचार्य अद्वैत सांगतात -सर्व कांही***

***भगवंत आहे असं ज्ञानेश्वरमहाराज सांगतात. मानणे आणि असणे या दोन्हीत फरक नाही का ?***

उत्तर : श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''जे जे भेटे भूत । ते ते मानीजे भगवंत. यात श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा अभिप्राय काय आहे हे समजले पाहिजे. सर्व जे दृश्य आपल्याला दिसतंय त्यालाच भगवंत मानायचे. हाही अर्थ यात दिसतोय. जो आपल्यासमोर आहे तो भगवंताचे स्वरूप आहे, सगळे विश्व त्याचेच रूप आहे असे मानावे. हा सामान्य साधा अर्थ घ्यायला हरकत नाही. सरळ आहे आणि तशीच जर आमची बुद्धी बनली तरी हरकत नाही. म्हणजे बुद्धीचा संकुचितपणा गेला ना! म्हणजे आपल्यापुरते आपल्या परिवारापुरते, आपल्याला अनुकूल असणाऱ्यांपुरते जे माझे म्हणतात, ते सर्वच भगवंतस्वरूप आहे असे मानायचे आहे.

परंतु दुसराही अर्थ त्यात असा दिसतो. जे भूत आहे ते परमात्मा आहे. याचा अर्थ जे दिसलेले आहे ते नाहीसे झाले आणि जे खरे आहे ते दिसायला लागले. ''सकलमिदं अहंच वासुदेवः'' आरंभाला सगळेच वासुदेवरूप आहे. पण ''सकलमिदं आणि अहं'' ही गेल्यानंतर एका वासुदेवाशिवाय दुसरे काहीच नाही. आनंदस्वरूप जगदंबा आहे.

ज्ञानदेव जे सांगताहेत त्यांत आरंभाला आपल्या चित्ताची भूमिका कोणत्या योग्यतेची आहे, त्या दृष्टीने विचार आहे. सर्व कांही भगवंत असे मानायचे. सर्व ठिकाणी परमात्मबुद्धी होणे हे काही वाईट नाही. एक रूप असलेला परमात्मा विविधरूप झाला आहे. भगवंताला इच्छा

झाली आपण अनेकरूप व्हावं. त्याचा संकल्प झाल्यावर हे सगळे विश्व निर्माण झाले असे उपनिषदांत येते.

आमच्या समोर विविधता आहे. अनेक जन्म आमची बुद्धी त्या अनेकत्वामध्ये गुंतून पडलेली आहे. सर्वत्र एक परमात्मा आहे ही कल्पनासुद्धा मनाला नाही. म्हणून अद्वैत ज्ञान पटत नाही आम्हाला. द्वैत इतके डोळ्यासमोर असतांना शंकराचार्य अद्वैत कसे म्हणतात असे आम्हाला वाटते. म्हणून ज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितले हे सर्वही परमात्मा आहे असे माना. हे एवढे समजते हे खरे ज्ञान आहे. ते एकाचेच अनेकत्व झालेले आहे. तेही काही खोटे नाही.

बुद्धीची परिपक्वता जशी जशी होत जाईल तसे तसे कळेल की, तो परमात्मा अविद्या आवरणामध्ये सापडलेला आहे. आवरण असेपर्यंत जग भासते आहे. तोही त्याचाच संकल्प आहे. परंतु जग ही बुद्धी जाते आणि खरी बुद्धी निर्माण होते. सर्वही ब्रह्मरूप आहे. जे जे आपल्या डोळ्याला दिसतेय, मनाला समजतेय तोपर्यंत हेच ब्रह्म आहे. सर्व संस्कार गेल्यावर काय? समोर दृष्टीला दिसणाऱ्या दृश्याचे सगळे संस्कार मनातून गेल्यानंतर फक्त आनंद आहे. दुसरे कांही नाही. ''सच्चिदानंद'', ''ब्रह्मास्मि'' अशा दोन्ही भूमिका आहेत ना? दोन्ही भूमिकांमध्ये ज्ञान आहे.

व्यवहारदशेमध्ये असणाऱ्या साधकांना ज्ञानदेवांनी सांगितले आहे की सर्वकांही भगवंत आहे असे मानावे हेही खरे आहे. ही भूमिकाही पक्की व्हायला पाहिजे. सर्वांच्याबद्दल परमात्मा बुद्धी पाहिजे. हे असू शकते. परंतु सर्व पदार्थांचा आत्मा हे खरे स्वरूप आहे. शंकराचार्य

स्वामीमहाराजांनी ते सांगितले. अद्वैत बुद्धी म्हणजे सर्व कांही ब्रह्मच आहे ही बुद्धी आहे. म्हणजे अनेकता नाहीच आहे. मनुष्याला जसा जसा बोध होईल तसे पुढे न्यायचे. एकदम सगळा ग्रास होऊन जातो असे सांगून कसे होईल? पटेल का कोणाला? परंतु सर्व जे दिसतंय ते ब्रह्म आहे. सर्वत्र समबुद्धी ठेवा असे श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात. मनातल्या वाईट वासना, राग द्वेषादिक विचार जाण्याकरता हा प्रयत्न आहे. हे विकार पूर्णपणे मनातून नाहीसे झाले म्हणजे मन शांत होते. निर्वासन होते. शुभ वासनाही नाहीत. अशुभ वासनाही नाहीत. अशा स्थितीमध्ये "सर्वं खलु इदं" गेलेच सर्व. केवळ ब्रह्म उरले. मग सकलंमिदं अहं च वासुदेवः हा अनुभव येतो.

श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात तेही बरोबर आहे. श्रीशंकराचार्य सांगतात तेही बरोबर आहे. कोणीही चुकलेले नाही. आम्हीच चुकलेलो आहोत. आमचीच चूक सुधारून दोघांचा समन्वय कसा साधता येईल हे पहाणे आमचे कर्तव्य आहे. बुद्धीला प्रेरणा करणारी जी भगवत्‌शक्ती आहे, तिची उपासना व्हायला पाहिजे म्हणजे बुद्धीतील दोष निघून जातात आणि सर्व समजून येते. म्हणून परमात्म्याची सेवा उपासना सांगताहेत.

***प्रश्न : महाराज, "सुखेदुःखे समे कृत्वा" याचा अर्थ काय?***

उत्तर : "सुखेदुःखे समे कृत्वा" याचा अर्थ दुःखाच्यावेळी सुद्धा सुख मानायचे असा नाही आणि सुखाच्या वेळी मी दुःखात आहे असे दाखवायचे असाही नाही. सम याचा अर्थ असा आहे की सुख मिळालंय आज. पण त्या सुखांत आनंद मानून उपयोग नाही. हे सुख

जाणार आहे. टिकाऊ नाही. सुख अनित्य आहे. सुख मिळाले म्हणजे अहंकारादिक विकार वाढणार. ते वाढले म्हणजे रागद्वेष वाढणार. ते सुख टिकवण्यासाठी पुन्हा प्रयत्न करायचा. प्रयत्न करुनही सुख जाणारच. ज्याला उत्पत्ती आहे त्याचा नाश केव्हातरी होणारच.

दुःखाचेही तसेच. दुःखाच्या वेळी उद्वेग वाटून उपयोग काय? दुःखही जाणारे आहे. सुख हे जाणारे आहे याची जाणीव असल्यामुळे त्याच्या ठायी इच्छा उत्पन्न होत नाही. तसेच दुःख आल्यावरसुद्धा हे टिकणार नाही या जाणिवेने त्याचा मनावर काहीही परिणाम होत नाही. मग काय करायचे? फक्त परमेश्वराचे स्मरण करायचे. चिंतन करायचे. ती सवय मनाला लावायची आहे. भगवंताची भक्ती अधिकाधिक वाढली पाहिजे. तिकडे प्रेम वाढत गेले पाहिजे. सुखं काय नि दुःखं काय? दोन्ही जाणारेच. दोन्ही अनित्यच. भगवंताची भक्ती वाढत जाणे महत्त्वाचे.

***प्रश्न : महाराज, पण दुःखे येतातच का? भगवंत भक्तांची दुःखे टाळू शकत नाही कां?***

उत्तर : दुःख आले असता जर परमेश्वराचे स्मरण घडत असेल तर ते दुःख राहिले तर काय हरकत आहे? दुःखात जर परमेश्वराचे प्रेम अधिक वाढत असेल, दुःखात जर परमेश्वराचे स्मरण अधिक घडत असेल तर दुःखही रहावे, नव्हे वाढावे म्हणतात. सुखही जाणारे आणि दुःखही जाणारे. पण ईश्वर स्मरण अखंड राहिले पाहिजे. ईश्वरस्मरणामुळे सद्गुणांची वृद्धी होते. ज्ञान, वैराग्य चित्तशुद्धी हे अनंत गुण ईश्वरस्मरणानेच येतात. म्हणून ते स्मरण अखंड रहावे यासाठी

त्यांचा प्रयत्न चाललाय. दुःख आले तरी ते दुःख दूर करण्याचा प्रयत्न नाही. सुख मिळाले तरीसुद्धा ते सुख टिकवण्याचा प्रयत्न नाही, कांही नाही. ईश्वरस्मरण अखंड रहावे याकरिता प्रयत्न आहे. तो जास्त महत्त्वाचा आहे. हा एक बुद्धीचा प्रकार आहे. अशी बुद्धी असणारी मंडळी आजही आहेत. त्यांचे कर्माचरण या बुद्धीने चालले आहे. जर दुःखे ईश्वराचे स्मरण ठेवायला सहाय्यकारी होणार असतील तर ती त्याला ईश्वराकडे न्यायलाच आली आहेत असे का वाटू नये? दुःखे जर ईश्वराकडे नेत असतील तर ती दुःखे द्यायला कारणीभूत असलेल्यांबद्दल आदरभावच वाटला पाहिजे. त्यांच्यामुळेच आम्ही ईश्वराच्या जवळ आलो. त्यामुळेच ईश्वराचे स्मरण राहिले आणि ईश्वराची भक्ती वाढत गेली.

***प्रश्न : पण महाराज, सद्गुरू दुःखे का दूर करीत नाहीत ?***

उत्तर : प्राक्तन आहे. भोगलेच पाहिजे. भोगून संपवायचे. काही नामस्मरणाने संपवायचे. प्रार्थना करायची. तळमळ वाटली पाहिजे. ऋषी महात्मे धर्माचरण करीत असतात. ते कांही स्वतःला मिळवण्यासाठी नव्हे. बुद्धी कमी कमी करताहेत. देहाभिमान उपयोगी नाही. अहंकार उपयोगी नाही. स्त्री, पुत्र इत्यादिकांची ममता उपयोगी नाही. लोक काय म्हणतील इकडेही लक्ष देऊन उपयोगी नाही. रामांनी जानकीचा त्याग केला. राजधर्माप्रमाणे मला वागायचंय. माझ्या दृष्टीने राजधर्म मुख्य आहे. असे वागणारे जे आहेत त्यांना ईश्वराने शुद्ध बुद्धी दिली आहे. धर्माचरण करून ते बाजूला झालेले आहेत. क्षेत्रक्षेत्रज्ञ

विवेक धर्माचरणामुळे पक्का होत जातो. शरीरतादात्म्य धर्माचरणाने कमी कमी होत जाते. ब्रह्मज्ञान झाल्यानंतर देहतादात्म्य जाते म्हणतात.

***प्रश्न : महाराज, कुंतीने याच भूमिकेतून दुःख मागितले का?***

उत्तर : ईश्वराची भक्ती कशाकरिता करायची? माझी कीर्ती वाढावी, धन मिळावे, सत्ता मिळावी याकरिता देवाची भक्ती करायची का? ते सगळे मिळाल्यावर देवाचे स्मरण राहिल कां मला?

पांडव राजे झाल्यानंतर त्या कुंतीने मागितलेले आहे. देवा ! आम्हाला धोक्यात टाकले तुम्ही. पांडव नेहमी वनवासांत राहिले पाहिजेत असं त्यांची आईच मागतेय. केवढी शुद्ध बुद्धी आहे. कारण ईश्वराची कृपा कोणावर होते? ज्याच्याजवळ काहीही नाही, अर्थ नाही, काम नाही, धर्म नाही. कुंतीला वाटले मुलांनी हे योग्य मागणे मागितले नाही. त्यांना राज्य मिळाले हे चांगले झाले नाही. ऐश्वर्य सत्ता मिळाल्यावर मद वाढतो. मग गोपालकृष्णांचे नांव पांडवांच्या मुखातून येणार नाही. अरण्यांत असतांना तुमची जशी आठवण येत होती तशी आठवण राज्यावर बसल्यावर येणार नाही आणि पूर्वीप्रमाणे तुमची आठवण झाल्यावर तुम्ही याल कां लगेच? अरण्यांतही गोपालकृष्ण येऊन भेटून जात होते. दुर्वासऋषी पांडवांची परीक्षा पहायला आले असता गोपालकृष्णांनीच येऊन सुटका केली ना! याप्रमाणे कुंतीची बुद्धी अशी आहे की दुःखाची साधने आम्हाला मिळावीत. म्हणजे दुःख आम्हाला मिळेल.

मनानेच मनाला तपासून पहायचे. आता मनामध्ये कोणते दोष आहेत, उद्या अनुकूल परिस्थिती आल्यावर मनामध्ये कोणते दोष

येण्याचा संभव आहे, हा सगळा अभ्यास केला पाहिजे. फलदाता ईश्वर आहे. त्याच्याजवळ हे मागायचे. मनाच्या शुद्धीमुळे त्याची भक्तीही शुद्ध होऊन जाते. काहीतरी मिळाले म्हणजे ईश्वराची कृपा आहे असे नाही. केवढी कुंती बुद्धिमान आहे. पांडवांना सुचले नाही. कोणत्या ऋषींनाही हे सुचले नाही. पांडवांना सुचले नाही. पांडवांनी कायम वनवासातच राहिले पाहिले असे त्यांची माता म्हणते आहे. मुलांबद्दल तिला काय प्रेम नाही?

***प्रश्न : सद्गुरूंना शरण गेल्यामुळे दुःखे कमी नाही का होणार?***

उत्तर : अलर्काचे राज्य गेले. मी दुःखी आहे म्हणून तो श्रीदत्तात्रेयांना शरण आला. सद्गुरूमहाराज अलर्काला विचारताहेत, ''तू संसारी नाहीस तुला दुःख झाले. कोणाला दुःख आहे?'' हे शब्द ऐकून अलर्कांचे अंतःकरण एकदम अंतर्मुख झाले. माझे राज्य गेले. मी दुःखी आहे. मी शरण आलो आहे. सद्गुरूंनी विचारले, ''कोण दुःखी आहे ? तू म्हणजे कोण आहेस?'' एवढे विचारले. बाकी कांही नाही. या शब्दांच्या उच्चाराबरोबर त्याचे मन अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय कोशांतून एकदम त्या आनंदापर्यंत जाऊन पोहोचले. मग ''अहम्'' कोण हे लगेच समजते. ''अहम्'' आनंदरूप आहे. निर्विकार आहे. द्वंदातीत आहे. मग मला कसले सुखदुःख? कशाला मी आलो महाराजांच्याकडे उगीच प्रार्थना करायला? मला दुःख असेल तरच दूर करायचे ना! ही ज्या शब्दामध्ये शक्ती आहे ती समजून घेण्याची योग्यता पात्रताही मनामध्ये असली पाहिजे.

त्याशिवाय उपयोग नाही. “एक तरी ओवी अनुभवावी” नामदेव सांगतात.

***प्रश्न : महाराज, सामान्य साधकाने काय करावे?***

उत्तर : धर्माचरण करीत राहिले की झाले. महात्म्याचा शब्द खरा मानला पाहिजे ही भावना धर्माचरणानेच उत्पन्न होऊ शकते. हे अशा बुद्धीला पटेल ज्याचे धर्माचरण पुष्कळ काळ झालेले आहे. श्रेष्ठ पुरुषाचा, महात्म्याचा शब्द ऐकला पाहिजे. आपण त्याच्याइतका विचार करू शकत नाही. ऐकणे आपले कर्तव्य आहे, सांगणारा महात्मा आहे, हितकर्ता आहे हे पटले पाहिजे. आपल्या संस्कृतीमध्ये प्राचीन कालापासून शब्दप्रमाण मानून आज्ञापालन चालत आलेले आहे. शब्दप्रमाण फार मोठे आहे. वेदज्ञानाचे पवित्रपणे चिंतन करणे, श्रवण करणे, अखंड त्यांत निमग्न होणे असे करणारे आहेत. त्यात मन व बुद्धी गुंतून पडते की तहानभुकेचा विसर पडतो. ईश्वरभावना अंतःकरणात उत्पन्न झाल्यानंतर शरीराची काळजी रहात नाही. तुकाराममहाराजांची “जय जय रामकृष्ण हरी” म्हणायला एकदा भंडारा डोंगरावर सुरुवात झाली की संपले. सारा देहसुद्धा नाहीसा होतो आहे. हे भगवत् प्रेमाचे महत्त्व आहे. ते महत्त्व सांगणाऱ्या महात्म्यांच्या शब्दांवर श्रद्धेने आमच्या मनांत विश्वास निर्माण झाला पाहिजे. ईश्वराने कृपा केली पाहिजे. म्हणजे त्यांच्या शब्दाच्या सामर्थ्याने आमच्या बुद्धीतील दोष दूर होतील.

***प्रश्न : महाराज, षोडशोपचाराने रोज देवपूजा करण्यात मन रमत नाही.***

उत्तर : ईश्वराची पूजा करता ती यथासांग होते का? कोणते कर्म यथासांग होते? ईश्वर दयाळू आहे. आमच्या शक्तीप्रमाणे केलेली पूजा त्याला मान्य होते. पण ''कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे।'' ही केवढी भूमिका आहे! कोणाचाही द्वेष करायचा नाही ही देवाची पूजा आहे. प्रत्यक्ष पूजा घडली नाही तरी हरकत नाही. म्हणजे ती मुद्दाम करायची नाही असे नाही. तीही करायची. बाह्यपूजाही आहे आणि अंतःपूजाही आहे. द्वेषरहित अंतःकरण असणे, शुद्ध सात्त्विक मन बनणे ही पूजा आहे देवाची.

***प्रश्न : महाराज, ''ब्रह्म सत्य जगन्मिथ्या'' हे खरे असेल तर भक्तीही मिथ्या नाही कां?***

उत्तर : नाही. भक्ती मिथ्या नाही. भक्ती मिथ्या आहे असे वाटणे हे अज्ञान आहे. ज्ञान झाल्यावर भक्ती मिथ्या आहे असे वाटणारच नाही.

आपले मन विषयांकडे जाते हा रोजचा अनुभव आहे. जर ब्रह्म सत्य जगन्मिथ्या हे पटले असेल तर मन विषयांकडे जाईलच कसे? मन विषयांकडे जाते प्रारब्धामुळे. पण ज्ञान झाले की तिकडे गेलेले मन आवरावेसे वाटते. आपले मन विषयांत आसक्त होत नाही याची काळजी घ्यायची. राग आला हरकत नाही. राग आवरावा. त्याचा अतिरेक होऊ देऊ नये. व्यवहारांत अंतःकरण असेतो राग येणारच. पण रागलोभ आवरावेसे वाटणे ही ईश्वरी कृपा आहे. जो रागलोभ आवरतो तो योगी. तोच सुखी होणार. रागलोभ आवरायला सगुण भक्ती फार उत्तम आहे. सारखी समाधी लावून बसता येत नाही.

व्युत्थान होणारच. लोकांशी संबंध येणारच. त्यांतून मन बाहेर तर काढायला हवं. सगुणाची भक्ती त्यासाठी उपयोगी पडते.

भक्तीचा आनंद मिळू लागला की संसाराचा आपोआप विसर पडायला लागतो. भगवंताचे जेवढे स्मरण राहील तेवढे मनाला इंद्रियांना आवरावे लागत नाही. खरी भक्ती उत्पन्न झाली की अंतःकरण तन्मय होऊन जाते. डोळेही मिटायला नकोत. मग समाधी अवस्थाही नको वाटते हा खरा ज्ञानी, भक्ती सोडणारच नाही. भगवंताचे ध्यान करणे, नामस्मरण करणे यांत तो इतका रंगतो की सगळी इंद्रिये ताब्यात येतात.

निर्गुण समाधी साध्य झाली तरीसुद्धा ती टिकवायला सगुणाची भक्तीच उपयोगी पडते. एवढे सगुण भक्तीचे महत्त्व आहे. केवळ भक्तीच्या जोरावर अनेक भक्तांनी परमेश्वराची प्राप्ती करून घेतली आहे. मग परमेश्वराची प्राप्ती करून देणाऱ्या भक्तीला मिथ्या कसे म्हणणार?

***प्रश्न : भगवंताची भक्ती मनांत कशी निर्माण होईल?***

उत्तर : ज्याचे मन कोणत्याही कारणाने कां होईना ईश्वरापर्यंत जाऊन पोचले आहे त्याचा निश्चित उद्धार होतो. माध्यम कोणतेही का असेना? द्वेष असेल, प्रेम असेल, भीति असेल, गोपींचा काम म्हणालात तरी हरकत नाही. अंतःकरण ईश्वरावर लागले पाहिजे. मग जीवभाव विसरून जातो. स्वतःचे घरदार विसरून जातो. आत्मविस्मृति व्हायला पाहिजे. सगळेच विसरून गेला आहे. हा देह म्हणजे मी आहे, घरदार माझे आहे, मन व इंद्रिये माझी आहेत,

अहंता, ममता सारे विसरले पाहिजे. मन ईश्वरापर्यंत जाऊन पोचले की मुक्ती, देहभाव वगैरे सारे विसरून जाणे म्हणजे मुक्त होणे.

***प्रश्न : महाराज, चिंतनाने साधेल काय?***

उत्तर : सारेच सुखासक्त नसतात. काही विवेकसंपन्नही असतात. मानवांमध्येही एखादा हजारात कां होईना, पण असतो. वेदाध्यायी ऋषी मंडळींचे अखंडचिंतन चालायचे. तत्त्वविचार, जग हे भ्रामक कसे आहे आणि मूळ सत्याचे अधिष्ठान काय आहे हे त्यांना वेदप्रमाणावरून माहिती आहे. त्याप्रमाणे त्यांचे अखंड चिंतनही चालले आहे. समाधी अवस्थेपर्यंत त्यांची भूमिका आहे. ध्येय वस्तूचे ध्यान करता करता समाधी अवस्थेपर्यंत जाता येते. ईश्वरकृपासंपन्न सद्गुरूसंपन्न अभ्यास करणारे महात्मे या अवस्थेपर्यंत जाऊ शकतात.

मनाला चिंतनाला एक विषय द्यायचा. जगद्रूपी विवर्ताचा विषय चिंतनाला कायमचा आहे. अनेक जन्म तो विषय मनात आहे. त्या विषयाला बाजूला करून चैतन्यरूपी जगदंबेचे अधिष्ठानरूप आहे त्याचे चिंतन करायचे.

चैतन्यरूपी जगन्मातेवर मन स्थिर झाले की अहम् सगळा निघून जातो व पाचही कोश बाजूला होतात. त्या सगळ्या कोशांना आधार अधिष्ठान म्हणून जे चैतन्यरूप आहे त्या चैतन्यापर्यंत अंतःकरण जाते व तेथेच थांबते. ध्यानाचा अभ्यास सुरू केला म्हणजे मन त्या परतत्त्वापर्यंत न्यायचे आहे. अंतःपूजाही चालू आहे. चिंतन चाललंय. चिंतन म्हणजे पूजा. बाह्यपूजाही आहे. त्या जगदंबेच्या चैतन्यरूपापर्यंत मन जाऊन स्थिर झाले की त्याच्या पुढे कुठे जायचे

नाही. स्थिरतेचा परमावधी याला म्हणतात. अंतःकरण अत्यंत स्थिर होणं म्हणजे चैतन्यनिष्ठ होणं. ही अवस्था त्यांना अनेक जन्मांच्या सुकृताने अभ्यासाने प्राप्त होते. लय नाही. विक्षेप नाही. काषाय नाही. रसास्वाद नाही. आरंभाला अधुन मधून अनुभव येतात. पण त्या अनुभवांचेच चिंतन करण्यामध्ये मन निमग्न होते. असा दृष्टांत आला मला. असे दिसले मला. असा आदेश ऐकायला आला याचेच चिंतन होते. म्हणजे मन हे तिथेच स्थिर राहू लागले. रसास्वाद हा मोठा दोष मानला आहे शास्त्रकारांनी. तेथून पुढे मन नेऊन ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणी स्थिर केले म्हणजे अभ्यास संपतो. या भूमिकेवर अनेक ऋषी होते. ब्रह्मनिष्ठ महात्मेही होते. त्यांचे तप चालायचे. तप म्हणजे चिंतन करणे, अंतःपूजा करणे. या चिंतनात सर्व इंद्रिये विलीन होऊन अंतःकरण ध्येयाकार होते. पंचकोशांच्या आंत जे चैतन्यतत्त्व आहे तिथे जाऊन स्थिर होते. पुढे कुठे जायचे नाही. काही नाही.

## ❋नाममंत्र मिळाल्यानंतर साधनेला प्रारंभ करतांना साधकाच्या मनांत येणाऱ्या शंकांविषयी प्रश्नोत्तरे -

*(श्रीदत्तमहाराज कांही साधकांना नाममंत्र देत असत. नाममंत्र मिळाल्यानंतर करावयाच्या साधनेबाबत एका भक्ताने श्रीदत्तमहाराजांना कांही प्रश्न विचारले. त्यावेळी झालेले संभाषण पुढे दिले आहे. या संभाषणाच्या वेळी डॉ.अशोकमहाराजही उपस्थित होते.)*

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंनी दिलेले नाम ध्यानांतही घ्यायचे व तेच चोवीस तासही घ्यायचे कां?***

उत्तर : हो. तेच नाम अखंड चोवीस तास घेत रहावे. जास्तीत जास्त घ्यावे.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंनी दिलेले नाम हाच मंत्र कां ?***

उत्तर : नाममंत्रच आहे तो.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंनी दिलेले नाम सिद्ध असते कां? का ते सिद्ध करण्यासाठी अनुष्ठान करावे लागते?***

उत्तर : सद्गुरूंनी दिलेले नाम सिद्धच असते. ते सिद्ध करण्यासाठी अनुष्ठान किंवा पुरश्चरण करावे लागत नाही. सद्गुरूंनी दिलेले नाम तारक आहे, पापनाशक आहे, कारण ते सिद्धच आहे.

***प्रश्न : महाराज, प्रपंच मनांत असल्यामुळे मानसिक दुःखे निर्माण होतात. त्यातून शारीरिक आजार उद्भवतात. प्रपंच मनांतून जावा म्हणून काय करायला हवे?***

उत्तर : संतांचे ग्रंथ वाचावेत. म्हणजे त्यांतून पुष्कळ मार्गदर्शन होते. भागवत आहे. एकनाथी रामायण आहे. ज्ञानेश्वरीचा आपला अभ्यास आहेच.

***प्रश्न : महाराज, आयुष्यांत घडून गेलेल्या जुन्या घटना, भेटलेल्या व्यक्ती यांच्यासंबंधी मनांत सारखे विचार येत असतात. वेगवेगळी झालेली संभाषणे सारखी आठवत रहातात. मनांतून हे विचार कसे घालवावे?***

उत्तर : नामस्मरण करीत रहावे. नामस्मरण जितके होईल तितके ते कमी होईल.

***प्रश्न : महाराज, माझ्या मनांत सारखे कांही ना कांही विचार येतच रहातात. अमकी व्यक्ती मला भेटल्यावर मी असे बोलेन, तमक्या व्यक्तीला असे सांगेन असे विचार मनांत येत रहातात. हे विचार मनांतून कसे घालवावे ?***

उत्तर : साहजिकच आहे ते. मनामध्ये येतं. पण हळूहळू नामस्मरणाकडे लक्ष गेलं की ते जाईल.

***प्रश्न : महाराज, आपण सांगितलेत की भगवंताचे अखंड अनुसंधान ठेवावे. ते कसे करावे ?***

उत्तर : ते हळूहळू येईल. नामस्मरण करायचे. भगवंताचे अखंड अनुसंधान रहावे म्हणून देवाची प्रार्थना करायची. अवतारी पुरुषांची चरित्रे वाचायची. संतांची चरित्रे वाचायची. अशा चरित्रवाचनानेही अखंड अनुसंधान रहायला मदत होते. ''वीतरागविषयम् वा चित्तम्'' असे सूत्र योगसूत्रकारांनी सांगून ठेवलेच आहे.

***प्रश्न : महाराज, आपण अभ्यास चालू ठेवावा असे सांगितले होते. अभ्यास म्हणजे ध्यान, धारणा व समाधी कां ?***

उत्तर : होय. ते बरोबर आहे.

***प्रश्न : महाराज, प्राणायाम चालू ठेवावा कां?***

उत्तर : चांगलं आहे. मनाची स्थिरता व्हायला प्राणायाम उपयोगी पडतो. योग्य मार्गदर्शन असलं म्हणजे झालं. त्याला कांही हरकत नाही. मनाच्या स्थिरतेचा प्राणायाम हा उपायच आहे.

***प्रश्न : महाराज, शिष्याचे कल्याण व्हावे हा सद्‌गुरूंचा संकल्प असतो. सद्‌गुरूंनी संकल्प केला म्हणजे तो सिद्ध होणारच. मग साधकाने स्वतः कांही संकल्प करणे आणि त्या संकल्पासाठी प्रयत्न करणे हे सदगुरूंच्या संकल्पाशी विसंवादी ठरणार नाही कां?***

उत्तर : गुरू शिष्याच्या मनांतले सगळे संकल्पच नाहीसे करून टाकतात. गुरूंच्या संकल्पानेच सगळं होतं. गुरूचा संकल्प झाला म्हणजे झालं.

***प्रश्न : महाराज, भगवंताचे सगुण साकार आणि निर्गुण निराकार अशी दोन रूपे सांगतात. कोणत्या रूपाची उपासना करावी?***

उत्तर : सगुण रूप आणि निर्गुण रूप दोन्ही एकच आहेत. पण ते कळायला वेळ लागतो. अगोदर सगुण ब्रह्माची उपासना करायची. सगळ्या संतांनी तेच सांगितलंय. अगोदर श्रद्धा पाहिजे. म्हणजे दोन्ही रूपे एकच आहेत हे हळूहळू कळतं.

***प्रश्न : महाराज, आत्मा व परमात्मा यांत काय फरक आहे?***

उत्तर :आत्मा हा परमात्म्याचा अंश आहे. अगोदर अंशच असतो. एकत्व बुद्धी नंतर येते.

***प्रश्न : महाराज, ईशकृपा, गुरूकृपा व आत्मकृपा झाली म्हणजे पारमार्थिक प्रगती होते असे सांगतात. गुरूकृपा व्हावी यासाठी साधकाने काय करावे?***

उत्तर : त्याने ईश्वराची उपासना चालू ठेवायची. नामस्मरण करायचं. योग्यवेळी गुरूची भेट होते. त्यांतून काहीतरी होतं.

***प्रश्न : महाराज, आत्मकृपा म्हणजे काय ?***

उत्तर : आत्मकृपा म्हणजे आपल्याला प्रतीति येणं. ती हळूहळू येते. जितकं जितकं मन शुद्ध होत जाईल तितका अनुभव येतो.

***प्रश्न : महाराज, कांही प्रगती झाली आहे म्हणून साधकाने आनंद मानायचा कां अजून पुष्कळ पुढे जायचंय म्हणून अस्वस्थ व्हायचं?***

उत्तर : तळमळ ठेवायलाच पाहिजे. अजून व्हायचं आहे याची जाणीव ठेवली म्हणजे प्रयत्न चालू राहतो.

***प्रश्न : सद्गुरूवांचून कोणाचेही प्रेम नको आपल्याला. फक्त सद्गुरू आणि आपण अशी भूमिका साधकाने घ्यावी कां ?***

उत्तर : होय. तेच चांगलं. बरोबरच आहे ते. एकच फक्त सद्गुरू.

***प्रश्न : महाराज, संसारात राहूनही मनाने निःसंग संन्यासी व्हावं अशी इच्छा करणं बरोबर होईल का ?***

उत्तर : होय. ते चांगलं आहे. वासनाक्षय म्हणून सांगितला आहे तो हाच.

***प्रश्न : महाराज, तसं होईल कां गुरूंच्या कृपेने ?***

उत्तर : होय. होईल.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंच्या वचनाचा नेमका अर्थ काहीवेळा कळत नाही. ज्येष्ठ साधकांशी चर्चा करून समजावून घेणे बरोबर होईल कां ?***

उत्तर : एकमेकांनी चर्चा करायला काही हरकत नाही.

***प्रश्न : महाराज, बुद्धी ईश्वरप्रेमाने भरून जायला हवी असे आपण सांगितले होते. असं व्हावं म्हणून आम्ही काय करावे?***

उत्तर : ईश्वराची प्रार्थना करावी. ईश्वर अंतर्यामी आहे ना! बुद्धीला प्रेरणा करणारी शक्ती तीच आहे ना? म्हणून त्या शक्तीची प्रार्थना चालू ठेवायची.

***प्रश्न : महाराज, गुणग्राहक बुद्धी झाली पाहिजे असे आपण प्रवचनांत सांगितले होते. ईश्वराची भक्ती करून ते साधेल कां ?***

उत्तर : गुणग्राहक बुद्धी वगैरे हे सगळं लौकिक आहे. गुणदोषाच्या पलीकडे जायचं. गुणातीत अवस्था ही वेगळीच आहे.

***प्रश्न : महाराज, महान् आत्मा म्हणजे ज्याला सगळीकडे परमेश्वर दिसतो आहे असे आपण सांगितलं होतंत. तसा अनुभव येण्यासाठी आम्ही काय केले पाहिजे?***

उत्तर : प्रत्यक्ष अनुभव येणं म्हणजे सर्व ठिकाणी ईश्वरभावना निर्माण

होणं. हा साक्षात्कारच आहे. त्याला वेळ लागणार. नामस्मरण, ध्यान, समाधी अवस्थेपर्यंत गेल्यानंतर ते होणार.

***प्रश्न : महाराज, गुरूकृपेनेच ते होणार कां?***

उत्तर : होय. ते गुरूकृपेनेच होणार.

***प्रश्न : महाराज, "तुझिया सत्तेने तुझे गुण गाऊ । सुखी होऊ सर्वकाळ ।" असे तुकाराममहाराज सांगतात, त्याचा अर्थ काय?***

उत्तर : भगवंताचे गुण गायलासुद्धा भगवंताची कृपा पाहिजे. खरं आहे ते. भगवंताची कृपा झाल्याशिवाय ती वासनाच होत नाही. परमार्थ वासनाच होत नाही.

***प्रश्न : महाराज, "एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा । हरीकृपे त्याचा नाश आहे। असे श्रीएकनाथमहाराजांनी म्हटलंय. हरीकृपा व गुरुकृपा एकच असते कां?***

उत्तर : होय, हरीकृपा व गुरुकृपा एकच.

***प्रश्न : महाराज, गुरुकृपा झाली तर स्वतःच्या प्रारब्धाचाच नाश होतो कां, कुटुंबातील सगळ्यांच्याच प्रारब्धाचा नाश होतो ?***

उत्तर : गुरुकृपेने समाधान प्राप्त होतं. प्रपंच परमार्थ दोन्ही साधतात.

***प्रश्न : महाराज, मी समोर आलो म्हणजे आपण खूप प्रेम करता. आपण माझेच आहांत असे वाटतं. पण मी गेल्यावर आपण मला विसरून जाऊन ईश्वरचिंतनांत मग्न होता का? नंतरही आपल्याला माझी आठवण रहाते कां?***

उत्तर : निरंतर ईश्वराचे अनुसंधान व अभ्यास चालू ठेवायचा असतो. कोणी जवळ असलं काय आणि नसलं काय. कोणी जवळ असलं

म्हणजे तेव्हा ईश्वराचे अनुसंधान ठेवायचे असे नाही. ईश्वराचे अनुसंधान अखंड चालू राहिलं पाहिजे. हा अभ्यास चालू ठेवायचा. त्याकरता ईश्वर प्रार्थना चालू ठेवायची.

***प्रश्न : महाराज, सद्गुरू सदैव माझ्याबरोबर आहेत व मला मदत करताहेत असा विश्वास बाळगून जीवनांत वागावं काय ?***

उत्तर : हे बरोबरच आहे. आहेच तसे ते.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंचे फक्त पारमार्थिक बाबतीतच मार्गदर्शन घ्यायचे कां? व व्यावहारिक बांबी विचारल्या तरी चालेल?***

उत्तर : पारमार्थिक वृत्तीने विचार चांगला. प्रापंचिक बाबी प्रारब्धांत गुंतलेल्या असतात ना ! प्रारब्ध कमी जास्ती असं होत असतं.

***प्रश्न : महाराज, श्रीकृष्णदयार्णवांच्या वंशात जन्म घेण्याचे भाग्य मिळाले म्हणजे त्यांचा कांही आध्यात्मिक वारसाही मिळाला असेल कां?***

उत्तर : त्यांचे लक्ष असणारच.

***प्रश्न : ते आहेतच. ते मजकडे बघत आहेत कां महाराज ?***

उत्तर : होय.

***प्रश्न : महाराज, आपल्या चरणांपाशी आल्यावर वाटत राहिले की, अनेक जन्म आपण मला आपल्या परिवारांत आसरा दिलेला आहे. असे जे वाटले ते बरोबर आहे कां ?***

उत्तर : परिवार म्हणजे काय? अनेक जन्मांचा परिवार असला तरी तो त्याच व्यक्तींचा असतो, एकच असतो हे कसे काय ठरवायचं? परिवारातील व्यक्ती बदलत रहातात ना?

***प्रश्न : महाराज, मुक्ती मिळेपर्यंत आपलं मार्गदर्शन मिळेल असा विश्वास बाळगावा कां?***

उत्तर : होय. चांगलंच आहे ते.

***प्रश्न : महाराज, असे सांगतात की, समाधी अवस्थेत भगवंताचे निर्गुण रूप अनुभवाला येते. पण समाधी उतरल्यावर व्यवहारांत शिरले की निर्गुण रूपाचा अनुभव येत नाही. असे असते कां ?***

उत्तर : तशा दृष्टीने ध्यान सुरू झालं म्हणजे तशी समाधी होणार. सगुणाच्या ध्यानाने सगुणाची समाधी होणार.

***प्रश्न : महाराज, आमच्यासारख्याने सगुणाचेच ध्यान करावे कां?***

उत्तर : सोपे आहे ते. तेच करावे. साधकाला प्रारंभीच्या काळात निर्गुणाचे ध्यान करताच येत नाही. निर्गुणाकडे मन जातच नाही. म्हणून साधकाने प्रारंभी सगुणाचेच ध्यान करत रहावे असे सांगतात.

***प्रश्न : महाराज, ज्ञानी भक्त स्थितप्रज्ञ होतो म्हणजे नेमके काय होते? त्याची बुद्धी परब्रह्मरूप होते आणि तरीही त्याचा देह, मन व इंद्रिये पूर्वीच्या संस्काराप्रमाणेच वागत रहातात का?***

उत्तर : इंद्रिये सर्व सहन करणारी असतात. तितिक्षा असते त्यांना. देहात्म बुद्धी गेली म्हणजे तितिक्षा होते. देहावर सगळं सुखदुःख आहे.

***प्रश्न : महाराज, हीच जीवनमुक्तीची अवस्था कां? प्रपंचात राहूनसुद्धा ती जीवनमुक्तीची अवस्था मिळवता येते कां?***

उत्तर : होय. प्रपंचात राहूनही जीवनमुक्तीची अवस्था मिळवता येईल.

***प्रश्न : महाराज, जीवनमुक्तीची अवस्था आल्यावर तो भक्त प्रपंचात राहिलं तरी ती अवस्था टिकून रहाते कां ?***

उत्तर : होय. जीवनमुक्तीची अवस्था आली म्हणजे संसारात जरी राहिलं तरी संसाराची आसक्तीच मनांत रहात नाही. तो संसारांत रहात असला तरी त्याचं मन अनासक्त असतं. संसारांत तो अलिप्ततेनेच रहात असतो.

***प्रश्न : महाराज, आपण आशीर्वाद द्या की, याच जन्मात अशी जीवनमुक्तीची अवस्था मला प्राप्त व्हावी.***

उत्तर : देवाची प्रार्थना अखंड चालू ठेवायची. तळमळ जितकी जितकी निर्माण होईल तितकं तितकं लौकर जमू शकतं ते. तळमळ लागली पाहिजे. केव्हा देवाची कृपा होईल, केव्हा सगळ्या वासना जातील, प्रपंचातून अलिप्त केव्हा होता येईल. तळमळ लागली की होईल. ईश्वराची शक्ती अनंत आहे.

***प्रश्न : महाराज, परमार्थ झाकूनच ठेवावा, कोणाला पारमार्थिक मार्गदर्शनही करू नये असे वाटते. तसं वागणं बरोबर होईल कां?***

उत्तर : आग्रह धरायचा नाही. मार्गदर्शन केलं तरी आग्रह ठेवायचा नाही. झालं तर ते त्याचं नशीब असं मानायचं. आपलं कांही नाही. सोडून दिलं. झालं पाहिजे म्हणून उगीच आम्हाला आपल्या गोष्टी कशाला विचारायच्या?

***प्रश्न : महाराज, शक्यतो झाकूनच ठेवायचं ना स्वत:ला?***

उत्तर : होय.

*(नाममंत्र दिल्यानंतर करावयाच्या साधनेबाबत साधकांच्या प्रश्नांना श्रीदत्तमहाराजांनी जी उत्तरे दिली त्यापैकी कांही निवडक प्रश्नोत्तरे पुढे दिली आहेत.)*

**प्रश्न : महाराज, गुरूवर श्रद्धा ठेवली तरच विद्या मिळते कां?**

उत्तर : गुरूवर निष्ठा ठेवली तरच विद्या मिळते. गुरूवर निष्ठा ठेवण्याचे फार महत्त्व आहे. शिष्याच्या बुद्धीला प्रेरणा देणारा सद्गुरूच असतो. म्हणून शिष्याने मी काही केले अशी भावना मनांतही आणू नये. मला कळते, मी केले असे शिष्याच्या मनांत आले की संपले. द्विसाहस्त्रीमध्ये एक कथा आहे. दीपक या शिष्याने काशी येथे गुरूंची (वेदधर्मा ऋषींची) खूप सेवा केली. त्याची गुरूभक्ती पाहून भगवान विष्णु प्रसन्न झाले. ते त्याच्यापुढे प्रकट झाले व म्हणाले, ''वर माग.'' दीपक म्हणाला, ''माझी गुरूभक्ती कमी आहे. ती वाढावी, दृढ व्हावी, स्थिर व्हावी असा वर मला द्या. माझे एवढेच मागणे आहे.'' गुरूभक्तीमुळे परमेश्वर प्रसन्न होऊन वर माग म्हणाला तरीही गुरूभक्ती कमीच आहे असे वाटते आहे. गुरूभक्ती वाढवावी असे वाटणे हीच सद्गुरूंवरील खरी निष्ठा आहे. शेवटपर्यंत गुरूवर अशी निष्ठा ठेवावी लागते. मला सारे कळते असे शिष्याला वाटले की संपले.

***प्रश्न : महाराज, अमानित्व व निरहंकारिता कशी प्राप्त करून घ्यावी?***

उत्तर : असंगत्व, अमानित्व हे गुण म्हणजेच ज्ञान. असे भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितले आहे. दुसरे ज्ञान नाही. हे गुण संपादन केले पाहिजेत. अमानित्व हा गुण आहे, ज्ञान आहे. मान म्हणजे

अज्ञान आहे, दोष आहे. अमानित्व हे ज्ञान पुस्तके वाचून मिळवता येणार नाही.

अमानित्व म्हणजे मला मान मिळावा ही कल्पनाच मनांत नाही अशी वृत्ती. ज्ञानदेव सांगतात स्वतःची पूजा पाहायची इच्छासुद्धा उत्पन्न होऊ नये. हे कसे असू शकेल? प्रत्यक्ष कुठे पाहायला मिळेल? ज्ञानेश्वरमहाराज स्वतः तसे होते. अनेक संत तसे होते. नारायणमहाराज तसे होते. त्यांच्या संगतीत अमानित्व पहायला मिळायचे. स्वतःचे पूजेकडे लक्ष नाही. कीर्तीकडे लक्ष नाही. सामान्य जीवाप्रमाणे व्यवहार चालले आहेत. मोठा यज्ञ, अनुष्ठान, उत्सव असे कार्य त्यांच्या प्रेरणेने चालले असले तरी आपला काही संबंधच नाही असे तेथे बसत. मोठे कार्य झाले तरी कर्तृत्वाभिमान नाही. ही केवढी अमानित्वाची भूमिका आहे? असे संत हेही परमेश्वराचेच अवतार आहेत. अशा महापुरुषांच्या संगतीचा लाभ घ्यावा. अमानित्व असं असलं पाहिजे, ते कसे संपादन केले पाहिजे, आपण निरभिमानी आहोत हे खरे आहे कां, हे अशा महापुरुषांच्या संगतीत समजून येते. महापुरुषांच्या सहवासांत अमानित्व समजते व ते त्यांच्याच कृपेने प्राप्त होते. त्यांच्या कृपेशिवाय काही होत नाही.

***प्रश्न : महाराज, मुक्ती मिळावी म्हणून आम्ही काय करावे?***

उत्तर : मोक्ष ईश्वराशिवाय कोणीच देऊ शकत नाही. मुक्ती ईश्वराकडेच मागावी लागते. मुक्ती हवी असली तर जन्म कायमचा बंद झाला पाहिजे. देहाचा संबंध सुटला पाहिजे. देहाचा संबंध सुटायचा असला तर त्यासाठी कर्म संपावी लागतात. आपल्या कर्माचे फळ म्हणून

देहाचा संबंध म्हणजे जन्म येतो, याकरता सर्व पाप व पुण्य कर्माचा क्षय व्हावा लागतो. पाप व पुण्य कर्माचा क्षय झाला तरच जन्म, मृत्यू व दुःखं कायमची संपतात. हे ईश्वरकृपेशिवाय होऊ शकत नाही.

ईश्वरकृपा सोपी नाही. अनेक जन्म साधना करावी तेव्हा ईश्वरकृपा मिळते. म्हणून सतत भगवंताचे नामस्मरण करावे. अखंड प्रार्थना करावी. तळमळ लागली की सद्गुरू आपणहून येतात व मार्ग दाखवतात. गुरूकृपा व ईश्वरकृपा एकच. सारे काही ईश्वराच्या कृपेवरच अवलंबून असते.

***प्रश्न : महाराज, श्रद्धेची भूमिका म्हणजे कोणती भूमिका? श्रद्धा म्हणजे काय?***

उत्तर : सद्गुरू, वेद व उपनिषदे जे सांगतात तेच सत्य आहे अशी निश्चयात्मक बुद्धी म्हणजे श्रद्धा. शंकराचार्य स्वामीमहाराज सांगतात, "गुरूवेदान्तवाक्येषु बुद्धिर्या निश्चयात्मिका । सत्यनित्येव सा श्रद्धा निदानं मुक्तिसिद्धये ॥ " गुरूंचे वाक्य आणि वेद व उपनिषदांतील वाक्य हेच सत्य आहे अशी निश्चयात्मक बुद्धी म्हणजे श्रद्धा. ही श्रद्धाच मुक्ती प्राप्त करून देते. श्रद्धेमुळेच फळ मिळते. शंकराचार्य स्वामीमहाराज सांगतात दैव, वेद, गुरू, मंत्र, तीर्थ, महात्मा आणि औषध यांवर जेवढी श्रद्धा असेल तेवढे फळ मिळते. श्रद्धेशिवाय फळ मिळत नाही. ब्रह्म सूक्ष्म वस्तू आहे. वेद ही ईश्वराची आज्ञा आहे. वेद सांगतात म्हणून ब्रह्म आहेच असा निश्चय करावा. म्हणजेच मोक्षाचे फळ मिळते.

**प्रश्न : महाराज, सद्गुरू शिष्याची परीक्षा कां पहातात?**

उत्तर : आत्मज्ञाननिधी द्यायचा आहे. पण हा निधी दिला तर तो शिष्य त्या निधीचे संरक्षण करू शकेल किंवा नाही हे पाहण्यासाठी अगोदर त्याची परीक्षा घ्यावी लागते. म्हणून शिष्याची बुद्धी, इंद्रिये वगैरे कशी आहेत याची गुरू तपासणी करतात. ज्या बुद्धीत ज्ञानाचं संक्रमण करायचं आहे, ती बुद्धी चांगली आहे कां नाही हे पाहिल्याशिवाय ज्ञान कसं देणार? उत्तम सांगणारे आहेत. सांगणाऱ्याने सांगितले पुष्कळ. ऐकत असतांना मनांत काही संशय रहात नाही. पण चित्तशुद्धी झालेली नसेल तर ते ज्ञान टिकून रहात नाही. योग्यता असल्याशिवाय ज्ञान द्यायचे नाही असे त्यासाठीच सांगतात.

ज्ञान देणारे समर्थ आहेत. सर्वज्ञ संतमहात्मे आहेत. ईश्वराच्या इच्छेने ते ज्ञान देत आहेत. सांगणारे 'शाब्दे परेच निष्णात' महात्मे आहेत. पण आमची बुद्धी तशी तयार नाही. तीव्र जिज्ञासा उत्पन्न व्हायला पाहिजे. सद्गुरूंची भेट व्हावी, त्यांच्याकडून मार्गदर्शन व्हावे, आत्मोन्नतीचा मार्ग कोणता आहे हे कळावं अशी तीव्र इच्छा उत्पन्न झाली पाहिजे. तरच तशा सद्गुरूंची भेट होऊन कार्य होते.

**प्रश्न : महाराज, आमची योग्यता नाही म्हणूनच तर आम्ही गुरूंकडे जातो ना? योग्यता यावी म्हणून आम्ही काय करावे?**

उत्तर : आपल्याजवळ योग्यता नसली तरी गुरूसेवेत ही योग्यता प्राप्त होते. बुद्धी शुद्ध होण्यासाठी गुरूसेवा सांगतात. गुरूस्वरूपाचं स्मरण करीत राहाणे हीच खरी गुरूसेवा आहे. अशा शिष्यावरच कृपा होते आणि तो आत्मसुखाचा अधिकारी होतो.

***प्रश्न : महाराज, आमच्याजवळ ज्ञान नाही, भक्ती नाही, कर्म कसं करायचं यांचही ज्ञान नाही. आमचा उद्धार व्हायचा तरी कसा?***

उत्तर : जे दीन आहेत, जे अज्ञानी आहेत, ज्यांना भक्तीसुद्धा करता येत नाही, ज्यांना ज्ञान नाही, कर्म कसं करावे हे सुद्धा ज्यांना समजत नाही, त्यांचा उद्धार करण्यासाठी सद्‌गुरूंचा अवतार आहे. लोकांचा उद्धार करण्याचं त्यांचं कार्य सतत चाललेच आहे. पूर्णश्रद्धेने सद्‌गुरूंची सेवा केली तर ते आत्मसाक्षात्कार करून देतात.

सद्‌गुरूंचा अवतार जीवांच्या शुद्धीसाठीच आहे. कोणाला कसा प्रतिबंध होतो, काय होतो याचे सगळं ज्ञान त्यांना आहे. आपण केलेली पुण्यकर्म आपल्या लक्षात रहातात आणि झालेली पापकर्म मात्र आपण विसरून जातो. पण आपण विसरलो तरी त्याचे फळ मिळाल्याशिवाय रहात नाही. कोणाचे काय कर्म आहे, कोणाच्या कर्माचा काय भोग आहे, हे सद्‌गुरूंना ज्ञात असते. भक्तीने श्रद्धेने जो त्यांच्याकडे जातो त्याचे कार्य होऊन जाते. सद्‌गुरूंच्या दर्शनाने, त्यांच्या दृष्टीक्षेपाने किंवा त्यांच्या स्पर्शानेही जन्मजन्मांतरींची पातके नाहीशी होऊ शकतात. तेवढी श्रद्धा पाहिजे, भक्ती पाहिजे.

***प्रश्न : महाराज, गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी ज्ञानमार्ग, कर्ममार्ग, भक्तीमार्ग आणि संन्यासमार्ग असे चार मार्ग सांगितले आहेत. भगवंतांना आमच्यासाठी त्यातला कोणता मार्ग सांगायचा आहे?***

उत्तर : भगवंतांनी गीतेमध्ये कर्ममार्ग, ज्ञानमार्ग व संन्यासमार्ग संक्षेपाने सांगितले आहेत. आणि भक्तीमार्ग सविस्तर सांगितला आहे. कर्ममार्ग आणि संन्यासमार्ग यापेक्षा भक्तीमार्ग श्रेष्ठ आहे, सर्व लोकांनी

भक्तीमार्गाचे अनुष्ठान करावे असाच भगवंताचा अभिप्राय आहे. भक्तीमार्गाची जोड दिली नाही तर सांख्ययोगी आणि पातंजलयोगी यांनाही भगवंताची प्राप्ती होत नाही असे सांगतात.

***प्रश्न : महाराज, निष्काम भक्ती करणारा भक्त श्रीमंतीत राहूनही भक्ती निष्काम ठेवू शकतो कां? प्रपंचात वैभव असेल तर ती निष्काम भक्ती टिकेल कां? सुदामजींना भगवान श्रीकृष्णांच्या कृपेने सर्व वैभव मिळाले. सोन्याची नगरी मिळाली. त्यानंतर ते कसे जीवन जगत राहिले हे सांगावे अशी प्रार्थना आहे.***

उत्तर : निष्काम भक्ताच्या मनांत इच्छा नाही, वासना नाही, कांही नाही. असे निर्वासन मन हीच ईश्वराची कृपा आहे. कृपा असेल तर वैभवांतही ते तसेच राहू शकेल. सुदामजींचे उदाहरण सांगतात. भगवान श्रीकृष्णांनी सुदामजींना सोन्याची नगरी दिली आहे. समृद्धी पुष्कळ मिळाली. पंचपक्वान्नांचे रोज जेवण, उत्तम प्रकारची वस्त्रे धारण करायला मिळताहेत, दागदागिने आहेत. पण मनांतून त्याग आहे. ''तेन व्यक्तेन भुंजीथा'' असं ईशावास्योपनिषदांत सांगितले आहे तशी सुदामजींची वृत्ती आहे. हे सर्व ईश्वराचं आहे. सर्व ईश्वररूप आहे. त्याग मनांतून आहे. बाहेरून परेच्छाप्रारब्ध आहे. स्त्रीची इच्छा, मुलांची इच्छा, मित्रांची इच्छा म्हणून पंक्तीत जाऊन बसताहेत, भोजन करताहेत. पण ही सर्व समृद्धी त्या यदुनाथांची आहे ही जाणीव मनांत पूर्णपणे आहे. ईश्वरार्पण बुद्धिनं धर्माचरण चाललेलं आहे. मी धर्माचरण करतो आहे ही भावनाही नाही. अर्थ आणि काम हे हेतू मनांत नाहीतच. अकिंचन आहेत. भगवंतप्रेम तेवढ अंतःकरणांत

आहे. दुसरं काहीही नाही. मी एक मूठ पोहे नेले. भगवंतांनी प्रेमाने स्वतः मागून घेतले आणि मला सोन्याची नगरी दिली. असा भक्तवत्सल परमात्मा आहे. त्याचंच दास्य मला प्रत्येक जन्मांत मिळावं असं भगवंताकडे ते मागताहेत. जन्ममरणांतून मुक्त व्हाव असे सुदामजींनी मागितलं नाही. हे जे ऐहिक वैभव मला मिळालं आहे ते रहावं, त्याचं संरक्षण व्हावं अशी इच्छा मनांत निर्माण झाली नाही. ते वैभव टिकून राहिलं म्हणजेच देवाची कृपा आहे ही भावना मनांत आलीच नाही. जे मिळालं आहे त्यापेक्षा आणखी जास्त मिळावं अशीही इच्छा मनांत निर्माण झाली नाही. ऐहिक वैभव मिळणं आणि टिकून रहाणं ही देवाची खरी कृपा नाहीच आहे असा मनांत पूर्ण विवेक आहे.

सुदामजी समृद्ध संसारात रहात आहेत. पण भगवंतांच अखंड ध्यान चाललेलं आहे. त्या समृद्धीचा मनावर कांहीही परिणाम झाला नाही. समृद्धी नव्हती, त्यावेळेलाही अंतःकरणांत समाधान होतं. समृद्धी मिळाली तरी काही फरक पडला नाही. तेच समाधान आहे. निर्विकार आहेत. हे सुख रहावं, वाढावं असं कांहीही त्याच्या मनांत नाही. अशी वृत्ती मिळणं हीच ईश्वराची खरी कृपा आहे.

***प्रश्न : महाराज, संतांच्या कृपादृष्टीचं एवढं महत्त्व कां सांगतात?***

उत्तर : संतांना विषयसुखाची गोडी नसते. अखंड ब्रह्मरसांतच असतात. भगवंताची प्राप्ती हीच खरी श्रीमंती त्यांना वाटते. ''परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण ।'' असे तुकाराममहाराज सांगताहेत. संतांच्या वचनावर विश्वास ठेवणारे, भक्ती मागणारे जे असतात तेच

संतांना जवळचे वाटतात, आपले वाटतात. त्यांचे लाड करावे असे त्यांना वाटते. जो ज्ञान मागायला येतो, भक्ती मागायला येतो त्याला संत प्रेमाने जवळ घेतात. केवळ कृपादृष्टीनेही त्यांची मागणी ते सहज पुरवूं शकतात. तेवढं त्यांचं सामर्थ्य असते.

त्यांची कृपा झाली की अनुभूती येते. केवळ कृपादृष्टीने भगवंताची प्राप्ती करून देण्याचे सामर्थ्य संतांजवळ असते. त्यांची कृपादृष्टी झाली की दुःखाचे कारण असलेला संसारच नाहीसा होतो. संसार नाहीच, सर्वत्र फक्त भगवंतच आहे हा अनुभव येतो. तोच साक्षात्कार.

***प्रश्न : महाराज, ज्ञानी महात्मा संसारांत असला तरी त्याच्या मनांत संसार नसतो असे सांगतात. मनांत संसार नाही अशी अवस्था कशी प्राप्त होते?***

उत्तर : संसारही आहे मनामध्ये आणि ईश्वराचं अनुसंधानही आहे,असं दोन्ही होऊ शकत नाही. संपूर्ण संसार, धन लोभ म्हणून जो आहे तो त्यांच्या मनांतून पूर्णपणे गेलेला आहे. त्याच्याकडे लक्षंच नाहीये. 'ठेविले अनंते तैसेची रहावे, हा एक त्यांचा मोठा गुण आहे. संसाराचा विचार बिलकूल त्यांच्या मनांत येत नाही.

मन संसारांतून मोकळं झालं आणि ईश्वराच्या ठिकाणी स्थिर झालं म्हणजे मग ते मन पुन्हा संसाराकडे येत नाही. हा एक मोठा चमत्कार आहे. त्यांची उपेक्षा बुद्धी इतकी झालेली आहे की संसाराबद्दल कसलीच आसक्ती नाही. इतकी विरक्ती आहे. ही अत्यंत मोठी विलक्षण वृत्ती आहे. उदासीन अवस्था आहे, पुन्हा ईश्वराच्या ठिकाणी

तितकीच तन्मयताही आहे. दोन्ही आहे. आणि अशा दोन्हीही अवस्थेमध्ये असणारे महात्मेच जगाचं कल्याण करू शकतात.

***प्रश्न : महाराज, गाणगापूरला भास्कर ब्राह्मणाने तीन पात्रांसाठी स्वयंपाक केला होता पण नरसिंह सरस्वती स्वामीमहाराजांच्या कृपेने सर्व गांव जेवले आणि तरीही अन्न उरले असे सांगतात. हा चमत्कार केवळ भास्कर ब्राह्मणाच्या श्रद्धेमुळे घडला कां ?***

उत्तर : खरी भक्ती कशी आहे हे दाखवायचं आहे महाराजांना. श्रद्धेचे माहात्म्य दाखवण्यासाठी सिद्धी वापरली. तीन पात्रं अन्न फक्त होतं. महाराजांनी त्या पात्रांवर आपली छाटी झाकण्यास दिली आणि मंत्र म्हणून त्यावर जल प्रोक्षण केलं त्याला प्राकाम्य सिद्धी म्हणतात. सर्वांना जेवायला बोलवायला भास्कर ब्राह्मणाला सांगितलं. भास्कर ब्राह्मणाने बोलावलं. तीनच पात्रांचा स्वैपाक केलाय तो सर्व गावातल्या लोकांना कसा पुरेल असा विकल्प त्याच्या मनांत आला नाही. महाराजांच्यावर पूर्ण विश्वास आहे. सर्वांना जेवायला घालायचे असा महाराजांचा संकल्प आहे. माझा स्वयंपाक कुठला ? माझं अन्न, माझं मन, माझं शरीर सर्वच त्या परमेश्वराने निर्माण केलेलं आहे. माझं असं म्हणायचं कसं?

ईश्वरावर विश्वास ठेवल्यावर काही कमी पडेल अशी शंका मनांत आणणे म्हणजे खरा विश्वास नाही तो. ईश्वरावर पूर्ण निष्ठा असल्यामुळे व्यवहारातील अनुकूल प्रतिकूल गोष्टी मनांतच येत नाहीत. ही भक्ताची योग्यता आहे. एवढ्या लोकांना पुरेल एवढं अन्न या तीन पात्रातून कसं आलं याचं उत्तर कुठला बुद्धिवादी देऊ शकेल कां? कसं होईल, काय

होईल या फक्त शंका आम्ही मनांत घेतो. पण हे झालं कसं याचा विचारच करता येत नाही. अचिंत्य शक्ती आहे ईश्वराची. तर्क करायचा झाला तर ज्याच्याबद्दल तर्क करता येईल त्याच्याबद्दल करावा. अनुभव घेऊनसुद्धा ही शक्ती मान्य न करणाऱ्याला प्रत्यक्ष ब्रह्मदेवही पटवून देऊ शकणार नाही. ईश्वराच्या लीलेबद्दल संशय असून उपयोगी नाही. फक्त ती पहायची. त्यांत आनंद आहे. सृष्टीची उत्पत्ती, स्थिती आणि लय ही परमेश्वराची लीला खरे भक्तगण पहातात फक्त आणि आनंदात राहतात.

## ❋ साधनामार्गावर साधक विशिष्ट टप्प्यापर्यंत आल्यानंतर त्या संदर्भात श्रीदत्तमहाराजांशी झालेली संभाषणे -

*(कांही भक्तांचे मन लौकीक व्यवहारांत रमेनासे होते आणि आध्यात्मिक प्रगती वेगाने व्हावी हाच एक ध्यास घेऊन ते साधनाभ्यासावर लक्ष केंद्रित करतात. आपली प्रगती पुरेशी होत नाही असे वाटून कांही भक्त उतावीळ होतात आणि अधीरतेने श्रीदत्तमहाराजांकडे जातात. अशाच एका उतावीळ भक्ताने अधीर होऊन श्रीदत्तमहाराजांना कांही प्रश्न विचारले. त्या विशिष्ट प्रसंगातील संभाषण पुढे दिले आहे.)*

***प्रश्न : महाराज, अंतःकरणांत सद्‌गुरूंना शोधू द्या व त्यांच्याशी एकरूप होऊ द्या. फार खेळणी दिलीत आपण आतापर्यंत. आता खेळण्याचा कंटाळा आला. आता खेळणी नकोत.***

उत्तर : चालायचंच. व्यवहार सांभाळला पाहिजे. साधनाभ्यास चालू ठेवायचा. होतं हळूहळू.

***प्रश्न : महाराज, साधनाभ्यास तर चालूच आहे. व्हायचं तरी केव्हा आमचं?***

उत्तर : तळमळ उत्पन्न झाली म्हणजे होतं आपोआप देवाच्या कृपेने.

***प्रश्न : महाराज, संसाराचा कंटाळा आला आता. हे एक व्हावं असं तीव्रतेने वाटतंय.***

उत्तर : जबाबदारी आहे. कंटाळा करून भागत नाही.

***प्रश्न : महाराज, ''असे मी सच्चिदानंद । नित्य शुद्ध बुद्ध निर्भेद । नित्यमुक्त परमानंद । अनंतवेदवेद्य मी'' असं वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांनी म्हटलंय. हे वाचलं. हे शाब्दिक ज्ञान झालं. सद्गुरूंनी जर कृपा केली नाही तर आम्हाला त्याचा अनुभव यायचा कसा?***

उत्तर : शाब्दिक ज्ञानाचंच सारखं चिंतन करायचं, हे जे शाब्दिक आहे तसा मी आहे. असं अखंड चिंतन ठेवायचं. ध्यान हे असेच करायचं. दुसरं कोणतं करायचं? मी देह नाही, मी आनंदरूप आहे. मी सच्चिदानंदरूप आहे. हे चिंतन करता करता समाधी अवस्थेचा लाभ होतो. समाधीनंतर साक्षात्कार.

***प्रश्न : महाराज, कर्म एकामागून एक चालूच आहेत. जन्ममृत्यूच्या या चक्रांतून सुटका तरी केव्हा व्हायची?***

उत्तरः कर्म संपल्याशिवाय जन्म थांबत नाहीत. कर्म अनेक जन्म केलेली असतात. हे कोणाला ज्ञान आहे? ते संपेल तेव्हा जन्म जाईल. ज्ञान झाल्याशिवाय कर्म संपत नाही.

***प्रश्न : महाराज, सद्गुरू कर्मनाश नाही का करू शकत?***

उत्तर : देवाची भक्ती करून शांती मिळवावी. जन्म आला म्हणून बिघडलं कोठे? तुकाराममहाराज कांही जन्माला भीत नाहीत. हे चालायचंच.

***प्रश्न : महाराज, किती जन्म थांबायचे ?***

उत्तर : किती जन्म झाले हे माहीत आहे कां? किती जन्म झाले हे माहिती आहे कोठे? ते माहिती असते तर कंटाळा आला असता.

कंटाळा येत नाही. म्हणायचे आपलं. रोजचे खाणेपिणे पाहिजे. हे पाहिजे सगळे पाहिजे. शरीर म्हटल्यावर सगळं पाहिजे. नाही कसं? व्यवहार सुटायचा नाही. प्रार्थना करायची. भक्तीचा आनंद घेत रहायचं.

***प्रश्न : महाराज, पुन्हा दुसरं खेळणं टाकता आहात आपण.***

उत्तर : हा खेळ नाही. व्यवहार जो आहे हा खेळ नाही. जन्म मृत्यू हे सगळे ठरलेलेच आहेत. खेळ कसला त्यात. साधना करीत रहायचं. नामस्मरण चालू ठेवायचं. सद्गुरू काय करणार? नामस्मरण अखंड चालू ठेवलं म्हणजे झाले. ईश्वराच्या कृपेनेच सगळं होईल. ईश्वराची उपासना, प्रार्थना नित्य अखंड चालू ठेवायची. ईश्वराजवळ मागायचे हे. सद्गुरूस्वरूपही ईश्वरच आहे. ईश्वराची शक्ती अनंत आहे.

***प्रश्न : महाराज, हे मिळतंय ते मिळतंय. पण त्यांत खरं सुख नाही आहे. खरं सुख सद्गुरूंशी एकरूप होण्यात आहे.***

उत्तर : तळमळीने होतं आपोआप. तळमळ जशीजशी वाढत जाईल तसं होतं आपोआप.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंचे दर्शन घ्यायला आम्ही काही नेहमी इकडे येऊ शकत नाही. वाटतं सद्गुरू अंतःकरणात सापडावेत. त्यासाठी काय करावे?***

उत्तर : ध्यानाभ्यास त्याकरिताच सांगितला आहे. ध्यान समाधी हळूहळू क्रमाने होते. चित्ताची जेवढी एकाग्रता होईल तेवढा समाधी लाभ झाला म्हणजे झालं. साक्षात्कार होतो.

***प्रश्न : महाराज, वाचलं की स्वस्वरूपानुसंधान म्हणजे भक्ती. शंकराचार्य स्वामीमहाराज म्हणतात. पण ते शाब्दिक ज्ञान झालं नुसतं. त्यांचा काय उपयोग?***

उत्तर : त्याचं ध्यान करीत बसायचं. पण त्याला वेळ मिळत नाही आपल्याला. शब्दांनी हे जे समजलेले आहे, त्यांचे अखंड चिंतन मनाने जर झालं तर मन दुसरीकडे जाणार नाही. एकाग्रता झाली म्हणजे झालं. त्याकरिता मन हे इकडं लागावं अशी ईश्वराला प्रार्थना चालू ठेवायची, तळमळीनं करायची.

***प्रश्न : महाराज, असं कांही मनांत आलं की सद्गुरू पुढे काहीतरी खेळणं टाकतात. कुठेतरी कमिटीवर बसवतात, असोसिएशनचे सेक्रेटरी करतात, कुठेतरी डायरेक्टरपदी बसवतात. कसं व्हायचं?***

उत्तर : असं झालं म्हणून काय झालं? ईश्वराची सेवाच आहे ना ती! कर्तृत्वाचा अहंकार आपल्याकडे घेतला नाही म्हणजे झालं. कितीही मोठेपण जरी आलं, प्रेसिडेंट जरी झालात, राष्ट्राध्यक्ष जरी झालात तरी आपण कांही नाही, त्याची सेवा आहे. या भावनेने समाधान मिळतं. करीत बसायचं अनासक्त रूपानं राहून हळूहळू.

***प्रश्न : महाराज, पण काम करत असतांना बरं वाटत नां?***

उत्तर : व्यवहारातलं काम करता करता वेळ मिळेल तितकं ध्यान करायचं, नामस्मरण करायचं. वेळ मिळेल तेवढा इकडे घालवायचा. त्याने हळूहळू शांतता प्राप्त होईल. एकाग्रता मुख्य मनाची झाली पाहिजे. प्राणायामचा अभ्यासही चालू आहे. होईल हळूहळू. देवावर भार घालायचा. करत रहायचं.

***प्रश्न : महाराज, आमची द्वैत भक्ती होते आहे. अद्वैत भक्ती व्हायची केव्हा?***

उत्तर : आरंभाला द्वैत भक्तीच आहे. शरीर अभिमान संपेपर्यंत द्वैत सुटत नाही. आरंभाला द्वैत भक्तीच असते. ती जितकी जितकी पक्की होत जाईल तेव्हा अद्वैत होतं.

***प्रश्न : महाराज, पण किती जन्म थांबायचं महाराज ?***

उत्तर : आत्मा जर अमर आहे तर काळजीचे काय कारण आहे. जन्म याचा अर्थ देहाशी संबंध. म्हणून जन्म म्हणतो आपण. देहापासून बाजूला होता आलं पाहिजे. म्हणजे जन्माचा काही संबंधच नाही. जन्मही नाही आणि मृत्यूही नाही.

***प्रश्न : महाराज, शाब्दिक ज्ञान होतयं, पण कृतीत येत नाही.***

उत्तर : शाब्दिक ज्ञान जरी झालं तरी ते पक्कं होण्यासाठी अखंड चिंतन घडलं पाहिजे. चिंतनाला वेळ मिळाला पाहिजे. प्रारब्ध अनुकूल पाहिजे. व्यावहारिक सगळी जी काही कामं प्राप्त झालेली आहेत ती सोडून कसं काय करता येईल.

***प्रश्न : महाराज, आता नुसते सद्गुरू पाहिजेत. बाकी काही नको. सगळं सोडून द्यायची तयारी आहे.***

उत्तर : नुसती सोडून द्यायची तयारी असून उपयोग नाही. मनापासून सगळं झालं पाहिजे. मनापासून सुटून झालं तर ना!

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंनी सोडवावं आता अशी प्रार्थना आहे. काय करायचं? सांगावं.***

उत्तर : (श्रीदत्तमहाराजांनी कांहीच उत्तर दिले नाही. ते गप्प राहिले.).

***प्रश्न : महाराज, मला काही लोकांना मार्गदर्शन करायचं नाही. ज्याने हे विश्व निर्माण केलं, त्याने लोकांना मार्गदर्शन करायची काळजी करावी. मला फक्त सद्‌गुरू सापडू देत. काय करायचं सांगावे?***

उत्तर : हे चालूच ठेवायचं ना. संतांनी सांगितलेल्या मार्गाने जायचं. अखंड नामस्मरण करायचं. त्यांत व्यत्यय येऊ नये यासाठी देवाची प्रार्थना करायची. त्यात आपल्या प्रारब्धाने प्रतिबंध होतो. ती सगळी विघ्नं दूर करण्यासाठीच ईश्वराची प्रार्थना आहे. आत्मा आनंदरूप आहे हे कळणं सुद्धा ईश्वराच्या कृपेवर अवलंबून आहे. नुसतं आत्मा साक्षी आहे हे शब्दांनी होत नाही.

'ईश्वरप्रणिधानाद्वा।', 'ततः प्रत्यक्चेतनाधिगमोऽप्यन्तरायाभावश्च।' त्यांनी योगसूत्रामध्ये हे दोन्ही सांगितलंय.

तो साक्षी आहे. आनंदरूप आहे. हे प्रत्यक्ष समजतं. तसं स्वतःला समजेपर्यंत आपण ईश्वराची प्रार्थना करीत रहायचं.

***प्रश्न : महाराज, सद्‌गुरू प्रारब्धाचा नाश कां करीत नाहीत?***

उत्तर : प्रारब्धाचा नाश कोण करणार सांगा ना? ज्याचं त्याचं जे आहे ते ते संकल्पाने संपून जातं ईश्वराच्या प्रार्थनेने. जास्ती तीव्र प्रार्थना हवी. प्रारब्ध हे भोगायलाच पाहिजे. भोगायचं, सहन करायचं. सहन करून भोगून संपवायचं.

***प्रश्न : महाराज, पण मग नवीन प्रारब्ध निर्माण होतं ना? मग जन्मामागून जन्म चालूच रहातात.***

उत्तर : ईश्वरार्पण बुद्धीनं कर्म झाल्यानंतर काही प्रारब्ध होत नाही.

कर्तृत्व आपल्याकडे घ्यायचं नाही हे जर झालं तर मग नवीन प्रारब्ध होत नाही. असलेले संपून जाईल. काही प्रारब्ध ईश्वराच्या नामस्मरणानं जाईल. काही भोगायचं नि संपवायचं. विचारांनी संपवायचे. प्रारब्ध नाश करण्याचे उपाय आहेत. अखंड नामस्मरण चालू होणं, त्याला वेळ मिळणं, एकाग्रता करणं, शांती मिळणं, चिंतन अखंड होणं, हळूहळू होत जातं म्हणजे प्रारब्धाचा नाश होत जातो.

***प्रश्न : महाराज, माझंच प्रारब्ध आडवं येतं असे नाही. बाकीच्या कुटुंबियांचं प्रारब्धही आडवं येतं ना ! त्याचं काय करायचं?***

उत्तर : सगळ्यांचंच प्रारब्ध आहे. ते टाळता येत नाही. सगळ्यांचे प्रारब्ध मिळूनच संसार आहे.

***प्रश्न : महाराज, लौकिक गोष्टी सगळ्या बाजूला झाल्या तरी चालेल, पण हे एक साधावं.***

उत्तर : सगळं एकदम बाजूला होणं कठीण आहे. नुसतं शब्दांनी जरी आपण बोललो तरी तितका मनाचा निश्चय होणं, पुन्हा हे असं असतं तर बरं झालं असतं असं न वाटणं, ही सगळी मनाची तयारी झाली पाहिजे. तोपर्यंत ईश्वराची अखंड प्रार्थना चालू ठेवायची. योगसूत्रकार ईश्वराला ''प्रत्यक्चेतन'' म्हणताहेत, ''अधिगम'' हा शब्द वापरताहेत. ईश्वराचे चिंतन करीत राहिलं म्हणजे ईश्वराचे अनुसंधान साधते आणि शुद्ध आत्मस्वरूपाचं आनंदरूपी आत्म्याचं ज्ञान होतं. समाधी ईश्वरप्रणिधानानेच होते असेही म्हणतातच आहेत ते. समाधी नुसत्या प्रयत्नांनी होत नाही. ईश्वरप्रणिधान व्हावेच लागते.

***प्रश्न : महाराज, नुसत्या प्रार्थनेने किंवा नामस्मरणाने होईल कां?***

उत्तर : प्रारब्धाप्रमाणे जास्तीत जास्त वेळ मिळेल तेवढी प्रार्थना करायची. ईश्वरानेच कृपा करायची. अखंड नामस्मरण चालू रहातं. त्याला वेळ मिळणं, त्यातून होणं, तिकडे जास्तीत जास्त लक्ष जाणं असं हळूहळू होणार ते ईश्वराच्या कृपेने. सगळी विघ्नं दूर होणं हेही योगसूत्रकारांनी सांगून ठेवलंय अंतरायाभवः। ईश्वरकृपेनच सर्व अंतराय म्हणजे अडथळे दूर होतात.

***प्रश्न : महाराज, समजा काहीच वाचलं नाही. नुसतं नामस्मरण चालू ठेवलं तर चालेल का ?***

उत्तर : पण व्हायला पाहिजे नां? असं कसं शक्य आहे? नुसतं नामस्मरण चांगलं. पण होत नाही. किती मनामध्ये विक्षेप असतात ! मनाची गति कांही विलक्षण आहे. झोप आहे, विक्षेप आहेत, आपण काय काय केलेलं आहे त्याचं स्मरण आहे, हे अनेक दोष आहेत. हे सगळे हळूहळू कमी कमी होत जाणार.

***प्रश्न : महाराज, प्रपंचात राहूनही लौकर होईल का एखाद्या गुहेत म्हणा किंवा देवळांत राहून लौकर होईल?***

उत्तर : नुसतं असं कुठं राहून नाही. अखंड ईश्वराचं अनुसंधान राहिलं पाहिजे. ते जास्त महत्त्वाचे आहे. त्याची तळमळ लागली पाहिजे. अनेक जन्मांची कर्मं असतात हे त्यांनी स्पष्टच सांगितलंय. मागील जन्म, मागील कर्मे, मागील भोग. असं सगळं अदृष्ट असतंच. ईश्वराचं अखंड अनुसंधान राहिलं पाहिजे. त्याचं सारखं अनुसंधान मनांत

उत्पन्न व्हायला लागल्यानंतर सात्त्विक अष्टभाव मनांत उत्पन्न होत जातात. नाहीतर चालूच रहातं.

***प्रश्न : महाराज, असं काही विचार करायला लागलं की सद्गुरू पुढे काहीतरी खेळणं टाकतात. खेळायला सांगतात. त्याच्या बरोबर आता काय करायचं?***

उत्तर : जीवांची परिस्थितीच तशी आहे. कर्म करून आलेली मंडळी आहोत आपण. त्यामुळे कोणत्या कोणत्या कर्मांनी काय काय प्रतिबंध होईल किंवा काय अनुकूल होईल ते सांगता येत नाही. आहे ते करत रहायचं आपण.

***प्रश्न : महाराज, पण वेळ लागायला लागला तर?***

उत्तर : जीवात्मा अमर आहे, तो देहापेक्षा वेगळा आहे, हे अगोदर पटलंय कां? देहाभिमान जात नाही, शेवटपर्यंत जात नाही. वाटतं आपल्याला. पण भूक लागली. अमूक लागलं. देहाचं तादात्म्य घेऊनच हे सगळं चाललं आहे. सोडायचं कसं? म्हणून त्यात राहून देवाचं करीत रहायचं. दुसरं काय करणार? आपल्याला वेळ नाही. आत्तापर्यंत वेळ गेला. जाईल वेळ पण आत्म्याला आयुष्य नाही काही नाही. देहापासून जसं जसं बाजूला होता येईल तसं तसं ते होईल. ते केव्हा होईल हे आपण कसं ठरवायचं? आत्ता काही आपल्याला सांगता येत नाही.

***प्रश्न : महाराज, प्रारब्ध भोगून संपवता येईल, नवीन प्रारब्ध उत्पन्न होत नाही याची काळजी घेता येईल. मग तरी होईल ना?***

उत्तर : अहो, पाप असेल ते गेलं. पण पुण्य कसे जाणार? एक एक

जन्माचं प्रारब्ध नसतं ते. सात सात जन्माची प्रारब्धं असतात. चांगलं पुण्य केलेलं आहे. एक जन्म पुण्य केलेलं आहे. एक जन्म, दोन जन्म, सात जन्म भोगावं लागेल. ते टाकायचं कसं? सगळ्या सुखसोयी आहेत. सोडायचं कसं ? आणि सोडून कोण देईल ? वेळ होणारच.

***प्रश्न : महाराज, मग आता करायचं काय ? इच्छा तर आहे.***

उत्तर : देवाची प्रार्थना, अखंड नामस्मरण हे चालू ठेवायचं. दत्तआश्रमांत तुम्हाला शांतपणाने राहाता येईल. ते स्वामीमहाराज परवा येथे येणार आहेत.

***प्रश्न : महाराज, कोणीतरी सांगितलं मला. पण सद्गुरू कोणापेक्षाही श्रेष्ठच आहेत. सद्गुरूंचे दर्शन झाले, सगळं सगळं मिळालं. आणि आता आणखी कोणाचे दर्शन घ्यायचे?***

उत्तर : प्रारब्ध आता सोडायचं कसं? आहे त्यात आपलं समाधानानं देवाचं नामस्मरण करत राहायचं. काय करणार? अजून भोग संपायचा आहे. सगळ्यांची प्रारब्धं एकत्रित येतात. आपलं चांगलं असलं तरी कुटुंबातल्या मंडळींचंही असतं. ते भोगावंच लागतं. काय करणार?

***प्रश्न : महाराज, प्रारब्धाचा नाश होण्यासाठी काहीही करायला तयार आहे. काय सांगाल ते करतो आहे.***

उत्तर : ईश्वराची उपासना करण्याशिवाय दुसरा कोणताही उपाय नाही. उपासनेमुळे प्रारब्ध कमी कमी होत जातं. ज्ञानाच्या जवळ जवळ जाता येतं. सगळी साधनं प्राप्त होणं, सगळी मिळणं हे सुद्धा ईश्वराची कृपा झाल्याशिवाय होत नाही. ईश्वराची कृपा झाली पाहिजे.

***प्रश्न : महाराज, सद्गुरू कल्पवृक्षासारखे असतात. जे मागतात ते मिळते. मुलगा, घरदार सगळं सद्गुरू देऊ शकतात. पण मला ते नकोय. फक्त सद्गुरूशी एकरूप व्हायचंय. दुसरं काहीही नको. सद्गुरूंनी द्यावं ते आता.***

उत्तर : आत्ताच पाहिजे असं कसं म्हणता येईल? ईश्वराची कृपा पाहिजे. नियती म्हणून ईश्वराने नेमून दिलेले आहे. त्याप्रमाणे काळही कारण मानलं पाहिजे. औषध घेतल्याबरोबर लगेच रोग जात नाही. त्यालाही काळ लागणारच. औषधाचा कोर्स असतो म्हणतात. कोर्सही कालच आहे. औषध चालू आहे हे समाधान मिळतं. त्या समाधानाने रहायचं.

*(भक्त जे जे बोलला ते श्रीदत्तमहाराजांनी शांतपणे ऐकून घेतलं होतं. त्याच्या प्रत्येक मुद्याला त्यांनी शांतपणे उत्तरे दिली होती व ते मुद्दे तर्कशुद्ध पद्धतीने पूर्णपणे खोडून काढले होते. भक्ताच्या मनांतील अधीरता, उतावीळता आता संपली होती. मन शांत झाल्यासारखं त्याला वाटलं होतं. शरणागत भावनेनं, लीनतेनं श्रीदत्तमहाराजांना तो म्हणाला.)*

***हो वेळ लागणारच. इतके जन्म आपण थांबलो तर आणखी काही वर्षे.***

*(भक्ताचे सर्व मुद्दे संपले आहेत आणि तो विनीत भावनेने पूर्णपणे शरण आलेला आहे हे पाहून श्रीदत्तमहाराजांनी आपली बोलण्याची पद्धती एकदम बदलली. आत्तापर्यंत भक्ताचा प्रत्येक मुद्दा ऐकून ते शांतपणे तर्कशुद्ध पद्धतीने ते खोडून काढत होते, उलट्या बाजूने ते*

*बोलत होते. परंतु भक्त शरण येताच त्यांनी बाजू बदलली आणि भक्ताची बाजू घेऊन ते एकदम त्याला म्हणाले.) -*

पण ते तरी कशावरून? होणार नाही असं नाही. तुळशीदास किती अगोदर हे होते. पत्नीला माहेरीसुद्धा पाठवीत नव्हते. पण एकदम वळले. या जन्मात होणार नाही असंही नाही. शेवट उत्तम झाला. तुळशीरामायण तयार झालं.

*(श्रीदत्तमहाराजांचे हे उद्‌गार ऐकून भक्त शांतपणे, विनीत भावनेने त्यांच्यासमोर तसाच बसून राहिला. असे कांही क्षण नीरव शांततेत गेल्यावर श्रीदत्तमहाराजांनी घरांतील मंडळींना हाक मारली आणि भक्ताला जेवण वाढायला सांगितलं. सौ.सवितावहिनींनी ताट वाढून पुढे आणलं. भक्ताने अतीव श्रद्धेने तो प्रसाद घेतला आणि श्रीदत्तमहाराजांपुढे साष्टांग नमस्कार घालून तो म्हणाला.)*

***महाराज, हे भोजन दिलंत. आता ब्रह्मभोजन द्या.***

*(- आणि श्रीदत्तमहाराजांच्या मुखांतून आशीर्वादपर अमृतवाणी प्रकटली.) -*

"होईल, ईश्वरकृपेने होईल. ईश्वरप्रार्थना नित्य चालू ठेवा."

## ❋ साधना तीव्र करण्यासाठी सद्‌गुरूंनी दिलेल्या सूचनांसंबंधी संभाषणे -

*(श्रीदत्तमहाराजांनी दिलेल्या सूचनांचे पालन करून अनेक भक्त साधना तीव्र करण्यावर भर देतात. एखाद्या भक्ताची साधना तीव्र व्हावी यासाठी श्रीदत्तमहाराज स्वतः अनेक सूचना करत असत आणि डॉ. अशोकमहाराज आणि सौ. ताईमहाराज यांच्याद्वाराही अनेक सूचना करत असत. साधना तीव्र करण्यासंबंधी श्रीदत्तमहाराजांनी दिलेल्या सूचनांच्या संदर्भात भक्ताने जे प्रश्न श्रीदत्तमहाराजांना विचारले ती प्रश्नोत्तरे पुढे दिली आहेत.)*

***प्रश्न : महाराज, प्रत्येक इंद्रियाची देवता असते असे म्हणतात.***

उत्तर : होय. शास्त्राप्रमाणे प्रत्येक इंद्रियाची एक देवता असते. त्या त्या इंद्रियाचा उपयोग करून कर्म करतांना जर त्या संबंधित देवतेला आवाहन केले तर त्यामुळे त्या कर्माचा आध्यात्मिक प्रगतीला उपयोग होतो. डॉ.सौ.माधुरीताई पणशीकर यांच्यासारख्या जाणकाराकडून या देवतांची व त्यांना करायच्या आवाहनाची अधिक माहिती घेता येईल.

***प्रश्न : महाराज, आध्यात्मिक चर्चा अनुसंधान टिकून रहायला उपयुक्त ठरतात काय?***

उत्तर : सद्‌गुरूंच्या प्रगत साधकांशी आध्यात्मिक चर्चा मननाच्या दृष्टीने उपयुक्त ठरू शकते. पण असे प्रगत साधक फारच थोडे असतात. सामान्यतः आध्यात्मिक चर्चा कोणाशीही करू नये असेच म्हणावे लागेल. परक्या व अपरिचित व्यक्तींशी व अध्यात्ममार्गात फारशी रूची नसलेल्या माणसांशी तर आध्यात्मिक चर्चा कधीच करू

नये. कोणी आध्यात्मिक गोष्टी विचारायला लागला तर तो खरा जिज्ञासू असला तरीसुद्धा एखादा शब्द बोलून चर्चा टाळण्याचाच प्रयत्न करावा. त्यासाठी अगदी तेथून निघून गेले तरी चालेल. मात्र असे करतांना कोणाला दुखवू नये याची जास्तीत जास्त काळजी घ्यावी. सर्वांशी आदराने बोलावे. यामुळे ईश्वराचे अनुसंधान टिकून रहायला निश्चितपणे मदत होईल.

***प्रश्न : महाराज, नामस्मरण सतत करावे हे पटते. परंतु ऑफिसांत काम करतांना नामस्मरण करणे कसे शक्य होईल? कामांत तन्मय झाले की नामस्मरण विसरणार. नाही कां?***

उत्तर : नामस्मरण करण्याचे चार मार्ग आहेत. वैखरी वाणीने, मध्यमा वाणीने, परा वाणीने व पश्यंती वाणीने. घरांत वैखरी वाणीने नामस्मरण करणे निश्चितच उपयुक्त आहे व तसे शक्यही आहे. परंतु वैखरी वाणीने नामस्मरण करणे ही प्राथमिक अवस्था झाली. मध्यमेत म्हणजे आंतरिक नामस्मरण करणे अधिक महत्त्वाचे आहे व ती पुढची पायरी आहे. ऑफिसात काम करतांना आपण कितीही तन्मय झालो तरी मध्यमेत नामस्मरण होतच राहील. तसे झाले पाहिजे. ऑफिसात काम करतांना सद्‌गुरूंचा भाव सदैव जागृत राहिला म्हणजे वरवर जरी नामस्मरण झालेले दिसले नाही तरी नामस्मरण आंत होतच राहील. गुरूशक्ती सदैव जागृत असते. ऑफिसात जे काम आपण करतो आहोत, ते काम गुरूंची आज्ञा पाळण्यासाठीच करतो आहे याची जाणीव ठेवावी. हे काम सद्‌गुरूच करून घेत आहेत. कर्तृत्व आपले नाही, सद्‌गुरूंचे आहे याची जाणीव ठेवली तर ऑफिसमध्ये काम

करतांना मध्यमेत नामस्मरण अखंड होत राहील. मध्यमेत नामस्मरण स्थिर व्हायला हवे. ते गुरूंवरील श्रद्धेनेच होऊ शकते. साधकाच्या दृष्टीने वैखरी वाणीने नामस्मरण ही पहिली पायरी. पुढची पायरी म्हणजे मध्यमेत नामस्मरण. परा व पश्यंती या पुढील दोन वाणीत नामस्मरण होणे हे ऋतंभरा प्रज्ञा प्राप्त झाल्याशिवाय होणार नाही.

**प्रश्न : महाराज, सद्गुरू परीक्षा घेतात असे म्हणतात.**

उत्तर : सद्गुरूंवर निष्ठा तर ठेवलीच पाहिजे. त्याशिवाय आध्यात्मिक प्रगती शक्य होणार नाही. परंतु आपला गुरूभाव व ईश्वरभाव नेहमी अंतःकरणातच ठेवला पाहिजे. तसे करूनच सद्गुरूंच्या आज्ञा कटाक्षाने पाळल्या पाहिजेत. काही वेळा सद्गुरू आपली परीक्षा पाहातात. शिवाय आपल्या आज्ञा पाळतो आहे की नाही याकडे सद्गुरूंचे सतत लक्ष असते. कारण सद्गुरूंना आपल्या शिष्याला त्याच्या मनांतील कामक्रोधादी विकारांतून बाहेर काढायचे असते. म्हणून ते शिष्यावर सतत लक्ष ठेवतात. सद्गुरूंना शिष्याचा उद्धार करायचा असतो. सद्गुरूंचा स्वतःचा उद्धार तर झालेलाच असतो. जर शिष्य त्यांच्या परीक्षेला उतरला तर ते त्या शिष्याचा उद्धार करतात.

**प्रश्न : महाराज, आपल्यावर गुरूकृपा आहे हे कसे ओळखावे?**

उत्तर : सद्गुरूंनी सांगितलेली उपासना आपल्या हातून नियमितपणे होते आहे असे असेल तर आपल्यावर गुरूकृपा आहे असे म्हणायला हरकत नाही. गुरूकृपा असली तरच उपासना नियमितपणे होते. नाहीतर अनेक विक्षेप येतात. शरीराला व्याधी होऊन उपासना न घडणे हा पहिला विक्षेप. झोप येणे व झोपेमुळे उपासना न घडणे हा दुसरा

विक्षेप. आळस शरीरांत भरणे व उपासनेत खंड पडणे हा तिसरा विक्षेप. नको ती व्यक्ती समोर येऊन उपासनेत खंड पडणे हा चौथा विक्षेप. गुरूकृपेनेच हे विक्षेप येत नाहीत. विक्षेप न येता उपासना अखंड चालू रहाणे केवळ गुरूकृपेमुळेच शक्य होते.

***प्रश्न : उपासनेचा अंहकार टाळता यावा म्हणून काय करावे?***

उत्तर : मी उपासना करतो आहे हा विचार किंवा भावना हा उपासनेचा अहंकारच आहे. उपासना चांगली चालली असेल तर ते गुरूकृपेमुळेच घडते आहे याची जाणीव भक्ताने सदैव ठेवली पाहिजे. उपासना चांगली चालणे यांत भक्ताचे कर्तृत्व काहीच नसते. ते केवळ गुरूकृपेनेच घडत असते. मग उपासनेचा अहंकार येण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. पण काही वेळा हा अहंकार येतो. काही व्यक्ती सांगतात, ''मी इतकी उपासना करतो, मी इतकी उपासना केली'' हा सगळा अहंकारच. ''मी इतकी वर्षे उपासना केली पण काही झाले नाही'' असे वाटणे हा अहंकारच. मी ही उपासना करतो व मला हे फळ मिळाले किंवा मिळेल असे विचार मनांत येणे हाही अहंकारच. उपासनेचा अहंकार उपासनेला बाधक ठरतो. अहंकार येऊ नये म्हणून उपासना कोणालाही सांगू नये. उपासनेतील मी गेला पाहिजे. मी हा भाव घालवण्यासाठी उपासनेचा कोठे उल्लेखही करू नये. उपासना आपल्या कल्याणासाठी सद्गुरूंनी दिलेली असते. उपासना दुसऱ्याला सांगून थोडेच कल्याण साधणार आहे? उपासना सांगितली की अहंकार येतो. अहंकारातून लोभ येतो. लोभ सर्वात वाईट. म्हणून उपासनेचा तोंडाने कधीच उच्चार करायचा नाही.

सद्गुरूंसमोरही उपासनेचा उल्लेख करायची गरज नसते. सद्गुरू अंतर्यामी असतात. ते न सांगताच ओळखतात. आपण जितका शरणभाव बाळगू तेवढे उपासनेचे फळ लौकर मिळते.

**प्रश्न : महाराज, पुण्यकर्म कोणाला सांगू नये असे कां म्हणतात?**

उत्तर : केलेले पुण्यकर्म कधी कोणालाही सांगू नये. जर आपल्या हातून पाप घडले व ते पाप जाहीरपणे इतरांना सांगायचे धाडस आपण करू शकत असू तरच आपण केलेले पुण्यकर्म इतरांना सांगणे क्षम्य ठरेल. तसे धाडस कोणातही नसते. म्हणून पुण्यकर्महीही सांगू नये. पुण्यकर्म सांगितल्याने पारमार्थिक हानीच होत असते.

**प्रश्न : आपल्या उणीवा व दोष दूर व्हावेत म्हणून काय करावे?**

उत्तर : रोज रात्री झोपतांना सद्गुरूंच्या फोटोसमोर बसून त्यांना आपण निवेदन करावे. आपल्या हातून घडलेली दुष्कृत्ये किंवा वाईट कृत्ये गुरूंना स्पष्टपणे निवेदन करावीत. सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत काय काय घडले ते सांगावे व ते सर्व त्यांना अर्पण करावे. तसेच चांगली कृत्येही गुरूंना अर्पण करावी. त्यामुळे अनासक्त भाव यायला मदत होते. आपल्या लोभीपणाची, रागीटपणाची व इतर उणीवांची जाणीव आपल्याला झाली व त्यांच्या फोटोसमोर आपण तसे निवेदन केले की सद्गुरू त्या उणीवा दूर करायची प्रेरणा देतात. हे एक प्रकारचे आंतरिक चिंतन आहे. मोठ्याने बोलायची गरज नाही. अंतरांतच निवेदन केले तरी चालेल. यामुळे अनासक्ती यायला मदत होते.

शेवटी मन अत्यंत चंचल असते हे मान्य करावेच लागते. मनाला लगाम घालावाच लागतो. मोठ्या मोठ्या योग्यांनाही असा मनाला

लगाम घालावा लागत असतो. मनाचे चंचलत्व जायला नामस्मरण फार उपयोगी पडते. रात्री झोपण्यापूर्वी असे गुरूंना आंतरिक निवेदन करावे, व दोष व उणीवा दूर करण्यासाठी कळकळीने प्रार्थना करावी. आपले दोष व उणीवा गुरूंना माहिती असतातच. पण ते आपण त्यांच्या फोटोसमोर आंतल्या आंत निवेदन केले की ते निवेदन गुरूंना पोचते. ते प्रसन्न होतात व शिष्याला मार्गदर्शन करतात, मदत करतात. गुरूंनीच प्रेरणा द्यायची आणि दोष व उणीवा घालविण्यासाठी मदत करायची असा भाव आध्यात्मिक प्रगतीला पोषक ठरतो. तसेच पहाटे उठून किंवा सकाळी बैठक करण्यापूर्वीही असेच निवेदन करावे व दिवसभर उणीवा व दोष यामुळे चुका होऊ नये यासाठी सद्गुरूंचे मार्गदर्शन व मदत मिळावी म्हणून त्यांची प्रार्थना करावी. त्यामुळे दोष व उणीवा दूर करायचा प्रयत्न करण्याची प्रेरणा व मदत सद्गुरू देतील.

***प्रश्न : महाराज, अखंड अनुसंधान कसे ठेवावे?***

उत्तर : उगीच फोन करणे, गप्पा करणे, भेटीगाठी, फिरायला जाणे असल्या गोष्टी जास्तीत जास्त टाळाव्या व मिळालेला वेळ नामस्मरणांत घालवावा. त्यामुळे गुरूंचे अनुसंधान टिकून राहील. गुरूंचे अनुसंधान म्हणजे गुरूतत्त्वाशी निगडीत रहाणे. उपासना अखंड, निरंतर व नियमित झाली की असे गुरूतत्त्वाशी निगडीत रहाणे शक्य होते.

***प्रश्न : महाराज, देहात्मभाव कमी व्हावा म्हणून काय करावे?***

उत्तर : मी देह नाही. मी आत्मा आहे. पण आपण देहाशी तादात्म्य घेऊन बसतो, म्हणून सुखदुःखे भोगावी लागतात. देहात्मभाव कमी

करण्यासाठी गुरूंचे आज्ञापालन निष्ठेने करावे. आपले खरे हित कशांत आहे हे आपल्यापेक्षा गुरूंना कळते. त्याप्रमाणे ते आज्ञा देतात, उपासना सांगतात. त्यांच्या आज्ञा कटाक्षाने पाळाव्या. त्यांनी दिलेले नामस्मरण सतत करावे. त्यांनी सांगितलेली उपासना निष्ठेने करावी. तळमळीने प्रार्थना करावी. त्यामुळे देहाचा तादात्म्यभाव कमी होईल. त्यामुळे मी देहापेक्षा वेगळा आहे, मी आत्मा आहे याचा अनुभव येऊ लागेल.

***प्रश्न : महाराज, रामदासस्वामी प्रपंच करावा नेटका असे सांगतात. त्याचा खरा अर्थ काय?***

उत्तर : रामदासस्वामींनी नुसताच प्रपंच असा शब्द वापरला असला तरी त्यांना परमार्थाचा प्रपंच अभिप्रेत आहे. परमार्थाचा प्रपंच जास्त महत्त्वाचा असतो. तो योग्य प्रकारे व्हावा यासाठी प्रयत्न निष्ठेने करावे लागतात. परमार्थात फार विक्षेप येतात. ते येऊ नयेत यासाठी प्रयत्न करावेच लागतात. रोजचा प्रपंच (कौटुंबिक) आपोआप होतच रहातो.

***प्रश्न : महाराज, शुद्ध बुद्धीच्या निष्ठावंत साधकाच्या उपासनेतही विक्षेप येतात. असे कां घडते?***

उत्तर : ते संचित प्रारब्धामुळे घडते. या जन्मांत आपण शुद्ध बुद्धीचे असलो, शुद्ध अंतःकरणाचे असलो तरी मागील कितीतरी जन्मांची संचिताची पुटे असतात. मागील जन्मांचे संचित पुढे येतेच. त्यामुळे हे विक्षेप येतात. एखादा महिना उपासना चांगली होते. पण पुढच्याच आठवड्यात विक्षेप येतात. प्रारब्ध भोगावेच लागते.

***प्रश्न : महाराज, प्रारब्ध म्हणजे काय ते सांगावं?***

उत्तर : क्रियमाण कर्म म्हणजे आता हातून घडणारे कर्म. तेच पुढे संचित होते. त्याचे पुढे प्रारब्ध होते. अनेक जन्मांचे प्रारब्ध असते. एखादा शुद्ध व सदाचरणी मनुष्य दुःखे भोगत रहातो तर एखादा पापी व दुराचारी मनुष्य वैभवात लोळतांना दिसतो. हे प्रारब्ध.

पाश्चात्य लोकही आता पुनर्जन्म मानू लागले आहेत. पाश्चात्य देशांतही काही डॉक्टर व वैज्ञानिक औषधांबरोबरच प्रार्थना करायला सांगतात. एकच रोग, लक्षणे, एकच डॉक्टर, एकच हॉस्पिटल पण एक रोगी पूर्ण बरा होतो तर दुसरा रोगी मृत्युमुखी पडतो. हे कर्मविपाकामुळेच घडते. कर्मविपाक मानल्याशिवाय याची उकल कशी करणार?

आद्य शंकराचार्य सांगतात की जर कर्मविपाक सिद्धांत वा पुनर्जन्म मानला नाही तर जे तुम्ही केलेले नाही ते तुमच्या माथी मारले जाईल. तसेच सत्कृत्य व पुण्य वाया जाते आहे असे दिसेल. म्हणून कर्मविपाक सिद्धांत व पुनर्जन्म मानावाच लागतो.

***प्रश्न : महाराज, पुण्यसुद्धा मुक्तीच्या आड येते कां?***

उत्तर : होय. जसे पापाचे फळ भोगावेच लागते, तसे पुण्याचे फळही भोगून संपवावे लागते. एखाद्या पुण्यवंताला एकाच जन्मातच इतके पुण्य मिळालेले असते की सात जन्म भोगूनही ते संपत नाही. तुम्ही मागच्या जन्मी किती पुण्य केलेले आहे याची तुम्हाला या जन्मी कशी कल्पना असणार? स्वतःचे पुण्य स्वतःच भोगावे लागते. ते सद्गुरूंनाही देऊन टाकता येत नाही व स्वतःच्या मुलांनाही देऊन

टाकता येत नाही. फक्त महात्मा आपले पुण्य शिष्यांना किंवा मुलांना देऊ शकतो. महात्मा म्हणजे ज्याला ब्रह्मज्ञान झालेले आहे तो. तो पाप व पुण्य यांच्या पलीकडे जाऊ शकतो. तो आपले पुण्य मुलांना देऊ शकतो. किंवा शिष्यांनाही देऊ शकतो.

***प्रश्न : महाराज, सद्‌गुरूंचेही असे पुण्य असते काय?***

उत्तर : सद्‌गुरू हे ईश्वरी अवतारच. ते पापपुण्यांच्या पलीकडे असतात. पण सद्‌गुरूंची सेवा केली, स्मरण केले, आज्ञापालन केले तर शिष्यांना पुण्य मिळते तसेच जर एखाद्याने सद्‌गुरूंची अवज्ञा केली, निंदा केली, द्वेष केला तर त्याला पाप लागते. त्याला सद्‌गुरूंचे मागील जन्मांतील शेष पापही भोगावे लागते असे म्हणतात.

***प्रश्न : महाराज, सद्‌गुरूंशिवाय इतर सत्पुरूषांना प्रश्न विचारू नये असे कां म्हणतात?***

उत्तर : सद्‌गुरूंना सोडून आपण जर इतर महात्म्यांना किंवा सत्पुरूषांना प्रश्न विचारीत बसलो तर आपल्या अध्यात्मज्ञानांत विक्षेप येण्याचा संभव असतो. ज्ञानांत गोंधळही होऊ शकतो. ते दूर करायला सद्‌गुरूंनाच त्रास द्यावा लागतो. हा त्रास आपण सद्‌गुरूंना कां द्यावा? खरा गुरू दुसऱ्याचा शिष्य लगेच ओळखतो व त्याला स्वतः उत्तर न देता ते प्रश्न तुझ्या गुरूंनाच विचार असे स्पष्ट सांगतो. गुरूंजवळ ती अंतर्दृष्टी असते.

अध्यात्मसाधनेला फारसे वाचन लागत नाही. एखादाच ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ जन्मभर अभ्यासला तर ते पुरेसे ठरते. पण वाचनापेक्षा गुरूकृपेनेच आध्यात्मिक प्रगती होत असते.

गुरूंना जरूर प्रश्न विचारावे. पण त्यात समर्पणभाव व जिज्ञासा असावी. प्रश्न विचारणारा दांभिक आहे का? अहंकारी आहे कां? परीक्षा घेण्यासाठी आलेला आहे का? हे सद्गुरूंना लगेच ओळखता येते. एकदा ताईमहाराजांना प्रश्न विचारायला एकजण आला. तो उंबऱ्यात आला तोच ताईमहाराजांनी ठामपणे निश्चयी शब्दांत सांगितले, ''परीक्षा घ्यायला आलात का स्वतःच्या जीवनाचे कल्याण करून घ्यायला आलात. परीक्षा घ्यायला आला असाल तर उंबऱ्याच्या आंत पाऊलही टाकू नका. उंबऱ्यातून परत जा.''

सद्गुरूंना खरी निष्ठा व श्रद्धा कळते. कोणी दांभिकपणे निष्ठा दाखवीत असला तरी ते सद्गुरूंना समजते. विचारणारा आपला दंभ व अहंकार सद्गुरूंपासून लपवू शकत नाही.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंना सिद्धी प्राप्त झालेल्या असतात कां?***

उत्तर : सद्गुरूंची आत्यंतिक मनःशुद्धी झालेली असते. त्यामुळे त्यांना अष्टसिद्धी प्राप्त झालेल्या असतात. पण सद्गुरू सिद्धींच्या आहारी जात नाहीत. जो सिद्धीत गुंतला त्याचा अधःपात होतो. सद्गुरू सिद्धीच्या आहारी जात नसल्यामुळे त्यांना अतींद्रिय शक्ती प्राप्त होतात व त्यांचा स्वतःच्या शरीरावर व इंद्रियांवर पूर्ण ताबा येतो. याचे उत्तम उदाहरण ताईमहाराजांच्या रूपाने आपल्याला पहायला मिळते.

***प्रश्न : महाराज, आध्यात्मिक साधनेला साधकाचा कसा स्वभाव पोषक ठरतो?***

उत्तर : दुसऱ्याचा द्वेष करणारा साधक फारशी प्रगती करून घेऊ शकत नाही. एकवेळ दुसऱ्याचा उघड उघड द्वेष करावा. ते चालेल. पण जो

मनुष्य अंतरात द्वेष करतो, वरपांगी गोड बोलतो व तिसरीच कृती करतो, त्याची फारशी प्रगती होऊ शकत नाही. जो साधक सरळ वृत्तीचा आहे, मृदू आहे, ऋजु आहे त्याची प्रगती झपाट्याने होते. रामदासस्वामी म्हणतात, "सदासर्वदा मोकळी वृत्ती राहे।"

रामदासांचे तत्त्वज्ञान मन:शुद्धीवरच आधारलेले आहे. मोकळी वृत्ती म्हणजे सरळपणा, ऋजुता, निष्पाप वृत्ती. असा साधक वेगाने प्रगति करू शकतो. सरळपणा असला की मोह, द्वेष, लोभ हे दोष दूर करणे सोपे होते. सरळ व ऋजु मनुष्य विकारांच्या पलीकडे लौकर जाऊ शकतो. समर्थ रामदास स्वत:ला रामाचा दास म्हणून घेतात. हा दास्यभाव आध्यात्मिक प्रगतीला पोषक ठरतो. शिष्याने सद्गुरूंच्या पायी स्थान मिळावे अशी दास्यवृत्ती विकसित केली की त्याची निरहंकारिता वाढत जाते, सेवाभाव वाढत जातो. आत्मतत्त्वाचा प्रकाश त्यामुळे त्याच्या अंत:करणांत पडायला लागतो. त्यामुळे झपाट्याने आध्यात्मिक वाटचाल होते.

श्रीगुरुमहाराज मन व बुद्धी यांच्या शुद्धतेवर फार भर देतात. मन व बुद्धी यांच्या शुद्धीसाठी चार गोष्टी सांगता येतील.

१. गुरूच्या आज्ञांचे पालन करावे.

२. नामस्मरण जास्तीत जास्त करावे.

३. स्वत:च्या उणीवा व दोष दूर करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत.

४. आसक्ती कमी करायचा प्रयत्न करावा.

***प्रश्न : महाराज, तितिक्षेला फार महत्त्व असते कां?***

उत्तर : होय. मन व बुद्धी यांच्या शुद्धीमुळे तितिक्षा येते. तितिक्षा म्हणजे सहन करणे. तितिक्षा सर्वात महत्त्वाची मानतात. सहनशक्ती सगळीकडेच हवी. घरात, बाहेर सगळीकडे. राग आला तर तो आवरावा. प्रार्थना करीत राहिले की राग कमी होतो. घरातील लोभ व आसक्ती तितिक्षेमुळे कमी होते. तितिक्षेमुळे अलिप्त भाव येतो, उपभोगात कमी कमी आनंद वाटू लागतो.

तुकाराममहाराज म्हणतात, नशिबाने जे मिळेल त्यात संतोष मानावा. द्विसाहस्त्रीमध्ये अशा महात्म्याचे वर्णन ''भूपृष्ठधारी विधीलब्धतोषः'' असे केले आहे. असा महात्मा वर आकाश व खाली जमीन एवढेच मिळाले तरी संतुष्ट रहातो. विधीने जे समोर येईल ते तो आनंदाने स्वीकारतो. काम, रसास्वाद व इंद्रियांचा उपभोग या तीन गोष्टींच्या बाबतीत विधीने जे समोर येते ते तो आनंदाने स्वीकारतो.

***प्रश्न : महाराज, सद्गुरूंना आपले हित जास्त कळते असेच असते ना?***

उत्तर : वयांत आलेल्या सुंदर तरूण मुलीला स्वतःचे हित कळत नाही. आईवडिलांनाच तिचे हित कळते. परमार्थातही तसेच आहे. शिष्याचे हित व अहित सद्गुरूंनाच शिष्यापेक्षा जास्त कळते. परमार्थातील अनुभव शिष्यांना कोठे असतो? तो तर गुरूंनाच असतो. म्हणून शिष्याने सद्गुरूंवर पूर्ण श्रद्धा ठेवावी. गुरू सांगतील तसे वागावे. आपली बुद्धी उगीच चालवू नये. घरात वागतांनासुद्धा आपण वृद्धांना

मान देतोच ना? भारतीय संस्कृतीत वृद्धसेवेला खूपच महत्त्व दिलेले आहे ते याच भावनेतून आहे. यक्ष धर्मराजाला विचारतो, "सर्वात बुद्धिमान कोण?" धर्मराज सांगतो, "जो वृद्धसेवा करतो तो." वृद्धांना अनुभव असतो. त्यांना मुलाचे हित जास्त कळते. म्हणून त्यांचे मार्गदर्शन घ्यावे. जो तरूण वृद्धांना मानतो तोच यशस्वी होतो. म्हणून वृद्धसेवा करणारा सर्वात बुद्धिमान ठरतो. या भावनेने पूर्वी घराघरात वृद्धांना मान दिला जाई. त्यामुळे पूर्वी वृद्धाश्रम नव्हते. आता सारेच बदलत चालले आहे.

***प्रश्न : महाराज, सुखदुःखात समत्व कसे आणावे?***

उत्तर : सुखही अनित्य आहे. दुःखही अनित्य आहे. ते येते व जाते. ते कांही नित्य रहात नाही. दुःखाचे प्रसंग येतात ते आपणाला सद्‌गुरूंकडे लौकर जाता यावे म्हणून येतात. कुंतीने दुःख उगीच नाही मागितले? सुख आले तरी ते अनित्य असते याची जाणीव ठेवली की आपण सुखातच रममाण होऊन गुंतून पडणार नाही. या विवेकामुळे देहभाव कमी होतो. समत्व साधते. देहभाव आहे म्हणून सुखदुःख वाटते. देहभाव गेला की सद्‌गुरूंच्या जवळ लौकर जाता येते.

परदेशप्रवास, प्रतिष्ठा, सत्ता, अधिकार, नावलौकिक, संपत्ती सारे अनित्य आहे. फक्त एक आत्मतत्त्व नित्य आहे. शाश्वत आहे. हे कळणेही गुरूकृपेशिवाय होत नाही. गुरूची कृपा व्हावी यासाठी गुरूसेवा करायची. सेवा म्हणजे स्मरण. गुरूंचे स्मरण केले की गुरू लगेच हजर होतात व मदत करतात अशी श्रद्धा हवी. तुम्ही किती

निष्ठावंत आहात याची ते परीक्षा घेत असतात. त्यांचे तुमच्यावर सतत लक्ष असतेच.

***प्रश्न : महाराज, आध्यात्मिक चर्चा कोणाशीही करू नये?***

उत्तर : होय. लोकांशी आध्यात्मिक बाबतीत चर्चा केली की बुद्धिभ्रम होऊ शकतो. म्हणून अध्यात्माबद्दल तुम्ही कोणाशीही कधीही चर्चा करू नका. तुमचा भाव तुम्ही सदैव जपला पाहिजे. कोणी अध्यात्माबद्दल चर्चा करायला आला तर स्पष्टपणे सांगावे, "माझ्या गुरूंची आज्ञा आहे. आध्यात्मिक चर्चा करायची नाही. मला माफ करा." साधकाने हे निर्भयपणे सांगावे. निर्भयवृत्ती हा साधकाचा पहिला गुण. निर्भयवृत्ती असली की सत्कर्म घडतात. विनाकारण कोणालाही भेटायला जाऊ नये. कोणालाही टेलिफोन करू नये. ऑफिसचे काम सांभाळून जेवढा वेळ मिळेल तेवढा नामस्मरणात घालवावा. बुद्धीचे कार्य आहे निश्चय करणे. निश्चय केला की कृती होते म्हणून निश्चयाने ते ठरवा व तसे पालन करा.

साधना करू लागल्यावर साधकाला अनुभव येतात. ते गुरूकृपेनेच येत असतात म्हणून कोणालाही सांगू नयेत. नाहीतर साधनेत विक्षेप येतो.

***प्रश्न : महाराज, परान्न वर्ज्य केले तर साधनेला फायदा होतो कां?***

उत्तर : साधनेत शुचिता फार महत्त्वाची असते. परान्नामुळे साधनशुचिता रहात नाही. साधनशुचिता बिघडली की साधनेत व्यत्यय यायला लागतात.

साधकाला वाईट काय व चांगले काय हे कळत नाही. उन्नत अवस्था आल्याशिवाय तारतम्य येत नसते. कोण व्यक्ती कशा प्रवृत्तीच्या आहेत हे कळत नाही. आपला मित्र चांगला असला तरी त्याच्या घरात द्वंद्वे असू शकतात. इतर कुटुंबीय वाईट प्रवृत्तीचे असू शकतात. नोकर कुकर्मात व्याप्त असू शकतात. त्यांचे आचरण शुद्ध नसले की त्यांच्या नुसत्या स्पर्शाने, वागण्याने वा बोलण्याने अन्नांतील शुचितेवर वाईट परिणाम होतो. अन्नात अशुचिता स्पर्शानेही उतरते. असे अन्न खाल्ले की उपासनेत विक्षेप येतात. उपासनेला धक्का बसतो. ती हानी भरून काढायला फार काळ लागू शकतो. कोठेही पाणीसुद्धा घेऊ नये. चहासुद्धा घेऊ नये. फारतर दूध घ्यावे. कोठे काही न घेणे चांगलेच.

भागवतात एक कथा आहे. एक सत्पुरूष राजाच्या घरी जेवायला गेला. जेवण झाल्यावर चांदीचा पेला घेऊन तो बाहेर पडला. त्याला अशी चोरीची वासना का झाली तर त्या राजाचा स्वयंपाकी व्यभिचारी व गुन्हेगार होता. अशा माणसाच्या स्पर्शाने दूषित झालेले अन्न खाल्ल्यावर थोर सत्पुरूषाचीही बुद्धी फिरली.

परान्न वर्ज्य केले हे बोलायचे नाही. कांहीतरी कारण सांगून टाळावे. शक्यतो कोणाच्या घरी जायचेच नाही. म्हणजे मग साधनेत विक्षेप येत नाहीत. हॉटेलांत पैसे देऊन जेवले तरी चालेल. पण त्यावेळी जास्त नामस्मरण करून दोष दूर करावा. त्यापेक्षा चणे फुटाणे, कुरमुरे, सुकामेवा असे कोरडे विकत घेऊन खावे. साधनेत सातत्य, निरंतरता व नियमितपणा हवा. धरसोड वृत्ती नको. ध्यान

किती वेळ करता याला महत्त्व नाही. थोडा वेळ करा  पण नियमितपणे करा.

***प्रश्न : महाराज, उद्विग्नता वा निराशा येऊ नये म्हणून काय करावे?***

उत्तर : काही घडले तरी त्रास करून घेऊ नये. रोज सद्गुरूंची प्रार्थना करावी की देहभाव कमी व्हावा व सुखदुःखात समत्व भाव प्राप्त व्हावा.

जे होईल ते एका कानाने ऐकावे व दुसऱ्या कानाने सोडून द्यावे. तिकडे लक्षच देऊ नये. नामस्मरण करीत रहावे. कोणी निंदा करू लागला किंवा  टोचून बोलू लागला तर साऱ्यांना ऐकू जाईल असे ''दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा'' मोठ्याने म्हणावे. सतत मोठ्याने दोन मिनिटे म्हणावे. त्यामुळे तुमचे मन शांत होईल व इतरांच्या मनावर परिणाम होईल. वातावरण बदलेल. मग उद्विग्नता वा खिन्नता येणार नाही. मन देहातच अनेक जन्म गुंतलेले आहे. ते वेगळे करायला वेळ लागणारच. इंद्रियांवर कधीही विश्वास ठेवू नये. सारा विश्वास, श्रद्धा व निष्ठा सद्गुरूंवर ठेवावी. ते शेजारी आहेत व मदत करायला उत्सुक आहेतच. त्यांना आवाहन करावे.  प्रार्थना  करावी.

१. उत्तम साधक म्हणजे ज्याच्या मनांतही पाप येत नाही व तो तसे वागतही नाही.
२. कनिष्ठ साधक म्हणजे मनांत पाप येते पण शरीर तसे वागत नाही.
३. पापी म्हणजे मनांत पाप येताच शरीराने पाप करतो.
४. अधम म्हणजे मनांत पाप येताच शरीराने पाप करणारा व त्याचे समर्थन करणारा.

***प्रश्न : महाराज, मित आहारविहार करावा असे कां सांगतात?***

उत्तर : साधकाने आत्मक्लेश करून घेऊ नये. मित आहार, मित विश्रांति, मित झोप, मित पाणी, मित बोलणे, मित चालणे ठेवावे. जाड्य होईल असे खाऊ नये. पक्वान्ने फार खाऊ नयेत. एकच पदार्थ फार खाऊ नये. भारतीय जेवणपद्धती फार चांगली आहे. कोणत्या पदार्थानंतर काय व किती खावे याचे शास्त्र आहे. आहार व्यवस्थित ठेवला की साधनेला खूप मदत होते. ज्यांची वृत्ती शुद्ध असते, वृत्ती प्रसन्न असते, ज्यांच्या घरी सत्कर्म घडते, ज्यांच्यावर गुरूकृपा झालेली आहे त्यांच्या घरचे अन्न मागून घ्यावे. वासुदेव निवास, दत्त आश्रम, ताईमहाराजांचे घर या ठिकाणी अन्न घ्यावे. ते भाग्य असेल तरच मिळते.

***प्रश्न : महाराज, प. पू. ताईमहाराजांबद्दल माहिती सांगावी अशी प्रार्थना आहे.***

उत्तर : त्या शक्तीदेवता आहेत. साक्षात् भगवती आहेत, आदिमाया आहेत, आदिशक्ती आहेत. त्यांच्या अधिकार फार मोठा आहे. त्यांचे संकल्प सत्य संकल्प असतात. ते लगेच सिद्ध होतात. त्या जगाच्या कल्याणासाठीच आहेत. स्वतःच्या देहाला त्या मानतच नाहीत. त्या किंडामुंगीलाही किंवा डासालाही धक्का लावणार नाहीत. ''सर्वभूतहितेरताः'' या वृत्तीचे त्या उत्तम उदाहरण आहेत. त्यांची तितिक्षा फार मोठी आहे. त्यांची अद्वैत भक्ती आहे. त्यांचे दर्शन व आशीर्वाद आध्यात्मिक प्रगतीला फारच मोलाचे ठरतात असा अनेक साधकांचा अनुभव आहे.

***प्रश्न : महाराज, काळजी करू नये हे पटते. पण ते घडावे कसे?***

उत्तर : सर्व काळजी श्रीगुरूमहाराजांच्या चरणी अर्पण करावे. काळजी करून प्रश्न सुटत नसतात. सारे श्रीगुरूमहाराजांवर सोपवावे. ते बघून घेतील. घरांत किंवा ऑफिसांत जे योग्य व हिताचे असेल तेच श्रीगुरूमहाराज करतील अशी खात्री ठेवावी. आपण निमित्तमात्र आहोत याची जाणीव ठेवली की श्रीगुरूमहाराज सारे करून घेतात.

***प्रश्न : महाराज, प्रपंचात राहूनही अनासक्त कसे व्हावे?***

उत्तर : प्रपंच व परमार्थ दोन्ही श्रीगुरूमहाराजांवर सोपवावे. आपण नामस्मरणात जास्तीत जास्त काळ घालवावा. प्रपंचाचे विचार मनांत येताच थांबवावे. व नामस्मरण पुन्हा सुरू करावे. हळूहळू त्यामुळे अनासक्तपणे जीवन जगणे शक्य होईल. श्रीगुरूमहाराजांनी तुम्हाला आशीर्वाद दिले आहेत. ते सारे बघून घेतील. तुम्ही प्रार्थना व नामस्मरण करीत रहा म्हणजे ते पुरेसे आहे. निंदा झाली, टोचून बोलणे ऐकावे लागले तरी गप्प बसावे. सहन करावे. उत्तरच देऊ नये. ''अतृणेपतितोवन्हिः । स्वयमेवोपशाम्यति ।'' अग्नि गवतावर पडला तरच गवत पेटते. तसे सहन केल्याने रागावलेला मनुष्य हळूहळू शांतच होणार. ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ या संतांनी काय काय सोसले. जे परमेश्वराने दिले आहे त्याबद्दल कृतज्ञ राहिले पाहिजे. त्यामुळे शांती लाभेल. पैशाची कसली श्रीमंती ! तो यायचा व दुसरीकडे जायचा. खरी श्रीमंती भक्तीची. समाधान हीच खरी श्रीमंती. जे समाधान भक्तीने मिळते ते पैशाने,उपभोगाने किंवा कशानेही मिळणार नाही. जो समाधानी तो श्रीमंत. जो वखवखलेला तो दरिद्री.

## आत्मसाक्षात्काराच्या अवस्थेसंबंधीची प्रश्नोत्तरे -

*(अनेक भक्त आणि साधक आत्मसाक्षात्काराच्या अवस्थेसंबंधी श्रीदत्तमहाराजांना प्रश्न विचारत असत. त्यांतील कांही निवडक प्रश्नोत्तरे पुढे दिली आहेत.)*

***प्रश्न : महाराज, सर्व दुःखे केव्हा संपतील ?***

उत्तर :''यदा चर्मवदाकाशं वेष्टयिन्ति मानवाः। तदा देवमविज्ञाय दुःखस्यान्तो भविष्यति।'' असे वेदही सांगत आहेत. आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाल्याशिवाय सर्व दुःखांचा अंत होणे शक्य नाही. आकाशाचीही घडी एखाद्या वेळी आपणाला करता येईल पण या संसारांत आत्मस्वरूपाचा यथार्थ साक्षात्कार झाल्यावाचून कोणाच्याही दुःखाचा पूर्णपणे अंत झाला आहे असे मात्र आढळून येणार नाही. हा श्रुति-विहित आणि पूर्वानुभवसिद्ध असा अबाधित सिद्धान्त आहे.

***प्रश्न : महाराज, आत्मसाक्षात्कार होणे तर खूपच दूरचे आहे. तोपर्यंत समाधान प्राप्त होण्यासाठी आम्ही काय करावे ?***

उत्तर : आत्मस्वरूपाचे चिंतन करीत राहिले म्हणजे समाधान प्राप्त होते. भागवतकार म्हणतात, भगवान् श्रीकृष्ण रोज पहाटेच ब्राह्ममुहूर्तावर उठत असत, हातपाय धुऊन आत्मचिंतन करीत असत. त्याशिवाय या व्यावहारिक जीवनांत सात्त्विक समाधानाचा साक्षात्कार होणार नाही, असे त्यांना आपल्या आचरणाने प्रत्यक्ष दाखवावयाचे होते. आत्मस्वरूपाच्या चिंतनानेही खऱ्या सुखाचा व समाधानाचा जीवाला लाभ होऊ शकतो. प्रसन्न अंतःकरणाने आत्मस्वरूपाचें चिंतन करीत. 'आत्मा हा अज्ञानाच्या पलीकडे आहे, तो ज्ञानमय आहे,

चिन्मय आहे, आनंदमय आहे. या जगात तो एकच एक आहे. तोच सर्वत्र भरला आहे. त्याच्यावांचून दुसरे कांही नाही. तो स्वयंप्रकाश आहे. तो अविनाशी आहे. तो स्वस्वरूपांत प्रतिष्ठित असल्यामुळे अविद्येचा लेशहि त्याला स्पर्श करू शकत नाही. तो आत्मा सदा सर्वकाळ आनंदस्वरूप आहे. ब्रह्माचा विचार करता करता बुद्धीही ब्रह्मस्वरूपच होते व विचार करणाराही पण ब्रह्मस्वरूपच होतो असे उपनिषदकार सांगतात. सर्व संतही तेच सांगतात.

***प्रश्न : महाराज, ब्रह्मचारी म्हणजे सर्व ब्रह्म आहे हे जाणणारा असे म्हणता येईल कां? तो विवाहित असेल, गृहस्थाश्रमी असेल किंवा नसेल कां ?***

उत्तर : शंकराचार्य स्वामीमहाराज सांगतात -

ब्रह्माध्ययनसंयुक्तो ब्रह्मचर्यरतः सदा।
सर्व ब्रह्मेति यो वेद ब्रह्मचारी स उच्यते।

ब्रह्मचारी म्हणजे वेदाध्ययन करणारा, सगळेही नियम घालून ज्ञानार्जन करणारा.

***प्रश्न : महाराज, म्हणजे वेदाध्ययन करणारा गृहस्थाश्रमी असला तरी त्याला ब्रह्मचारीच म्हणायचं कां?***

उत्तर : होय.

***प्रश्न : महाराज, भगवान श्रीकृष्ण म्हणतात - सोळा सहस्त्र नारी असूनही मी ब्रह्मचारीच आहे. याचा अर्थ कसा लावायचा.***

उत्तर : स्त्रीपुरुष हा भेदच नाहीसा झाला. सर्व काही केवळ ब्रह्म आहे ही अनुभूती आहे.

**प्रश्न : महाराज, स्त्रीपुरूष हा भेद मनांतून केव्हा जातो?**

उत्तर : जे कर्म मनाकडून केले जाते ते कर्म असते. केवळ शरीराकडून घडणारे कर्म हे कर्म नव्हे. कांतेला आणि कन्येला तेच शरीर जवळ घेते. पण दोन्ही ठिकाणी मनांतील भाव वेगळे असतात. शरीराचे कर्म एकच असले तरी मनाकडून झालेले कर्म वेगळे असते. मी देह नाही. तर मी देही आहे. मी शरीर नाही. प्राण, मन, बुद्धी अहंकारी नव्हे. पाच कोशांच्या पलीकडे असलेला सच्चिदानंदस्वरूप आत्मा मी आहे हा अनुभवच आला म्हणजे पुरूष-स्त्री हे सर्व भेद ओलांडले जातात. सर्व कांही ब्रह्मच आहे अनुभव आला म्हणजे मनुष्य, पशुपक्षी, कीटक हे भेदही ओलांडले जातात, जड-चेतन हा भेदही नाहीसा होतो.

**प्रश्न : महाराज, भोवती हे विश्व स्पष्टपणे आम्हाला दिसतं, ते सतत अनुभवालाही येतं. मग ते मिथ्या आहे असं का म्हणायचं?**

उत्तर : आपण स्वप्नात असतो तेव्हा जे कांही पाहातो ते सत्यच वाटतं. पण जाग आली की कळतं स्वप्नातलं सगळं मिथ्या होतं. तसा आत्मसाक्षात्कार होईपर्यंत हे विश्व खरं वाटतं. मी कर्ता आहे, मी भोक्ता आहे, मी भोग घेतो आहे असं वाटत रहातं. पण आत्मसाक्षात्कार झाला की हे सगळं मिथ्या आहे असा अनुभव येतो. हे विश्व म्हणजे मायेने निर्माण केलेला भ्रम आहे. हे सगळे व्यवहार आत्मसाक्षात्कार होईपर्यंतच आहेत. माझे मातापिता, माझी पत्नी, माझी मुलं, माझे शत्रूमित्र हे सगळे व्यवहारच आहेत. एकत्र येणं, वियोग होणं, सुखं वाटणं, दुःख होणं, अपमान वाटणं, पराजय वाटणं, प्रेम वाटणं हे सगळे व्यवहारच आहेत. आत्मसाक्षात्कार झाला म्हणजे

हे सर्व व्यवहार मिथ्या होतात. मग हे विश्व मावळून जाते. ''आत्मैवेदं सर्वम् ।'' हे सर्व आत्मस्वरूपच आहे. आपण आत्मा आहोत याची प्रतीति येते. मग व्यवहार उरतच नाहीत. बाहेर हे जे विश्व दिसत आहे ते आत्म्याच्या ठिकाणीच अनुभवाला येत असते. मग कळते. विश्व बाहेर नाहीच आहे. ते विश्व आंतच आहे, आत्म्यातच आहे. आत्मज्ञान झाल्यावर ते मावळून जातात.

आरसा स्वच्छ असला म्हणजे त्यांत समोरचे प्रतिबिंब दिसते. झाडे दिसतात, आकाश दिसतं, डोंगर दिसतात. पण आरशांत काहीच नसतं. आरशाला कशाचाच संग होत नाही. आरशांतली छाया खोटी आहे, मिथ्या आहे. तसंच बाहेरच्या विश्वाची छाया आत्म्यात दिसते, ही मिथ्या असते. आत्मा असंगच आहे.

***प्रश्न : महाराज, आत्मक्षात्कार झाल्यावर अहंकार रहात नाही. मग तो ज्ञानी पुरुष व्यवहार कसा काय करतो?***

उत्तर : आत्मसाक्षात्कार होईपर्यंत देहाला, इंद्रियांना, मनाला विवेकाचे आणि वैराग्याचे वळण लागलेले असते. तेच संस्कार दृढ झालेले असतात. आत्मसाक्षात्कार झाला म्हणजे देहभान हरपते. पण देह, इंद्रिये आणि मन पूर्वीच्या संस्काराप्रमाणेच व्यवहार करीत रहातात. अशा जीवनमुक्ताला कांही इच्छा नाही, वासना नाही, हेतू नाही, कांही नाही. स्वतःला कांही मिळवायचं नाहीये. ज्या वाटेने परमूपदाला पोहोचला ती वाट तो इतरांना दाखवित रहातो. त्याच्या प्रभावामुळे अनेकजण या वाटेकडे वळतात. परमार्थाच्या मार्गावर वाटचाल करीत रहातात. सगळेच परमूपदाला पोहोचत नाहीत. पण या वाटेवर

चालतांना दैवी संपत्तीचा लाभ होतो. दया, परोपकार, शांती, संतोष, मनोनिग्रह, सदाचार हे गुण प्राप्त होतात. दैवी संपत्तीचा प्रसार होतो. सत्प्रवृत्ती वाढीला लागतात. हेही कमी नाही. यासाठीच संतमहात्मे असतात. ''तुका म्हणे आंता । उरलो उपकाराकरता ।'' यांत तुकाराममहाराज हेच सांगतात.

***प्रश्न : महाराज, आत्मसाक्षात्कार झालेल्या पुरुषांना आम्ही दैनंदिन व्यवहार करतांना पाहातो. ते व्यवहार कसे होतात?***

उत्तर : आत्मसाक्षात्कार झाल्यावर ज्ञानी पुरुषाला दैनंदिन व्यवहारही व्यवहार या स्वरूपात रहात नाहीत. त्याच्या मनांत भेदबुद्धीच नसते. ब्रह्माव्यतिरिक्त त्याच्या ठिकाणी कोणतीच भावना रहात नाही. त्याचे सर्व व्यवहार ब्रह्मरूपच होऊन जातात. ते व्यवहार आहेत असे इतरांनी म्हणावे. त्याला मात्र ब्रह्माशिवाय दुसरे कांही दिसतच नाही.

वीजेचा पंखा फिरत असतो. वीज गेल्यावरसुद्धा पूर्वीच्या संस्कारांमुळे तो कांही काळ फिरतच राहातो. आत्मसाक्षात्कारी पुरुषाच्या देहाचे, इंद्रियांचे आणि मनाचे पूर्वीचे संस्कार असतातच. त्या संस्कारांप्रमाणे देह, इंद्रिये आणि मन यांचे व्यवहार होत रहातात. पण हे व्यवहार इतरांसाठी आहेत. इतरांनी व्यवहार बुद्धीने त्यांच्याकडे पहावे. त्याला मात्र ब्रह्माशिवाय दुसरे कांहीच रहात नाही. विश्वाचा आभास त्याच्यासाठी नाही. तो इतरांसाठीच आहे. चिदानंदरूपः शिवोहं शिवोहं हीच त्याची अनुभूती आहे.

***प्रश्न : महाराज, सद्‌गुरूंची सगुण साकार मूर्ती मला डोळ्यासमोर दिसते आहे. त्यांचे साकार रूप पाहून मला अतीव आनंद होतो आहे. माझे हे पहाणे ही मिथ्याच आहे कां ?***

उत्तर : व्यावहारिकदृष्ट्या सत्य आहे, पण पारमार्थिकदृष्ट्या मिथ्या आहे. आत्मज्ञान झाले म्हणजे 'केवळ आत्मस्वरूपच एक सत्य आहे आणि बाकी सारे मिथ्या आहे' हा अनुभव येतो. उपास्य आणि उपासक, गुरू आणि शिष्य हे भेद व्यवहारांत असेपर्यंतच असतात. परंतु आत्मज्ञान झाले की व्यवहार संपतो आणि हे भेदही मावळून जातात.

***प्रश्न : महाराज, अशी आत्मसाक्षात्काराची अवस्था सद्‌गुरूंच्या कृपेने याचजन्मी मला प्राप्त व्हावी अशी इच्छा आहे. तसं होईल कां ?***

उत्तर : ईश्वराची प्रार्थना करायची तळमळीने. ईश्वराच्या कृपेनेच होऊ शकते. 'नाही काळवेळ तयालागी' असे ज्ञानदेव म्हणतात. त्या शक्तीला काही विलंब नाही. जन्माची वाट तरी कशाला पहायची?

***प्रश्न : महाराज, सद्‌गुरूंची कृपा झाली की लौकर होईल असेच कां?***

उत्तर : होय. ईश्वराची किंवा गुरूची कृपा झाली की तशी अवस्था प्राप्त होईल.

## डॉ.शरदूचंद्र कोपर्डेकर यांचे प्रकाशित झालेले संतसाहित्य

*** इंद्रायणी साहित्य प्रकाशन, २७३ शनिवार पेठ, पुणे यांनी प्रकाशित केलेले**

१. श्रीदत्तमहाराज कवीश्वर - विचारधन भाग १ (विस्तारीत दुसरी आवृत्ती)

२. श्रीदत्तमहाराज कवीश्वर -चरित्र आणि विचारधन
(साधकांचे प्रश्न आणि श्रीदत्तमहाराजांची उत्तरे यांचे संकलन असलेला
विचारधन भाग दोन यांत समाविष्ट आहे.)

३. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची विचारसंपदा (विचारधन भाग ३)
(साधकांचे आणखी काही प्रश्न आणि श्रीदत्तमहाराजांची उत्तरें यांचे संकलन)

| | |
|---|---|
| ४. श्रीरामकृष्ण परमहंस | चरित्र |
| ५. स्वामी विवेकानंद | चरित्र |
| ६. श्रीगुलाबरावमहाराज | चरित्र आणि तत्त्वज्ञान |
| ७. श्रीगाडगेमहाराज | चरित्र |
| ८. पातंजल योगदर्शन | भगवान पतंजलींची मूळ संस्कृत सूत्रे, त्या सूत्रांचा मराठी भावार्थ आणि विवरण |
| ९. श्रीरंगअवधूत महाराज | चरित्र (स्वामीमहाराज या अंकात प्रसिद्धी) |
| १०. श्रीचैतन्य महाप्रभू | चरित्र (स्वामीमहाराज या अंकात प्रसिद्धी) |
| ११. श्रीरमण महर्षी | चरित्र (स्वामीमहाराज या अंकात प्रसिद्धी) |

*** वासुदेव निवास, कर्वेरोड, पुणे यांनी प्रकाशित केलेले साहित्य**

१२. गुण गाईन आवडी
(श्रीदत्तमहाराजांची प्रवचने व श्रीदत्तमहाराजांवरील तीन लेख यांच्या संकलनाचे
हे पुस्तक डॉ.सौ. माधुरी पणशीकर यांच्या समवेत संपादित केले आहे.)

*** श्री भगवती प्रकाशन, ६/१, साईविहार, कर्वेनगर, पुणे यांनी प्रकाशित केलेले**

१३. विचारधन भाग १ (साधकांचे प्रश्न आणि श्रीदत्तमहाराजांची उत्तरे यांचे संकलन) (आवृत्ती संपली.)

*** साधुवासवानी मिशन, वासवानी रोड, पुणे-१ यांनी प्रकाशित केलेले साहित्य**

१४. साधु वासवानी चरित्र

*** नवचैतन्य प्रकाशन, शशांक सोसायटी, ए-००२, एक्सर रोड, बोरीवली(प), मुंबई.९२ यांनी प्रकाशित केलेले साहित्य**

१५. स्वामी शिवानंद (ऋषिकेश) चरित्र

१६. शिकवण ज्ञानेश्वरीची
(ज्ञानेश्वरीचे सार या पुस्तकात सुबोध भाषेत गद्यस्वरूपांत दिले आहे.)

*** भारतीय विद्याभवन, चौपाटी, मुंबई यांनी प्रकाशित केलेले संतसाहित्य**

१७. श्रीगुलाबरावमहाराज चरित्र (इंग्रजी भाषेत)

*** विलासराव कोरे, वारणानगर, यांनी प्रकाशित केलेले साहित्य**

१८. सत्संग (श्री. मामासाहेब गुळवणी यांच्या आध्यात्मिक उपदेशांचे संकलन)

***